(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसणे

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत त्यामुळे सभागृहाचे कामकाज स्थगित करावे. आपण या बाबतीत निर्णय द्यावा.

उप सभापती : कॅबिनेट मंत्री येईपर्यंत सभागृहाचे कामकाज स्थगित करावयाचे का ?

श्री. विनोद तावडे : होय.

उप सभापती : सभागृहाचे कामकाज 5 मिनिटांकरिता स्थगित करण्यात येत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज 5 मिनिटांऐवजी 10 मिनिटांकरिता स्थगित करावे.

उप सभापती : आपला प्रश्नोत्तराचा तास वाया जाईल.

श्री. दिवाकर रावते : प्रश्नोत्तराच्या तासाकरिता तेवढा वेळ वाढवून देण्यात येईल असे सांगून आपण सभागृहाचे कामकाज दहा मिनिटांकरिता स्थगित करावे.

उप सभापती : सभागृहाचे कामकाज 5 मिनिटांकरिता म्हणजे 11 वाजून 6 मिनिटांपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.01 ते 11.06 वाजेपर्यंत स्थगित झाली)

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

मुंबईतील भोईवाडा-ागायगांव परिसरातील पालिकेची पुर्व प्राथमिक शाळा पुनर्विकासाच्या नावाखाली बंद करण्यात येत असल्याबाबत

(1) * 30864 श्रीमती अलका देसाई, श्री.एम.एम.शेख, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजन तेली, श्री.मोहन जोशी, श्री.सुभाष चव्हाण, श्री.चरणसिंग सप्रा : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील परळ भोईवाडा- नायगांव परिसरातील गोरगरीब कामगाराच्या मुलांसाठी असलेली पालिकेची शाळा पुनर्विकासाच्या नावाखाली मागील 11 महिन्यापासून बंद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या शाळेतील 250 विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची पूर्वसूचना न देता आजूबाजूच्या शाळांमध्ये स्थलांतर करण्यात आल्यामुळे या मुलांच्या पटसंख्येत वाढ झाल्याने मुलांना वर्गात बसण्यास जागाही अपुरी पडत आहे, हे ही खरे आहे काय,

(3) तसेच सदर शाळेच्या नुतनीकरणासाठी दोन वर्षापूर्वी निधी मंजूर करुनही तो वापरला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(5) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान पाहता उपरोक्त शाळेचा पुर्नविकास त्वरीत थांबविण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात आली आहे,अद्याप, कार्यवाही केली नसल्यास, होत असलेल्या दिरंगाईची सर्वसाधारण कारणे कोणती?

श्री.भास्कर जाधव, श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (1) व (2) प्रश्नाधीन शाळेची इमारत ही जीर्ण व धोकादायक झाल्यामुळे ती रिक्त करुन त्या इमारतीत भरण्यात येत असलेली शाळा अर्धा कि.मी. वर असलेल्या महानगरपालिकेच्या न्यु नायगांव महानगरपालिका शाळेत स्थलांतरित करण्यात आली आहे. सदर ठिकाणी त्यांना बसायला पुरेशी जागा आहे व त्यासाठी पालकांना /विद्यार्थ्यांना पूर्वसूचना देण्यात आली होती. प्रश्नाधीन शाळेच्या इमारतीची महानगरपालिकेकडून पुनर्बांधणी प्रस्तावित असून त्यासाठी निविदा मागविण्यात येत आहे.

(3) हे खरे नाही. प्रश्नाधीन शाळेकरिता मागील दोन वर्षामध्ये निधीची विशिष्ट तरतूद करण्यात आलेली नव्हती.

(4) व (5) प्रश्न उद्भवत नाही.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, भोईवाडा-नायगांव परिसरातील मुंबई महानगरपालिकेची ही शाळा आहे. त्या शाळेमध्ये त्या भागातील कामगार वस्तीतील मुले शिकत होती. मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित खात्यातर्फे कोणतीही पूर्वसूचना न देता ती

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शाळा स्थलांतरित करण्यात आली. त्यामुळे त्या शाळेतील विद्यार्थ्यांचे हाल होत आहेत हे खरे आहे काय ? कारण या प्रश्नाचे उत्तर मला कोठेही दिसून येत नाही. एका बाजूला लेखी उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, "शाळेच्या इमारतीची मुंबई महानगरपालिकेकडून पुनर्बांधणी प्रस्तावित असून त्यासाठी निविदा मागविण्यात येत आहेत." दुसऱ्या बाजूला असे नमूद केले आहे की, "प्रश्नाधीन शाळेकरिता मागील दोन वर्षांमध्ये बजेट ॲलोकेशन केलेले नाही." यापैकी कोणते उत्तर खरे आहे ? तेथील काही लोकांना इमारतीचा केवळ पुनर्विकासच करावयाचा आहे की आणखी काही करावयाचे आहे याबाबत संशोधन होणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, लालबाग येथील मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत माझे शालेय शिक्षण झालेले आहे. प्रश्नाधीन शाळेच्या इमारतीला बदलून दिलेली शाळा अर्ध्या कि.मी.अंतरावर आहे असे उत्तरात म्हटले असले तरी माझ्या माहिती प्रमाणे बदलून दिलेली शाळा दीड कि.मी.अंतरावर आहे. काही लोकांना पुनर्वविकासासाठी शाळांचीच आवश्यकता का भासते याची सुध्दा चौकशी होणे आवश्यक आहे आणि ती केली जाईल काय याचे उत्तर मला मिळणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, आजच्या 'लोकसत्ता' या दैनिकामध्ये एक प्रेस नोट छापून आलेली आहे. त्यामध्ये असून नमूद केले आहे की, "मुंबई महानगरपालिकेच्या ज्या शाळा आहेत त्या शाळा खाजगी शाळा चालकांना किंवा बिल्डर्सना देऊन तेथे त्यांच्या कर्मचाऱ्यांना नेमावयाचे आहे. " ही वस्तुस्थिती असेल तर मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षकांनी कोठे जायचे ? महानगरपालिकेच्या शाळा विकासकांना पुनर्विकासाच्या नावाखाली देण्याला माझ्यासारख्या व्यक्तीचा विरोध आहे. शासन याची नोंद घेऊन मुंबई महानगरपालिकेच्या संबंधितांना तसे कळविल काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, उत्तर क्रमांक 1 व 2 मध्ये असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे की, शाळा स्थलांतरित करण्याबाबत विद्यार्थ्यांना पूर्वसूचना देण्यात आली होती. सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांचे याबाबतचे म्हणणे खरे नाही. त्यांनी असेही मत व्यक्त केले आहे की, या शाळेचा पुनर्विकास करावयाच्या नावाखाली कोणत्या तरी विकासकास ही जागा देण्यात येणार आहे. परंतु तशा प्रकारची माहिती आज तरी शासनासमोर आलेली नाही.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30864.... श्री.भास्कर जाधव.....

शाळेच्या जागेचा आणि इमारतीचा पुनर्विकास करण्याचा प्रस्ताव मुंबई महानगरपालिकेच्या विचाराधीन आहे. त्या अनुषंगाने 10 कोटी 50 लाख रुपये इतक्या रकमेचे बजेट महानगरपालिकेने तयार केलेले आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांना या शाळेचा पुनर्विकास करण्याऐवजी ती शाळा विकासकास देण्याचा प्रयत्न केला जाईल अशी भीती वाटत आहे. याबाबत शासनाकडून 100 टक्के बारकाईने लक्ष ठेवण्यात येईल आणि तसा प्रयत्न यशस्वी होऊ देणार नाही.

यानंतर श्री.शिगम....

अधिकृत पत्र / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे : प्रश्नाच्या उत्तरावरुन असे दिसून येते की ही शाळा जीर्ण झाल्यामुळे रिकामी करण्यात आलेली आहे. शाळेच्या इमारतीची पुनर्बांधणी प्रस्तावित आहे. प्रश्न असा आहे की, आज मुंबई शहरामध्ये मुंबई महानगरपालिकेच्या अनेक शाळा जीर्णावस्थेत आहेत. अशा जीर्ण झ ाालेल्या शाळांचा सर्व्हे केलेला आहे काय, असल्यास किती शाळा जीर्णावस्थेत आहेत ? या जिर्णावस्थेत असलेल्या शाळांच्या दुरुस्तीचा अथवा पुनर्बांधणीचा ठोस कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या एकूण 1319 शाळा आहेत. त्यापैकी 29 शाळांची पुनर्बांधणी करणे आवश्यक आहे. या शाळांचा सर्व्हे झालेला असून अशा शाळांची पुनर्बांधणी करणे हे महानगरपालिकेचे धोरण आहे. या वर्षी मुंबई महानगरपालिकेने शिक्षण विभागासाठी बजेटमध्ये 317 कोटी रु.ची तरतूद केलेली आहे. ही तरतूद केवळ पुनर्बांधणीसाठी नाही.

श्री. भाई जगताप : सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी विचारलेला एक प्रश्न अनुत्तरित राहिलेला आहे. या शाळेतील मुले दीड कि.मी.अंतरावरील शाळेमध्ये स्थलांतरित केलेली असल्यामुळे त्यांना जाण्या-येण्याचा खूप त्रास होतो असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. या मुलांना अर्धा कि.मी.अंतरावरील शाळेत स्थलांतरित करण्यात आलेले आहे असे उत्तरामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. तेव्हा या मुलांना दीड कि.मी.अंतरावरील की अर्धा कि.मी.अंतरावरील शाळेत स्थलांतरित करण्यात आलेले आहे ?

श्री. भास्कर जाधव : भोईवाडा येथील सेंट झेवियर येथील शाळेत या मुलांना स्थलांतरित करण्यात आलेले आहे. मी माझ्या उत्तरामध्ये अंतराचा उल्लेख केलेला नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे प्रत्यक्ष अंतर किती आहे हे तपासून पाहिले जाईल. 2009 पासून मुले त्या शाळेमध्ये जात आहेत. या शाळेच्या पुनर्बांधणीसाठी एकूण साडेदहा कोटी रु.ची तरतूद असून 54 हजार चौ.मी.चे बांधकाम होणार आहे व 32 खोल्या बांधण्यात येणार आहेत. टेंडर नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यामध्ये काढण्यात येईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30864....

श्री. विनोद तावडे : सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी मुले स्थलांतरित केलेली शाळा किती अंतरावर आहे असा प्रश्न उपस्थित केला. मुले स्थलांतरित केल्यानंतर त्यांच्यामध्ये गळती झालेली आहे का हे पाहिले पाहिजे. गळती झालेली नसेल तर केलेले स्थलांतर योग्य आहे असे म्हणावे लागेल. मागे कामाठीपुरा येथील 7व्या गल्लीतील गुजराथी आणि ऊर्दू माध्यमाच्या शाळेच्या संदर्भातील प्रश्न चर्चिला गेला होता. ही गुजराथी आणि ऊर्दू माध्यमाची शाळा कोसळल्यानंतर त्या शाळेतील मुलांना चंद्रमणी-बुद्धविहारमध्ये स्थलांतरित करण्यात आले. त्या ठिकाणी वेश्याव्यवसाय करणा-या स्त्रियांच्या मुलांसाठी एक संस्था नाईट शेल्टर चालवित होती आणि त्या नाईट शेल्टरमधील मुले शाळेत देखील जात होती. तेथील शाळा कोसळल्यामुळे तेथील नाईट शेल्टर देखील बंद झाले. नवीन ठिकाणी नाईट शेल्टर काढण्यास परवानगी दिली नाही. त्या शाळेतील ड्रापआऊटचे प्रमाण वाढले. त्या ठिकाणी नाईट शेल्टर चालविण्यास परवानगी देण्यात येईल असे आश्वासन या सभागृहामध्ये दिले गेले होते. परंतु ती परवानगी अद्याप दिलेली नाही. शिक्षणाच्या हक्काचा कायदा करण्यात आलेला आहे. सरकारने ड्रापआऊट होऊ नये यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. तेव्हा ड्रॉपआऊट किती आहे याची माहिती घेतली तर वास्तव समोर येईल. दुसरा जो चंद्रमणी-बुद्धविहार शाळेचा मुद्दा मी उपस्थित केलेला आहे त्यासंदर्भात तेथे नाईट शेल्टर चालविण्यास परवानगी देण्यासंबंधीचे आदेश माननीय मंत्री महोदय महानगरपालिकेच्या अधिका-यांना देतील काय ?

श्री. भास्कर जाधव : ही शाळा शिफ्ट केल्यामुळे कोणतीही गळती झालेली नाही. या बाबतीत कोणत्याही पालकाची तक्रार नाही. आताच आलेल्या माहिती नुसार अंतर 500 ते 600 मीटर आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : मुंबईतील महानगरपालिकेंच्या शाळांची दुर्दशा झालेली आहे. मुंबई महानगरपालिकेच्या शाळांची किती अनास्था झालेली आहे हे या प्रश्नावरुन दिसून येईल. या शाळेमधील विद्यार्थ्यांना गेल्या दोन, तीन वर्षापासून स्थलांतरित करण्यात आलेले आहे. या प्रश्नाच्या उत्तरात असे नमूद करण्यात आले आहे की, प्रश्नाधीन शाळेच्या इमारतीची महानगरपालिकेकडून पुनर्बांधणी प्रस्तावित असून त्यासाठी निविदा मागविण्यात येत आहे. पावसाळा आला की, मुंबई महानगरपालिकेला मोडकळीस आलेल्या इमारती, मोडकळीस आलेल्या शाळांच्या इमारती दिसतात. महानगरपालिकेचे बजेट 26 हजार कोटी रुपयांचे आहे. इमारती व शाळा पुनर्बांधणीसाठी मोठया प्रमाणात महानगरपालिकेकडे निधी पडून आहे. तीन वर्षापासून सदर शाळा स्थलांतरित करण्यात आलेली आहे. अशी परिस्थिती असतानाही शाळेच्या पुनर्बांधणीसंबंधी निविदा अद्याप मागविण्यात आलेल्या नाहीत. या प्रश्नावरुन महानगरपालिकेचा कारभार कशा पध्दतीने चालतो आहे हे स्पष्ट होते. सदर शाळा पुनर्बांधणीचा प्रस्ताव तातडीने तयार करुन या शाळेतील विद्यार्थ्यांना नवीन इमारतीत लवकरात लवकर कसे आणता येईल या दृष्टीने काय उपाययोजना केली जाणार आहे ?

श्री. भास्कर जाधव : या शाळेची इमारत पुनर्बांधणी करण्याकरिता थोडा विलंब झाला ही गोष्ट खरी आहे. ही बाब शासनाच्या लक्षात आल्यामुळे या शाळेची इमारत पुनर्बांधणी करण्यासाठी येत्या नोव्हेंबर-डिसेंबर पर्यंत निविदा मागविण्यात येईल आणि त्या कामास तत्काळ सुरुवात करण्यात येईल.

श्री.कपिल पाटील : सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी शासनाचे एका गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधले होते. त्याचप्रमाणे सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो प्रश्न विचारला होता त्या प्रश्नाचे शासनाकडून उत्तर आलेले नाही. महानगरपालिकेच्या अनेक शाळा इमारती जीर्ण अवस्थेत आहेत. त्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांची मोठया प्रमाणात गळती आहे. विद्यार्थी महानगरपालिकांच्या शाळेमध्ये जाण्यास तयार नाहीत हा एक महत्वाचा भाग आहे आणि दुसरा महत्वाचा भाग असा आहे की, शाळा इमारतींची पुनर्बांधणी करण्यासाठी पुरेसा निधी उपलब्ध असताना तो खर्च होत नाही. महानगरपालिकेत शिक्षणाच्या बाबतीत प्रचंड दुरवस्था आहे. ती दुरवस्था दूर करण्याचा प्रयत्न शासनाकडून केला जाईल काय ? काही सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी अशी शंका उपस्थित केली होती की, महानगरपालिकेच्या अनेक शाळा खाजगी विना

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अनुदानित महाविद्यालयांना दिल्या गेल्या आहेत ही गोष्ट खरी आहे काय या प्रश्नाचा खुलासा शासनाने केला पाहिजे. शाळा इमारतींची पुनर्बांधणी आणि विद्यार्थ्यांची गळती या बाबतीत शासन काही उपाययोजना करील काय ?

श्री. भास्कर जाधव : मघाशी सन्माननीय सदस्यांनी एकाच वेळी तीन ते चार प्रश्न विचारल्यामुळे एका प्रश्नाचे उत्तर द्यावयाचे राहून गेले ही गोष्ट खरी आहे. सध्याच्या परिस्थितीमध्ये महानगरपालिका हा प्रस्ताव तपासून पहात आहे. महानगरपालिकेच्या शाळा काही खाजगी संस्थांना, काही स्वयंसेवी संस्थाना चालविण्यास दिल्या तर त्याचा काय परिणाम होऊ शकतो आणि त्या शाळा देण्याचा विचार हा महानगरपालिकेच्या एकंदरीत या संबंधीच्या चौकशीवरुन दिसून येते, हे नाकारण्याचे काही कारण नाही. सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये या बाबतीत काही शंका आहेत. सभापती महोदय, मला असे वाटते की, या विषयाच्या अनुषंगाने मुंबईमधील जे सदस्य आहेत त्यांची आपल्या दालनात एक बैठक आयोजित करु व त्या बैठकीस महानगरपालिकेच्या संबंधित अधिकाऱ्यांना उपस्थित राहण्याबाबत सूचना देऊ. सदर बैठकीत सन्माननीय सदस्यांच्या या विषया बाबतच्या ज्या काही सूचना असतील त्या ऐकून घेऊन त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल.

सभापती : ठीक आहे. या बाबतीत माझ्या दालनात बैठक आयोजित करु.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यात राज्य शासनामार्फत बांधण्यात आलेल्या एसआरए योजनेतील

झोपडीधारकांना ओळखपत्राशिवाय घराचे वाटप केल्याबाबत

(2) * 30290 **श्री.किरण पावसकर**, **ॲड. उषा दराडे**, **श्री.हेमंत टकले**, **श्री.रमेश शेंडगे**, **श्री.अमरनाथ राजूरकर**, **श्री.सुभाष चव्हाण** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्य शासनामार्फत बांधण्यात आलेल्या एसआरए योजनेतील 1 लाख 27 हजार झोपडीधारकांपैकी केवळ 9547 झोपडीधारकांना छायाचित्राच्या ओळखपत्राद्वारे घरे वाटप केली व अन्य लोकांना ओळखपत्राशिवाय घराचे वाटप करण्यात आल्याचे माहे मे, 2012 च्या दुसऱ्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(2) तसेच अशी घरे सन 2009 पासून देणे सुरु असून झोपड्यांच्या जागी घरे बांधून पुनर्वसन केलेल्यांना ओळखपत्र देण्याचा कोणताही निर्णय झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, उक्त प्रश्न भाग (1) व (2) प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(4) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार एसआरए योजनेत अपहार होवू नये म्हणून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(5) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत (?)

श्री. सचिन अहिर, **श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1), (2) व (3) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत झोपडीधारकांना परिशिष्ट-2 मधील पात्रतेनुसार निवासी/अनिवासी गाळयाचे वाटप संबंधित झोपडीधारकांचे फोटो काढून ओळखपत्र देण्याचे काम प्राधिकरणामार्फत केले जाते. बृहन्मुंबईमध्ये आतापर्यंत वाटप केलेल्या 61,127 सदनिकांपैकी 16,727 झोपडीधारकांना ओळखपत्रे दिलेली आहेत. प्राधिकरणाने फोटो असलेली संगणीकृत ओळखपत्र तयार करुन देण्यासाठी एका खाजगी संस्थेस काम दिलेले आहे. हे काम अधिक जलद गतीने होण्यासाठी आणखी एजन्सीची नियुक्ती करण्याची कार्यवाही मुंबई झोपडपट्टी प्राधिकरणाच्या स्तरावर सुरु आहे. तसेच बृहन्मुंबईमध्ये ज्या योजना विकास नियंत्रण नियमावली 33 (10) उपकलम 3, 11 अन्वये सुरु आहेत त्या संदर्भात संबंधित योजना राबविणाऱ्या संस्थांकडून झोपडीधारकांना ओळखपत्र देण्यात येते.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पुणे-पिंपरी चिंचवड प्राधिकरणांतर्गत आत्तापर्यंत 12 योजनांमध्ये 3028 सदनिकांचे इ
ोपडीधारकांना वाटप झालेले आहे.

(4) व (5) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत झोपडीधारकांची पात्रता सक्षम प्राधिकाऱ्याकडून परिशिष्ट-2अन्वये काटेकोरपणे तपासली जाते. झोपडीधारकास सदनिका वितरित केल्यानंतर त्यास संबंधित झोपडीधारकांच्या गृहनिर्माण संस्थेचा सदस्य बनविले जाते. अशा प्रकारे वितरीत केलेली सदनिका त्या इमारतीस भोगवटा प्रमाणपत्र दिल्यापासून 10 वर्षे हस्तांतरीत करण्यात येत नाही. त्या अगोदर असे हस्तांतरण झाल्यास त्या झोपडीधारकास निष्कासित करण्याची तरतूद झोपडपट्टी कायद्यात अलीकडेच केलेली आहे.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, यापूर्वी एसआरएमध्ये चाललेला गोंधळ या विषयी सभागृहात अनेक वेळा चर्चा झाली आहे. या अनुषंगाने अनेक प्रश्न उपस्थित झाले होते. मी प्रश्न विचारण्या अगोदर एक गोष्ट सदनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. मी मागच्या अधिवेशनात चामुंडा बिल्डर, पार्ले यांच्या बाबतीत एक प्रश्न सभागृहात उपस्थित केला होता. त्या प्रश्नाची छाननी करुन कारवाई केली जाईल असे सभागृहात माननीय मंत्री महोदयांकडून सांगण्यात आले होते. या अधिवेशनाच्या पूर्वी त्या ठिकाणच्या रहिवाशांना घराच्या चाव्या देण्यात आलेल्या आहेत. आपण किती कार्यक्षम आहोत त्याचे हे एक जीवंत उदाहरण आहे आणि ते उदाहरण या अधिवेशनात देता आले. राज्य शासनातर्फे बांधण्यात आलेल्या एसआरए योजनेतील झोपडीधारकांना ओळखपत्राशिवाय घराचे वाटप केल्याबाबतचा हा प्रश्न आहे. आतापर्यंत 1 लाख 27 हजार झोपडपट्टी धारकापैकी केवळ 9547 झोपडीधारकांना छायाचित्राच्या ओळखपत्राव्दारे घरे वाटप केली या विषयासंबंधी हा प्रश्न आहे.

महोदय, शासनाने उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, " बृहन्मुंबईमध्ये आतापर्यंत वाटप केलेल्या 61,127 सदनिकांपैकी 16,727 झोपडीधारकांना ओळखपत्रे दिलेली आहेत. प्राधिकरणाने फोटो असलेली संगणीकृत ओळखपत्र तयार करुन देण्यासाठी एका खाजगी संस्थेस काम दिलेले आहे. 2009 पासून सदनिका देण्यास प्राधिकरणाने सुरुवात केलेली आहे...

यानंतर श्री. कानडे...

अधोरेखित भाग / भाषणासाठी नाही

सन 2009 पासून झोपडीधारकांना घरे देण्यास सुरुवात केली असे उत्तरामध्ये म्हटले आहे. झोपडीधारकांना ओळखपत्रे देण्याचे काम 2011 पासून एका एजन्सीला दिले हे खरे आहे काय ? ओळखपत्र दिल्यानंतर घरांचे वाटप करणे आवश्यक आहे. परंतु ओळखपत्र देण्याआधीच घरांचे वाटप करण्यात आलेले आहे. अशा पध्दतीच्या 277 प्रकल्पांना परवानगी देण्यात आली नाही. करार केल्यानंतर एकही प्रकल्प पूर्ण झालेला नाही. ज्या बिल्डरांनी प्रकल्प पूर्ण केले नाहीत त्यांच्यावर कोणती कारवाई केली जाणार आहे ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, शासनाने सन 2009 साली श्रध्दा व सबुरी अशा नावाची एजन्सी झोपडीधारकांना ओळखपत्रे देण्यासाठी नेमण्यात आली होती. सन्माननीय सदस्यांच्या भावनांशी मी सहमत आहे. एजन्सी नेमल्यानंतर फोटोपास देण्याचे काम ज्या पध्दतीने पूर्ण व्हावयास पाहिजे होते किंवा जी प्रगती व्हावयास पाहिजे होती ती झालेली दिसत नाही ही वस्तुस्थिती आहे. हे जरी खरे असले तरी माननीय मुख्यमंत्री आणि मी स्वत: असा निर्णय घेतलेला आहे की, येत्या 6 महिन्यांच्या आत या संपूर्ण योजनेचा सर्वे करुन सर्व संबंधित इ ोपडीधारकांना ओळखपत्र देण्याची कार्यवाही केली जाईल. माननीय सदस्यांनी चामुंडा बिल्डर्सच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला आहे त्याची दखल घेऊन जी काही वस्तुस्थिती असेल ती त्यांना कळविण्यात येईल.

सभापती महोदय, एक गोष्ट निश्चित आहे की, केवळ एकाच संस्थेला झोपडीधारकांना ओळखपत्रे देण्याचे काम देऊन काम पूर्ण होणार नाही. ज्यावेळी फोटोपास झोपडीधारकांना इश्यू केले जातात त्यावेळी घरांची लॉटरी काढल्यानंतर अनेक लोक गावी गेलेले असतात, पती-पत्नी एकत्र नसल्यामुळे अडचण निर्माण होते. म्हणून जॉईंट फॅमिलीचा फोटो काढण्याचा निर्णय घेण्यात आला. ओळखपत्रे देण्यास विलंब होत आहे म्हणून येत्या 6 महिन्याच्या आत सर्व पात्र झोपडीधारकांना ओळखपत्र देण्याची कार्यवाही करु.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, अतिशय महत्वाचा आणि झोपडीधारकांच्या दृष्टीने जिव्हाळयाचा विषय आहे. 2009 ते 2012 या कालावधीत 61127 सदनिकांपैकी केवळ 16727 इ ोपडीधारकांना ओळखपत्र दिलेली आहेत असे शासनाने उत्तरात स्पष्ट केलेले आहे. आताच मंत्रीमहोदयांनी सांगितल्यानुसार येत्या 6 महिन्यात ओळखपत्रे देण्याचे काम पूर्ण करण्यात येईल. शासनाच्या क्षमतेबद्दल आमच्या मनात शंका नाही. परंतु येत्या 6 महिन्यात हे काम पूर्ण होईलच असे म्हणण्याचे धाडस मला करता येणार नाही. श्रध्दा आणि सबुरी नावाच्या एजन्सीला ओळखपत्र देण्याचे काम दिलेले आहे. आमची सबुरी आहे पण श्रध्दा कशी ठेवणार ? हे काम कशा पध्दतीने होणार आहे ते स्पष्ट झाले पाहिजे...

सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा. माझी दमछाक होत चालली आहे म्हणून सांगतो.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, जवळजवळ 35000 ते 40000 घरांचे वाटप होणार आहे. या झोपडीधारकांना ओळखपत्रे देण्यासाठी पुरेशी यंत्रणा आहे काय ? अशा पध्दतीनेच दुसऱ्या एखाद्या एजन्सीची नेमणूक करुन येत्या सहा महिन्यात हे काम पूर्ण होणार आहे काय ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे 2011 मध्ये आणखी काही एजन्सी पुढे येऊन हे काम करु शकतील काय यादृष्टीने जाहिरात देण्यात आली होती. परंतु त्याला प्रतिसाद मिळाला नाही. आधार कार्डाच्या माध्यमातून किंवा केंद्र शासनाचा जो निधी येतो त्यासाठी एजन्सीमार्फत कंपलसरी आय.डी. द्यावे लागते अशा यंत्रणेचा समावेश करु आणि येत्या सहा महिन्यात हे काम पूर्ण झालेले दिसून येईल.

नंतर श्री. भोगले

अप्रुव्हड पत्र / प्रिव्हिलेज नाही

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, एसआरए योजनेमध्ये गुंड प्रवृत्तीच्या व्यक्ती बिल्डर म्हणून घुसलेल्या आहेत. या योजनेमध्ये मोठया प्रमाणात गुंडगिरी चाललेली आहे. झोपडीधारकांना पात्र किंवा अपात्र ठरविण्यामध्ये हे बिल्डर महत्वाची भूमिका बजावितात. ज्या झोपडीधारकांना अपात्र ठरविले जाते ते अन्यायाविरुध्द एसआरएच्या सक्षम प्राधिकाऱ्यांकडे दाद मागतात. परंतु त्यांच्या अर्जाबाबत सहा-सहा महिने निर्णय दिला जात नाही. वर्षानुवर्षे अशी प्रकरणे रेंगाळत पडतात. गरीब झोपडीधारकांना न्याय मिळविण्यासाठी शेवटी स्थानिक आमदारांकडे धाव घ्यावी लागते किंवा मंत्रालयातील गृहनिर्माण विभागामध्ये खेटे घालावे लागतात. अशा प्रकरणामध्ये तातडीने निर्णय होण्यासाठी शासन विशेष यंत्रणा निर्माण करणार आहे काय?

सभापती महोदय, आज वांद्रे येथे एसआरए योजनेमध्ये प्रत्येक चौरस फुटाचा दर 40 ते 50 हजार रुपये इतका आहे. मुंबईतील प्रख्यात गुंड प्रवृत्तीच्या दिवाण बिल्डरने केलेल्या अनेक घोटाळ्यांबाबत मी सभागृहात विषय मांडण्याचा प्रयत्न केला होता, परंतु मला त्यात यश आले नाही. या दिवाण बिल्डरने वांद्रे येथील आरक्षित जागेवर एसआरए योजनेची इमारत बांधून करोडो रुपये कमावले आहेत. इमारत बांधलेल्या जागेवरील आरक्षण मिठी नदीच्या पात्रात शिफ्ट करण्याचे घाटत आहे. याबाबत शासन ठोस कारवाई करणार आहे काय?

सभापती महोदय, पवई येथे हिरानंदानी बिल्डरने गरिबांसाठी छोटी घरे बांधण्याचे सरकारला हमीपत्र देऊनही मोठ्या क्षेत्रफळाचे फ्लॅट बांधून ते खुल्या बाजारात विकले व करोडो रुपयांचा नफा कमावला. त्या संदर्भात शासनाने कारवाई करण्याच्या दृष्टीने भूमिका घेतल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. या प्रकरणात शासनाचे प्रधान सचिव श्री.बेंजामिन यांच्यावरही खटला दाखल झालेला आहे. मुंबई शहरातील बिल्डर मंडळी फार उन्मत्त झालेली आहेत. त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई करण्याबाबत शासनाकडून कोणता निर्णय घेण्यात येणार आहे?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाचा रोख व्यापक झालेला दिसून येतो. निश्चितपणे शासनाने एसआरए योजनेतील अपात्र ठरविल्या जाणाऱ्या झोपडीधारकांबाबत एक यंत्रणा कार्यान्वित केलेली आहे. त्या संदर्भातील पाच-सहा बंधने कमी करण्याच्या दृष्टीने स्लम ॲक्टमध्ये नव्याने तरतूद करण्याचा प्रयत्न केला असून माननीय राष्ट्रपती महोदयांनी मान्यता दिल्यामुळे सक्षम प्राधिकारी किंवा विभागीय आयुक्त यांना असलेले अधिकार

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शासनाकडे घेण्याचा प्रयत्न करीत आहोत. आजही झोपडीधारकांना अपात्र ठरविण्याचे अधिकार महानगरपालिका किंवा म्हाडाकडे असून एसआरए योजनेचे सक्षम प्राधिकारी अपिलेट ॲथॉरिटी म्हणून काम करतात. त्याबाबत आणखी उपयोजना करता येईल काय हे पाहिले जाईल. इतर जे दोन प्रश्न उपस्थित केले आहेत ते या प्रश्नाशी संबंधित नसले तरी माननीय सदस्यांचे म्हणणे समजून घेऊन त्यातून योग्य तो मार्ग काढला जाईल.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, एसआरए योजनेतील त्रुटींबाबत मी कागदोपत्री पुरावे सादर केलेले आहेत. एसआरए योजनेतील बिल्डर मंडळींवर शासनाचा कोणताही अंकुश नाही हे कॅगने देखील आपल्या अहवालात नमूद केलेले आहे. दिनांक 1 जानेवारी, 1995 रोजी संबंधित जागेवर जे झोपडीधारक राहत आहेत त्यांच्यासाठी एसआरए प्रकल्प राबविला जातो. परंतु अनेक प्रकरणांमध्ये झोपडीधारकांना अपात्र ठरविण्यात आलेले आहे. ज्यांना अपात्र ठरविण्यात आले आहे त्यांच्यासाठी शासन एक खिडकी योजना राबविणार आहे काय याचे उत्तर एसआरएकडून दिले जात नाही. अपात्र झोपडीधारक अन्यायाविरुध्द दाद मागण्यासाठी उप जिल्हाधिकारी यांच्याकडे जातात तेव्हा त्यांना सक्षम प्राधिकाऱ्यांकडून काटेकोरपणे पात्रतेबाबत तपासणी केली असल्याचे सांगितले जाते. काटेकोरपणे तपासणी झाली असेल तर माझ्यासारख्या सदस्याला एसआरए योजनेतील भ्रष्टाचाराबाबत सभागृहात कागदोपत्री पुरावे देण्याची वेळ का येते? मी या सदनामध्ये एसआरए योजनेमध्ये एकाच कुटंबाला एकापेक्षा अधिक सदनिका दिल्याबाबत तीन वेळा कागदोपत्री पुरावे सादर केलेले आहेत. एका कुटुंबातील सदस्याला एका योजनेतील इमारतीमध्ये सदनिका मिळाल्यानंतर पुन्हा दुस-या योजनेमध्ये पात्र ठरवून सदनिकेची चावी देण्यात आली आहे. अशा प्रकरणांबाबत शासन कठोर कारवाई करणार आहे काय?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, त्यांनी स्पेसिफिक पुरावे माझ्याकडे पुन्हा द्यावेत. ते पुरावे दिल्यानंतर तत्काळ संबंधित अधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश देण्यात येतील.

नंतर श्री.खर्चे...

अप्रधानित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औरंगाबाद महानगरपालिकेच्या नगर रचना विभागातील 3000 नस्त्या गहाळ झाल्याबाबत

(3) * 30057 श्री.सतीश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.वसंतराव खोटरे : तारांकित प्रश्न क्रमांक 21899 ला दिनांक 21 डिसेंबर, 2012 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) औरंगाबाद महानगर पालिकेच्या नगर रचना विभागातील 3000 नस्त्या गहाळ झाल्याचे माहे मे 2012 च्या पहिल्या आठवड्यात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(2) तसेच महापालिकेने दोन वर्षापूर्वी दिलेले 12 कोटी रुपयाचे 278 धनादेश बँकेत वटलेच नाहीत, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले आहे,

(4) असल्यास,त्यानुषंगाने संबंधितांवर काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. भास्कर जाधव, श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (1) औरंगाबाद महानगर पालिकेने अभिलेख कक्षातील संचिका वेळेवर मिळत नसल्याने या संचिकांचे लेखापरिक्षण केले असता अभिलेख कक्षात 2837 संचिका अनुपलब्ध असल्याचे आढळले. त्यापैकी 885 संचिका कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी अभिलेख कक्षातून घेतल्याचे तर 1952 संचिका उपलब्ध होत नसून त्याबाबतची पोचही दिसून येत नाही. त्या मूळ गठ्ठ्याशिवाय अन्य गठ्ठ्यांमध्ये ठेवल्या गेल्या असण्याची शक्यता विचारात घेवून त्याची खातरजमा औरंगाबाद महानगर पालिकेमार्फत करण्यात येत आहे. ते पूर्ण झाल्यानंतरच नस्त्या गहाळ झाल्या आहेत किंवा कसे हे अंतिमत: स्पष्ट होईल.

(2) हे खरे नाही.

(3), (4) व (5) प्रश्न उद्भवत नाही.

महोदय, या प्रश्नाच्या उत्तरात मला आपल्या परवानगीने पुढीलप्रमाणे सुधारणा करावयाची आहे :--

प्रश्न क्र. 1 ला दिलेल्या उत्तरात तिसऱ्या ओळीत अभिलेख कक्षात "2837 संचिका" असे म्हटले आहे. त्याऐवजी "2870 संचिका" असे वाचावे.

त्याच ओळीत "885 संचिका" असा शब्दप्रयोग केला त्याऐवजी "918 संचिका" असे वाचावे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 30057.....

श्री. वसंत खोटरे : औरंगाबाद महानगरपालिकेच्या अखत्यारित असलेल्या नगररचना विभागातील 3000 फाईल्स गायब झालेल्या आहेत. तसेच या फाईल्सवर सह्या आहेत पण कोणाचेही नाव व पदनामही नाही तसेच कोणत्याही प्रकारची नोंद नाही. यामध्ये जे 278 धनादेश आहेत त्यांची किमत जवळपास 10 ते 12 कोटी इतकी आहे. यासंबंधीचा अहवाल प्राप्त झाला असून त्यानुसार कॅश बुकात देखील खाडाखोड दिसून येते. या विभागाचे लेखाधिकारी प्रामुख्याने यात दोषी असल्याचा संशय आहे. असे कर्मचारी शासनाला बदनाम करण्याचा प्रयत्न करतात. म्हणून या फाईलींच्या गायब होण्याशी संबंधित असलेल्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन शासनाने कारवाई केली आहे काय, नसल्यास त्यांना तत्काळ बडतर्फ करुन चौकशी केली जाईल काय ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, हा प्रश्न व्यापक स्वरुपाचा असून तो प्रथम समजून घेणे आवश्यक आहे. नगररचना विभागाच्या फाईल्स गायब झाल्या असून त्यातील 2870 फाईल्स अजूनही मिळत नाहीत, अद्याप त्या अस्तित्वात नाहीत या निर्णयाप्रत महानगर पालिका अथवा शासन अजून आलेले नाही. आपण बऱ्याच वेळा परवानग्या घेतो आणि इमारतीच्या खाली पार्किंग, स्टील्ट पार्किंग वगैरे प्लॅनमध्ये दाखवितो. नंतरच्या काळात त्याच ठिकाणी भिंत अथवा गाळा दाखविला जातो आणि त्याचा सर्रास वापर सुरु होतो. अशा प्रकारच्या प्रकरणांची चौकशी करावी म्हणून तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या. त्या तक्रारींच्या अनुषंगाने आपण मूळ इमारतीचा प्लॅन कसा तयार केला याचा शोध घेण्यात आला असता या प्लॅनच्या मूळ नस्तीच अस्तित्वात नसल्याचे लक्षात आले. म्हणून तत्कालीन आयुक्तांनी संबंधित अधिकाऱ्यांना या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले. अशा प्रकारे एकंदरित 46767 दस्तऐवज असून त्यापैकी अद्याप 2870 फाईल्स उपलब्ध नाहीत. त्यापैकी कार्यालयीन कामासाठी काढून घेतलेल्या 918 फाईल्स अन्य कोणत्या कक्षात ठेवल्या की काय याचाही शोध घेण्याचे काम सुरु आहे. तरी देखील अद्याप 1952 फाईल्स उपलब्ध नाहीत असे समजले व त्याबाबत पुन्हा चौकशी केली जात आहे.

श्री. किशनचंद तनवाणी : महोदय, एकूण 1952 फाईल्स सापडत नाहीत म्हणून शासनाकडून महानगर पालिकेला ठराविक कालावधी ठरवून त्यात या फाईल्स खरोखरच गहाळ आहेत की अन्य ठिकाणी ठेवल्या आहेत याचा शोध घेण्याचे आदेश दिले जातील काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 30057.....

श्री. भास्कर जाधव : महोदय, महानगर पालिकेला तीन महिन्यांचा कालावधी देण्यात येईल. या तीन महिन्यात प्रत्यक्षात फाईल्स गहाळ झाल्या की दुसऱ्या ठिकाणी ठेवण्यात आल्या यासंबंधीचा अंतिम शोध घेण्यात येईल. त्यानंतर जे दोषी आहेत हे सिध्द होईल व त्या अनुषंगाने पुढील आवश्यक ती कारवाई संबंधितांविरुध्द केली जाईल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 30057 .....

श्री. दिवाकर रावते :सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांचे उत्तर मी लक्ष पूर्वक ऐकत होतो. मंत्रालयाच्या आगीमध्ये जवळपास 46,000 नस्त्या जळाल्यानंतर सुध्दा काही दिवसातच त्यातील काही हजार नस्त्या पुन्हा तयार केल्याची माहिती कालच माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या सदनाला दिलेली आहे. आम्ही 30 दिवस अगोदर प्रश्न देत असतो असे असतांना सदर महानगर पालिकेकडे 30 दिवस प्रश्न गेलेला असतांना ते जर उत्तर देऊ शकत नसतील तर ते योग्य नाही. प्रश्नाचे उत्तर विधिमंडळात द्यावयाचे आहे त्यामुळे या नस्त्या शोधल्याच गेल्याच पाहिजेत परंतु याचे गांभीर्य महानगर पालिकेच्या प्रशासनाने घेतलेले नाही असे दिसून येते. त्यामुळे खरे म्हणजे हा विधिमंडळाचा अवमान आहे. विधिमंडळात प्रश्न आल्यानंतर नस्त्या शोधायचे काम होत असेल तर त्या कर्मचाऱ्यांना आपण कशासाठी पाठीशी घालता ? आम्ही 30 दिवस अगोदर प्रश्न विचारला असतांना सुध्दा नस्त्या सापडत नसतील तर हा विधिमंडळाचा अवमान आहे असे आम्ही समजतो. हलगर्जीपणाने जर महानगर पालिकेचे प्रशासन काम करीत असेल तर त्या प्रशासनाला जाब विचारला गेलाच पाहिजे. मंत्रालयाला आग लागल्यामुळे ज्या नस्त्या जळाल्या त्या पुन्हा आपण तयार करु शकतो हे शासनाने दाखवून दिलेले आहे. त्यामुळे आपल्या विभागास किती दिवसात सदर महानगर पालिका नस्त्या उपलब्ध करुन देणार आहे ? तसेच 12,278 कोटी रुपयांचे जे धनादेश वटलेले नाहीत त्याबाबत शासनाची नक्की कोणती भूमिका आहे ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या मनात जे आले आहे होते तेच माझ्याही मनात आले होते. ही महानगर पालिका कोणत्या पक्षाच्या ताब्यात आहे याची माहिती घेतली असता ही महानगर पालिका शिवसेनेच्या ताब्यात आहे अशी माहिती मला मिळाली आहे. जर मी यासंदर्भात अगोदरच उत्तर दिले असते तर सन्माननीय सदस्य म्हणाले असते की, तुम्ही आमच्याकडे आकसाने पाहता.

सभापती महोदय, सदर महानगर पालिकेला नस्त्या गोळा करण्यासाठी तीन महिन्याची मुदत दिलेली असून सन्माननीय सदस्यांनी धनादेशाच्या संदर्भात जी माहिती विचारली आहे त्यासंदर्भात मी एवढेच सांगू इच्छितो की, या क्षणापर्यंत कोणतेही धनादेश वटण्याचा शिल्लक राहिलेले नाहीत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, मंत्रालयात फाईलच्या प्रवासाच्या संदर्भात ट्रॅकींग केले जात असते त्यामुळे मंत्रालयात फाईलच्या संदर्भात जी पध्दत आहे तशीच पध्दत महानगर पालिकेमध्ये सुध्दा असणे आवश्यक आहे. मंत्रालयासारखी पध्दत असेल तर महानगर पालिकेतील फाईल कोठून कोठे गेली याचा तपास करण्यासाठी तीन महिने लागण्याची काहीही गरज पडणार नाही. या फाईल्स जर जाणूनबुजून गहाळ झाल्या असतील तर या फाईल्स तीन महिन्यातही मिळणार नाही व त्याचे उत्तरही मिळणार नाहीत त्यामुळे यासंदर्भात काही उपाययोजना केली जाणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, या फाईल्स हेतूपुर:स्सर गहाळ केलेल्या आहेत काय, या निर्णयाप्रत आपण अजूनपर्यंत आलेलो नाही. या निर्णयाप्रत आल्यानंतर निश्चितपणे बाकीच्याही प्रशासनाला किंवा महानगर पालिकेला किंवा अन्य विभागांना धडा बसेल याबाबत शासन निश्चितपणे कारवाई करील.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, या प्रश्नाचे गांभीर्य ठेवून सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी प्रश्न विचारला आहे. अशा महत्वाच्या प्रश्नाच्या संदर्भात योग्य माहिती नसेल तर राजकीय वळण देऊन विषय भलतीकडे न्यावयाचा असा काही मंत्र्यांचा स्वभाव असतो. या महानगर पालिकेत ज्या फाईल्स गहाळ झालेल्या आहेत त्या मुख्यत्वेकरुन भूखंड आणि ले-आऊटच्या संदर्भातील आहेत. आदर्श सोसायटीची एक फाईल गेल्यामुळे जी परिस्थिती ओढवली तशीच परिस्थिती या फाईल्सच्या संदर्भात देखील होऊ शकते. आदर्शच्या गांभीर्याइतकेच गांभीर्य या प्रश्नाच्या संदर्भात देखील आहे. औरंगाबाद महानगर पालिकेचे अधिकारी कोणाच्या सांगण्यावरुन, काम करतात याच्या खोलात मी जाणार नाही. ज्या अर्थी या फाईल्स सापडत नाहीत त्या अर्थी त्यामध्ये मोठा आर्थिक घोटाळा आहे असे मी मानतो. आपण या फाईल्सच्या संदर्भात चौकशी कराल परंतु त्यातून काहीही सापडणार नाही. त्यामुळे या घटनेच्या चौकशीचे काम सीआयडीकडे दिले तर संपूर्ण वास्तव बाहेर येईल त्यामुळे या प्रकरणाची चौकशी सीआयडीकडे दिली जाणार आहे काय याबाबत माननीय मुख्यमंत्री महोदयांनी माहिती दिली तर बरे होईल असे मला वाटते.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, हा विषय गंभीर आहे, याबद्दल शंका नाही. 30 दिवसांमध्ये अनेक अद्ययावत माहिती यायला पाहिजे होती, हे खरे आहे. एकूण 2870 फाईल्स पैकी 918 फाईल्स कोणी तरी सह्या करून बाहेर नेल्या आहेत असे आढळून आले आहे. त्यांच्याकडून त्या गहाळ झाल्या किंवा त्या दुसऱ्या गट्ठयात गेल्या आहेत काय हे तपासण्याचे काम सुरू आहे. आताच राज्य मंत्री महोदयांनी सांगितले की, आता पर्यंत किती नस्त्या सापडलेल्या आहेत, चुकीच्या ठिकाणी ठेवल्या आहेत काय, याची माहिती घेण्यात येईल. यात निश्चित काही तरी घोटाळा झाला आहे असे सकृतदर्शनी आढळून आले तर संबंधितांना कडक शिक्षा करण्यात येईल असे आश्वासन मी येथे देऊ इच्छितो. हा प्रश्न औरंगाबाद पुरताच मर्यादित नाही. इतर ठिकाणी देखील असा प्रकार घडण्याची शक्यता आहे. विशेषत: बिल्डींग प्लॅन मध्ये चुका करायच्या आणि फाईल गायब करायची असे देखील होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सर्व महानगरपालिकांना ताबडतोब आदेश निर्गमित करण्यात येतील की, एकूण फाईल्स किती आहेत याची मोजणी करून त्या सुरक्षित ठिकाणी ठेवल्या आहेत किंवा नाही याचे ऑडिट करून घ्यावे. तसेच या सर्व फाईल्सच्या सुरक्षिततेची काळजी घ्यावी असे देखील सांगण्यात येईल. मंत्रालयाला लागलेल्या आगी नंतर आता सर्व आस्थापनांना फाईल्स सुरक्षित ठेवण्या संबंधीचे आदेश देण्यात येतील. संगनमताने घोटाळा झाला असेल तर कडक कारवाई केली पाहिजे अशी भावना माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी व्यक्त केली आहे. या संबंधातील प्राथमिक माहिती आल्यानंतर पुढील आदेश देण्यात येतील एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईत भाडेतत्वावर पाच लाख घरे बांधण्याच्या योजनेबाबत

(4) * 30150 श्रीमती विद्या चव्हाण, श्री.किरण पावसकर, ॲड. उषाताई दराडे, श्री.हेमंत टकले, श्री.रमेश शेंडगे, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अरुण गुजराथी : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) मुंबईतील गगनाला भिडलेल्या घरांच्या किंमती व वाढणाऱ्या झोपड्यांवर उपाय म्हणून शासनाने सन 2008 मध्ये भाडेतत्वावर पाच लाख घरे बांधण्याचा निर्णय घेवूनही अद्याप सदर योजनेस सुरुवात करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(3) तसेच सदर योजनेची अंमलबजावणी करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

श्री.भास्कर जाधव, श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (1) नाही.
(2) प्रश्न उद्भवत नाही.
(3) या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने वेळोवेळी विविध अधिसूचना निर्गमित केल्या आहेत. त्याचप्रमाणे शासनाने गठीत केलेल्या समितीने या योजनेच्या अंमलबजावणीबाबत सखोल अभ्यास करुन त्याचा अहवाल जानेवारी, 2012 मध्ये शासनास सादर केला आहे. सदर अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, ह्या प्रश्नाला जे लेखी उत्तर देण्यात आले आहे ते खरोखरच आश्चर्यजनक आहे. लेखी उत्तरात नमूद करण्यात आले आहे की, "शासनाने वेळोवेळी विविध अधिसूचना निर्गमित केल्या आहेत. समितीने या योजनेच्या अंमलबजावणीबाबत सखोल अभ्यास करून त्याचा अहवाल जानेवारी 2012 मध्ये शासनास सादर केला आहे." सन 2008 पासून 2012 पर्यंत अहवाल देण्याचेच काम करण्यात आल्याचे दिसून येत आहे. लेखी उत्तरात पुढे असेही नमूद केले आहे की, "सदर अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे." हा प्रश्न मुंबईच्या दृष्टीने गंभीर आहे. मुंबईत 65 लाख लोक झोपडपट्टयांमध्ये राहतात. मुंबईत लोक पदपथावर देखील रहात आहेत. हायकोर्टाने देखील रात्रीसाठी शेल्टर उपलब्ध करून द्यावे असे सांगितले आहे.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण ...

भाडेतत्त्वावर घरे उपलब्ध करून देणे हे काम मुंबईच्या दृष्टीने फार महत्त्वाचे आहे. हे काम करण्यासाठी शासन जास्त कालावधी का घेत आहे ? मुंबईतील गरीब, मध्यमवर्गीयांना घरे घेणे परवडणारे नाही. अशा वेळी भाड्याची घरे उपलब्ध करून देणे हे शासनाचे प्राथमिक कर्तव्य असले पाहिजे. परंतु, तसे न करता पाच-सहा वर्षे प्रश्न प्रलंबित ठेवणे योग्य नाही. तेव्हा या संबंधी आपण कोणती उपाययोजना करणार आहात ? असा माझा प्रश्न आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी शासन कोणती उपाययोजना करणार आहे अशा प्रकारचा प्रश्न विचारला आहे. उपाययोजना करण्याचे काम सुरू आहे. मुंबई शहरामध्ये अफोर्डेबल हाऊसिंग स्कीम राबविण्यासंबंधी शासनाने निर्णय घेतला. त्यादृष्टीने खाजगी विकासकांकडून प्रस्ताव देखील मागविण्यात आले. त्यानुसार एकूण 238 प्रस्ताव आले. त्यांनी दिलेल्या प्लॅननुसार 9 लाख 27 हजार 312 घरे निर्माण झाली असती. तथापि, या प्रस्तावांची छाननी करण्यात आली. त्यावेळी लक्षात आले की, यामध्ये 57 प्रस्ताव परिपूर्ण नाहीत. त्यामुळे 40 प्रस्ताव स्वीकारण्यात आले. 8 प्रस्ताव स्वीकारले होते. परंतु, नंतरच्या कालावधीत रद्द करण्यात आले. एक प्रस्ताव स्वत: अर्जदाराने मागे घेतला आहे. अशा प्रकारे 41 प्रस्ताव मान्य केले गेले होते. या प्रस्तावाद्वारे 2 लाख 30 हजार 760 घरे आपल्याला उपलब्ध करून देता आली असती. शासनाला कोणतीही नवीन योजना हातामध्ये घेताना सर्व शक्यतांची पडताळणी करून घ्यावी लागते. वेगवेगळ्या लोकांची मते जाणून घ्यावी लागतात. त्यातील बरे-वाईट परिणाम समजावून घ्यावे लागतात. हे सर्व समजण्यासाठी शासनाने मध्यंतरी एक समिती स्थापन केली होती. या समितीने 24 मुद्यांवर चौकशी केली. त्यानुसार शासनाकडे अहवाल सादर करण्यात आला. यामध्ये देखील शासनाला थोडीशी शंका होती. त्यामुळे शासनाने याबाबत एक उप समिती नेमली. या समितीचा अहवाल देखील शासनाच्या अंतिम विचाराधीन आहे. शासनाचा हा प्रस्ताव पूर्णत्वास नेण्याचा मनोदय आहे.

यानंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मागील अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये भाडे तत्वावर 5 लाख घरे बांधण्याच्या विषयासंबंधी मी दिलेल्या लक्षवेधी सूचनेला माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर देतांना सांगितले होते की, या योजनेबाबत पूर्वीच्या सरकारमध्ये काही कन्सिडरेशन्स होते. ती योजना मंजूर करीत असतांना जवळ रेल्वे स्टेशन, बस स्टेशन उपलब्ध आहे काय याचा विचार करुनच योजना तयार करीत असतो. शासनाकडे त्या संबंधी जानेवारी महिन्यात अहवाल प्राप्त झालेला आहे. माझे असे म्हणणे आहे की, या योजनेमध्ये काही लोकांचे चुकीचे कन्सिडरेशन्स असल्यामुळे चांगले प्रस्ताव निर्णयाअभावी अडकून पडले आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या वेळी उत्तर देतांना अतिशय चांगला मनोदय व्यक्त केला होता. चुकीच्या कन्सिडरेशन्सवरील प्रस्ताव शासनाकडे येत असतील तर ते आपण थांबविले पाहिजेत. काही लोकांनी स्वत: चांगले प्रस्ताव दिले आहेत ते आपण लवकर अंमलात आणू शकता. एमएमआरडीएच्या रिजनमध्ये तशाप्रकारची मोठी योजना निर्माण होऊ शकते. या योजनांच्या माध्यमातून भाडे तत्वावरील घरांचे बांधकाम करण्याची आवश्यकता असतांना आपण केवळ माननीय श्री. नितीन गडकरी साहेब नेहमी म्हणतात त्या प्रमाणे "Where there is a will, there is a way" सर्व्हे, कमिटया, सब कमिटया नेमण्याचे प्रकार करीत आहात. मोठया प्रमाणात या कमिटया नेमून आपण ही योजना अंमलात आणणार असाल तर या महिनाभरामध्ये योजनेच्या कामाला सुरुवात करु, असे तरी सांगा.

मी हे या ठिकाणी अशा करिता सांगू इच्छितो की, या योजनेमध्ये अडचणी फार मोठया प्रमाणात आहेत. पनवेल नगरपालिकेकडे या योजनेसंदर्भात मोठया प्रमाणावर प्लॅन येत असून ते कसे मंजूर करावयाचे हे त्यांना समजत नाही. त्यामुळे त्या प्रस्तावांना मंजुरी देण्याचे ते टाळीत आहेत. इतक्या मोठया प्रमाणात आपण प्लॅन मंजूर करु शकतो या करिता त्यांच्याकडे ॲप्रोप्रिएट ॲथॉरिटी नाही. माझ्या लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्या वेळी मी मांडलेल्या अडचणींबाबत विचार करु असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते. त्या ठिकाणी एमएमआरडीएने दिलेल्या इन्सेंटिव्हज कशा उपयोगात आणावयाच्या हे नगरपालिका आणि नगर रचना अधिकाऱ्यांना समजत नाही. या करिता एमएमआरडीएकडे आपण हे अधिकार देणार आहात काय? या योजनेतील अडचणी आपण वेळीच दूर केल्या नाहीत तर ही योजना बारगळू शकते. तेव्हा ही घरे आपण केव्हा बांधून पूर्ण करणार आहात ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, ही एक अत्यंत महत्वाकांक्षी योजना असून त्या करिता सन 2008 पासून शासनाकडे प्रस्ताव आले होते. परंतु मध्यंतरीच्या काळात बांधकाम व्यावसायिकांच्या संघटनेने शासनाला विनंती करुन या योजनेमध्ये अडचणी असल्याचे सांगितले होते. त्या ठिकाणी पायाभूत सुविधा कोणी निर्माण करावयाच्या, कोणते लोकेशन ठरवावयाचे या संदर्भात शासनाच्या पातळीवर करण्यात आलेल्या चर्चेमध्ये देखील या योजनेमध्ये अडचणी असल्याचे दृष्टिपथात आले. त्या नंतर शासनाने सखोल अभ्यास करुन दिनांक 8 सप्टेंबर 2011 रोजी महानगर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली असून तिचा अहवाल दिनांक 6.1.2012 रोजी प्राप्त झाला आहे. त्या अहवालामधील काही शिफारशी मान्य करण्यात आल्या असून काही बाबी पुनर्विचाराधीन आहेत. त्यामध्ये बांधकाम व्यावसायिकांना एफ.एस.आय. किती द्यावयाचा आणि त्या योजनेचे लोकेशन कोणते निवडावे या बाबत विचार करण्यात आला. महानगर क्षेत्राच्या बाहेर एखादी योजना घेतली तर त्या ठिकाणी पायाभूत सुविधा कोणी पुरवावयाच्या यावर विचार करण्यासाठी पुन्हा 17 मे रोजी एक उप समिती नेमण्यात आली असून तिचा अहवाल 7 जून रोजी शासनाला प्राप्त झाला आहे. त्या मुळे या प्रश्नासंबंधी शासनाच्या पातळीवर चर्चा झाली असून हे शासन आता निर्णयाप्रत आले आहे. शासनाने आतापर्यन्त 41 योजनांच्या 39 हजार घरांना तत्वत: मान्यता दिलेली आहे, त्यापैकी 17 योजनांच्या 37 हजार घरांचे काम सुरु असून 91 योजनांचे प्रस्ताव प्रलंबित आहेत. आपण पर्यायी व्यवस्था कशाप्रकारे करावी असा शासनापुढे प्रश्न आहे. शासनाकडे जुन्या योजनांचे प्रस्ताव आलेले असतांनाही नवीन योजना जाहीर करतो त्यावेळी जुन्या योजनांचे काय करावे अशाप्रकारचा संभ्रम निर्माण होतो. त्यामुळे यामध्ये शासनाकडून देखील चूक झाल्याचे मी अनेक वेळा पाहिले आहे. ज्यावेळी आपण नवीन योजना आणतो त्यावेळी चालू असलेल्या योजनांचे काय करावे या बाबत स्पष्टता नसते. त्यामुळे अनेक अडचणी निर्माण होतात.

कित्येक वेळा असेही घडते की, पहिले नोटिफिकेशन प्रसिध्द केल्यानंतर ती योजना सुरु होते तर कित्येक वेळा ती योजना सुरु होत नाही. त्या ठिकाणी 20 टक्के ॲफोर्डेबल हाऊसेस निर्माण करण्याकरिता शासनाने असा निर्णय घेतला की, जोपर्यन्त कलम 37(2) चे अंतिम नोटिफिकेशन निघत नाही तोपर्यन्त जुनी योजना चालू राहील. त्या बाबतीत लवकरच अंतिम निर्णय घेतला जाईल. आता शासनाकडे 91 प्रस्ताव प्रलंबित आहेत त्यामध्ये 20 प्रस्ताव कागदपत्रांच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 30150...

श्री. पृथ्वीराज चव्हाण....

पूर्ततेसह पूर्ण आहेत. सद्याच्या योजनेनुसार ते प्रस्ताव मान्य किंवा अमान्य करुन लवकरात लवकर निकालात काढले जातील. त्या बाबत लवकरच अंतिम निर्णय घेऊन ही अत्यंत महत्वाकांक्षी योजना चांगल्या प्रकारे आम्ही राबविणार आहोत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अप्रधारित पत्र / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, 2008 ते 2012 म्हणजे साधारणपणे तीन वर्षाचा कालावधी यामध्ये गेला आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी मघाशीच त्यासंदर्भातील तपशील दिलेला आहे. एकूण 57 प्रस्तावांपैकी 41 प्रस्ताव स्वीकारलेले आहेत असे सांगण्यात आले. माझा असा प्रश्न आहे की, 2,30,760 घरांच्या कामाला कधी सुरुवात होणार आहे, तसेच ही कामे केव्हा संपणार आहेत, तसेच त्या घरकुलांचे क्षेत्रफळ किती असणार आहे? त्याचप्रमाणे शासनामार्फत गठीत केलेल्या समितीने जो अहवाल सादर केला आहे, त्यातील महत्वाच्या बाबी कोणत्या आहेत याविषयी शासन माहिती देणार आहे काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, 41 योजनांना तत्वत: मान्यता देण्यात आली असून त्यामध्ये 89 हजार घरे होतील. त्यापैकी 17 योजना आणि 37 हजार घरांची कामे प्रगतीपथा वर आहेत. मला असे वाटते की, याबाबतीत लवकरच निर्णय निर्गमित करण्यात येईल आणि त्यामध्ये चटई क्षेत्राबाबत, पायाभूत सुविधांबाबत, एफ.एस.आय. इ.बाबतचे निर्णय घ्यावयाचे असून त्याबाबत लवकरच अंतिम निर्णय घेण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही सदरहू योजना 100 टक्के कार्यान्वित करु अशा प्रकारचे निवेदन माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेले आहे. माझा एक प्रश्न आहे की, शासन भाडे तत्वावर 5 लाख घरे बांधणार आहे. पण जे लोक बाहेरुन येतात त्यांना राहाण्यासाठी बांधणार आहात की याठिकाणी ज्या झोपडपट्टया वाढत आहेत त्यांच्यासाठी बांधणार आहात? याबाबत खुलासा होणे आवश्यक आहे. तसेच याठिकाणी जागेचा विषय उपस्थित झाला आहे.अशा वेळी गिरणी कामगारांना घरे देण्यासाठी शासनाकडे जागा नाही. तसेच त्यांना म्हाडाच्या घराची किंमत परवडत नाही. अशा वेळी पाच लाख घरापैकी जी घरे शिल्लक रहातील ती गिरणी कामगारांना देणार आहात काय? जर एखाद्याची जमीन असेल तर त्याबाबत संबंधितांना विचारुन त्यांच्या संमतीने ती घेण्यात यावी. तसे केले तर गिरणी कामगारांचा प्रश्न 100 टक्के निकाली निघू शकतो. त्यामुळे आपण गिरणी कामगारांना घरे उपलब्ध करुन देणार आहात काय ? असा माझा प्रश्न आहे.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, ही भाड्याने घरे देण्याची योजना किंवा ॲफोर्डेबल हाऊसिंगची योजना असून कायम स्वरुपामध्ये मालकी तत्वावर घरे देण्याची योजना नाही.तरीपण आपण गिरणी कामगारांसाठी पर्यायी व्यवस्था करण्याचा प्रयत्न करीत आहोत आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यामध्ये याचा देखील विचार करता येईल. परंतु याबाबत अजून अंतिम निर्णय घेण्यात आलेला नाही.

. . . .के-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खोपोली (ता.खालापूर, जि.रायगड) नगरपरिषदेने निविदा प्राप्त न

झालेल्या रस्त्याचे बांधकाम करण्यास कार्यादेश दिल्याबाबत

(5) *30202 श्री.जयंत प्र.पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक 29333 ला दिनांक 4 एप्रिल, 2012 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय मुख्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) खोपोली (ता.खालापूर, जि.रायगड) नगरपरिषदेने सन 2010-11 मध्ये रस्ते दुरुस्ती व इतर कामासाठी मागविलेल्या निविदा व त्यानुसार झालेली अनियमितता या संबंधी केलेल्या चौकशीनुसार एक वर्षासाठी एका लेखनिकाची वेतन वाढ रोखण्याचे आदेश केंव्हा काढण्यात आले,

(2) याचप्रकरणी नगरपरिषद अभियंता यांचा वेतनवाढ रोखणे कामी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत संचालक, नगरपरिषद प्रशासन यांच्याकडे प्रस्ताव केंव्हा सादर करण्यात आला,

(3) सदर प्रस्तावांवर शासनाने कार्यवाही केली आहे काय, असल्यास, कार्यवाही केंव्हा करण्यात आली आहे,

(4) नसल्यास, कार्यवाही न करण्याची कारणे कोणती तसेच वेळीच कार्यवाही न करण्यास जबाबदार कोण आहेत ?

श्री.भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (1) खोपाली नगरपरिषदेने दिनांक 17.03.2012 च्या आदेशान्वये संबंधित लेखनिकाची एक वेतनवाढ रोखण्याबाबत आदेश पारीत केला आहे.

(2), (3) व (4) या प्रकरणी संचालक, नगरपरिषद प्रशासन यांनी दिनांक 19.04.2012 अन्वये जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडून मागविलेला अहवाल प्राप्त व्हावयाचा आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यावर त्या आधारे संचालक, नगरपरिषद प्रशासन यांच्या स्तरावर उचित निर्णय घेण्याची तजवीज ठेवलेली आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, खोपोली नगरपालिका ही वैशिष्ट्यपूर्ण आहे.या नगरपालिकेमध्ये ज्या ठेकेदारांनी निविदा भरली नाही त्यालाच वर्क ऑर्डर देण्यात आली आणि त्याने काम करण्यास सुरुवात केली. ज्या अभियंत्यांनी किंवा ज्या क्लार्कने हे केले आहे त्यांच्यावर कोणती कारवाई करीत आहात ? तर संबंधितांची एक वर्षासाठी वेतनवाढ थांबविण्यात आली आहे. अशा प्रकारे हास्यास्पद उत्तर देण्यात आले आहे. पण त्याला त्यापेक्षा कितीतरी वेतनवाढी मिळालेल्या आहेत. तसेच ही बाब हसण्यावर न नेता या नगरपालिकेमध्ये 1 कमान ज्याची किंमत 3 लाख रुपये इतकी आहे, त्याचे 55 लाख रुपयांचे बिल तयार करण्यात आले. तसेच याठिकाणी एक नाट्यगृह बांधण्यात आले असून त्यासाठी 5 लाख रुपये खर्च आलेला असताना जवळजवळ 40 ते 45 लाख रुपयांचे बिल काढण्यात आले आणि अशा प्रकारची अनेक कामे आहेत. नगरपालिकेमध्ये त्या-त्या कामाचे जे व्हॅल्युएशन आहे त्यापेक्षा जास्त रकमेचे बिल काढण्यात येते. ही अतिशय गंभीर बाब असून मी या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सदनामध्ये याबाबतीत अनेक वेळा अर्ध्या तासाची चर्चा उपस्थित केली होती आणि माननीय मंत्री महोदयांनी याबाबतीत कारवाई करतो अशा प्रकारचे मला उत्तर दिलेले आहे. म्हणून माझी माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, या नगरपालिकेच्या कारभाराची उच्च पातळीवरुन चौकशी करण्यात यावी. मघाशी सांगितल्याप्रमाणे एका क्लार्कची वेतनवाढ थांबवित आहात. पण ज्या अधिकाऱ्यांनी, ज्या मुख्य कार्याधिकारी यांनी वर्क ऑर्डर दिली, ती गंभीर बाब आहे. त्यांच्या बाबतीत शासन कोणती कारवाई तसेच कोणती ठोस भूमिका घेणार आहे?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी ज्या भावना व्यक्त केल्या आहेत, त्या शासन आणि सभागृह समजू शकते. सन्माननीय सदस्यांनी मागील अधिवेशनामध्ये सुध्दा हा प्रश्न उपस्थित केला होता आणि त्यावेळी आम्ही शासन म्हणून जे उत्तर दिले होते, तेही माझ्याकडे आहे.

सभापती महोदय, मला सन्माननीय सदस्यांना सांगावयाचे आहे की, त्यांनी जे सांगितले, त्यातील केवळ एक भाग खरा आहे आणि बाकीच्या संदर्भात मी सन्माननीय सदस्यांच्या असे निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, गेल्या वर्षी गणपती उत्सवाच्या वेळी शहरामध्ये खूप मोठ्या प्रमाणात खड्डे पडले होते. याबाबतीत ज्याच्याकडे टेंडर होते, त्यांची मुदत संपली असल्याने नवीन ठेकेदारांचे टेंडर काढून त्यांना हे काम करण्याबाबत सांगण्यात आले. परंतु त्यांनी ते काम न केल्यामुळे आणि याबाबतीत जनतेकडून देखील दबाव वाढत असल्याने सदरहू काम हे पूर्वीच्या ठेकेदाराने करावे यासाठी वर्क ऑर्डर देण्यात आली ही वस्तुस्थिती आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 30202.... श्री. भास्कर जाधव....

पण त्याला चुकीच्या पध्दतीने ही वर्क ऑर्डर दिली गेल्याचे नंतर लक्षात आल्यामुळे त्याची वर्क ऑर्डर रद्द करण्यात आली. त्याच्याकडून कोणत्याही प्रकारचे काम करुन घेण्यात आलेले नाही. त्याला कोणत्याही प्रकारचे पेमेंट सुध्दा करण्यात आलेले नाही. तरी सुध्दा ही चूक झाल्यामुळे या क्लार्कला शिक्षा झाली. त्यावर आम्ही समाधानी नाही. कारण यामध्ये केवळ क्लार्कचा दोष नाही. म्हणून त्याच पध्दतीने सिटी इंजिनिअरवर सुध्दा कारवाई करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. परंतु सिटी इंजिनिअर हा राज्य शासनाच्या संवर्गात असल्यामुळे त्यांच्यावर डीएमएने कारवाई करावयाची आहे. त्याचा अहवाल जिल्हाधिकारी आणि विभागीय आयुक्तांकडे मागण्यात आलेला आहे. त्याच्यावर सुध्दा कारवाई करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी दोन तीन मुद्दे उपस्थित केले. त्यांनी सांस्कृतिक केंद्र तसेच कमानीच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केला. सन्माननीय सदस्यांनी जर त्या संदर्भात वेगळी माहिती दिली तर त्या अनुषंगाने कायदेशीर बाब तपासून चौकशी करता येईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सभागृहात दिलेली माहिती आपण ग्राह्य धरतो. कमानीचे 3 लाख रुपयांचे बजेट 50 लाख रुपये होत असेल ही विचार करण्यासारखी बाब आहे. सन्माननीय सदस्यांनी नाट्यगृहाबाबत सांगितले. नाट्यगृह 5 लाख रुपयांमध्ये होत नाही हे सर्वांनाच माहीत आहे. आपणही नाट्यगृहे बांधलेली आहेत. कमानीचे बांधकाम हे साधे बांधकाम आहे. त्या बांधकामाचे 3 लाख रुपयांचे बजेट जर 50 लाख रुपये झाले असेल आणि ही बाब जर खरी असेल तर त्याच्यावर शासन कारवाई करणार आहे का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी या प्रश्नाचे उत्तर आधीच दिलेले आहे. ही बाब खरी आहे का हे तपासावे लागेल. 3 लाख रुपयांचे एस्टिमेट 50 लाख रुपये झाले असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले तरी ताबडतोब असे काही करता येणार नाही. सन्माननीय सदस्यांनी जर स्पेसिफिक काही तक्रारी दिल्या तर त्याची योग्य प्रकारे चौकशी करण्यात येईल आणि जी काही कायदेशीर कारवाई करता येत असेल ती करण्यात येईल.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 30202 .....

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या सभागृहामध्ये अर्धा-तास चर्चेला उत्तर देताना माननीय मंत्री महोदयांनी या सर्व प्रश्नांच्या बाबतीत चौकशी करण्यात येईल असे उत्तर दिले होते. खोपोली नगरपालिका ही महाराष्ट्रातील सर्वात जास्त उत्पन्न असणारी दुसऱ्या क्रमांकाची नगरपालिका होती. आपल्याला माहीत आहे की, पिंपरी-चिंचवड ही महाराष्ट्रात जास्त उत्पन्न असणारी पहिल्या क्रमांकाची नगरपालिका होती आणि दुसरा क्रमांक खोपाली नगरपालिकेचा होता. त्या खोपोली नगरपालिकेकडे आज कर्मचाऱ्यांना पगार देण्यासाठी पैसे नाहीत. माननीय मुख्यमंत्र्यांना मी यासाठी विनंती केली की, ही बाब माननीय राज्यमंत्र्यांच्या अखत्यारीत नाही. आपण उत्तरे चांगली देता पण प्रश्न सोडविण्याचे अधिकार आपल्याकडे नाहीत. म्हणून माननीय मुख्यमंत्र्यांकडून माझी अपेक्षा आहे. आपण जो स्वच्छ कारभार करावयास मागत आहात त्यानुसार या नगरपालिकेची उच्च पातळीवरुन चौकशी करुन या सर्व कामांची चौकशी होईल का ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. तो राज्य सरकारच्या संवर्गातील अधिकारी असल्यामुळे डीएमएच्या माध्यमातून त्याची चौकशी करुन त्यामध्ये आपण जे आरोप केलेले आहे ते सत्य निघाले तर निश्चितपणे त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल.

...3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म्हाडाच्या सोडतीतील घरांच्या किंमतीत सातत्याने होत असलेली वाढ

(६) * ३०६७४ श्री.रामदास कदम, श्रीमती अलका देसाई, डॉ.सुधीर तांबे, श्री.राजन तेली, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुभाष चव्हाण, श्री.चरणसिंग सप्रा : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वाढत्या बाजार भावामुळे म्हाडाच्या या वर्षीच्या सोडतीतील घरांच्या किंमती वाढविण्यापाठोपाठ आता गेल्या वर्षीच्या सोडतीतील घरांच्या किंमतीतील वाढ करण्याचा शासनाने माहे मे, २०१२ च्या दुसऱ्या आठवड्यात निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गेल्या वर्षाच्या सोडतीतील घरांच्या किंमती वाढविण्याची कारणे काय आहेत व या निर्णयास सोडतीतील लाभार्थ्यांनी विरोध केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, घरांच्या किंमती नियंत्रणात ठेवण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सचिन अहिर, श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता : (१) म्हाडातर्फे बांधण्यात येणाऱ्या सदनिकांची किंमत म्हाडातर्फेच निश्चित करण्यात येते.

(२) मे, २०११ मधील म्हाडाच्या सोडतीत मालवणी मालाड (प) येथील २३५० अल्प उत्पन्न गटाच्या गाळयाचे व पवई येथील उच्च उत्पन्न गटाच्या ११० सदनिकांचे बांधकाम अनुक्रमे डिसेंबर २००९ व सन २००६ मध्ये सुरु झाले होते. प्रस्तुत सदनिकांच्या किंमतीत वाढ होण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत :-

१. बांधकाम साहित्यांची किंमतीमध्ये सातत्याने मोठया प्रमाणात वाढ झाली.

२. मुंबई मनपाकडून पवई महाप्रकल्प येथील गाळयांना टी.डी. आर. प्राप्त होण्यास वेळ लागला.

३. मुंबई मनपाच्या नवीन नियमानुसार आग प्रतिबंधक उपाययोजनेसाठी यंत्रणा उभी करणे, मल:निसारण व्यवस्थेमध्ये पाण्याचा पुनर्वापर यांची यंत्रणा उभी करणे, सुधारित गुणवत्तेसाठी इ ाालेला जादाचा खर्च.

४. अनुषंगिक कामे करावी लागली. किंमती संदर्भात सोडतीतील काही लाभार्थ्यांनी मा. राज्यमंत्री, गृहनिर्माण यांना निवेदने सादर केली होती.

(३) मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत बांधण्यात येणाऱ्या सदनिकांच्या विक्री किंमतीचे दर ठरविण्याचे धोरण प्राधिकरण ठराव क्र. ३०९४, दि. १६/११/१९९२ तसेच ठराव क्र. ६४१९, दि. ०७/०८/२००९ निश्चित करण्यात आलेले आहे. त्यानुसार सदरील सदनिकांच्या विक्री किंमतीमध्ये जमीन व विकास खर्च, बांधकाम खर्च, सुविधासाठींचा बांधकाम खर्च, खर्चावरील व्याजाचे भांडवलीकरण व प्रशासकीय खर्च यांचा अंतर्भाव असतो. अत्यल्प उत्पन्न गट व अल्प उत्पन्न गटासाठींच्या सदनिकांच्या विक्री किंमतीमध्ये कोणत्याही प्रकारचा नफा आकारला जात नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

...4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 30674 .....

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, दोन वर्षाच्या अगोदर म्हाडाच्या अल्प उत्पन्न गटाच्या घरांचा जो दर 15 लाख रुपये होता तो आता 27 लाख रुपयांवर गेलेला आहे. मध्यम उत्पन्न गटाच्या घरांची किंमत 18 लाख रुपयांवरुन 40 लाख रुपयांवर गेलेली आहे. आज सर्वसामान्य लोक म्हाडाचे घर घेऊ शकत नाहीत अशी अवस्था आहे. जागेच्या किंमती वाढणे हे त्याचे मूळ कारण आहे. माननीय मुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे. आपल्या अगोदरच्या तत्कालीन दोन्ही मुख्यमंत्र्यांनी मुंबईतील म्हाडाच्या मालकीचे सुमारे 50 एकर जमिनीचे 67 प्लॉट्स काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या मंत्री आणि आमदारांना दान केले, वाटले. म्हणून या बाबतीत सी.बी.आय.मार्फत चौकशी करुन हे सर्व प्लॉट तत्काळ म्हाडाला देऊन त्या ठिकाणी गरीब माणसांना घरे बांधण्यासाठी जागा उपलब्ध करुन देणार आहात का ?

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30674.... श्री.रामदास कदम...

सभापती महोदय, या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी सन्माननीय राज्यमंत्री उभे राहत आहेत. परंतु या प्रकरणाची सी.बी.आय.मार्फत चौकशी करण्याचा निर्णय सन्माननीय राज्यमंत्री घेऊ शकणार नाहीत. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी या प्रश्नाचे उत्तर दिले तर बरे होईल.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी विचारलेला प्रश्न मूळ प्रश्नाशी संबंधित नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी म्हाडाच्या जागांचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांनी या प्रश्नाचे उत्तर द्यावे अशी मी विनंती करतो.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, प्रश्नोत्तराच्या तासाच्या सुरुवातीला सभागृहात कॅबिनेट मंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक 5 मिनिटांकरिता स्थगित करण्यात आली होती.

सभापती : हे जरी खरे असले तरी मी आता माझा निर्णय दिलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचना</u>

सभापती : आज माझ्याकडे एकूण दोन नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचना आलेल्या आहेत. पहिली सूचना सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "राज्यातील स्त्री-भ्रूण हत्येच्या व एमटीपी किटच्या पार्श्वभूमीवर अनेक केमिस्ट, डिस्ट्रिब्युटर्सवर धाडी पडणे, त्यामुळे केमिस्ट व ड्रगिस्ट यांनी संप पुकारणे, एफ.डी.ए.ने अनेक बी.ए.एम.एस., बी.एच.एम.एस. डॉक्टरांची प्रिस्क्रीप्शन्स परत पाठविणे व औषध देण्यास नकार देणे, ब्लड प्रेशर, डायबेटिसची औषधे फ्रेश प्रिस्क्रीप्शन शिवाय न देणे, असे काढलेले आदेश, त्यामुळे ग्रामीण व शहरी आरोग्य व्यवस्था बाधित होणे, राज्यातील एम.बी.बी.एस.डॉक्टरांचे प्रमाण कमी असल्यामुळे इतर डॉक्टर्स ॲलोपॅथिक औषधांची प्रॅक्टिस सुरु करीत असणे, शेड्युल-के मध्ये ड्रग ॲण्ड कॉस्मेटिक रुलमध्ये अंगणवाडी सेविकांना ॲलोपॅथिक औषधे देण्याची मुभा असणे, राज्यात बी.ए.एम.एस.डॉक्टरांना पी.एस.सी.वर मेडिकल ऑफिसर म्हणून नेमणे" या विषयावर चर्चा करण्यासाठी सभागृहासमोरील आजचे कामकाज स्थगित करण्यासाठी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे.

या सूचनेतील विषय महत्वाचा आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सदर विषय नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाचा कसा होतो ते दोन मिनिटांमध्ये मांडावे. त्यानंतर मी माझा निर्णय देईन.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आपण मला दोन मिनिटात माझे म्हणणे मांडण्यासाठी संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो.

सभापती महोदय, काल औषध विक्रेत्यांनी आपला संप मागे घेतला असला तरी त्यांना शासनाकडून कोणत्याही प्रकारचे ठोस आश्वासन देण्यात आलेले नाही. त्यांचा प्रश्न दिनांक 25 जुलैपर्यंत पुढे ढकलण्यात आला आहे. या विषयासंबंधी दिनांक 25 जुलै, 2012 रोजी बैठक घेण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे मुंबई व महाराष्ट्रातील डॉक्टरांनी जरी हा संप मागे घेतला असला तरी त्यांना दिलेले आश्वासन अधांतरी आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी या संदर्भात काल बैठक घेऊन त्यांना आश्वासित केले असले तरी त्यांना शासनाकडून ठोस आश्वासन किंवा कागदोपत्री आश्वासन मिळालेले नाही.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/ D/ MMP/

डॉ.दीपक सावंत...

राज्यातील दोन विषयांशी संबंधित हा प्रश्न आहे. राज्यातील अंगणवाडी सेविकांना शेड्युल-के नुसार औषधे वापरण्यास परवानगी दिलेली आहे. परंतु तशी परवानगी इतरांना दिली जात नाही. या सर्व गोष्टींचा विचार केला पाहिजे. या संदर्भात शासनाने निर्णय घेऊन या अंगणवाडी सेविकांना प्रॅक्टिसमध्ये आणले तर इंडियन मेडिकल असोसिएशनकडून त्याबाबत हरकत घेतली जाईल. त्यामुळे हे प्रकरण पुन्हा कोर्टामध्ये जाण्याची शक्यता आहे. परिणामी महाराष्ट्रातील आरोग्य व्यवस्था धोक्यात येऊ शकते. केमिस्ट व डॉक्टरांनी संप मागे घेतला असला तरी शासनाने यासंबंधी दोन दिवसामध्ये निवेदन करणे आवश्यक आहे अशी मी विनंती करतो.

सभापती : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितलेली वस्तुस्थिती आहे. नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेला मी अनुमती दिली नसली तरी या विषयाच्या अनुषंगाने एक तासाच्या अल्पकालीन चर्चेला परवानगी देण्याचे मी निश्चित केलेले आहे. या चर्चेचा दिवस किंवा वेळ मी नंतर जाहीर करीन.

डॉ.दीपक सावंत : धन्यवाद.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती...

आज दिनांक 11 जुलै 2012 रोजी सकाळी 9 वाजून 12 मिनिटांनी सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, श्रीमती शोभा फडणवीस, डॉ. दीपक सावंत, श्री.रामनाथ मोते, डॉ. नीलम गो-हे, सर्वश्री चंद्रकांत पाटील, केशवराव मानकर, सय्यद पाशा पटेल, परशुराम उपरकर, डॉ. रणजित पाटील व श्री. गोपीकिशन बाजोरिया यांनी "बेळगाव महानगरपालिका बरखास्त करण्याचा कर्नाटक सरकारचा निर्णय कर्नाटक उच्च न्यायालयाने दिनांक 19 जून 2012 रोजी रद्द करणे, बेळगाव महानगरपालिकेची बरखास्ती रद्द करण्याचा कर्नाटक उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय कर्नाटक सरकारने बाजूला ठेवून बेळगाव महानगरपालिका पुन्हा बरखास्त करणे" अशा आशयाच्या नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. अशाच पध्दतीची सूचना सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी दिनांक 9 जुलै 2012 रोजी दिलेली आहे. मघाशी माझ्या दालनामध्ये सदनाचे नेते, विरोधी पक्षनेता, गटनेते यांच्याशी मी चर्चा केली. त्याप्रमाणे उद्या दिनांक 12 जुलै 2012 रोजी चर्चा करुन आपल्याला आपल्या भावना व्यक्त करुन एक ठराव करावयाचा आहे. तेव्हा हा विषय आणि सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी दिलेला विषय मी उद्या चर्चेसाठी घेईन.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, प्रत्येक अधिवेशनामध्ये हा विषय चर्चेला येतो. हे चौथे अधिवेशन आहे. बेळगाव महानगरपालिकेच्या बाबतीत कर्नाटक सरकार दडपशाही करीत आहे. या संदर्भात आपल्या सरकारने केन्द्र सरकार बरोबर कोणता पत्रव्यवहार केलेला आहे, काय चर्चा केली आहे, सरकारची काय भूमिका आहे हे सरकारकडून दिल्या जाणा-या उत्तरामध्ये स्पष्ट होणे आवश्यक आहे.

सभापती : त्या दृष्टीने शासनाला सूचना करण्यात येईल.

--

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

सभापती : आता मी मंगळवार, दिनांक 10 जुलै 2012 रोजी प्राप्त झालेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचना बाबत निर्णय देतो.

सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे व नागो पुंडलिक गाणार यांनी "राज्यातील सर्व अनुदानित संस्थांचे वेतनेतर अनुदान देण्याबाबत शासनाने आश्वासन देऊनही शाळा बंद आंदोलनामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री वसंतराव खोटरे व विक्रम काळे यांनी "बुलढाणा केंद्रीय सहकारी बँक अवसायनात निघाल्यामुळे प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांचे तसेच सेवानिवृत्त कर्मचा-यांचे भविष्य निर्वाह निधी व ग्रॅच्युईटी न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी "राज्यात होत असलेल्या सकृतदर्शनी अल्पवयीन मुलींचे अपहरण व सामूहिक बलात्कार करणा-या सर्व आरोपींवर कारवाई करुन महिला बाल विकास व गृह विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने महिला आयोगाच्या देखरेखीखाली समिती गठीत करुन देखरेख ठेवण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यात राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत पक्के कृषी बंधारे बांधण्यासाठी शेकडो टन सिमेंटचा परस्पर व्यापार करुन कृषी विभागातील काही अधिका-यांनी आर्थिक कमाई करणे, याबाबत चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी " रोहा (जि. रायगड) तालुक्यामध्ये अनधिकृत रेती उत्खनन करणा-या इसमांनी तहसीलदार, रोहा (जि. रायगड) यांची शासकीय गाडी

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ....

अडवून त्यांच्यावर पिस्तूल रोखून जीवे मारण्याची दिलेली धमकी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...नंतर श्री. गिते...

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे,चंद्रकांत पाटील, श्रीमती शोभा फडणवीस,श्री. रामनाथ मोते यांनी "प्रसुती काळात आरोग्य विषयक सेवा सुविधा न मिळाल्याने तसेच आर्थिक समस्येमुळे माता व अर्भक याचा मृत्यू होण्याच्या घडणाऱ्या घटनांमुळे राज्यातील सर्व आरोग्य केंद्रात स्त्री रोग तज्ज्ञांची नियुक्ती तसेच इतर पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री गोपीकिशन बाजोरिया, परशुराम उपरकर, किशनचंद तनवाणी यांनी "खरपाणपट्टयातील 88 गावांना गोडया पेयजलाचा पुरवठा करणारी अकोट 84 खेडी पाणी पुरवठा योजना कोणत्याही क्षणी बंद पडण्याचा निर्माण झालेला धोका " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी "राज्य शासनामार्फत गरीब झोपडपट्टी धारकांसाठी राबविण्यात येत असलेल्या एस.आर.ए.योजनेचे विकासक आपली दहशत निर्माण करुन त्यांना विरोध करणाऱ्यांवर होणारे खुनी हल्ले् वा हत्या या प्रकरणी सी.आय.डी.मार्फत चौकशी करुन दोषीवर करावयाची कारवाई " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

त्याचप्रमाणे आज दिनांक 11 जुलै, 2012 रोजी नियम 93 अन्वयेच्या सूचना मला प्राप्त झालेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील, यांनी "महर्षी शंकरराव मोहिते पाटील शिक्षण प्रसारक मंडळाचे प्राथमिक विद्यालयाची शाळा इमारत म्हाडाने निष्कासित करुन या शाळेचे सर्व गाळे पाडून विद्यार्थ्यांना बसण्यासाठी तात्पुरती कोणतीही व्यवस्था न केल्यामुळे 2000 विद्यार्थ्यांची निर्माण झालेली शैक्षणिक अडचण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती....

तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे यांनी " प्राथमिक शिक्षण मंडळ, महानगरपालिका कोल्हापूरचे कार्यक्षेत्रातील दि पुना जेस्युट स्कूल सोसायटी संचलित सेंट झेवियर्स प्रायमरी स्कूल,कोल्हापूर, दिपक सोसायटी, कोल्हापूर संचलित होलीक्रॉस कॉन्व्हेंट स्कूल, कोल्हापूर या अल्पसंख्यांक शाळांना अटी शर्ती व नियमाच्या आधारे अल्पसंख्यांक दर्जा मिळूनही उपरोक्त शाळा अटी, शर्ती व नियमांचे पालन करीत नसल्यामुळे पालक संघटना व शिक्षक विभाग यांच्यामध्ये पसरलेला असंतोष " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "नाशिक जिल्हयातील इगतपुरी येथील पाकिस्तानी अभिनेत्री लैला खान हिच्या हत्येप्रकरणी तिच्या बंगल्यामध्ये शोधाशोध करण्यासाठी दिनांक 9 जुलै, 2012 रोजी वा त्या सुमारास गेलेल्या पोलीस पथकाला बंगल्याच्या परिसरात मानवी सांगाडे सापडणे, या घटनेचा तपास करुन आरोपींवर कडक कारवाई करण्याची आवश्यकता " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, रामनाथ मोते, डॉ.रणजीत पाटील यांनी "गिरणी कामगारांना बंद गिरण्याच्या जागांवर घरे देण्याचे जाहीर करुन विकास नियंत्रण नियमावलीनुसार गिरण्यांच्या जमिनीचा एक तृतीयांश हिस्सा कामगारांच्या घरांकरिता देण्याचा कायदा करणे, राज्य सरकारच्या नियमानुसार 12 गिरणी मालकांनी आपल्या जमिनी दिल्या परंतु काही गिरणी मालकांनी विविध कारणांमुळे जमीन देण्यास नकार देणे, याबाबत गिरणी मालकांवर कारवाई करुन ठोस कायदा करण्याची आवश्यकता " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती.....

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "अकरावी ऑनलाईन प्रवेशाच्या शेवटच्या गुणवत्ता यादीनंतर 1900 विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिल्याचे उघडकीस येणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री गोपीकिशन बाजोरिया, परशुराम उपरकर, किशनचंद तनवाणी यांनी "अमरावती महानगरपालिकेचे पूर्ण अमरावती शहरामध्ये 38-39 गुठ्यांचे अनेक अभिन्यास बेकायदेशीररित्या मंजूर करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी "केरळमधील सी.पी.एम.पक्षाचे नेते टी.पी.चंद्रशेखरन यांच्या हत्या प्रकरणातील साथीदार सिंधुदुर्ग जिल्हयातील बांद्यात असल्याची माहिती उघडकीस येणे, सिंधुदुर्ग जिल्हयातील दोडामार्ग तालुक्यात अनेक प्रकारचे अनैतिक धंदे सुरु असून या जिल्हयातील कायदा व सुव्यवस्थेची ढासळलेली परिस्थिती " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

उर्वरित नियम 93 च्या सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

यानंतर श्री. कानडे....

अप्रधारित पत्र / प्रश्नोत्तरासाठी नाही

पृ. शी. :धामापूर(ता.मालवण,जि.सिंधुदूर्ग) येथील तलावात पोहण्यासाठी गेलेल्या दोन लोकांचा झालेला मृत्यू

मु. शी. : धामापूर(ता.मालवण,जि.सिंधुदूर्ग) येथील तलावात पोहण्यासाठी गेलेल्या दोन लोकांचा मृत्यू झालेला यासंबंधी श्री. सुभाषण चव्हाण ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"दिनांक ३ जून, २०१२ रोजी वा त्यादरम्यान धामापूर (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) येथील तलावात पोहण्यासाठी गेले असता दोघांचा मृत्यू झाल्याची भयंकर घटना घडणे, यापूर्वीही अशा प्रकारच्या घटना घडल्याचे आढळून येणे, यामुळे संपूर्ण धामापूर गावात भीती व चिंतेचे वातावरण पसरणे, धामापूर हे पर्यटन स्थळ असून येथे ऐतिहासिक व नैसर्गिकदृष्टया अत्यंत नयनरम्य असलेल्या शिवकालीन तलावात बोटींगसाठी तसेच पोहण्यासाठी पर्यटकांची मोठया प्रमाणात गर्दी होत असणे, परंतु पोहण्यासाठी व बोटींगसाठी येणाऱ्या पर्यटकांना येथे कोणत्याही प्रकारचे संरक्षण मिळत नसणे, येथे अनेकदा घडत असलेल्या अपघातासंबधी तसेच गुन्ह्यांसंबंधी तक्रार करण्यासाठी धामापूर येथे पोलीस चौकी नसल्यामुळे मालवण येथे २० कि.मी. दूरवर तक्रार नोंदविण्यासाठी जावे लागणे, स्थानिक लोकप्रतिनिधींनी मालवण पोलीस ठाणे अंतर्गत धामापूर या पर्यटन स्थळी पोलीस चौकीची निर्मिती करण्याकरीता पोलीस अधीक्षक, जिल्हा सिंधुदुर्ग यांना दिनांक १२ मे, २०१० रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन देण्यात येऊनही अद्यापी कोणतीही कार्यवाही न होणे, यामुळे परिसरात तीव्र असंतोषाचे व संतापाचे वातावरण निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.1

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, धामापूर येथील तलावामध्ये राजन महाजन या तरुणाचा बुडून मृत्यू झालेला आहे. दिवंगत आमदार श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांचे ते मेव्हणे होते. सभापती महोदय, हा शिवकालीन तलाव आहे. अतिशय सुंदर असा तलाव आहे. याठिकाणी पोलीस चौकी द्या आणि पोलीस संरक्षण द्या म्हणून शासनाकडे अनेक वेळा विनंती केलेली आहे. आम्ही याठिकाणी भेट दिली होती. माननीय सदस्य श्री. केशवराव मानकर हे देखील सोबत होते. याठिकाणी 100 कोटी रुपयांचा प्रकल्प मंजूर झालेला आहे. 25 कोटी रुपये प्रत्यक्षात आलेले आहेत. याठिकाणी अनेक पर्यटक पोहण्यासाठी जातात तसेच बोटीतून प्रवास करतात त्यांच्या संरक्षणासाठी एखादा पोलीस उभा असणे आवश्यक आहे. ही घटना संध्याकाळी 5.00 वा.घडली. परंतु पहाटे 5.00 वाजेपर्यंत देखील प्रेत सापडले नाही. दुसऱ्या दिवशी कोकणकन्या एक्सप्रेसने मी याठिकाणी आल्यानंतर पोलीस अधीक्षकांना फोन केला. जॅकेट घातल्याशिवाय बोटीत बसता कामा नये. पोलीस संरक्षण मिळाले पाहिजे अशी विनंती केली. या विभागाचे डी.आय.जी. श्री. परमविरसिंह यांनी 17.11.11 रोजी शासनाला यासंदर्भात पत्र लिहिले आहे. याठिकाणी पोलीस चौकीची निर्मिती करावी अशी विनंती त्यांनी पत्रात केली आहे. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, याठिकाणी पोलीस चौकीची स्थापना केली जाणार आहे काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील :सभापती महोदय, धामापूर येथे असणाऱ्या भगवती देवी मंदिराजवळ अनेक भक्त आणि पर्यटक येत असतात.याठिकाणी पर्यटनकेंद्र विकसित करण्यासाठी म्हणून 100 कोटी रुपये केंद्र शासनाकडून मंजूर झालेले आहेत. 25 कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आलेला आहे. या तलावामध्ये गाळ साचल्यामुळे युवकाचा मृत्यू झालेला आहे असे सकृतदर्शनी दिसून येते. 25 कोटी रुपये मंजूर झालेले आहेत त्यामध्ये गाळ काढण्याचे काम समाविष्ट करावे असा अभिप्राय आहे. लाखो लोक याठिकाणी येत असतात असा देखील अंदाज आहे. ज्यावेळी यात्रा असते किंवा गर्दी असते त्यावेळी पोलीस बंदोबस्त ठेवणे शक्य होईल. कायम स्वरुपी पोलीस देणे शक्य होणार नाही. जवळजवळ 1300 गावांचा हा परिसर आहे. कायम स्वरुपी पोलीस चौकी निर्माण करणे नॉर्म्सच्या दृष्टीने पाहिले तर अवघड आहे. गर्दी असल्यानंतर आणि यात्रा असेल तेव्हा निश्चितपणाने पोलीस बंदोबस्त दिला जाईल.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर :सभापती महोदय, याठिकाणी पर्यटनस्थळ असल्यामुळे ते पाहण्यासाठी बरेच पर्यटक येत असतात. आंबोली पर्यटनस्थळाजवळ ज्याप्रमाणे पोलीस बंदोबस्त ठेवला जातो त्याप्रमाणे याठिकाणी सुध्दा पोलीस स्टेशन निर्माण करता येत नसेल तर किमान दोन पोलीस नेमण्याची व्यवस्था शासनाकडून केली जाणार आहे काय ?

नंतर श्री. भोगले...

अप्रधारित प्रत / परिपृच्छेसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-1.....

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मी यापूर्वीच उत्तर दिले की, धामापूर तलाव येथे ज्यावेळी पर्यटकांची गर्दी असेल त्यावेळी निश्चितपणे पोलीस बंदोबस्त ठेवला जाईल.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, पोलीस बंदोबस्त ठेवण्यापेक्षा लाईफ गार्ड नेमण्याची आवश्यकता आहे. खरे पाहता हे काम गृह विभागाऐवजी पर्यटन विभागाने करण्याची आवश्यकता आहे. शासनाने सिंधुदुर्ग जिल्हयातील सहा ठिकाणी बोटिंग करण्यासाठी पर्यटन स्थळांची निश्चिती केलेली आहे. तेथे कायमस्वरुपी लाईफ गार्ड नेमण्याची व्यवस्था केली जाईल काय?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, पर्यटन विभागाच्या माध्यमातून बोटिंगची व्यवस्था करण्यात आलेली आहे. धामापूर तलाव या पर्यटन स्थळी येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने बंदोबस्त करण्याविषयी पर्यटन विभागाला सूचना दिल्या जातील.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, श्री.के.पी.रघुवंशी हे सिंधुदुर्ग जिल्हयाचे पोलीस अधीक्षक असताना त्यांनी धामापूर तलावाच्या पर्यटन स्थळाचे महत्व लक्षात घेऊन तेथे लाईफ गार्ड नेमणे आणि पोलीस यंत्रणेच्या माध्यमातून करावयाच्या बंदोबस्ताबाबत शासनाला अहवाल सादर केला होता. या पर्यटन स्थळाला भेट देणाऱ्या पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढत जाणार आहे. त्यामुळे तेथे लाईफ गार्ड आणि पोलीस बंदोबस्त उपलब्ध करुन देण्याबाबत शासन विचार करणार आहे काय?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, ज्यावेळी यात्रा असेल त्यावेळी पोलीस बंदोबस्त दिला जाईल. त्यासाठी वेगळ्या पध्दतीने सूचना देण्याची आवश्यकता नाही. निश्चितपणे माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनेचा देखील विचार करण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या पर्यटन स्थळाच्या विकासासाठी केंद्र सरकारने 100 कोटी रुपयांचा निधी मंजूर केल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. या निधीमधून धामापूर तलावातील गाळ काढणे ही प्राथमिकता आहे. कारण गाळामध्ये बोटी अडकून पडतात. या तलावातील गाळ काढण्यासाठी पर्यटन विभागाला सूचना दिल्या जातील काय?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, 25 कोटी रुपये मंजूर केले आहेत त्या निधीमधून प्रथमत: सुरक्षिततेच्या दृष्टीने गाळ काढण्याच्या कामाला प्राधान्य द्यावे अशा सूचना पर्यटन विभागाला दिल्या जातील.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-1...

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण हे गेली सहा वर्षे धामापूर तलावाच्या विकासाबाबत सातत्याने शासनाला विनंती करीत आहेत. या प्रश्नाबाबत आपल्या दालनामध्ये बैठक बोलावून धामापूर येथील पर्यटन स्थळाच्या विकासाचा प्रश्न संपुष्टात आणावा एवढीच मला विनंती करावयाची आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, एखाद्या तलावामध्ये दुर्घटना घडली की त्याबद्दल सभागृहात चर्चा केली जाते. पर्यटन विभागाच्या संकेतस्थळावर विविध पर्यटन स्थळांची माहिती नमूद केली जाते. त्या माहितीमध्येच संबंधित पर्यटन स्थळाच्या ठिकाणी कोणत्या प्रकारची दुर्घटना घडू शकते व त्या संदर्भात पर्यटकांनी कोणती दक्षता घेतली पाहिजे याचीही माहिती दिली जावी. तलावामध्ये पोहण्यास जाणाऱ्या पर्यटकांनी कोणती काळजी घेतली पाहिजे याबाबत सूचना दिल्या पाहिजेत. लाईफ गार्ड नेमण्याबाबत गृह विभागाकडून कार्यवाही करता येईल. प्रशिक्षित पोलिसांना लाईफ गार्ड म्हणून नेमता येईल. ही जबाबदारी अन्य विभागाची असली तरी त्याची अंमलबजावणी होत नाही ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, आपत्कालीन व्यवस्थापनाबाबत वारंवार चर्चा केली जाते. त्या संदर्भातील काही जबाबदारी गृह विभागाची असते. एखाद्या तलावामध्ये पर्यटक बुडू लागल्यास कोणती मदत मिळेल, कोणती यंत्रणा अस्तित्वात आहे या संदर्भात गृह विभाग कोणती पावले उचलणार आहे?

नंतर श्री.खर्चे...

अप्रमाणित प्रत / प्रतिक्षेपणी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 1.....

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : महोदय, पर्यटन स्थळांच्या बाबतीतील जबाबदारी वेगवेगळ्या विभागांकडे येते. काही ठिकाणी पर्यटन विभाग ही जबाबदारी स्वीकारते तर काही ठिकाणी पाटबंधारे विभाग आणि काही ठिकाणी ग्रामविकास विभागाची देखील जबाबदारी असते. एकूण राज्यात अशा ज्या घटना घडल्या आहेत त्यांची विस्तृतपणे माहिती पुढील दीड महिन्यात आढावा घेऊन घेण्यात येईल व पर्यटन स्थळांच्या सुरक्षिततेच्या संदर्भात काय उपाययोजना करणे आवश्यक आहे अशा सूचना संबंधित विभागांना देण्यात येतील.

श्री. सुभाष चव्हाण : महोदय, तलावातील गाळ काढण्याच्या बाबतीत जलसंधारण मंत्र्यांबरोबर बैठक झाली होती. त्या बैठकीसाठी जलसंपदा विभागाचे अधिकारी देखील उपस्थित होते. यासंबंधीची संपूर्ण माहिती माझ्याकडे आहे. तसेच विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्याकडून पाठविलेला खर्चासहित आराखडा सुध्दा माझ्याकडे तयार आहे. या ठिकाणी पोलीस स्टेशन आणि मनुष्यबळाची गरज आहे. त्याला मंजुरी देण्यात शासनाला कोणती अडचण आहे हेच मला समजत नाही. या ठिकाणी तीन ते पाच लाख लोक पर्यटनासाठी येत असतात. मी आमदार झाल्यापासून या क्षेत्राचा बराच विकास झालेला आहे. परवा तर मी परदेश पर्यटकांना सुध्दा या ठिकाणी पाहिले, असे हे स्थळ आहे. या स्थळाच्या सुरक्षिततेसाठी पोलीस आऊट पोस्ट आणि मनुष्यबळाची गरज असून शासन ते देण्याबाबत विचार करणार काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : महोदय, सन्माननीय सदस्यांच्या विनंतीचा विचार करुन धामापूर पर्यटन स्थळाच्या ठिकाणी पोलीस आऊट पोस्ट व आवश्यक तेवढे मनुष्यबळ देण्याची कार्यवाही निश्चितपणे केली जाईल.

<u>लक्षवेधी क्र. 2 बाबत</u>

सभापती : लक्षवेधी क्र. 2 च्या संदर्भात माननीय सामाजिक न्याय मंत्री श्री. शिवाजीराव मोघे यांनी ही लक्षवेधी त्यांच्या विभागाशी संबंधित नसून ती महसूल व वन विभागाकडे पाठविली असल्याचे कळविले आहे. पण महसूल व वन विभागाने देखील या लक्षवेधी सूचनेचा त्यांच्या विभागाशी संबंध नसल्याचे कळविल्यामुळे ही लक्षवेधी सूचना आज चर्चेला घेता येणार नाही. अशा परिस्थितीत ही लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्यात येत आहे व तिचा कोणत्या विभागाशी संबंध आहे हे पाहून ती नंतर चर्चेला घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाच्या प्रादेशिक कार्यालयात भरती प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार

मु.शी. : व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाच्या प्रादेशिक कार्यालयात भरती प्रक्रियेत झालेला गैरव्यवहार यासंबंधी श्री दिवाकर रावते, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागांतर्गत नागपूर व अमरावती येथील प्रादेशिक कार्यालयातील नियमित व कंत्राटी कर्मचाऱ्यांची भरती व बढती बाबत सहसंचालकांनी फार मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार करणे, सदर गैरव्यवहारासंदर्भात राष्ट्रीय अपंग विकास महासंघ, अमरावती यांच्यातर्फे दिनांक 16 मार्च, 2012 रोजी वा त्यासुमारास मा. मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण सचिव यांच्याकडे तक्रारी करणे, सदर तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 25 व 26 एप्रिल, 2012 रोजी आणि दिनांक 27 व 28 एप्रिल, 2012 रोजी अमरावती व नागपूर येथे जाऊन संचालकांनी चौकशी करणे, सदर चौकशीनुसार सहसंचालकांविरुध्द अद्यापि कोणतीही कार्यवाही न करणे, नागपूर व अमरावती या दोन्ही प्रादेशिक कार्यालयातील कर्मचाऱ्यांमध्ये सहसंचालकांच्या गैरव्यवहाराबद्दल पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."

श्री. डी.पी.सावंत (उच्च व तंत्रशिक्षण राज्य मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

.....3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ल. सू. क्र. 3.....

श्री. दिवाकर रावते : महोदय, श्री. मस्के नावाचे अधिकारी ज्या ठिकाणी जातात तेथे घोळ निर्माण करतात हे शासनाच्या निदर्शनास आले आहे. अमरावतीला त्यांनी घोळ केला म्हणून नागपूरला त्यांची बदली करण्यात आली. नागपूरला देखील भरती प्रक्रियेत त्यांनी घोळ निर्माण केला. याचा अर्थ शासनाच्या कोणत्याही निर्देशाविरुध्द वागावे आणि माझे कोणी काहीच करु शकत नाही अशा आविर्भावात काम करणे ही त्यांची खासियत आहे. माझ्याकडे त्यांच्याबाबत अनेक प्रकारचे पुरावे व माहिती आहे पण केवळ एक दोन गोष्टींचाच मी उल्लेख करणार आहे त्यावरुन श्री. मस्के नावाचे अधिकारी कसे आहेत हे सभागृहाच्या सुध्दा लक्षात येईल.

महोदय, निवेदनात संचालनालयाच्या स्तरावरुन 27 व 28 एप्रिल, 2012 रोजी चौकशी करण्यात आली असे म्हटले आहे. पण तीन महिन्याच्या काळात एखाद्या कर्मचाऱ्याच्या गैरवर्तनाचा अहवाल प्राप्त करता येत नसेल तर शासन कसे चालते हेच यावरुन समजते. विधिमंडळाचे पावित्र्य राखण्यासाठी शासनाला निर्धाराने येथे जाहीर करावयाचे असते ही बांधिलकी सचिव स्वीकारतात की नाही हा प्रश्न पुन्हा निर्माण होतो.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

त्यामुळे या अनुषंगाने "अमरावती प्रादेशिक कार्यालयातील पद भरती व पदोन्तीबाबतचा खुलासा संचालकांकडून मागविण्यात येत आहे असा उल्लेख लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात करण्यात आलेला आहे.

हा घोटाळा अपंगाच्या भरतीमध्ये झालेला आहे. भरतीमध्ये अपंगाला डावलण्यात आलेले आहे. अपंगाला डावलण्यात आल्यानंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले व त्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर शासनाने दि.19 मार्च, 2010 रोजी परिपत्रक काढले आहे त्यामध्ये असे म्हटले आहे की, "माननीय सर्वोच्च न्यायालयाने देखील अपंग हा अपंग आहे, तो खास प्रवर्ग असून त्याची अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, खुला प्रवर्गामध्ये आणखी वर्गवारी होत नाही असे स्पष्ट केले आहे." याचा अर्थ अपंगांना कोणताही प्रवर्ग न वापरता नोकरी दिली पाहिजे असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितलेले आहे. परिपत्रकात पुढे असे म्हटले आहे की, "वरील सर्व बाबी लक्षात घेऊन अपंगांच्या नियुक्त्या करतांना त्या सरळसेवेत कराव्यात. वरील संदर्भ क्रमांक 1 मधील 16/3/99 च्या शासन परिपत्रकातील कार्यपध्दतीचा अवलंब न करता वरील सूचनेनुसार म्हणजे अपंगांची आरक्षित पदे सरळसेवेने भरतांना ती स्वतंत्र दर्शवण्यात येऊन अपंगांची पदे भरतीची कार्यवाही करावी" अशा प्रकारचे शासनाचे स्पष्ट निर्देश आल्यानंतर सुध्दा संबंधित अधिकारी श्री. मस्के यांनी नियमांची पायमल्ली केली आहे. त्यांनी आपला अधिकार वापरुन योग्य अपंगांला निवड प्रक्रियेमध्ये स्थान दिले नाही ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, श्री. कीर्ती वाघ यांनी या प्रकरणाला वाचा फोडली असून त्यांनी 1999 च्या भरती पध्दतीच्या विरोधामध्ये 2010 मध्ये मॅट मध्ये याचिका दाखल केली होती. मॅटने यासंदर्भात "खुल्या प्रवर्गातील आरक्षण हे कोठल्याही परिस्थितीत खुल्या प्रवर्गातूनच भरण्यात यावे" असा निर्णय दिला होता. या निर्णयाच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने मॅटचा निर्णय मान्य करुन मॅटच्या निर्णयाप्रमाणेच भरती करण्याचे निदेश दिले होते. न्यायालयाचे निदेश असतांनाही ते निदेश श्री. मस्के यांनी डावलेले आहेत. असे असतांनाही शासनाने श्री.मस्के यांच्यावर कोणतीही कारवाई केलेली नाही. श्री. मस्के यांच्या संदर्भात मोठया प्रमाणात तक्रारी झालेल्या आहेत. अमरावतीमध्ये त्यांनी गैरपध्दतीने काम केल्यामुळे त्यांची बदली नागपूर येथे करण्यात आली. परंतु त्यांनी नागपूरला सुध्दा गैरपध्दतीने काम केले असून त्यांनी शासनाच्या भरती प्रक्रियेचे आदेश ==2==

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

डावलल्यामुळे श्री. मस्के यांना त्वरित निलंबित करण्यात यावे अशी माझी शासनाला विनंती आहे.

सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय डावलणाऱ्या अधिकाऱ्यावर केवळ चौकशी करण्याचे आदेश शासनाने दिलेले आहेत. या वेळच्या पोलीस भरतीमध्ये मोठया प्रमाणात घोळ झालेला आहे. ज्यांना कामावर घेतलेले आहे त्यांना आपल्याला कमी करावे लागणार आहे अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. ज्यांना नोकऱ्या दिल्या त्यांच्या नोकऱ्या जातील व ज्यांना घेतले नाही त्यांना न्याय मिळणार, अशा विचित्र अवस्थेत आज प्रशासन सापडलेले आहे व एक अधिकारीच हे सर्व काम करीत आहे. त्यामुळे माझे तर म्हणणे आहे की,ज्यांना सेवेत घेतले आहे त्यांना ठेवा, त्या अधिकाऱ्याच्या चुकीच्या निर्णयाचा फटका तरुणांना न देता, न्यायालयाचा मान ठेवून या तरुणांना नोकऱ्या द्या. त्यामुळे घोळ घालणाऱ्या अधिकाऱ्याला आपण घरी पाठविणार की, नाही ? अमरावती प्रादेशिक कार्यालयात पद भरती व पदोन्नतीबाबत संबंधित अधिकाऱ्याकडून खुलासा मागविला जाणार आहे व अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्याची तपासणी करुन निर्णय घेतला जाणार आहे. प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी आम्ही सभागृहात प्रश्न उपस्थित करीत असतो,त्याला प्रशासनाकडून योग्य तो प्रतिसाद मिळावा अशी आमची अपेक्षा असते. श्री. मस्के यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाला डावलले, शासनाच्या परिपत्रकाला धुडकावले त्यामुळे श्री. मस्के यांच्यावर शासनाने निलंबनाची कारवाई आजच्या आज जाहीर करावी अशी विनंती आहे.

श्री. डी.पी.सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सह संचालकांचा जो प्रश्न उपस्थित केलेला आहे त्या सह संचालकांचे नाव श्री. मस्के नसून श्री. अष्टे` आहे. श्री. अष्टे यांच्या विरोधात राष्ट्रीय अपंग विकास महासंघ, अमरावती शाखा यांच्याकडून तक्रार आली होती व त्या अनुषंगाने संचालकांच्या स्तरावर चौकशी करण्यात आली असून त्या चौकशीचा अहवाल मागविण्यात आला असून त्यामध्ये ते दोषी आढळले तर त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, यात घोळ आहे असे शासनाचे म्हणणे आहे. यासंबंधातील चौकशी सुरू आहे. त्यामुळे त्यांची ताबडतोब बदली केली पाहिजे. त्या अधिकाऱ्याला तेथेच ठेवून त्याच्या दबावाखाली शासन चौकशी करू शकत नाही. तेव्हा त्या अधिकाऱ्याची शासनाने ताबडतोब बदली करावी. शेवटी न्यायालय देखील सांगते की, आपण साक्षीदार फोडणार नाही याची खात्री द्यावी. त्यामुळे आपण देखील सामाजिक न्याय वापरावा अशी विनंती आहे.

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, बदली ही काही शिक्षा होऊ शकत नाही. ते जर दोषी असतील तर त्यांच्या विरूद्ध बदली पेक्षा जास्त कठोर कारवाई करण्यास आम्ही कटिबद्ध आहोत.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो प्रश्न मांडला आहे तो अतिशय योग्य आहे. मी त्या पुढे सांगतो की, त्यांच्या कार्यालयात अनेक नियुक्तीचे प्रस्ताव आहेत. वरिष्ठ आणि निवडश्रेणीचे देखील प्रस्ताव आहेत. आम्ही देखील विचारणा करतो तेव्हा ते सांगतात की, मला आता वेळ नाही. तीन-चार महिन्यांनी पाहू या. हा कोणता प्रकार आहे ? ते कशासाठी हे प्रस्ताव आपल्याकडे मुद्दामहून ठेवतात ? नियुक्तीचे प्रस्ताव आल्यानंतर ते एक महिन्याच्या आत काढण्यासंबंधीचे आदेश आहेत. वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रस्ताव ताबडतोब काढण्यासंबंधीचे आदेश आहेत. असे असताना ते लोकप्रतिनिधींचे देखील ऐकत नाही म्हणूनच त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, हे योग्य आहे.

(उत्तर देण्यात आले नाही)

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागासंबंधी येथे लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली आहे. नागपूर विभागात अनेक अनियमितता सुरू आहे. यासंबंधी मी माननीय मंत्री महोदयांना पत्र देखील दिलेले आहे. जवळ जवळ 70 कर्मचारी दिनांक 15 नोव्हेंबर 1999 ते 31 मे 2007 पर्यंत म्हणजे 8 वर्षे कंत्राटी म्हणून कार्यरत होते. त्यांना अचानकपणे कामावरून काढून टाकण्यात आले. हे कर्मचारी सतत मागणी करीत आहेत की, आमचे नुकसान झालेले आहे. आम्ही 8 वर्षे काम करीत होतो. या नवीन भरतीत घोळ करायचा होता म्हणून या 70 कंत्राटी कर्मचाऱ्यांना कमी करण्यात आले आहे. या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी वारंवार निवेदन देऊन मागणी केली होती की, आम्हाला येथे कायम करण्यात यावे. तेव्हा या कंत्राटी कर्मचाऱ्यांना कामावरून कमी करण्याचे कारण काय आहे ? कामावरून कमी केलेल्या या सर्व कर्मचाऱ्यांना कामावर पुन्हा घेण्यासाठी शासन विचार करणार आहे काय ? ...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून येथे प्रश्न उपस्थित केला आहे. राष्ट्रीय अपंग विकास महामंडळाच्या वतीने निवेदन आले आहे. त्यासंबंधी शासनाने तातडीने चौकशीच्या सूचना दिल्या आहेत. संचालक, व्यवसाय शिक्षण यांच्या कार्यालयातील जे ज्येष्ठ सह संचालक होते त्यांच्या मार्फत ताबडतोब चौकशी करण्यात आली. तत्संबंधीचा अहवाल शासनाला जास्तीत जास्त 8 दिवसांमध्ये अपेक्षित आहे. मी आपल्या मार्फत सदनाला 100 टक्के खात्री देऊ इच्छितो की, यामध्ये थोडी सुद्धा चूक आढळली, कुठेही नियमबाह्य काम केले असेल तर त्यांना निश्चितपणाने कडक शासन केले जाईल.

सभापती महोदय, कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित केले पाहिजे असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित करताच येत नाही. कंत्राटी कर्मचाऱ्यांना कॉन्ट्रॅक्ट प्रमाणेच काम करावे लागते. कंत्राटी कर्मचाऱ्यांची सेवा खंडित करून त्यांची पुनर्नेमणूक केली जाऊ शकते. त्यांची नियमित नेमणूक करणे हे नियमात नाही. याबाबत सर्वोच्च न्यायालयाचे अनेक निर्णय आहेत. डबल बेंचचे निर्णय आहेत की, बॅक डोअर एन्ट्री होते. नियमित करण्यासंबंधी जी कार्यपद्धती असते ती फॉलो करूनच नियमित भरती केली जाते. कंत्राटी कर्मचाऱ्याला नियमित करणे हा नियमातील भाग असू शकत नाही.

यानंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे...

सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, 70 कंत्राटी लोकांना कमी करण्यात आले आहे. त्यांना कामावरुन कमी करण्यामागील हेतू वेगळा होता काय, विशिष्ट प्रकारचे कारण होते काय हे निश्चितपणे तपासले जाईल. त्या बाबत कुणालाही पाठीशी घालण्यात येणार नाही. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांच्या म्हणण्याप्रमाणे बदली करणे किंवा अहवालाच्या अनुषंगाने कडक कारवाई करण्या संदर्भात योग्य तो निर्णय घेतला जाईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या ठिकाणी चुकीचे उत्तर दिले आहे. एखाद्या कर्मचाऱ्याने सलग 265 दिवस सेवा केली तर त्या कर्मचाऱ्याला सेवेत कायम करता येते. तशाप्रकारची कायद्यात तरतूद आहे. त्या प्रमाणे आपण या कंत्राटी कामगारांना न्याय देणार काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या कर्मचाऱ्यांनी खरोखरच सलग 265 दिवस काम केले आहे की नाही हे तपासणे आवश्यक आहे. सर्वसाधारण पध्दत अशी आहे की, कर्मचाऱ्यांनी काही दिवस काम केल्यानंतर त्यांना गॅप देऊन त्यांची पुन्हा नेमणूक केली जाते. या बाबतीत असलेले नियम तपासून योग्य ती कारवाई केली जाईल.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, या प्रश्नाबाबत राष्ट्रीय अपंग विकास महासंघाने तक्रार केली आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, भरती प्रक्रियेमध्ये अपंगाना जेवढया जागा मिळावयास पाहिजेत त्या मिळालेल्या नाहीत. 1995 मध्ये डिसॅबिलिटी ॲक्ट संमत झाल्यानंतर अपंगासाठी आरक्षण ठेवण्यात आले. त्या नुसार अपंगांना 3 टक्के व अंधाना 1 टक्का आरक्षण ठेवण्यात आले. त्या प्रमाणे या ठिकाणी आरक्षण ठेवले आहे की नाही याची चौकशी करुन पात्र असलेल्या अपंगाना कामावर घेण्याबाबत सूचना देण्यात येतील काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, अपंगाना आरक्षण ठेवणे अपेक्षित असेल किंवा कायद्यातील तरतुदीनुसार त्या कामगारांची भरती करणे अपेक्षित असेल तर ती झाली पाहिजे. या प्रश्नासंबंधी अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली असता त्या संदर्भातील अहवाल शासनाला सादर झालेला नाही. सदरचा अहवाल आठ दिवसामध्ये शासनाला प्राप्त होईल, त्यानंतर आठ दिवसात त्या संदर्भात निर्णय घेतला जाईल. त्या अहवालामध्ये जर काही दोषारोप असतील तर त्या बाबत योग्य तो निर्णय घेतला जाईल. माननीय सदस्य श्री. हेमंत टकले साहेबांनी सांगितल्याप्रमाणे अपंग

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे...

आणि अंधांसाठी टक्केवारीनुसार आरक्षण ठेवून त्या प्रमाणे भरती झाली आहे की नाही हे पाहिले जाईल. तशा प्रकारे भरती झाली नसेल तर त्या बाबत निश्चितपणे सूचना दिल्या जातील.

सभापती : मंत्री महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी स्पष्टीकरण करीत असतांना सांगितले की, या बाबत सुप्रीम कोर्टामध्ये अपिल दाखल झाल्यानंतर सुप्रीम कोर्टाने विशिष्ट प्रकारच्या डायरेक्टिव्हज किंवा जजमेंट दिल्यामुळे ही बाब स्पष्ट झाली आहे. त्या मध्ये अपंगासाठी आरक्षण ठेवण्यासाठी असलेल्या तरतुदीकडे पहात असतांना अन्य कॅटॅगरीच्या लोकांसाठी ठेवण्यात आलेले आरक्षण बाजूला ठेवून आपण अपंगाना न्याय देण्यासाठी त्यांच्याकडे A+ अशा पध्दतीने पहावे. त्या करिता आपण सुप्रीम कोर्टाने दिलेले जजमेंट जरुर पहावे.

माझी दुसरी अशी इच्छा आहे की, अपंगांच्या संदर्भातील विषय ज्या वेळी आपल्यासमोर येतो त्यावेळी नेमणुकीची प्रक्रिया पूर्ण करणाऱ्या अधिकाऱ्यांकडून देखील अपंगांची नोकरीवर नियुक्ती करीत असतांना त्यांच्याकडे वेगळया भावनेने पाहणे गरजेचे आहे. सुप्रीम कोर्टाने एका बाजूला अशा प्रकारचा निर्णय दिलेला आहे त्या निर्णयाची प्रत मी स्वत: मागवून घेणार आहे, आपण देखील तो निर्णय जरुर पहावा. त्याच प्रमाणे आपण या ठिकाणी संचालकांनी चौकशी केली असल्याचे म्हटले आहे. तरी सुध्दा सविस्तर चौकशी करुन आठ दिवसात अहवाल प्राप्त होईल असेही आपण म्हटले आहे. माननीय सदस्यांनी लक्षवेधी सूचना दिल्यानंतर त्यावर कार्यवाही करण्यासाठी आपण दहा दिवसांचा कालावधी देतो त्या कालावधीत संचालकांकडून हा अहवाल येणे गरजेचे होते. माननीय सदस्यांकडून त्याच उद्देशाने लक्षवेधी सूचना दिली जात असते. म्हणूनच माझी अशी इच्छा आहे की, शासनाने या अपंगांच्या प्रश्नाकडे अधिक लक्ष देणे गरजेचे असून त्या प्रमाणे आपण लक्ष द्यावे. त्याच प्रमाणे सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयाचा देखील आपण अभ्यास करावा.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती . . ..

तसेच याबाबत सांगावयाचे तर ए+ अशा पध्दतीचा जो प्रोव्हीजो आहे, तो देखील तपासण्यात यावा जेणेकरुन या अपंग व्यक्तींना अजून काही न्याय देता आला तर पहावे. अष्टे यांना काय वाटते यापेक्षा देखील अपंग व्यक्तींवर जो अन्याय होत आहे त्याचे निराकरण कसे होईल यादृष्टीने या विभागाचे कार्यक्षम मंत्री म्हणून आपण प्रयत्न करावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला एक विनंती करावयाची आहे. मी याठिकाणी शासनाचे जे निर्देश वाचून दाखविले, त्याची त्यांनी पायमल्ली केली. एक पध्दत असते की, लक्षवेधी सूचना देण्यात आल्यानंतर प्रथमदर्शनी काय वाटते याविषयी जरी माहिती मागविली असती तर बरे झाले असते. नंतर सखोल अभ्यास केल्यानंतर तो दोषी आहे की नाही हे समजले असते. पण प्रथमदर्शनी तो दोषी आहे काय? एवढी जरी माहिती मागविली असती तरी ती आपल्याला सदना मध्ये सांगता आली असती.मी तर तुमच्याकडे निलंबनाची मागणी केली.परंतु निलंबन म्हणजे नोकरीतून काढून टाकणे असे नाही. त्यामुळे सदनाचा मान राखण्यासाठी याबाबतचा अहवाल येईपर्यंत आपण संबंधितांना निलंबित करावे. तसेच अहवाल प्राप्त झाल्यावर जर ते दोषी नसल्याचे आढळून आले तर त्यांना पुन्हा नोकरीमध्ये घेता येते आणि त्यांना सर्व इतर बाबी नंतर देता येतात. पण ज्यावेळी सभागृहाची शान आणि मान याबाबत प्रश्न उपस्थित होतो तेव्हा या माध्यमातून संबंधित अधिकाऱ्यांपर्यंत देखील संदेश जाईल, नाहीतर त्यांना असे वाटेल की, माननीय मंत्री महोदय, आपल्याला वाचवतात, ते सर्वकाही नीट करतात. मग आम्ही काहीही केले तरी चालू शकते असा संपूर्ण महाराष्ट्रामध्ये संदेश जाईल आणि अशी स्थिती प्रत्येक विभागामध्ये असून ही बाब अतिशय गंभीर आहे.

सभापती महोदय, खरे म्हणजे सदनामध्ये एखादा प्रश्न आल्यानंतर, मग तो कोणाचाही असो, त्यावेळी त्या-त्या अधिकाऱ्याला घाम फुटला पाहिजे अशा प्रकारचे वातावरण प्रशासनामध्ये नाही अशी सध्याची परिस्थिती आहे.याबाबत माझी नम्र विनंती आहे. यामध्ये ते लोक माझे कोणी लागत नाहीत. तसेच मी श्री.अष्टे नावाच्या व्यक्तीला पाहिलेले नाही. ती व्यक्ती काळी आहे की गोरी आहे हे देखील मला माहिती नाही. पण याठिकाणी कागदोपत्री प्राथमिकता असल्याचे दिसत आहे आणि या सदनामध्ये ही बाब माननीय सभापती महोदयांनी निदर्शनास आणून दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाला पायदळी तुडवावयाचे, शासकीय आदेश तुडवावयाचे आणि आपले हितसंबंध सुरु ठेवावयाचे. सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव खोटरेसाहेबांना देखील आमदार म्हणून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असा अनुभव आलेला आहे. तसेच एखाद्याचे निलंबन केले म्हणजे त्याच्या आयुष्याचे नुकसान होत नाही. जर तो दोषी नसेल तर परत सेवेमध्ये घेता येईल आणि त्याला सर्वकाही मिळेल. पण जर ती व्यक्ती दोषी असेल तर त्याबाबत पुढील शिक्षा देण्यासाठी त्याचे निलंबन केले तर तो या सदनाचा सन्मान होईल. माझी साधी मागणी आहे की, जर त्याचे निलंबन करावयाचे असेल तर बदली करण्यात यावी. पण तुमचे म्हणणे असे आहे की, केवळ बदली करुन काय होणार आहे ? पण एखाद्याला जामीन देताना न्यायालय सुध्दा असे सांगते की, संबंधितांनी रोज पोलीस स्टेशनमध्ये जाऊन हजेरी लावावयाची आहे. आम्ही माननीय मंत्री महोदयांचे एक कार्यक्षम मंत्री म्हणून कौतुक केले आहे. त्या नुसार आपण आम्हाला कार्यक्षमता दाखववी. कारण आम्हाला तुमच्या विरोधामध्ये घोषणा करणे बरोबर वाटत नाही.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, आपण दिलेले निदेश किंवा सूचना आहेत त्या 100 टक्के पाळल्या जातील. तसेच सुप्रीम कोर्टाने कायद्यामध्ये ज्या डायरेक्टीव्हज् दिलेल्या आहेत, त्याबाबत सांगावयाचे तर सुप्रीम कोर्ट जजमेंट इज लॉ ऑफ लॅण्ड असे म्हणतो आणि तसे ते अभिप्रेतच आहे. याबाबत सुप्रीम कोर्टाचे हेच म्हणणे आहे की, अपंगांचा अनुशेष तातडीने भरण्यात आला पाहिजे. त्या अनुषंगाने मी ब्रिफींगच्या वेळी जी माहिती घेतली, त्यानुसार सदरहू जागेवर दुसऱ्या कोणाची तरी भरती झालेली आहे असे काही दिसून येत नाही. कारण त्या जागा रिक्त आहेत. कदाचित संबंधितांकडून सर्टीफीकेट वगैरे प्राप्त झाली नसतील असे काही झाले असेल. पण मी सदनाला आश्वासित करु इच्छितो की, अधिवेशन संपण्यापूर्वी या संबंधातील अहवाल प्राप्त करुन घेऊन त्याबाबत कारवाई केली जाईल.

श्री.दिवाकर रावते (खाली बसून) : सदरहू अहवाल सदनामध्ये मांडण्यात येईल काय ?

सभापती : मला सन्माननीय मंत्री महोदयांना सांगावयाचे आहे की, कॉन्ट्रॅक्ट सर्व्हीसमध्ये जे लोक सात वर्षे, आठ वर्षे, नऊ वर्षे काम करीत होते, त्याअनुषंगाने आपण या बाबतीतील सविस्तर परिस्थिती पहावी. मला असे वाटते की, शासनाच्या माध्यमातून अनेक विभागतील कॉन्ट्रॅक्ट सर्व्हीस मध्ये काम करणारे जे कर्मचारी आहेत मग ते विशेषत: चतुर्थ श्रेणीतील असतील किंवा तृतीय श्रेणी तील कर्मचारी असतील. त्यांना शासनाने अत्यंत मोठ्या अनेक ठिक्काणी रेग्युलर सुध्दा केलेले आहे अशी उदाहरणे आहेत. तसेच मला असे वाटते की, माननीय मंत्री महोदयांची या विषयाकडे पहाण्याची दृष्टी विशाल आहे.जर ते लोक सात वर्षे, आठ वर्षे किंवा नऊ वर्षे काम करीत असतील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती . . ..

व त्यांची संख्या 200 किंवा 250 असेल तर अशा परिस्थितीत एखाद्या कौटुंबीक जबाबदाऱ्या असणाऱ्या व्यक्तीला अचानक एक प्रकारचा फटका मारणे बरोबर नाही. याबाबतीत माणुसकीच्या दृष्टीकोनातून शक्य असेल तेवढा विचार करावयाचा असतो.माननीय मंत्री महोदयांनी किमान मंत्रिमंडळासमोर हा विषय मांडला तर काही वेळेला न्याय मिळू शकतो आणि त्यादृष्टीने आपण प्रयत्न करावा अशी विनंती आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, हा मुद्दा का उपस्थित झाला तर यापूर्वी आपण ग्रामविकास मंत्री म्हणून काम करीत असताना अनेक कंत्राटी कामगारांना रेग्युलर करण्याच्या संबंधातील आदेश आपण आपल्या सहीने दिलेले आहेत आणि ते आम्ही देखील संबंधितांकडे घेऊन गेलो आहोत. हा कायदा असून रेकॉर्डवर चुकीचे येऊ नये म्हणून मी सांगत आहे.

सभापती : सन्माननीय मंत्री श्री.राजेश टोपे हे अत्यंत कार्यक्षम मंत्री आहेत आणि त्यांना भावना कळतात. समजा या ठिकाणी कंत्राटी कामगार म्हणून 500 जण काम करीत असतील तर त्यांच्या बाबतीत देखील सहानुभूतीने विचार केला पाहिजे. आरोग्य विभागातील वैद्यकीय अधिकारी अनेक वर्षे टेम्पररी म्हणून कार्यरत होते.

यानंतर श्री.बरवड . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

त्यांची 11 महिन्याची सर्व्हिस होती. त्यांची संख्या अडीच ते तीन हजार पर्यंत झाली होती. आपण सर्वांनी प्रयत्न केला आणि शासनानेही मनावर घेतले. त्यानंतर ते सर्व वैद्यकीय अधिकारी नियमित झाले, अशी परिस्थिती आहे. हाही तसाच प्रकार आहे. या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी लक्ष घालावे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात विविध साथीच्या आजारांची झालेली लागण

मु. शी. : चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात विविध साथीच्या आजारांची झालेली लागण यासंबंधी श्रीमती शोभा फडणवीस, सर्वश्री जयवंतराव जाधव, अनिल भोसले, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"राज्यात विशेषत: विदर्भातील चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये मलेरिया, डेंग्यू, अतिसार, गॅस्ट्रो व टॉयफाईड या विविध साथींच्या आजाराने नागरिकांना ग्रासले जाणे, पेंढरी येथील प्रफुल कोडापे या 16 वर्षीय बालकाचा डेंग्यू मूळे झालेला मृत्यू, तसेच स्वाईन फ्लूची मोठ्या प्रमाणात लागण झाल्याचे दिसून येणे, एकटया चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा तालुक्यात 402 सिकलसेल रुग्णांची नोंद होणे, त्यापैकी एसएस गटात 41 तर एएस गटात 361 रुग्ण असल्याचे दिसून येणे, राज्यातील 19 जिल्ह्यात असलेल्या सुमारे 15 लाख सिकलसेलचे रुग्णांपैकी विदर्भात 2 लाखाच्या जवळपास रुग्ण आढळून येणे, परंतु यावरील उपाययोजना म्हणून प्रयोगशाळा मुंबई व पुणे येथे असणे, त्यामुळे विदर्भातील रुग्णाची होत असलेली गैरसोय, चंद्रपूर जिल्ह्यात मे, 2012 मध्ये उष्माघातामुळे 12 जणांचा बळी जाणे, चंद्रपूर जिल्हा सामान्य रुग्णालयातील सी.टी.स्कॅन, एक्सरे सारख्या महत्वाच्या उपकरणांच्या कमतरतेमुळे रुग्णाचे योग्य उपचार होत नसल्यामुळे रुग्णांची होत असलेली गैरसोय, रुग्णांना बाह्य उपचारासाठी आर्थिक भुर्दंड सोसावा लागणे, शासनाने यावर तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना."

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, खऱ्या अर्थाने चंद्रपूरच्या आरोग्याची जी व्यवस्था आहे ती पूर्णपणे कोलमडून पडलेली आहे. सिव्हिल सर्जन यांच्या कार्यालयामध्ये जाऊन लोक तोडफोड करतात इतका राग अनावर झालेला आहे. 5-5 हजार रुपये मागतात म्हणून लोकांनी सीटीस्कॅन मशिन चालविणाऱ्या डॉक्टरला मारलेले आहे. अशी परिस्थिती असताना सुध्दा या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये डॉक्टर्सच्या जागा भरलेल्या आहेत असे म्हटले आहे. एक सीटी स्कॅन मशिन दीड वर्षापासून बंद आहे. खाजगी डॉक्टरकडे जाऊन सीटीस्कॅन करा, बाहेरुन एक्स-रे काढून या असे सांगितले जाते. जे गरीब लोक त्या दवाखान्यामध्ये जातात त्यांच्याकडून 5-5 हजार रुपये मागितले जातात. एक्सरे मशिन गेल्या वर्षभरापासून बंद आहे. ती मशिन दुरुस्त करण्याचे भान शासनाला नाही. सीटीस्कॅन मशिन दुरुस्त करण्याचे भान शासनाला नाही.

वास्तविक पाहता चंद्रपूर हा औद्योगिक जिल्हा आहे, नक्षलग्रस्त जिल्हा आहे. गडचिरोली जिल्ह्यातील लोक सुध्दा त्या ठिकाणी येतात. त्या ठिकाणी संपूर्ण जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर रुग्ण येतात. हे सर्व रुग्ण गरीब, दलित, आदिवासी, मागासवर्गीय असतात. निवेदनामध्ये डॉक्टर्सच्या रिक्त जागा भरलेल्या आहेत असे म्हटले आहे. मूल येथे डॉक्टरांच्या 8 जागा आहेत. त्यातील एक डॉक्टर गेल्या साडेतीन वर्षापासून पळून गेलेला आहे. परंतु 10 वेळा पत्र देऊनही अजून त्याच्यावर कोणतीही कारवाई केलेली नाही. त्याचे नाव आजही मूल येथील डॉक्टरांच्या रजिस्टरमध्ये आहे. 2005 मध्ये शासनाने जेवढी पदे मंजूर केली त्यातील डॉक्टर्स रुजू झाले नाहीत. ही बाब सुध्दा शासनाला माहीत नाही.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, आमच्या खूप व्यथा आहेत पण कोणीही लक्ष देत नाहीत. किती वेळा भेटावयाचे ? माननीय मंत्री महोदय श्री. सुरेश शेट्टी यांनाही मी भेटले. त्यांच्या समोर आदेश देऊन सुध्दा सिव्हिल सर्जन काम करीत नाहीत. अशी परिस्थिती असेल तर आम्ही कोणाजवळ बोलावयाचे ? डॉक्टर साहेब आमचे पालकमंत्री आहेत. पालकमंत्र्यांच्या ग्रामीण दवाखान्यातील ॲनेस्थेशियन चंद्रपूरमध्ये नेला. मूल येथील ॲनेस्थेशियन नेला. आता त्या ठिकाणी ॲनेस्थेशियन नाही. तेथील दोन्ही दवाखाने रिकामे पडलेले आहेत. अशी परिस्थिती असताना या निवेदनामध्ये मलेरियाचा, टायफाईडचा एकही रुग्ण गंभीर नव्हता असे उत्तर दिलेले आहे. चंद्रपूरचे

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP

श्रीमती शोभा फडणवीस .....

एस.पी. श्री. सुवेझ हक हे मलेरियानंतर टायफाईडने गंभीर आजारी झाले. ते नागपूरला तीन दिवस कोमात होते. एस.पी.ची अशी अवस्था असताना शासनाला जर ते मान्य नसेल तर आम्ही कोणाकडे जावयाचे ? सर्वसामान्य माणसांचा आवाज कोण उठविणार ?

सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मी प्रश्नच विचारते पण त्यापूर्वी मला हे सांगू द्यावे. एस.पी. सारखा अधिकारी गंभीर आजारी होतो, कोमात जातो पण त्याचीही नोंद होत नाही. त्या ठिकाणी या वेळी 48 ते 50 डिग्री उष्णतामान होते. उष्माघाताने 10 लोक मयत झाले. परंतु शासनाने एकही मयत झाला नाही असे उत्तर दिले आहे. मी नावे वाचून दाखविण्यात वेळ घालविणार नाही. पण 10 लोक मयत झालेले आहेत. त्यामध्ये 32 वर्षाचे, 65 वर्षाचे, 70 वर्षाचे, 80 वर्षाचे लोक आहेत. त्यामध्ये मजूर आहेत, कामगार आहेत. त्यांची नोंद शासनाकडे नाही. हे आरोग्य खाते आहे की काय आहे ?

त्या ठिकाणचे सीटीस्कॅन मशिन दुरुस्त करण्याची गरज नाही. कारण त्या मशिनला 10 वर्षे झालेली असून आऊटडेटेड झालेली आहे. त्या ठिकाणी ताबडतोब नवीन सिटीस्कॅन मशिन बसविण्याची गरज आहे. त्या ठिकाणी नवीन सीटीस्कॅन मशिन पंधरा दिवसांच्या किंवा एक महिन्यात आत देणार का ? एक्सरेच्या दोन मशिन्स असल्यानंतर एक मशिन नादुरुस्त असते. यांना एवढा सुस्तपणा आलेला आहे की ती मशिन सुध्दा दुरुस्त होत नाही. त्या ठिकाणी नवीन एक्सरे मशिन देणार का ? चंद्रपूर येथील सामान्य रुग्णालयामध्ये ॲनेस्थेशियनची दोन पदे रिक्त आहेत. आमचे नेलेले डॉक्टर्स मी आणि पालकमंत्र्यांनी परत मागितले. त्या ठिकाणी आजही डॉक्टर्सची 6 पदे रिक्त आहेत. ॲनेस्थेशियन नाही. ग्रामीण रुग्णालयामध्ये अधीक्षक नाही.

सभापती : आपण हे मघाशी सांगितले आहे. आपण प्रश्न विचारावा.

श्रीमती शोभा फडणवीस : माझी अशी मागणी आहे की, ही सर्व पदे भरणार का तसेच या सर्व मशिन्स दुरुस्त करणार का किंवा नवीन मशिन्स देणार का ? जे डॉक्टर्स 2005 पासून 2012 पर्यंत रुजू झालेले नाहीत त्यांना ताबडतोब कामावरुन कमी करुन दुसरे डॉक्टर्स देणार का ?

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

जो डॉक्टर 3 वर्षांपासून पळालेला आहे त्याच्याविरुध्द कारवाई केली जाणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांच्या प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देण्याचा मी प्रयत्न करते. सी.टी.स्कॅन मशीन 10 वर्षे जुनी असल्यामुळे ती निर्लेखित करण्याच्या स्थितीत आहे. त्यामुळे त्या रुग्णालयात नवीन सी.टी.स्कॅन मशिन देण्यात येईल. एक्स-रे मशीन 3 महिन्यांपासून बंद आहे, त्या मशिनच्या दुरुस्तीचे काम सुरु आहे. एक महिन्याच्या आत ती मशिन दुरुस्त होऊन कार्यान्वित होईल. दुसरी मशिन कार्यरत आहे. डॉक्टरांच्या रिक्त पदांबाबत मी सांगू इच्छिते की, चंद्रपूर जिल्ह्यातील 28 डॉक्टरांच्या नियुक्तीचे आदेश आजच देण्यात आलेले आहेत. त्यामध्ये रेडिओलॉजिस्ट-1, एम.बी.बी.एस.-11, सर्जन-1, अस्थिरोग तज्ज्ञ-1, बालरोग तज्ज्ञ-5, भूल तज्ज्ञ-6 आणि स्त्रीरोग तज्ज्ञ-3 या डॉक्टरांचा समावेश आहे. या डॉक्टरांच्या नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

मलेरियाच्या प्रादुर्भावामुळे 255 केसेस पॉझिटिव्ह आढळून आलेल्या आहेत. परंतु सुदैवाने मलेरियामुळे एकाही व्यक्तीचा मृत्यू झालेला नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी उष्माघातामुळे 10 लोकांचा मृत्यू झालेला आहे असे सांगितले आहे. शासनाच्या माहितीनुसार उष्माघाताने एकाही व्यक्तीचा मृत्यू झालेला नाही. त्यांच्या मृत्यूचे अन्य कारण असू शकेल. मी मघाशी सांगितल्या प्रमाणे सर्व मशीन्स दुरुस्त करण्याचे काम शासनामार्फत करण्यात आलेले आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तराच्या आधारावरच मी माझा प्रश्न विचारत आहे. सी.टी.स्कॅन मशीन 10 वर्षे जुनी असल्यामुळे ती मशीन दीड वर्षांपासून बंद होती. ही मशीन बंद असल्याचे विभागाच्या लक्षात केव्हा आले आणि नवीन मशीनची ऑर्डर केव्हा देण्यात आली आहे आणि नवीन मशीन केव्हा येणार आहे ?

मंत्री महोदयांनी असेही सांगितले की, 3 महिन्यांपासून एक्स-रे मशीनची दुरुस्ती सुरु आहे. हे मशीन दुरुस्तीसाठी विदेशात पाठविले आहे का किंवा या मशीनची दुरुस्ती महाराष्ट्रात किंवा चंद्रपूरमध्येच केली जात आहे, या मशीनच्या दुरुस्तीला 3 महिन्यांचा कालावधी का लागला ?

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत....

याची चौकशी केली जाईल काय, उष्माघातामुळे 10 जण दगावले असल्याचे सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी सांगितले आहे. रुग्णाचा हॉस्पिटलमध्ये मृत्यू झाला तर त्याची नोंद घ्यावयाची आणि रस्त्यावर एखाद्याचा मृत्यू झाला तर त्याची नोंद घ्यावयाची नाही अशी आपल्याकडे पध्दत आहे काय ? सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस ह्या उष्माघातामुळे रस्त्यावर मृत झालेल्या 10 व्यक्तींची नावे सांगण्यास तयार आहेत. त्यांची माहिती शासनाकडे का नाही, त्याचप्रमाणे सिकलसेलच्या रुग्णाची इलेक्ट्रोफोरोसिसची रुग्णालयात टेस्ट केली जाते. तशी तपासणी प्राथमिक आरोग्य केंद्रातून केली जाते काय आणि केली जात असेल तर सिकलसेलचे निदान कशा प्रकारे केले जाते ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सी.टी.स्कॅनबाबत मी सांगेन की, या सी.टी.स्कॅनच्या मशीनची अनेक वेळा दुरुस्ती करण्यात आली होती. 2003-2004 पर्यंत या मशीनची वॉरन्टी होती. त्यामुळे त्या कालावधीत या मशीनची दुरुस्ती केलेली नाही. 2005-2006 मध्ये 2.5 लाख रुपये दुरुस्तीवर खर्च करण्यात आला. 2006-2007 मध्ये 2.5 लाख रुपये, 2007-2008 मध्ये 2 लाख 80 हजार 900 रुपये, 2008-2009 मध्ये 2 लाख 75 हजार 750 रुपये, 2009-2010 मध्ये 2 लाख 80 हजार 900 रुपये आणि 2010-2011 मध्ये 2 लाख 75 हजार 750 रुपये आणि 2011-2012 मध्ये खर्च करण्यात आला नाही. या मशीनच्या दुरुस्तीसाठी एकूण 16 लाख 13 हजार 300 रुपये खर्च करण्यात आलेला आहे. या मशीनचा वॉरन्टी पिरियड 2004 मध्येच संपलेला आहे. त्यानंतर ती मशीन वारंवार नादुरुस्ती होत असल्यामुळे नवीन मशीन घेण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

डॉ.दीपक सावंत : कोणत्या तारखेला मशीन देण्याचे आदेश देण्यात आले आणि ती मशीन केव्हा प्राप्त होणार आहे ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, आरोग्य संचालकांना चंद्रपूर येथील रुग्णालयाला सी.टी.स्कॅन मशीन देण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KTG/ D/ D/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 13:00

प्रा. फौजिया खान...

सिकलसेलसाठी प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये इलेक्ट्रोफोरोसिची सुविधा नसते. परंतु सॉल्युबिलिटी टेस्ट करण्यात येते. सन्माननीय सदस्य स्वत: डॉक्टर आहेत. त्यांना माहीत आहे की, या बाबतीत कौन्सिलिंग खूप महत्वाचे असते. सिकलसेलसाठी अनेक उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही. 20 जिल्ह्यामध्ये ज्या ज्या सुविधा करणे आवश्यक आहे त्या करण्यास शासन तयार आहे.

एक्स-रे मशिन 3 महिन्यापासून बंद आहे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. हे मशिन दुरुस्त करण्यासाठी मी एक महिन्याचा कालावधी दिलेला असला तरी 2 दिवसात देखील हे मशिन दुरुस्त होईल.

श्री. प्रवीण पोटे : विदर्भामध्ये सिकलसेल, स्वाईन फ्ल्यूच्या रुग्णांच्या रक्ताचे नमुने तपासण्यासाठी प्रशोगशाळा नाही. रक्ताचे नमुने पुण्याला तपासण्यासाठी पाठवावे लागतात. तेव्हा विदर्भामध्ये रक्ताचे नमुने तपासण्यासाठी प्रयोगशाळा केव्हा सुरु करण्यात येईल ?

प्रा. फौजिया खान : ही सुविधा चार-पाच ठिकाणी देण्यात येते. सॉल्युबिलिटी टेस्टची सुविधा प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये असेल तर ग्रामीण रुग्णालयामध्ये, जिल्हा रुग्णालयामध्ये इलेक्ट्रोफोरोसिसची सुविधा असते. तेव्हा इलेक्ट्रोफोरोसिसची सुविधा मुंबई-पुण्यापर्यंत करण्याची आवश्यकता नाही.

श्री. प्रवीण पोटे : स्वाईन फ्ल्यूचे नमुने तपासण्यासाठी पुण्याला पाठवावे लागतात. विदर्भामध्ये स्वाईन फ्ल्यूचे नमुने तपासण्याची सुविधा नाही. तेव्हा स्वाईन फ्ल्यूचे नमुने तपासण्याची सुविधा विदर्भामध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल काय ?

प्रा. फौजिया खान : स्वाईन फ्ल्यूच्या रुग्णाच्या थ्रोट स्वॅबची तपासणी पुण्यालाच होते. अशा प्रयोगशाळा मर्यादित ठिकाणीच आहेत.

श्रीमती दिप्ती चवधरी : पावसाळा सुरु झाल्यानंतर स्वाईन फ्ल्यूची मोठ्या प्रमाणावर लागण होत असते. पुणे शहरामध्ये स्वाईन फ्ल्यूचे रुग्ण जास्त प्रमाणात आढळतात. स्वाईन फ्ल्यूच्या रुग्णांवर उपचार करण्यासाठी टॅमी फ्ल्यूच्या गोळया, व्हेण्टीलेटर इत्यादी गोष्टींची शासनाने तयारी केलेली आहे काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : स्वाईन फ्ल्यूच्या बाबतीत शासन दक्ष असून शासनाने सर्व तयारी केलेली आहे. दवाखान्यामध्ये औषधे आणि व्हेंटिलेटर्स उपलब्ध असून तसा आढावा आम्ही घेतलेला आहे. पुणे शहरातील कोणकोणत्या रुग्णालयामध्ये कोणकोणत्या सुविधा उपलब्ध आहेत याची माहिती माझ्याकडे आहे. सन्माननीय सदस्यांना पाहिजे असेल तर ती माहिती मी पटलावर ठेवू शकेन. पावसाळयामध्ये स्वाईन फ्ल्यूची लागण मोठ्या प्रमाणावर होते असा आपला अनुभव आहे. त्यामुळे त्याबाबतीत शासनाने सर्व प्रकारची तयारी केलेली आहे.

श्री. केशवराव मानकर : पूर्व विदर्भामधील नक्षली भागामध्ये विशेषत: गोंदियामध्ये वैद्यकीय सोईसुविधांच्या बाबतीत अनेक अडचणी आहेत. सध्या सोनोग्राफी सेंटर्स बंद केली जात आहेत. या पार्श्वभूमीवर मी सांगू इच्छितो की, गोंदिया येथील गंगाबाई रुग्णालयातील सोनोग्राफी सेंटर बंद असल्यामुळे रुग्णांना खाजगी डॉक्टरांकडे जावे लागते. परिणामी अनेक मुले दगावलेली आहेत. तेव्हा गंगाबाई रुग्णालयातील सोनोग्राफी सेंटर तातडीने सुरु करण्यात येईल काय ? गोंदियामध्ये विजेचा देखील प्रश्न आहे. सिंगल लाईनचे लाखो रुपये भरण्यात आलेले आहेत.

...नंतर श्री. गिते...

अधिकृत मत / प्रतिक्रियेसाठी नाही

श्री. केशवराव मानकर....

परंतु त्या ठिकाणी अद्यापपर्यंत वीज पुरवठा झालेला नाही. तेथील विजेचा प्रश्न सुटला नसल्यामुळे अनेक रुग्ण दगावले आहेत. म्हणून विजेच्या प्रश्न सोडविण्याच्या बाबतीत शासन तातडीने कार्यवाही करील काय ?

प्रा.फौजिया खान : प्रत्येक ठिकाणी रुग्णांसाठी आरोग्य सुविधा उपलब्ध नसेल किंवा सुविधांची कमतरता असेल तर त्या ठिकाणी शासनाकडून अशी सुविधा निर्माण करण्यात आली आहे की, सिटी स्कॅन, सोनोग्राफी ही रोग निदान निश्चित करणारी यंत्रे आहेत. यासाठी प्रायव्हेट डायग्नोस्टीक्सची मदत घेऊन पीपीपी मॉडेलवर आपण व्यवस्था सुरु केलेली आहे. शासनाने त्याचे दर ठरवून दिलेले आहेत. ए.पी.एल.च्या लोकांना कोणत्या दरामध्ये ती सुविधा उपलब्ध होईल हे ठरवून दिले आहे आणि दारिद्र्य रेषेखालील जे लोक आहेत त्यांच्यासाठी ही डायग्नोस्टीकची सुविधा मोफत करण्यात आलेली आहे. यामध्ये प्रायव्हेट रुग्णालयाची आणि प्रायव्हेट डायग्नोस्टीकची सुध्दा मदत घेऊन आपण हे काम करीत आहोत. परंतु विदर्भातील रुग्णालयांमध्ये ज्या काही असुविधा आहेत त्यांच्याबद्दल आढावा घेऊन कार्यवाही करण्यात येईल.

सभापती : राज्यमंत्री महोदया, हा प्रश्न चंद्रपूर जिल्हयातील रुग्णालयासंबंधीचा आहे. माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी गोंदिया येथील रुग्णालयाचा प्रश्न उपस्थित केला आहे. गोंदिया रुग्णालयाबाबत तातडीने उत्तर देणे आपल्याला शक्य नाही. त्या संदर्भातील उत्तर आपण सभागृहाच्या पटलावर ठेवले तर माननीय सदस्यांना त्याची माहिती मिळू शकेल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, विशेषत: चंद्रपूर जिल्हयाबाबत हा प्रश्न निर्माण झालेला आहे. एक गोष्ट आपण सगळयांनी मान्य केली आहे की, या संपूर्ण राज्यात प्रदूषणाच्या दृष्टीने सर्वात अधिक वाईट परिस्थिती चंद्रपूर जिल्हयात आहे. आपण आरोग्य सेवेचा एकूण विचार केला तर इतर जिल्हयांबाबत जे काही मापदंड लावले जातात त्यापेक्षा काहीतरी अधिक या जिल्हयाबाबत करण्याची आवश्यकता आहे. तेथील पर्यावरण सातत्याने बिघडत असताना नवनव्या स्वरुपाचे आजार तेथे उद्भवण्याची शक्यता आहे. त्यासाठी प्रतिबंधात्मक काय रचना करता येईल हा एक मूलगामी विचार या आरोग्य सेवेच्या संदर्भात झाला पाहिजे. तो विचार झाला नाही तर यामध्ये गुणात्मक बदल होण्याची सुतराम शक्यता नाही. सुदैवाने आपण आपल्या राज्यात आरोग्य विज्ञान विद्यापीठ स्थापन केलेले आहे. त्यांच्याकडे संशोधनाची मुख्य जबाबदारी आहे. चंद्रपूर

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

जिल्हा असा आहे की, त्याचे संपूर्णपणे आरोग्याच्या दृष्टीने आरोग्य विज्ञान विद्यापीठाने संशोधन करण्याची गरज आहे. त्या ठिकाणी तांत्रिक गोष्टींची पूर्तता कमी असतील तर त्या तेथे उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. चंद्रपूरला विशेष दर्जा देऊन इन्फ्रास्ट्रक्चरसाठी लागणाऱ्या ज्या गोष्टीची आवश्यकता आहे, त्या गोष्टीची उपलब्धता करुन देण्याबाबत तसेच तेथील आरोग्य सेवेमध्ये चांगल्या प्रकारची सुधारणा होण्यासाठी खास उपाययोजना करण्याबाबत शासन विचार करील काय ?

प्रा.फौजिया खान : सन्माननीय सदस्यांनी अतिशय उपयुक्त अशी सूचना केलेली आहे. नाशिक येथील आरोग्य विज्ञान विद्यापीठाने या विषयावर संशोधन करावे या बाबतीत आमच्या विभागाने वेळोवेळी पत्र व्यवहार केलेला आहे.

श्री. जयवंत जाधव : राज्यातील अनेक शासकीय रुग्णालयांमधील सिटी स्कॅन मशीन्स नादुरुस्त अवस्थेत आहेत. नाशिक सिव्हील हॉस्पिटलमधील सिटी स्कॅन मशीन बंद अवस्थेत आहे. त्या बाबतीत मी अनेक वेळा माननीय आरोग्य मंत्र्यांकडे लेखी स्वरुपात तक्रारी केलेल्या आहेत. मी या लक्षवेधी सूचनेच्या चर्चेच्या निमित्ताने माननीय सभापतींना विनंती करतो की, ज्यावेळी सभागृहात ज्या जिल्हया विषयी प्रश्न विचारला जातो, त्यावेळी त्या जिल्हयाच्या अनुषंगानेच माननीय मंत्री महोदयांकडून उत्तरे दिली जातात. संपूर्ण राज्यातील शासकीय रुग्णालयांमध्ये आज मोठया प्रमाणात मशिनरी बंद आहेत. ज्या मशिनरींचा पुरवठा केला गेला आहे, त्या मशिनरी नेहमीच बंद पडतात. एका मशिनरीवर दुरुस्तीचा खर्च 16 लाख रुपये करण्यात येतो. या मशिनरीची मूळ किंमत किती असते, त्यावर दुरुस्तीसाठी किती खर्च अपेक्षित असतो, या संबंधी कशा पध्दतीने ऑडीट होते इत्यादी सर्व माहिती संकलित करण्याच्या सूचना शासनाला देऊन ती माहिती सदनातील सर्व सदस्यांना उपलब्ध करुन दिली पाहिजे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.4.....

श्री.जयवंतराव जाधव.....

नाशिकसारख्या ठिकाणी सुध्दा रुग्णालयातील मशीन्स् अनेक वेळा बंद अवस्थेत असतात. तसेच पुरेसा कर्मचारीवर्ग देखील उपलब्ध नसतो. अशा रुग्णालयांमधून मशीन्स दुरुस्त करणे किंवा कर्मचारीवर्गाची नियुक्ती करणे यासारख्या उपाययोजना शासनाकडून केल्या जाणार आहेत काय?

सभापती महोदय, सिकलसेल आजारासंबंधी अस्थिमज्जा प्रत्यारोपणाचा इलाज केला जातो परंतु तो अतिशय महाग आहे. सिकलसेलच्या रुग्णांना शासनाकडून त्यांच्या परिस्थितीनुरुप उपचार उपलब्ध करुन दिले जातील काय ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, नाशिकसारख्या शहरामध्ये आरोग्य विज्ञान विद्यापीठ दिलेले आहे. हे विद्यापीठ नागपूर येथे स्थापन करण्यात येणार होते.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सांगितलेली गोष्ट खरी आहे की, सी.टी.स्कॅन मशीनरीची समस्या आहे. डायग्नोस्टीक मशीनरी इक्वीपमेंट ज्या ज्या ठिकाणी शक्य आहे त्याठिकाणी नव्याने देण्याचा शासनाकडून प्रयत्न होत आहे. ही मशीनरी महागडी आहे. परंतु पी.पी.पी.(पब्लीक प्रायव्हेट पार्टिसिपेशन) माध्यमातून सरकारने बी.पी.एल. धारकांसाठी कमी दरात औषधोपचाराची व्यवस्था केलेली आहे. मला सांगण्यास आनंद होतो की, गेल्या 2 वर्षामध्ये कर्मचारी भरतीसंबंधी आम्ही ड्राईव्ह घेतला असता वर्ग-1 म्हणजे सिव्हील सर्जन, डी.एच.ओ.,मेडीकल ऑफीसर आणि वर्ग-3 अशा एकूण 3824 उमेदवारांची निवड केलेली आहे आणि त्यापैकी 3211 उमेदवार रुजू झालेले आहे. चंद्रपूर जिल्हयासाठी वैद्यकीय अधिकारी या पदासाठी एकूण 753 उमेदवारांना आज नियुक्तीचे आदेश दिलेले आहेत. गेल्या दोन वर्षात कर्मचारीवर्गाच्या नियुक्तीसाठी शासनाने निश्चितपणाने प्रयत्न केलेला आहे हे वरील आकडेवारीवरुन दिसून येईल.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, चंद्रपूर जिल्हयाच्या प्रश्नासंबंधी ही लक्षवेधी उपस्थित करण्यात आली होती. सगळया राज्यातील प्रश्नासंबंधी चर्चा करण्याऐवजी ज्या हेतूने लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली आहे त्यासंदर्भातील उत्तर अपेक्षित आहे. नव्याने कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आल्याचे राज्यमंत्री महोदयांनी सांगितले. वर्ग-1 ची 20 मंजूर पदे असून 14 भरली आहेत आणि 6 पदे रिक्त आहेत. वर्ग-2 मध्ये 32 मंजूर पदे असून 27 भरलेली आहेत.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक 4.....

डॉ. नीलम गोऱ्हे...

5 पदे रिक्त आहेत. ही पदे केव्हा भरली जाणार आहेत ? 2011 मध्ये आरोग्य विभागाने वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या त्यातील अनेक उमेदवार हजरच झालेले नाहीत. 272 उमेदवारांच्या सेवा रद्द करण्याची नोटीस पाठविण्यात आलेली आहे. या उमेदवारांच्या जागी दुसऱ्या उमेदवारांची नियुक्ती केली जाणार आहे काय ? महाराष्ट्रात अनेक रुग्णालयांमध्ये सी.टी.स्कॅन, एक्स-रे मशीन नादुरुस्त अवस्थेत आहेत. यासंदर्भातील माहिती अधिवेशन संपण्यापूर्वी पटलावर ठेवण्यात येईल काय ?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. जी रिक्त पदे आहेत त्याच्या अगेन्स्ट दुसऱ्या उमेदवारांमधून पदे भरली जातील. जे उमेदवार रुजू झालेले नाहीत किंवा जे उमेदवार ॲबस्कॉंडींग आहेत त्यांच्याबाबतीत शासनाने कडक धोरण स्वीकारले असून जे उमेदवार रुजू झालेले नसतील त्यांना नव्याने अर्ज करणे जरुरीचे आहे. त्यानंतरच त्यांना रुजू करुन घेण्यात येईल.

यानंतर श्री. भोगले

अप्रधारित प्रत / प्रोव्हिजनल कॉपी

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातील सी.टी.स्कॅन मशीन गेली पाच-सहा वर्षे बंद आहे. गेल्या आर्थिक वर्षात पब्लिक प्रायव्हेट पार्टिसिपेशनमध्ये एक संस्थेशी करार केला असल्याचे शासनाने सांगितले होते. परंतु सेवा देणाऱ्या संस्थेकडून आकारले जाणारे दर सर्वसामान्य रुग्णांना परवडत नाहीत. त्यामुळे इतर जिल्हयांसाठी जर नवीन सी.टी.स्कॅन मशीन खरेदी केले जाणार असेल तर सिंधुदुर्ग जिल्हयासाठी देखील नवीन सी.टी.स्कॅन मशीन उपलब्ध करुन देण्यात येईल काय आणि रेडिऑलॉजिस्टचे पद भरण्यात येईल काय?

सभापती महोदय, कणकवली येथील शवागार गृहासाठी वातानुकूलित यंत्र बसविण्यात आले आहे. त्या यंत्रासाठी वार्षिक देखभाल करार करुनही संबंधित पुरवठादाराकडून यंत्राची दुरुस्ती होत नसल्यामुळे वातानुकूलित यंत्राचा काहीही उपयोग होत नाही. त्या वातानुकूलित यंत्राची तातडीने दुरुस्ती करण्याचे आदेश दिले जातील काय?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, इक्वीपमेंटबाबतची माहिती पटलावर ठेवण्यात येईल असे मी यापूर्वीच सांगितले आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील इक्वीपमेंटबाबतची माहिती पटलावर ठेवण्यात येईल. शक्य असल्यास नवीन मशीन देण्याचा सुध्दा विचार करण्यात येईल. सिंधुदुर्ग जिल्हयातील 38 पदे भरण्यात आली आहेत. त्यामध्ये रेडिऑलॉजिस्ट या पदाचा अंतर्भाव नसल्यामुळे ते पद भरण्यात आले नाही. इतर सर्व विशेषज्ञांची पदे भरण्याचे काम केलेले आहे. पुन्हा नव्याने पदे भरली जाणार असून त्या भरतीमधून सिंधुदुर्ग जिल्हयासाठी रेडिऑलॉजिस्टचे पद उपलब्ध होईल.

सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत पहिल्यांदाच खास बाब म्हणून विशेषज्ञांची पदे भरली जात आहेत. यापूर्वी असा प्रयत्न झालेला नव्हता. यापुढे राज्यात वैद्यकीय अधिकाऱ्यांची नेमणूक करताना विशेषज्ञांचा देखील त्यामध्ये समावेश होणार आहे. रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये वैद्यकीय अधिकारी सेवा करण्यास इच्छुक नसतात. त्यामुळे शासनाने खास धोरण निश्चित केले आहे. यापुढे वैद्यकीय अधिकारी म्हणून काम करण्यासाठी रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हयास प्राधान्य दिले तर परीक्षेत अधिक गुण देण्याबरोबर वेतनवाढ देण्यात येणार आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.4.....

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत तज्ज्ञ डॉक्टरांची नियुक्ती केली जाते. चंद्रपूर जिल्हयामध्ये डी.जी.ओ.नेमण्याबद्दल सरकारला आदेश देण्यात आल्यानंतर जिल्हा शल्य चिकित्सकांनी त्या पदावर एम.बी.बी.एस.डॉक्टरांची नेमणूक करावी अशा सूचना देण्यात आल्या होत्या. तरी देखील डी.जी.ओ.पदावर बी.ए.एम.एस.डॉक्टरांची नेमणूक करण्यात आली. ही बाब मी माननीय आरोग्यमंत्र्यांसमवेत झालेल्या बैठकीमध्ये उपस्थित केली होती. संचालक, आरोग्य सेवा यांनी जिल्हा शल्य चिकित्सकांना कळविले होते की, तज्ज्ञ डॉक्टरांची नेमणूक केली पाहिजे. त्यामुळे जिल्हा शल्य चिकित्सकांनी एम.बी.बी.एस.ऐवजी बी.ए.एम.एस.डॉक्टरांची डी.जी.ओ.पदावर नियुक्ती केल्याबद्दल त्यांच्यावर कारवाई केली जाईल काय?

ग्रामीण रुग्णालयामध्ये बी.ए.एम.एस.ऐवजी डी.जी.ओ.नेमण्यात येतील काय? मूल येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये डी.जी.ओ.पदाची आवश्यकता आहे. ते पद तातडीने भरण्यात येईल काय?

प्रा.फौजिया खान : सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे बी.ए.एम.एस.डॉक्टरांना कोणत्या पदाच्या ऐवजी नेमण्यात आले याची माहिती घेण्यात येईल.

श्रीमती शोभा फडणवीस : स्त्री रोग तज्ज्ञांच्या जागेवर नेमण्यात आले. मी ही बाब माननीय आरोग्यमंत्र्यांसमवेत झालेल्या बैठकीमध्ये निदर्शनास आणली होती.

प्रा.फौजिया खान : ते कॉन्ट्रॅक्च्युअल पद आहे. कॉन्ट्रॅक्च्युअल पदामध्ये स्पेशालिस्टचे पद नसते. याबाबत माहिती घेऊन कार्यवाही करण्याची प्रक्रिया करण्यात येईल.

नंतर श्री.खर्चे...

अप्रधारित प्रश्न / प्रश्नोत्तरासाठी नाही

पृ.शी./मु.शी. :औचित्याचा मुद्दा

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यासाठी विशेष परवानगी मागितलेली असल्याने ते आपला औचित्याचा मुद्दा आता मांडतील.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"हसरा चेहरा, स्नेहील डोळे, पीळदार शरीरयष्टी, हातात मोगऱ्याचा गजरा असे भारतीय चित्रपट सृष्टीतले सदाबहार व्यक्तीमत्व म्हणजे कै. वसंत देसाई त्यांचे हे जन्मशताब्दी वर्ष, जून, 2012 मध्ये जन्माला आलेल्या कोकणच्या सुपुत्राने 1930 पासून 1975 पर्यंत 45 वर्षे चित्रपट सृष्टीमध्ये अढळ स्थान प्राप्त केले. प्रभातमधून सुरु झालेली संगीताची कारकीर्द शांताराम बापूंच्या राजकमलमध्येही उत्साहात सुरु राहिली. पंडितराज जगन्नाथ ह्या संगीत नाटकाने नव इतिहास निर्माण केला. "एक सूर एक ताल" मध्ये सारा महाराष्ट्र गुंफला. पद्मश्री किताबाबरोबर संगीतातले मानाचे पुरस्कार त्यांनी मिळविले. मराठी नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपदही भूषविले. सन 1974 मध्ये विधान परिषदेचे नामनियुक्त सदस्यत्वही मिळाले. 1975 मध्ये दुर्दैवी अपघातात त्यांचे निधन झाले. अशा थोर संगीतकाराला भारतीय चित्रपट उद्योगाची शताब्दी साजरी होताना महाराष्ट्र शासनाने मानाचा मुजरा करावा. असे असंख्य मोठे कलाकार राज्याने निर्माण केले त्यात कै. वसंत देसाई यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. माझी विनंती आहे की, यंदाच्या चित्रपट सृष्टीच्या शंभरीच्या निमित्ताने चित्रपट संगीतासाठी (संगीत दिग्दर्शनासाठी) दरवर्षी त्यांच्या नावाने पुरस्कार द्यावा, अशी मी विनंती करीत आहे.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: जिल्हा परिषद व पंचायत समिती विधेयक

L.C.BILL No. IX OF 2012

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA ZILLA PARISHADS AND PANCHAYAT SAMITIS ACT, 1961.)

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील (ग्राम विकास राज्यमंत्री) : महोदय, सन 2012 चे विधान परिषद विधेयक क्र.9-महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, 1961 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

महोदय, जिल्हा परिषदेच्या काही समित्यांमध्ये एक पाणीपुरवठा समिती आहे. त्या समितीत नियमानुसार सध्या 4 सदस्य आहेत. त्यात आणखी 2 सदस्यांची वाढ करण्याची तरतूद या सुधारणेच्या माध्यमातून करण्यात येत आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

सभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2012 चे वि.प.वि.क्र.9 मांडतो.

सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : विशेष उल्लेखाच्या सूचना मध्यंतरानंतर घेण्यात येतील.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मला आपल्या मार्फत शासनाच्या लक्षात आणून द्यावयाचे आहे की, दि.11 जुलै, 2007 रोजी मुंबईतील उपनगरीय रेल्वेमध्ये बॉम्बस्फोट झाले होते या बॉम्बस्फोटामध्ये बऱ्याच लोकांचा मृत्यू झाला होता तसेच बरेच लोक जखमीही झाले होते. या बॉम्बस्फोटात जे जखमी झाले होते त्याच्यांपैकी बऱ्याच लोकांना अद्याप पावेतो औषधोपचाराची बिले मिळालेली नाहीत. आज 11 जुलै असल्यामुळे आपण या बॉम्बस्फोटातील मृतांबाबत शोक व्यक्त करीत आहोत. ज्या जखमींना बिले मिळालेली नाहीत त्याचा शासनाने पाठपुरावा केला तर या विषयाचे गांभीर्य आपण पाळले आहे असा मेसेज जनतेमध्ये जाईल एवढे मला या निमित्ताने सांगावेसे वाटते.

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. रेल्वे बॉम्बस्फोटाला इतकी वर्षे उलटून सुध्दा यातील काही जखमींना बिले मिळालेली नाहीत यासंदर्भात सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी आपल्या भावना व्यक्त केलेल्या आहेत. त्यामुळे जखमींना बिले त्वरित मिळण्याच्या संदर्भात लक्ष घातले जाईल एवढे मी या प्रसंगी सांगू इच्छितो.

सभापती : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2 वाजून 15 मिनिटांनी पुन: भरेल.

(1.27 ते 2.15 मध्यंतर)

मध्यंतरानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरा नंतर)

<u>सभापती स्थानी माननीय सभापती</u>

पृ.शी./मु.शी.: सदस्यांचा परिचय

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, राज्यपालांनी नामनियुक्त केलेल्या श्री.विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांचा आपणास व आपल्या मार्फत सभागृहास परिचय करून देताना मला अतिशय आंनद होत आहे.

(सन्माननीय सदस्यांनी सभागृहात उभे राहून अभिवादन केले.)

.....

<u>विशेष उल्लेख</u>

पृ.शी./मु.शी.: मुंबई शहरातील वडाळा येथील आंध्र एज्युकेशन सोसायटी हायस्कूलमधील व नॅशनल कन्नड हायस्कूल मधील सर्व विद्यार्थ्यांवर तेलगू व कन्नड भाषेची सक्ती करणे याबाबत श्री.जयवंतराव जाधव,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

मुंबई शहरातील वडाळा येथील आंध्र एज्युकेशन सोसायटी हायस्कूलमध्ये सर्व विद्यार्थ्यांना तेलगू भाषा सक्तीची करण्यात येणे, शाळेचे व्यवस्थापन आंध्र प्रदेशातील असल्याने तेलगू भाषा शिकणे सक्तीचे असून जर तेलगू शिकायची नसेल तर शाळेतून नाव काढून टाकण्याचा दम देऊन इतर भाषिक व मराठी विद्यार्थ्यांवर सक्ती केली जाणे, तसेच वडाळा परिसरातील नॅशनल कन्नड हायस्कूलमध्येही कन्नड भाषा सक्ती करण्यात येणे, या दोन्ही शाळांमध्ये मिळून सुमारे 150 पर्यंत मराठी भाषिक विद्यार्थी शिक्षण घेत असणे, प्रत्यक्षात इतर भाषिक शाळांमध्ये त्यांची मातृभाषा ही पर्यायी भाषा म्हणून शिकवण्याचा नियम असणे मात्र मुंबईतील अनेक शाळा तेलगू व कन्नड भाषेची सक्ती करत असणे, शाळांच्या या सक्तीमुळे या सर्व मराठी भाषिक विद्यार्थ्यांसोबतच अन्य भाषिक विद्यार्थ्यांवर अन्याय केला जाणे, या शाळांमध्ये प्रादेशिक भाषा शिकविणे चुकीचे नाही मात्र त्या भाषांची सक्ती करणे नियमबाह्य व अन्यायकारक असल्यामुळे याबाबत शासनाने चौकशी करून या शाळांवर कारवाई करावी. हा गैरप्रकार बंद करण्यासाठी पावले उचलावी अशी मागणी मी विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारा करीत आहे. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: पंचायत युवा क्रीडा व खेल अभियान योजनेची अंमलबजावणी संथ गतीने होणे याबाबत श्री.जयंत प्र पाटील,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने शासन निर्णयानुसार दिनांक 11 जानेवारी 2010 रोजी पंचायत युवा क्रीडा व खेल अभियान या केंद्र पुरस्कृत योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्याबाबत आदेश निर्गमित करून सन 2008-09 ते 2016-17 या कालावधीत योजनेची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

त्यानुसार वरील कालावधीत प्रतिवर्षी निश्चित होणाऱ्या आराखड्याच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या केंद्र शासनाच्या निधीच्या प्रमाणात राज्य शासनाचा हिस्सा उपलब्ध करून दिला आहे. तसेच योजनेच्या अंमलबजावणीसाठी संपूर्ण राज्यासाठी राज्यस्तरीय व जिल्ह्यासाठी जिल्हास्तरीय व तालुक्यासाठी तालुकास्तरीय कार्यकारी समितीची स्थापना करण्यात आली आहे.

परंतु, गेल्या 3 वर्षात या योजनेची अंमलबजावणी संथ गतीने होत आहे. सबब, उर्वरित कालावधीत या योजनेची शीघ्रगतीने अंमलबजावणी होण्यासाठी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सेवाग्राम आश्रमातील बापू कुटीजवळ असलेल्या गांधीजींच्या स्वीय सहायकाची कुटी पाडून टाकणे याबाबत श्री.मोहन जोशी,वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सेवाग्राम आश्रमातील बापू कुटीजवळ असलेल्या गांधीजींचे स्वीय सहायक श्री.महादेवभाई देसाई यांची कुटीच पाडून टाकण्यात आल्याची धक्कादायक बाब जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात उघडकीस येणे, ज्या महादेवभाईंना सन 1917 पासून गांधीजींचा सहवास मिळाला, दिनांक 15 ऑगस्ट 1942 रोजी महादेवभाईंनी शेवटचा श्वास घेतला त्यावेळी गांधीजी आणि सुशीला नायर यांनी त्यांच्या पार्थिवाला स्नान घातले व गांधीजींच्या उपस्थितीत त्यांचे अंत्यसंस्कार इ ाले. त्यावेळी गांधीजी म्हणाले होते, "महादेवभाईंनी योग्याप्रमाणे देह ठेवला". अशा गांधीवादी कर्मयोगीची एकेकाळी श्रमदानातून उभारलेली कुटी मजूर लावून पाडून टाकण्यात आलेली असणे, गांधीजींच्या श्रमदान या मूल्याधिष्ठीत आश्रमात आता या कुटीच्या फेर उभारणी करिता मजूर लावण्यात येत असल्यामुळे देशातील सर्व बापू प्रेमी जनतेत पसरलेली तीव्र नाराजीची भावना, सेवाग्राम आश्रमातील बापू कुटीच्या शेजारीच असलेल्या महादेव कुटीची देखील देखभाल झाली असती तर ती कोलमडली नसती. तसेच सेवाग्राम आश्रमातील वास्तूंना असणारा ऐतिहासिक आशय या कुटीच्या फेर उभारणीत कालबाह्य होणार असणे तसेच कुटी उभारणीचे काम मजुरांकडून करून घेऊन आश्रमातून श्रमदान मूल्य चक्क हद्दपार करण्याचा होत असलेला प्रयत्न पाहता या प्रकरणी जनतेत पसरलेली तीव्र नाराजीची भावना व याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना.

यानंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी मांडलेल्या विशेष उल्लेखाच्या सूचनेबाबत मला एक गोष्ट सुचवावयाची आहे की, राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या स्वीय सहाय्यकांची कुटी पाडून टाकण्यात आल्यामुळे जनतेमध्ये संतापाची भावना निर्माण झाली आहे. ज्या बापूजींनी हा कॉग्रेस पक्ष उभा केला त्यामुळे तुम्ही आज सत्तेवर बसलेले आहात परंतु अशा प्रसंगी आपल्या मनामध्ये संतापाची भावना निर्माण झालेली दिसत नाही. इतर वेळी या सभागृहामध्ये आम्हाला विरोध करण्यासाठी आपण धाडकन उभे रहाता, तर मग बापूजींच्या स्वीय सहाय्यकांची झोपडी पाडल्यानंतर त्यांच्या करिता आपण का उभे राहिला नाहीत? ही गंभीर बाब आहे. बापूजींच्या स्वीय सहाय्यकांची कुटी पाडल्यानंतर शासन ती श्रमदानातून उभी करणार आहे. बापूजींचे नाव घेऊन आपण कॉग्रेसवाले जगत आहात, आपल्या मनामध्ये बापूजींबद्दल भावना का जागृत होत नाही? ती भावना या सभागृहामध्ये व्यक्त होतांना मला दिसली नाही ही खंत मी या ठिकाणी व्यक्त करतो.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी विशेष उल्लेखाची सूचना मांडून ती बाब शासनाच्या निदर्शनास आणली. त्या निमित्त माननीय ज्येष्ठ सदस्य श्री. दिवाकरजी रावते यांनी महात्मा गांधींचा राष्ट्रपिता म्हणून उल्लेख करतांना त्यांना कॉग्रेस पक्षापुरते सीमित करु नये. ते संपूर्ण देशाचे राष्ट्रपिता होते. स्वर्गीय बाळासाहेब भारदे यांनी विश्वकोष म्हणून त्यांचा उल्लेख केला होता. महात्मा गांधींचे स्वीय सहाय्यक म्हणून ज्यांनी जवळ जवळ 37 वर्षे काम केले त्या महादेवभाई देसाईंची कुटीर अशापध्दतीने पाडली जावी ही गंभीर बाब आहे. त्यामुळे संपूर्ण जनतेमध्ये संतापाची लाट पसरलेली आहे, ही केवळ विशिष्ट संस्थेपुरती मर्यादित बाब नाही तर संपूर्ण देशामध्ये याबाबत संतापाची लाट पसरली असून ती भावना माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी आपल्या नजरेस आणून दिली आहे.

सभापती : शासनाने या बाबतीत लक्ष घालणे गरजेचे आहे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्यामध्ये वाघांची होत असलेली शिकार याबाबत श्री. चंद्रकांत पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये वाघांच्या हत्या दिवसें दिवस होत असल्यामुळे त्यांच्या बाबतीत चिंतेची परिस्थिती निर्माण झाली असल्यामुळे या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनाच्या नजरेस ही बाब आणून देत आहे.

"सन 2000 साली ठाणे येथे एका मारुती कारमध्ये वाघाची कातडी ठाणे पोलिसांना सापडली. ती कातडी पाटगाव, ता. भुदरगड, जिल्हा कोल्हापूर जंगलामध्ये वाघाची शिकार करुन वहीम नामक व्यक्तीने पाठविल्याचे निष्पन्न झाले. तपासाच्या दरम्यान त्या वहीमने वन खात्याच्या तपास अधिकाऱ्यांसमोर पाटगाव येथे आत्महत्त्या केली. त्यामुळे काहीही निष्पन्न झाले नाही. दोन वर्षापूर्वी शाहूपुरी पोलिसांनी भुदरगड तालुक्यातील तिखडे येथील बबन देसाई या तरुणाला अटक केली. अशा प्रकारे पाच-सहा घटनांमध्ये वाघाची शिकार करणारी व्यक्ती भुदरगडमध्ये वाघाची शिकार केल्याचे मान्य करते, परंतु भुदरगड तालुक्यामध्ये वाघ आहेत याची वन खात्याच्या दफ्तरी एकही नोंद नाही. त्या बिबट्या वाघाची शिकार भुदरगडच्या हद्दीतच केली गेली. दीड वर्षापूर्वी खेडगे, ता. भुदरगड येथे बिबटया वाघ मृत अवस्थेत सापडला. त्याची शिकार केली गेली व वाघ नखांसाठी त्याच्या पायाचे पंजे तोडून घेतले गेले. गेल्या वर्षी पुणे जिल्ह्यामध्ये वाघ कातडे विकणारा एक आरोपी सापडला. त्यानेही वाघाची शिकार भुदरगड तालुक्यामध्ये नवले गावच्या जंगलात केल्याचे तपासात उघड झाले. चार दिवसांपूर्वी भुदरगड तालुक्यातील कालेकर वाडी या गावाचा विक्रांत कालेकर हा युवक वाघाचे कातडे विकताना कोल्हापूर येथे सापडला. पोलीस तपासात एक कातडे दाखवले तरी प्रत्यक्ष दोन कातडे त्याच्या जवळ होती. एवढया सर्व शिकारी होऊन वाघाची कातडी कोल्हापूर, पुणे, ठाणे येथे सापडली व ती भुदरगडमध्ये शिकार झाल्याचे उघड झाले. परंतु भुदरगडमधील वन खात्याला याची साधी कुणकुण लागली नाही. तसेच

श्री. चंद्रकांत पाटील....

त्यांच्याकडून भुदरगडच्या जंगलात वाघ नसल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे या बाबत शासनाने तातडीने चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकता".

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : औरंगाबाद व जालना जिल्ह्यातील नागरिकांचे आधारकार्ड पोस्टात पडून राहणे याबाबत ॲड. उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"औरंगाबाद आणि जालना विभागात नागरिकांनी काढण्यात आलेली आधार कार्ड पोस्टात वापराविना पडून राहणे, टपाल कार्यालयात दररोज आधार कार्डाचे गठ्ठे सातत्याने येत आहेत, तथापि टपाल विभागाच्या अधिकाऱ्यांनी आधार कार्डाचे वाटप झाले नसले तरीही त्याचे वेबसाईट डिलिव्हरी स्टेटस दाखविण्यात येणे, परिणामी पोस्टातील कर्मचाऱ्यांत निर्माण झालेली गोंधळाची परिस्थिती, या बाबत सखोल चौकशी करुन अशाप्रकारे खोटा अहवाल सादर करणाऱ्यांवर करावयाची कारवाई आणि आधार कार्डाचे वाटप नागरिकांना करण्याबाबत शासनाने करावयाची कारवाई या संदर्भात मी विशेष उल्लेख उपस्थित करीत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : प्रभादेवी येथील मुंबई महानगरपालिकेची हिदी माध्यमाची शाळा जमीन मालकास द्यावी लागणे याबाबत श्री.हेमंत टकले, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, आपल्या सभागृहामध्ये नेहमी मुंबई महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळांबाबत चर्चा होत असते. अलीकडे एक धक्कादायक घडलेली घटना मी या ठिकाणी मांडीत आहे.

"मुंबई महानगरपालिकेची प्रभादेवी येथील हिंदी माध्यमाच्या शाळेची जागा जमीन मालकाच्या ताब्यात परत गेली. या शाळेचे सहा ते सात महिन्यांचे केवळ 60 ते 70 हजार रुपयांचे भाडे थकले होते. परंतु कोर्टामध्ये न्याय विभागाच्या अधिकाऱ्यांनी योग्य प्रकारे आपली बाजू मांडली नाही त्यामुळे जमीन मालकास ती जागा परत द्यावी लागली. त्यामुळे एक शाळा संपून गेली. अशाप्रकारे मुंबईमधील या शाळा संपत आहेत त्यावेळी गरीब, गरजू विद्यार्थ्यांसाठी हा प्रश्न मोठा गंभीर स्वरुप धारण करील. त्या बाबत तातडीने चौकशी करुन त्यामध्ये भ्रष्टाचार झाला असेल तर संबंधित व्यक्तींना योग्य ते शासन करावे अशी मी या विशेष उल्लेखाव्दारे मागणी करीत आहे."

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: चंद्रपूर जिल्ह्यातील मूल तालुक्यातील जि.प. शाळा व खाजगी शाळांमधील विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके उपलब्ध न होणे याबाबत श्रीमती शोभा फडणवीस वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"सार्वजनिक हिताच्या दृष्टीकोनातून यावर्षी शाळा 22 जून रोजी सुरु झालेल्या आहेत. परंतु अजूनपर्यंत चंद्रपूर जिल्ह्यात मुलांना 30 टक्के पुस्तके मिळालेली नाहीत. चंद्रपूर जिल्ह्यातील मूल तालुक्यातील जि.प.शाळा व खाजगी शाळांकरता पाठ्यपुस्तकांची मागणी प.स.शिक्षण विभागाकडून करण्यात आली आणि सदर जि.प. वर्ग 1 ते 8 वी पर्यंत 8892 विद्यार्थी तर खाजगी शाळांकरता वर्ग 1 ते 8 वी करता 6138 विद्यार्थ्यांची नोंद करण्यात आली. परंतु त्यात विशेषत्वाने सेमी इंग्रजी 1चे पुस्तक तसेच गणित-1 चे पुस्तक, तसेच मराठी माध्यमिक शाळांकरता वर्ग-2 मध्ये भाषेचे एकही पुस्तक मिळालेले नाही, भूगोलाचे पुस्तक मिळालेले नाही आणि वर्ग-6 मध्ये इंग्रजी, गणित, इतिहास, भूगोल या चार विषयांची पुस्तके मिळालेली नाहीत. तसेच वर्ग 7 मध्ये भाषेचे पुस्तक मिळालेले नाही, इंग्रजीचे पुस्तक मिळालेले नाही आणि गणिताचे पुस्तक मिळालेले नाही. वर्ग-8 मध्ये विज्ञानाचे पुस्तक देखील मिळालेले नाही. अशा प्रकारे जवळपास 1 लाख 1100 पुस्तकांची आवश्यकता असताना केवळ 72 हजार पुस्तके प्राप्त झाली असून अद्यापपर्यंत 26 हजार पुस्तके प्राप्त झालेली नाहीत. मागच्या वर्षी देखील असेच झाले होते आणि तेव्हा ही पुस्तके डिसेंबरमध्ये देण्यात आली. त्यामुळे विद्यार्थ्यांना महत्वाच्या विषयाचा अभ्यास करता आला नाही. त्यामुळे ही पुस्तके तातडीने देण्यात यावीत जेणेकरुन विद्यार्थ्यांनी महत्वाच्या विषयाच्या बाबतीत गळचेपी होणार नाही. यासाठी मी याठिकाणी विशेष उल्लेख मांडत आहे.

. . . .2 जी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कांदिवली पूर्व येथील पोयसर, गायत्रीनगर, ठाकूर कॉम्प्लेक्स येथील रस्त्यावरील झोपड-पट्टीधारकांचे पुनर्वसन करुन रस्ता खुला करण्याची आवश्यकता याबाबत श्री.रामदास कदम वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"मुंबई उपनगरातील मौजे-पोयसर न.भू.क्र.759,गायत्री नगर, सहकारी गृहनिर्माण संस्था, ठाकूर कॉम्प्लेक्स, कांदिवली-पूर्व, मुंबई येथील काही झोपडधारकांच्या झोपड्या रस्त्यांमध्ये बाधित होत असून तेथे बोगस एसआरए स्किम राबविण्यात येत असणे, विकासकामार्फत एका झोपड्यांच्या तीन-तीन झोपड्या दाखवून बनावट कागदपत्रांच्या आधारे शासनाची फसवणूक करण्यात येत असणे,गेल्या पाच वर्षापासून सदर गृहनिर्माण संस्थेला उप जिल्हाधिकाऱ्यांकडून नोटीसा देण्यात येत आहेत. परंतु नागरिकांसाठी रस्ता खुला करण्याबाबत कोणताही ठोस निर्णय घेण्यात येत नाही. सदर ठिकाणी झोपडपट्टीचे प्रमाण वाढत असून या झोपडपट्टीधारकांमुळे बाजूच्या बगिच्याच्या आवारात केर-कचरा, विष्ठा टाकत असल्यामुळे तेथील गटारे पूर्णपणे भरुन गेलेली असून त्यांच्या दुर्गंधीमुळे परिसरातील रहिवाश्यांमध्ये रोगाचे प्रमाणही मोठ्या प्रमाणात वाढलेले असणे, यामुळे या बगिच्याचा तेथील करदात्या नागरिकांना उपभोगही घेता येत नसणे, याकरता या रस्त्यामुळे बाधित होत असलेल्या पात्र झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करुन नागरिकांसाठी रस्ता खुला करण्याची आवश्यकता असल्याने याबाबत शासनाने तत्काळ निवेदन करावे.

. . . .2 जी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: होमिओपॅथीक डॉक्टरांच्या शासनाकडे
प्रलंबित असलेल्या मागण्यांवर निर्णय
घेणे याबाबत श्री.दिवाकर रावते, वि.प.स.
यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

भारत देशामध्ये होमिओपॅथीकची 186 महाविद्यालये असून त्यापैकी 46 महाविद्यालये महाराष्ट्रात आहेत. एकंदर तीन लाख होमिओपॅथीक प्रॅक्टीशनर्स पैकी 57 हजार होमिओपॅथीक डॉक्टर्स् आहेत. तरी सुध्दा होमिओपॅथीचा प्रचार व प्रसार करण्यासाठी राज्य शासनातर्फे कोणतेही प्रयत्न केले जात नाहीत. देशामध्ये पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, पंजाब, केरळ, असाम, आंध्रप्रदेश, इत्यादी विविध राज्यात होमिओपॅथीचे स्वतंत्र संचालनालय आहे. तथापि महाराष्ट्रात उप संचालकांकडे होमिओपॅथचा कार्यभार सोपविलेला आहे. महाराष्ट्र राज्यात होमिओपॅथीच्या एकाही डॉक्टरची नियुक्ती शासकीय हॉस्पिटलमध्ये केलेली नाही.

होमिओपॅथीक डॉक्टरांच्या महाराष्ट्रात होमिओपॅथीचे स्वतंत्र संचालनालय असावे. होमिओपॅथीच्या डॉक्टरांना शासकीय सेवेत घ्यावे, शासकीय महाविद्यालय स्थापन करावे इत्यादी मागण्या शासनाकडे प्रलंबित आहेत. त्यावर शासनाने अद्यापही निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे या संदर्भात तातडीने निर्णय घेणे आवश्यक आहे. यासंदर्भात माननीय मंत्री महोदयांनी तातडीने लक्ष घालावे.

सभापती महादय, देशामध्ये डायरेक्टर आयुष यांच्याकडून ओरिसा, कर्नाटक, झारखंड, गुजरात व छत्तीसगढ राज्यातील होमिओपॅथी शाखा सांभाळली जाते. भारतात विविध राज्यात होमिओपॅथीक डॉक्टरांच्या राज्य शासनाने नियुक्ता केलेल्या आहेत. त्यापैकी एकंदर 33 राज्यांमध्ये होमिओपॅथीक डॉक्टर्स् कार्यरत आहेत. महाराष्ट्रातील होमिओपॅथीक डॉक्टर्स्नां योग्य तो दर्जा मिळावा याकरता गेली 40 वर्षे कै.प्रा.राम मेघे, कै.सौ.केशरबाई क्षीरसागर, माजी खासदार, कै.ॲड.दत्ता पाटील,माजी विरोधी पक्ष नेते,कै.डॉ.बाबासाहेब नांदूरकर, कै.डॉ.आर.एम. चिंचोळकर, कै.डॉ.बाबासाहेब कवीश्वर, तसेच आमचे मराठवाड्यातील कै.वसंतराव काळे यामाजी आमदारांनी सतत आणि सातत्याने प्रयत्न केले आणि आजही सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत, माजी मंत्री डॉ.शोभाताई बच्छाव, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे, सन्माननीय सदस्य श्री.कल्याण काळे,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय सदस्य श्री.ओमप्रकाश पोकर्णा, श्रीमती सुधाताई जोशी, माजी आमदार, डॉ.चंद्रकांत मोकल हे सर्व सतत आणि सातत्याने याचा पाठपुरावा करीत आहेत. या एकाच गोष्टीसाठी ते सतत आणि सातत्याने गेली 40 वर्षे प्रयत्न करीत आहेत.

यानंतर श्री.बरखड . . ..

अधिकृत पत्र / प्रतिक्षेसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

मी जुन्या लोकांची नावे एवढ्यासाठीच वाचली की, एवढे सामर्थ्य असलेल्या विधिमंडळाच्या सदस्यांनी 40 वर्षे सातत्याने पाठपुरावा करुन सुध्दा माझ्यासारख्या सदस्याला हा विषय मांडावा लागत आहे. म्हणून मी आपल्या माध्यमातून पुन्हा या विशेष उल्लेखाव्दारे या बाबीकडे शासनाचे लक्ष वेधतो आणि आता तरी शासन ही बाब गांभीर्याने घेईल आणि आपले सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत, श्री. विक्रम काळे, श्री. पोकर्णा यांच्या प्रयत्नांना योग्य तो न्याय मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. / मु. शी. : विदर्भातील शेतकऱ्यांना तुषार व ठिबक सिंचन योजनेच्या अनुदानाचे वाटप न होणे याबाबत श्री. जयंत प्र. पाटील, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"केंद्र व राज्य शासनाने सन 2005-2006 मध्ये सिंचन क्षेत्रात वाढ करण्यासाठी ठिबक आणि तुषार सिंचन योजना जाहीर करणे, ठिबक व तुषार सिंचन योजनेव्दारे शेतकऱ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी सुरुवातीला 75 टक्के अनुदान असणे व नंतर ते अनुदान 50 टक्के करणे, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली व नागपूर या सहा जिल्ह्यातील एकूण 4 हजार 618 शेतकऱ्यांनी आपल्या शेतात ठिबक व तुषार संच बसविणे, कृषी विभागाने त्याची तपासणी करुन शासनाकडे प्रस्ताव पाठवून देणे व मंजूरही होणे, मात्र संबंधित शेतकऱ्यांना अद्यापही अनुदानाचे वाटप न होणे, केंद्र सरकारकडून एकूण 3 कोटी 84 लाख रुपये येणे असताना फक्त 1 कोटी 41 लाख रुपयांचा निधी उपलब्ध होणे, त्यामुळे 3 हजार 297 शेतकरी अद्यापही या योजनेपासून वंचित राहणे, सबब विदर्भातील शेतकऱ्यांच्या या गंभीर प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधून त्यावर त्वरित कार्यवाही व्हावी या महत्वाच्या बाबीकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यात निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती

मु. शी. : राज्यात निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती यासंबंधी सर्वश्री हेमंत टकले, विक्रम काळे, सुभाष चव्हाण, उल्हास पवार, अनिल भोसले, श्रीमती अलका देसाई, ॲड. उषा दराडे, सर्वश्री भाई जगताप, रमेश शेंडगे, श्रीमती दिप्ती चवधरी श्री. चरणसिंग सप्रा, वि. प. स. यांचा प्रस्ताव

सभापती : आता या प्रस्तावावरील चर्चेला सुरुवात होईल. या प्रस्तावावरील चर्चेसाठी अडीच तासाचा वेळ द्यावयाचा म्हटला तर 4.00 वाजेपर्यंत या प्रस्तावावरील चर्चा संपली पाहिजे. परंतु हा अतिशय महत्वाचा विषय असल्यामुळे आणि टंचाईच्या परिस्थितीच्या अनुषंगाने चर्चा होणार असल्यामुळे मी या प्रस्तावावरील चर्चेला सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत परवानगी देत आहे. माननीय मंत्री महोदयांचे उत्तर व प्रस्ताव मांडणाऱ्या सदस्यांच्या उत्तराच्या भाषणासह या प्रस्तावावरील चर्चा सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत पूर्ण करावयाची आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : या प्रस्तावावर बोलण्यासाठी किती सदस्यांची नावे आली आहेत ?

सभापती : या प्रस्तावावर बोलण्यासाठी माझ्याकडे 21 सदस्यांची नावे आलेली आहेत. त्यामध्ये आपले नाव आलेले नाही. आता सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी आपला प्रस्ताव मांडावा.

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"राज्यातील बऱ्याच भागात सुरूवातीला पाऊस पडल्यानंतर शेतकऱ्यांनी पेरणीला केलेली सुरूवात, त्यानंतर पावसाने दडी मारल्याने निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती, शेतकऱ्यांनी 15 लाख हेक्टरवर सुमारे 450 कोटी रुपयांची बियाणे व खते खरेदी करुन पेरणी करणे, परंतु आता पिके करपल्यामुळे दुबार पेरणीचे ओढवलेले संकट, दुबार पेरणीसाठी शेतकऱ्यांना बँकेमार्फत कर्ज पुरवठा न होणे, परिणामी शेतकऱ्यांना सावकाराकडून जास्त व्याज दराने कर्ज घ्यावे लागणे,

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP

श्री. हेमंत टकले .....

शेतीचा वाढलेला खर्च, अपुऱ्या पावसामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी दिवसेदिवस कमी होणे, राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली तीव्र टंचाई, विदर्भात 4300 गावांना भीषण पाणीटंचाई निर्माण होणे, पिण्याच्या पाण्यासाठी महिलांनी मोर्चे काढून निदर्शने करणे, गुरांच्या चाऱ्याचा व त्यांच्या पिण्याच्या पाण्याचा निर्माण झालेला गंभीर प्रश्न, शासनाने ठिकठिकाणी चारा डेपो उघडणे, परंतु तेथे होत असलेला भ्रष्टाचारामुळे व चाऱ्याअभावी शेतकऱ्यांना त्यांची जनावरे कमी दराने विकावी लागणे, गावांत रोजगार मिळत नसल्यामुळे राज्यातील शेतकरी विशेषत: विदर्भातील शेतकरी मुंबई, ठाणे, नवी मुंबई येथे कुटुंबीयांसह स्थलांतरित होणे, दुष्काळाचा सामना करण्यासाठी राज्यात शेततळी निर्माण करण्याची तसेच अवर्षणप्रवण भागात जलसंधारणाच्या कामांना गती देण्याची नितांत आवश्यकता, राज्यात दुष्काळी महामंडळाची स्थापना होऊन अद्यापी त्या मंडळाला निधी देण्यात आला नसल्याने मंडळाचे काम ठप्प होणे, केंद्र शासनाची असलेली आर.आर.आर.योजना राज्यात राबविण्याबाबत शासनाकडून होत असलेला विलंब, त्यामुळे 1972 सालच्या पाझर तलावाच्या दुरूस्तीचा निधी उपलब्ध न होणे, प्रलंबित असलेला निधी व त्यानंतरच्या कोल्हापूर टाईप बंधारे व पाझर तलावांच्या दुरूस्तीचा निधी मिळण्याची आवश्यकता, दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांच्या शेतीमालास योग्य बाजारपेठ व भाव मिळणेबाबत तसेच विविध वित्तीय संस्था व बँकाकडून कर्ज पुरवठा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी."

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

सभापती महोदय, तसे पाहिले तर फार व्यापक, सर्वस्पर्शी असा हा प्रस्ताव आहे. त्यामध्ये असंख्य गोष्टी शेतीशी निगडीत आहेत, शेतकऱ्यांच्या समस्यांशी निगडीत आहेत. या चर्चेत सहभागी होत असताना दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य यातील प्रत्येक गोष्टीबाबत निवेदन करतील. सभापती महोदय, जल संपत्ती, जल संपत्तीचे नियोजन व जल संपत्तीचे न्याय्य वाटप या तीन प्रमुख बाबी डोळ्यासमोर ठेवून मी या विषयाची मांडणी करण्याचा प्रयत्न करणार आहे. आपण असे गृहित धरुन चालतो की, दरवर्षी 7 जून रोजी पावसाळा सुरु होतो आणि 15 ऑक्टोबरला संपतो. हे एक कोष्टक डोळ्यासमोर ठेवून आपल्या राज्यामध्ये अनेक ठिकाणी पाणी साठवून त्याचे नियोजन केले जाते. आतापर्यंत 15 जुलैपर्यंत पुरेल इतक्या पाण्याचे नियोजन करुन तेवढे पाणी धरणामध्ये राखून ठेवले जात होते. परंतु आता ग्लोबल वॉर्मिंगमुळे बदलत्या हवामानामुळे गेल्या 8-10 वर्षांमध्ये पाऊस पडण्याचा कालावधी सारखा मागेपुढे होत आहे. आता 15 जुलैची कटऑफ तारीख बदलली पाहिजे. 15 जुलै अखेरपर्यंत किंवा 15 ऑगस्टपर्यंत पिण्याच्या पाण्याची गरज लक्षात घेऊन तेवढ्या प्रमाणात पिण्याचे पाणी आरक्षित करण्याची गरज आहे. राज्यामध्ये जी जल संपत्तीसाठी वेगवेगळी धरणे उभी केली जातात. त्या धरणासाठी जमीन संपादित करावी लागते. त्यामुळे अनेक लोक विस्थापित होतात. प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन न करता ती कामे पूर्ण केली जातात किंवा लोकांचे पुनर्वसन न झाल्यामुळे धरणाचे काम अपूर्ण राहते. ही वस्तुस्थिती आहे.

सभापती महोदय, या राज्यात सध्या असलेल्या धरणांची उंची वाढविणे शक्य आहे. त्या धरणांची उंची वाढविण्याचे बांधकाम केले तर अधिक पाण्याचा साठा करता येईल. या दृष्टीकोनातून आता विचार करण्याची गरज आहे. सभापती महोदय, नव्याने बांधण्यात येणा-या सर्व प्रकल्पांमध्ये कॅरिओव्हरची तरतूद करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे पावसाचे प्रमाण चांगले असल्यास या धरणांमध्ये पाण्याचा अधिकचा साठा करता येईल. तो साठा अडचणीच्या वेळी वापरता येईल. कोयना धरण बांधताना 10 टी.एम.सी. कॅरिओव्हरची तरतूद केली होती. त्यानंतर बांधण्यात आलेल्या धरणांमध्ये कॅरिओव्हरची तरतूद केल्याचे आढळून येत नाही. कॅरिओव्हरची

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले....

तरतूद करीत असताना धरणाची उंची वाढवावी लागते, त्यामुळे जमिनीचा मोठा भाग बुडतो. हे खरे असले तरी राज्यात नवीन धरणे बांधणे अशक्य असल्यामुळे त्याचा विचार करण्याची आवश्यकता आहे. तसे पाहिले तर राज्यातील धरणांच्या जागा पाहिल्या तर त्यांना गॉड गिफ्ट असेच म्हणावे लागेल. त्याचा सर्वंकष अभ्यास करुनच तेथे धरण बांधले जाते. दुर्दैवाने अशा जागा राज्यामध्ये कमी राहिलेल्या आहेत. पिण्याचे पाणी आरक्षित करण्याला प्राधान्य दिल्यानंतर प्रत्येक महानगरपालिकेने पाणी वापरण्याच्या कोष्टकात बदल करण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

उदा. आपण शहरातील प्रत्येक सोसायटीला बोअर वेल घेण्याची सक्ती करण्याची गरज आहे. त्या बोअर वेलच्या पाण्याचा वापर पिण्याव्यतिरिक्त अन्य कारणासाठी करता येईल. प्रसाधनगृह, भांडीकुंडी, फरशी पुसणे, झाडांना पाणी देणे इत्यादी कारणासाठी पाण्याचा जो अपव्यय होतो आणि पाण्याच्या साठ्यावर जो ताण पडतो त्याचा विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, आपण नेहमी कमी पाणी असलेल्या देशांची कशी प्रगती होत आहे, त्या देशात पाण्याची कशी बचत केली जाते याची उदाहरणे देत असतो. इस्त्रायलमध्ये प्रत्येक घरात पाण्याचे मीटर बसविलेले आहेत. तेथे मीटर मोजून पिण्याचे पाणी दिले जाते आणि त्यानुसार पाणीपट्टी बसविली जाते. आपण वापरल्या जाणा-या प्रत्येक पाण्याच्या थेंबाची किंमत वसूल करणारी यंत्रणा जो पर्यन्त निर्माण करण्यात येणार नाही तोपर्यन्त पाणी साठ्याचा गैरवापर या पुढच्या काळातही असाच चालू राहील. शहरी विभागासाठी जे पाणी वापरले जाते त्यातील 80 टक्के पाणी पुन्हा सांडपाण्याच्या रुपाने नदीत येते. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी चंद्रपूर मधील कारखान्यामधून प्रदूषित पाणी प्रक्रिया न करता कसे नदीत सोडले जाते हे सांगितले. हीच परिस्थिती राज्यातील सर्व शहरांमध्ये आहे. हे प्रदूषित पाणी शुध्द करुन पुन्हा वापरात आणले तर महापालिका किंवा नगरपालिकाच्या हद्दीमध्ये जो पाण्याचा अपव्यय होतो तो होणार नाही.

सभापती महोदय, आज देखील उजनी,गोसीखुर्द प्रकल्पामध्ये पाणी आहे. परंतु त्या प्रकल्पातील पुष्कळसे पाणी प्रदूषित झालेले असल्यामुळे ते वापरण्यायोग्य नाही. अशा प्रदूषित पाण्याचा पुरवठा झाला तर शेतीतर सोडाच पण असंख्य वॉटरबोर्न डिसिजेसमुळे आपल्याला आरोग्यावर खूप मोठा खर्च करावा लागेल. केन्द्र सरकारच्या किंवा राज्य सरकारच्या जेएनएनयूआरएम आणि युआयडीएसएसएमटी यासारख्या योजनांद्वारे शुध्द पाणी पुरवठा करण्यास भाग पाडता येईल. त्यामुळे शुध्द पाण्या व्यतिरिक्त बाकीच्या पाण्यावर प्रक्रिया करण्याची एक मोठी मोहीम आपल्याला हाती घ्यावी लागेल. पाणी ही संपत्ती असून ती नियोजन पध्दतीने साठविली पाहिजे, वापरली पाहिजे आणि शिल्लकही ठेवली पाहिजे.

सभापती महोदय, महात्मा फुले भूमी आणि जल अभियानाचे पुनरुज्जीवन करण्याची फार आवश्यकता निर्माण झालेली आहे. त्यामध्ये लोकसहभाग मिळविण्यासाठी प्रत्येक गावाचा पाणलोट

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले....

विकासाचा कार्यक्रम आपल्याला हाती घ्यावा लागेल. मध्यंतरी अशी घटना घडली होती की, उस्मानाबाद आणि सोलापूरमध्ये पाणी सोडण्यावरुन वाद निर्माण झाला होता. फक्त पिण्यासाठी वापरायचे पाणी मध्यरात्री शेतीला दिले जात होते. पाण्याच्या होणा-या चोरीमुळे जे संघर्ष होत आहेत त्याकडेही लक्ष देण्याची गरज निर्माण झालेली आहे.

सभापती महोदय, आपल्या असे लक्षात आलेले आहे की, आपण जे काम करतो आणि जे काम हाती घेतो त्याबाबतीत काही संकेत ठरवून दिलेले असतात. आपण नेहमी प्रवाही पाण्याचा विचार करतो. प्रवाही पाण्यामधून जे पाणी शेतीला दिले जाते त्यामुळे पाण्याचा अपव्यय होतो आणि त्याचा विचार करण्याची गरज आहे. प्रवाही पाण्याचा कमीत कमी वापर करुन ठिबक सिंचन पध्दतीने शेतीचे क्षेत्र वाढवता येते ही गोष्ट शेतक-यांच्या अंगवळणी पडण्याची आवश्यकता आहे. पाणी साठवून ठेवून ते ठिबक पध्दतीने दिले तर पाण्याचा चांगला उपयोग करुन घेता येईल. माण, खटाव सारख्या दुष्काळी भागात आणि सातारा जिल्हयात पाणलोट विकास कार्यक्रमाकरिता केन्द्रीय कृषी मंत्री आदरणीय शरद पवार साहेबांनी 585 कोटीचा निधी दिला होता. हे पैसे बँकेत पडून आहेत. राज्य सरकार त्या पैशावरचे व्याजही घेत आहे. परंतु लोकप्रतिनिधी आणि बाकीच्या यंत्रणांमध्ये अनेक अडथळे निर्माण केले जात असल्यामुळे, ठराविक लोकांना ती कामे देण्यासाठी आग्रह धरले जात असल्यामुळे पाणलोट विकासाची कामे सुरु होत नाहीत. शेततळी करण्याची मोठी धडक योजना आपण हाती घेतलेली आहे. शेततळे केल्यानंतर त्यामध्ये साठलेल्या पाण्याचे बाष्पीभवन होण्याचा मुद्दा समोर आलेला आहे.

...नंतरश्री. गिते.

अप्रधारित प्रत/ रिपब्लिशिंग नाही

श्री.हेमंत टकले...

साठवण बंधारे, तलाव, नदी, समुद्र या ठिकाणचे साठवलेले पाणी बाष्पीभवनाच्या माध्यमातून वर निघून जाते. या पाण्याचे बाष्पीभवन होऊ नये म्हणून थर्माकोलचे तुकडे ज्याला आपण इंडस्ट्रीयल वेस्ट म्हणतो ते थर्माकोलचे तुकडे साठवलेल्या पाण्यावर आच्छादित करावेत. त्यामुळे त्या पाण्याचे बाष्पीभवन खूपच कमी प्रमाणात होईल. कदाचित ही सूचना सन्माननीय सदस्यांना अजब वाटण्याची शक्यता नाकारता येत नाही. पण थर्माकोलचे तुकडे पाण्यामध्ये विरघळत नाहीत म्हणून त्या तुकडयांचे आच्छादन साठवलेल्या पाण्यावर किंवा शेततळयांवर केले तर बाष्पीभवनामुळे पाण्याचा जो नाश होतो तो निश्चितपणे कमी होईल.

श्री.दिवाकर रावते (बसून) : असा प्रयोग करण्यासाठी पर्यावरण विभागास विचारावे लागेल.

श्री. हेमंत टकले : असा प्रयोग करण्यासाठी पर्यावरण विभागाला निश्चितपणे विचारावे लागेल यात शंका नाही. प्रवाही पाण्याच्या वापरासंबंधी मी मघाशी माहिती दिली. पाण्याच्या परिस्थितीबद्दल काही ठिकाणी अगदी मोजकी माणसे काम करीत आहेत. ते शासकीय यंत्रणेवर फारसे अवलंबून रहात नाहीत. सातारा जिल्हयातील कोरेगाव सर्कलमध्ये श्री.राजेंद्र शेताळे यांनी 60 शेततळयांचा उपक्रम हाती घेतला आहे. या 60 शेततळयांच्या माध्यमातून लक्षावधी लिटर पाणी त्यांना उपलब्ध झालेले आहे. त्यामुळे त्या विभागात पाऊस पडला नाही व दुष्काळा सारखी परिस्थिती असली तरी तेथील शेतीला वरदान ठरले एवढया प्रमाणात पाणी पुरवठा ते त्या ठिकाणी करु शकतात. डॉ.अविनाश पोळ यांनी विहीर जोड प्रकल्प हाती घेतला. विहीर जोड प्रकल्पाच्या बाबतीत त्यांनी असे केले की, भूजलातील पाण्याचे पुनर्भरण योग्य पध्दतीने झाले व तेथील विहिरी अंतर्गत जोडल्या गेल्या तर वेगवेगळया ठिकाणच्या सर्व विहिरींना पुरेसे पाणी उपलब्ध होऊ शकेल. पाणी टंचाई निर्माण झाली तर टँकरने पाणी पुरवठा करण्यात येतो, अशा वेळी टँकर्स उपलब्ध होत नाहीत. पाण्याचे टँकर्स मागविण्यासाठी लाईन लागलेली असते. पाणी पुरवठा करण्यासाठी टँकर्स कमी पडतात म्हणून बाहेरच्या राज्यातून टँकर्स उपलब्ध करुन घ्यावे लागतात अशी परिस्थिती उद्भवते. जे पाणी उपलब्ध होत आहे, ते पाणी साठविणे, पाण्याची बचत करणे यासाठी योजना सुरु केलेल्या आहेत, त्या योजना चांगल्या प्रकारे कार्यान्वित करण्यासाठी शासनाने प्रयत्न केले पाहिजेत.

2...

श्री.हेमंत टकले...

सभापती महोदय, भूजल पुनर्भरणाचा कार्यक्रमाकडे शासनाचे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले आहे. ज्याला ॲक्वॉफायर रिचार्ज असे म्हणतात. याच्यासाठी इंडियन असोसिएशन ऑफ जिओहायड्रॉलॉजिस्ट ही महत्वाची संस्था आहे. पाण्याचा प्रश्न जेवढा शेतीशी निगडीत आहे, तेवढाच पर्यावरणाशी निगडीत आहे. तसेच तो प्रश्न पाणी पुरवठा विभागाशी देखील निगडीत आहे. या सर्व यंत्रणा एकत्र येऊन पाण्याच्या प्रश्नाबाबतीत विचार करणार नाहीत तो पर्यंत पाण्याचा प्रश्न सुटू शकणार नाही असे माझे मत आहे. दरवेळेला आपण म्हणतो की, "नेमेचि येतो मग पावसाळा." आता पावसाळा कधी येतो याचा नेमच राहिलेला नाही. या संदर्भात दुसरी म्हण अशी आहे की, "आडातच नसेल तर पोहऱ्यात कोठून येणार". आपण कोठेच कायम स्वरुपी पाणीसाठा करुन ठेवत नाही. त्यामुळे पाण्याचे वितरण व्यवस्थेमध्ये फार मोठया प्रमाणात अनास्था आणि अनागोंदी कारभार चालला आहे. पाऊस किती पडला, त्या माध्यमातून पाणीसाठा किती झाला याबाबतची माहिती घेण्यासाठी महसूल विभागाची मदत घेत असतो. पाऊस पडल्याच्या नोंदी तलाठ्याकडे ठेवण्यात येत असतात. हे सामान्यज्ञान आहे. आपण शालेय विद्यार्थ्यांना इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र, विज्ञान असे सर्व विषय शिकवित असतो. एक साधी सोपी पध्दत शासन का सुरु करीत नाही? गावातील काही ठराविक शाळा निवडून गावात किती पाऊस पडला आहे याची मोजणी शाळांनीच करावी आणि त्या बाबतीत रेकॉर्ड ठेवावे अशा प्रकारच्या सूचना शासनाने दिल्या पाहिजेत. यासाठी मोठी मशिनरीची गरज लागणार नाही. विद्यार्थ्यांसाठी शिक्षण विषयकख प्रशिक्षण विषयक अनेक उपक्रम हाती घेतले जातात. पाऊस मोजण्याचा उपक्रम निवड केलेल्या शाळांकडे सोपविला तर तो उपक्रम निश्चितपणे उपयुक्त ठरेल असे मला वाटते.

महोदय,पावसाचे पाणी आपण संरक्षित करीत नाही, पावसाचे पाणी जो पर्यंत आपण साठवत नाही, त्याच्या अयोग्य वापरावर जो पर्यंत नियंत्रण करीत नाही तो पर्यंत पाण्याचा प्रश्न सुटणार नाही. राज्यातील शेतकरी मागासलेला नाही. त्या शेतकऱ्यांना या सर्व गोष्टींचे ज्ञान आहे. त्याला फक्त वेळेवर एक कॅटेलिस्ट म्हणून सरकारी यंत्रणेने जी कामे करण्याची गरज आहे, ती कामे कोठेही करताना दिसून येत नाहीत. पाऊस नाही म्हणून पेरणी नाही, पेरणी नाही म्हणून पुढे

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले...

पीक नाही, पीक नाही म्हणून शेतकऱ्याला कर्ज नाही, शेतकरी कर्जबाजारी होणे, त्यानंतर शेतकऱ्यांच्या आत्महत्या होणे हे एक मोठे दृष्टचक्र आहे. या दृष्टचक्रातून बाहेर पडावयाचे असेल तर या बाबतच्या मूलभूत गोष्टीकडे बारकाईने पाहण्याची गरज आहे.

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

. पाणी किती वेगाने झिरपते, काय प्रक्रियेने झिरपते, बाष्पीभवनाने किती पाणी वाया जाते याची कुठेही मोजणी होत नाही किंवा तशी यंत्रणा नाही. सगळे स्वप्नाळू कार्यक्र म चालू असतात आणि केवळ खर्च करावयाचा एवढेच ज्ञान आणि उद्दिष्ट ठेवून जमिनीला भोके पाडण्याचा उद्योग सुरु आहे. ग्रामीण जीवनाशी निगडीत असलेला असा हा भविष्यकाळातील विषय आहे. याची मजबूत पायाबांधी केली नाही तर ग्रामीण ज्ञान आणि उद्दिष्ट ठेवून कार्यक्रम आखणे आवश्यक आहे. केवळ खर्च करावयाचा आणि जमिनीला कुठेतरी भोक पाडण्याचा उद्योग सुरु झालेला आहे. ग्रामीण जीवनाशी भविष्यकाळात आधार असलेला हा कार्यक्रम आहे. या मजबूत पायाबांधणी केली नाही तर ग्रामीण भागातील जलव्यवस्था संपूर्णपणे उद्ध्वस्त होईल. आतापर्यंत जलशास्त्र म्हणजे प्रवाही पाण्याचे शास्त्र असाच वापर केला गेला. मग हळूहळू भूजलाचे महत्व लक्षात आल्यामुळे भूजलाचे शास्त्र त्याच्याशी निगडीत झाले. नंतर पाणी आणि पर्यावरण यांचे घट्ट असे नाते निगडीत झाले आणि आता जलविज्ञान आणि विज्ञान या मूलभूत शाखेचे नवे स्वरुप तयार करण्याची आवश्यकता आहे. पारंपारिक पध्दतीपेक्षा हे शास्त्र वेगळे आहे आणि ते सर्वांनी लक्षात घेतले पाहिजे.

सभापती महोदय, भारत आज अनेक विषयात प्रगती करीत आहे आपले राज्यही प्रगती करीत आहे मग विज्ञान असेल जैवविज्ञान असेल अणुविज्ञान असेल टिश्यू कल्चर असेल, स्पेस असेल, उपग्रह असेल, मायक्रोबायॉलॉजी असेल, या सगळया विषयात काम सुरु आहे. पण शेतीसाठी आवश्यक असलेल्या या पाण्यासाठीच्या संशोधनात्मक कामाची आपल्या भौगोलिक परिस्थितीचा, आपल्या नैसर्गिक परिस्थितीचा विचार करुन नव्याने मांडणी करण्याची गरज आहे. ही मांडणी करुन पावसाचे गावनिहाय प्रमाण लक्षात घेऊन तीव्रता मोजली पाहिजे. कारण किती पाऊस पडतो याच्यावर जमिनीची धूप अवलंबून असते. ती धूप जास्त झाली तर पीक चांगले येत नाही असाही निष्कर्ष त्यातून येऊ लागतो. त्यामुळे उपलब्ध पाणी राखून ठेवणे, नियोजनबध्द पध्दतीने त्याचे वाटप करणे, शेतकऱ्यांना त्यांच्या पीक पध्दतीमध्ये जर काही बदल सुचवायचे असतील आणि जे पीक पध्दतीमधील बदल असतील त्याबाबतच्या कार्यशाळा घेणे, त्याबद्दलची जनजागृती करणे आणि कोणत्याही परिस्थितीत हा प्रश्न केवळ शासनाचा नाही, केवळ एखाद्या गावाचा नाही, या राज्यात राहणाऱ्या प्रत्येक नागरिकाचा हा प्रश्न आहे. कारण पाणी हे जीवन आहे असे आपण म्हणतो. 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

हे जर आपल्याला जगवायचे असेल,जपायचे असेल तर या सर्व क्षेत्राचा आपण पुनर्बांधणीसाठी विचार केला पाहिजे. जेव्हा आपण ही मांडणी शास्त्रशुध्द पध्दतीने समोर ठेवू तेव्हा शेतीशी निगडीत असलेल्या घटकांसाठीचे चक्र किंवा नियोजन आपल्याला व्यवस्थित बसविता येऊ शकेल.

यामध्ये अनेक क्षेत्रात काम करणारे तज्ज्ञ आहेत. आपल्याकडे प्रशासकीय अधिकारी त्या त्या वरच्या स्तरावर जाऊन बसतात आणि त्यांना सर्व काही समजते अशा प्रकारचा एक गैरसमज सगळीकडे पसरविला जातो. त्यांना तितके उमजते किंवा नाही, त्यांना अधिक ज्ञानाची आवश्यकता आहे का याचाही कुठे विचार केला जात नाही. या सगळयासाठीच्या कार्यशाळा आपण सातत्याने घेतल्या पाहिजेत. हा प्रश्न एखाद्या शाळेचा किंवा एखाद्या वर्षाचा नाही. दुष्काळ आला म्हणून मदत जाहीर करा हे म्हणजे कुठेतरी फाटलेल्या आभाळाला ठिगळ लावण्यासारखे आहे. मूळ प्रश्नाकडे जाऊन जर आपण याचा खोलात विचार केला आणि ही सगळी मांडणी पुन्हा एकदा नव्याने केली तर निश्चितच कमी पाण्याच्या, खडकाळ असणाऱ्या मोठया प्रदेशाच्या धरणे होण्याची शक्यता कमी असलेल्या भागाचा आणि उपलब्ध असलेला पाणीसाठा लक्षात घेऊन लहरी निसर्गापर्यंत या सगळया गोष्टींचा आढावा घेऊन केंद्र आणि राज्य सरकार निश्चितपणे उपाययोजना राबवतील आणि त्यामध्ये काही उणिवा असतील काही चुकीच्या गोष्टी असतील त्याचा ताबडतोब बंदोबस्त करुन दिलासा देण्याची आवश्यकता आहे. म्हणून हा विषय आज या सभागृहात मी उपस्थित केला आहे. तशी आवश्यकता वाटली म्हणून मी विषय मांडला आहे.माझे अनेक सन्माननीय सहकारी याविषयावर बोलतील आणि याविषयाची अनेकविध अंगे आपल्या भाषणात मांडतील अशी अपेक्षा आहे. पण पाणी हा विषय केद्रस्थानी ठेवूनच विषयावर बोलावे अशी अपेक्षा व्यक्त करतो. मला हा ठराव मांडण्याची संधी दिल्याबद्ल आपले आभार मानतो आणि येथे थांबतो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री हेमंत टकले यांनी नियम 260 अन्वये उपस्थित केलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, मंगळवारी सत्ताधारी पक्षाच्या वतीने सभागृहामध्ये प्रस्ताव चर्चेला येत असतो. आज मांडण्यात आलेला दुष्काळाविषयीचा प्रस्ताव हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने मांडण्यात आलेला दिसतो. माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले व माननीय सदस्य श्री.राजन तेली वगळता राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे एकही सदस्य सभागृहात उपस्थित नाहीत. जे वास्तव दिसते ते मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो.

सभापती महोदय, महाराष्ट्राचे थोर शिल्पकार स्व.यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष आपण साजरे करीत आहोत. यशवंतराव चव्हाण यांनी एका सभेत प्रश्न विचारला की, सर्व नक्षत्रांपैकी 9 नक्षत्रे संपली तर किती नक्षत्रे उरतात? अभ्यासू, हुशार, गणित तज्ज्ञांनी अभ्यास करुन एकूण नक्षत्रे किती हे सांगितले. शेवटी एका व्यक्तीने सांगितले की, 9 नक्षत्रे निघून गेली तर काहीच उरत नाही. जर 9 नक्षत्रामध्ये पाऊस झाला नाही तर काहीच उरत नाही. स्व.यशवंतराव चव्हाण म्हणाले, हे उत्तर परफेक्ट आहे.

सभापती महोदय, स्व.यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करीत असताना त्यांच्याच कराडचे माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांना त्यांच्या मातीची नीट माहिती नाही. परतीचा पाऊस पडला नाही तर दुष्काळ धरला जातो. तरी सुध्दा मार्च महिन्यात शासनाने अर्थसंकल्प मांडला, त्या अर्थसंकल्पामध्ये दुष्काळाबाबत काहीच तजवीज केलेली नव्हती. आता मात्र पुरवणी मागण्यांमध्ये तरतूद करण्याचा प्रयत्न चालविला आहे. आपत्कालीन परिस्थितीसाठी वापरावयाच्या आकस्मिकता निधीची मर्यादा 150 कोटी रुपयांवरुन 250 कोटी रुपये करण्यासाठी विधेयक सादर केलेले आहे. अर्थसंकल्पावरील चर्चेच्या वेळी आम्ही सभागृहामध्ये दुष्काळाचा विषय मांडला होता. माननीय वन व पुनर्वसन मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी या सभागृहात ज्या घोषणा केल्या त्या घोषणा अद्याप अंमलात आलेल्या नाहीत. माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी दूरदर्शनच्या वाहिन्यांवरुन प्रदर्शित केलेले व वृत्तपत्रात प्रसिध्द झालेले चारा डेपोचे फोटो सभागृहात आणून दाखविले होते. ते वास्तव मंत्री महोदयांनी मान्य केले नाही. त्यांचे म्हणणे होते की, चारा वाटप सुरु आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

सभापती महोदय, असे असेल तर आता जो प्रस्ताव मांडण्यात आला आहे त्या प्रस्तावामध्ये जास्त व्याज दर, दुबार पेरणी, दुबार पेरणीसाठी शेतकऱ्यांना कर्ज घ्यावे लागणे, भ्रष्टाचारामुळे आणि चाऱ्याअभावी शेतकऱ्यांच्या जनावराचा विषय अंतर्भूत करण्याचे कारण काय? सत्ताधारी पक्ष हेच आणि विरोधी पक्ष देखील हेच. चीत भी मेरी, पट भी मेरा. माननीय पुनर्वसन मंत्री यांच्या आम्ही निदर्शनास आणून दिले की, आपण जे सांगितले तसे प्रत्यक्ष अंमलात येत नाही. परंतु त्यांनी ज्या घोषणा केल्या त्याबद्दल सत्ताधारी पक्षातील सदस्यांनी सभागृहात बाके वाजवून स्वागत केले होते. जणूकाही आता शेतकऱ्यांचे सर्व काही आबादी आबाद होणार आहे. शेतकऱ्यांना चारा मिळणार, मुबलक पाणी मिळणार.

सभापती महोदय, माननीय पुनर्वसन मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी कोणकोणत्या घोषणा केल्या होत्या? टंचाईग्रस्त गावांना टँकरने पाणी पुरवठयाचे आदेश दिले. जिल्हाधिकाऱ्यांचे अधिकार तहसीलदारांना देण्याचा शासनाने निर्णय घेतला. 5 जनावरांपर्यंत कोणत्याही दुभत्या जनावरांना चारा देण्याचा निर्णय घेतला आहे. प्रत्येक गणासाठी 5 ते 6 गावांना चाऱ्याचा डेपो देण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. आवश्यकतेनुसार चारा छावण्या सुरु करण्याचे आदेश दिले आहेत. पाणी टंचाईच्या भागात चारा छावण्या मंजूर करणार आहोत. वीज दरामध्ये 33 टक्के मदत देण्याचे स्थायी आदेश दिलेले आहेत. वीज कनेक्शन तोडले जाणार नाही. या सर्व निर्णयांबाबत सत्ताधारी पक्षाकडून मंत्री महोदयांचे बाके वाजवून स्वागत करण्यात आले.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनीच ऊर्जा विभागाला पत्र लिहून काही शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन तोडण्यात आले ते पूर्ववत करण्यास सांगितले आहे.

नंतर श्री.खर्चे...

अप्रधारित पत्र/प्रतिक्षेपी नोंद

श्री. विनोद तावडे .....

ही कनेक्शन्स पुन्हा सुरु करावीत अशी त्यांनी विनंती केली आहे. 9 फेब्रुवारी, 2012 रोजी टंचाई सदृश्य परिस्थतीच्या संदर्भात उपाययोजनना करण्याच्या बाबतीत आदेश निर्गमित केले असून या माध्यमातून चाऱ्याच्या छावण्या टाकून त्यातून जनावरांना सहज चारा मिळेल अशी व्यवस्था केली आहे. तसेच कृषी विद्यापीठे व महाविद्यालयांची देखील यासाठी मदत घेण्यात येईल अशी उपाययोजना केल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले होते. त्यानंतरच्या काळात काँग्रेस पक्षाचे नेते माननीय श्री. राहूल गांधी आपल्या राज्यात आले असता ज्या भागात ते गेले होते त्या टंचाईग्रस्त गावात हिरवा चारा भरभरुन पाठविण्यात आला होता. ते पाहून माननीय राहूल गांधीना सुध्दा वाटले असावे की, या राज्याचे मुख्यमंत्री किती चांगले काम करीत आहेत. तसेच 35 हजार हेक्टरवर चारा निर्माण केला असून 15 एप्रिलपासून हा ओला चारा मिळण्याची व्यवस्था शासन करणार आहे असेही त्यात म्हटले होते. तसेच तहसीलदारांनी सकाळी 7 ते दुपारी 12 वाजेपर्यंत गावोगांव फिरुन परिस्थितीचा आढावा घेण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. चारा मागणीचे प्रस्ताव आले नाही अशी सबब सांगू नका असेही त्यांना ठणकाविले असल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले होते. त्याचप्रमाणे पालक मंत्र्यांनी आणि जिल्हा परिषद सदस्यांनी देखील दुष्काळावरील उपाययोजनांबाबत बैठका घ्याव्यात असे सांगितले. पण आमच्या राज्यातील पालक मंत्री मात्र कोणी युरोपला तर कोणी स्वित्झर्लंडला फिरत होते. ही संपूर्ण माहिती मी स्वत: मिळविलेली असल्याने ठामपणे सांगत आहे....अडथळा.... माझ्या दौऱ्याबाबत तर संपूर्ण माहिती वर्तमान पत्रातून छापूनच आलेली आहे.

महोदय, टंचाई सदृश्य परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाने निर्णय जाहीर केला होता की, पीक पैसेवारीच्या बाबतीत स्वतंत्र समिती गठित करण्यात येईल. तसेच प्रत्यक्ष अधिवेशन संपल्यानंतर शक्य होईल त्या जिल्ह्यांमध्ये मी माननीय मुख्यमंत्र्यांना घेऊन जाईन. माननीय मुख्य मंत्र्यांना शक्य झाले नाही तर मी स्वत: संपूर्ण राज्यभर दौरा करीन असेही मंत्री महोदय डॉ. पतंगराव कदम यांनी सभागृहात सांगितले होते. ते पुढे असेही म्हणाले होते की, राज्यात कोणीही पाण्यावाचून राहणार नाही, कोणावरही स्थलांतर करण्याची वेळ येणार नाही कारण शासन त्यास कटिबध्द आहे. प्रत्यक्षात या सर्व गोष्टींची अंमलबजावणी किती झाली हा प्रश्न वेगळा आहे. ही

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

घोषणा मुख्यमंत्री पदाचे दावेदार असणाऱ्या डॉ. पतंगरावांनी केलेली असल्याने सहाजिक मलाही दुष्काळाची तीव्रता जास्त असल्याने जाऊन बघावे असे वाटले. म्हणून मी चारच दिवस या भागात फिरलो असता सांगली जिल्ह्यातील आटपाडी या गावात गेलो असता गावकऱ्यांना वाटले की, लाल दिव्याची गाडी आली म्हणजे कोणी तरी मंत्री आले, मारा दगडं. मी गाडी थांबवून त्यांना म्हणालो की, माझी गाडी मंत्र्याची नाही तर विरोधी पक्षनेत्याला सुध्दा लाल दिव्याची गाडी असते आणि मी विरोधी पक्षाचा नेता आहे. मी जर हे सांगितले नसते तर लोकांनी मला बडविले असते, सन 2014 नंतर सत्ता येईल तो भाग वेगळा पण आजची आपल्या मंत्र्यांची अशी परिस्थिती आहे.

महोदय, या गावात गेल्यानंतर आटपाडी तहसीलदार, स्पीक फोनवर जिल्हाधिकारी श्री. शाम वर्धने आणि मी असे उभे असताना समोर 500 ते 600 लोकांचा समुदाय अशी परिस्थिती होती. जिल्हाधिकारी गांवकऱ्यांशी स्पीक फोनवरुन बोलत होते.त्यावेळेस मी तहसीलदारांना विचारले की, या गावाला पिण्याच्या पाण्याची परिस्थिती काय आहे, त्यावर तहसीलदारांनी माहिती दिली की, या गावात 15 हजार लिटरचे चार टँकर तीन खेपा दररोज मारत असतात.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अप्रमाणित प्रत / प्रतिलिपीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

ज्या टँकरने पाणी पुरवठा केला जात होता त्यातील एका टँकरच्या ड्रायव्हरला मी विचारले की, बाबा तुझ्या टँकरची पाणी वाहून नेण्याची क्षमता किती लिटरची आहे ? तेव्हा त्या ड्रायव्हरने सांगितले की, माझ्या टँकरची क्षमता 20 हजार लिटरची आहे. टँकरची आरटीाओची पासींग सुध्दा 20 हजार लिटर क्षमतेचीच असल्याची मी खात्री करुन घेतली. खरे म्हणजे येथेच 5 हजार लिटरचा फरक पडला. ही सर्व चर्चा जनतेसमोरच सुरु होती. मी ड्रायव्हरला विचारले की, तू पूर्ण क्षमतेने म्हणजे 20 हजार लिटर पाणी भरुन पुरवठा करतो का ? त्यावर टँकरच्या ड्रायव्हरने सांगितले की, साहेब ठेकेदाराने सांगितल्यानुसार मी 3/4 टँकर पाण्याने भरतो व पाणी पुरवठा करतो. पुन्हा 5 हजार लिटर फरक पडला म्हणजे 20 हजार लिटरमधून 10 हजार लिटरच पाणी टँकरमध्ये भरले जाते असा त्याचा अर्थ होतो. मी पुन्हा त्या ड्रायव्हरला विचारले की, 3/4 पाणी टँकरमध्ये भरल्यानंतर तू डायरेक्ट विहिरीमध्ये पाणी टाकण्यासाठी जातोस काय ? त्यावेळेस ड्रायव्हरने सांगितले की, साहेब जाता जाता मी तहसीलदार, प्रांत, तलाठी यांच्या घरात पाणी टाकून उरलेले पाणी विहिरीत टाकण्यासाठी जातो. याचा अर्थ पुन्हा 5 हजार लिटरचा फरक. म्हणजे प्रत्यक्षात एका टँकरमधून केवळ 5 हजार लिटरच पाणी लोकांना मिळते असा त्याचा अर्थ होतो. ही जी चर्चा सुरु होती ती स्पीक फोनमधून जनतेसमोरच सुरु होती. त्यावेळेस माझ्या सोबत सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील, सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश शेंडगे तसेच आणखी काही सन्माननीय सदस्य होते. या दुष्काळामध्ये पाण्याचे टँकर माफिया कसे बळावले होते त्याचा आखोदेखाहाल मी आपल्यापुढे मांडलेला आहे. त्यावेळी मीडिया, जनता, तहसीलदार, कलेक्टर हे सर्व उपस्थित होते व तेच वास्तव मी येथे सांगत आहे.

सभापती महोदय, शासनाकडून चारा डेपो सुरु करण्यात आले होते त्यांना सुध्दा मी भेटी दिलेल्या आहेत. परंतु त्या चारा डेपोमधील सुकलेला चारा खाल्ल्यामुळे जनावरांच्या तोंडामध्ये जखमा झाल्याचे आम्ही पाहिले होते. जनावरांच्या तोंडात जखमा झाल्यावर सन्माननीय मंत्री

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

श्री. लक्ष्मणराव ढोबळे म्हणतात की, मीडिया टीआरपी वाढविण्यासाठी खोटया गोष्टी पसरवित असतात. पंढरपूरच्या माणसाला असे बोलण्याचे कसे काय सुचू शकते हे काही समजत नाही. मीडिया, आमदार, खासदार,लोकांनी या सर्व गोष्टी आपल्या डोळयांनी बघितल्या असतांनाही संबंधित मंत्री महोदय हे सर्व खोटे आहे असे सांगतात ते ऐकून मला फार दु:ख झाले.

सभापती महोदय, मी गुरांच्या छावण्यांनाही भेटी दिल्या होत्या. त्यावेळेस तेथील शेतकरी सांगत होते की, शासन चाऱ्यासाठी जे 75 टक्के अनुदान देते तेवढे अनुदान शासनाने आमच्या खात्यावर जमा केले तर त्या पैशातून आम्ही आमच्या जनावरांसाठी चारा विकत घेऊ शकू मग हा चारा आम्हाला शेजारच्या राज्यातून आणावा लागला तरी आम्ही आणू. आम्हाला उरलेले 25 टक्के अनुदान दिले नाही तरी चालेल परंतु 75 टक्के अनुदान आमच्या खात्यावर जमा करावे अशी शेतकऱ्यांची मागणी होती. परंतु सरकारला जनावरे जगविण्यात इंटरेस्ट नव्हता तर चारा माफिया वाचवण्यामध्ये इंटरेस्ट होता. अनुदान खात्यावर जमा करावे अशी प्रत्येक शेतकऱ्याची मागणी होती परंतु ही मागणी शासनाने मान्य केली नाही. एवढी एक मागणी जर शासनाने मान्य केली असती तर शासनाने आमच्यासाठी काही तरी केले असे शेतकऱ्यांना वाटले असते. सत्ताधारी पक्षाला जनावरे जगवण्यापेक्षा राजकीय जनावरे जगवण्यात इंटरेस्ट होता असे मला या ठिकाणी दुर्दैवाने सांगावे लागत आहे. राजकीय व्यवस्थेवर मी कमी टीका करीत असतो. परंतु दुष्काळाचे जे दारुण चित्र मी पाहिले,अनुभवले ते मला या ठिकाणी नाइलाजाने सांगावे लागत आहे आणि याचेच मला जास्त दु:ख आहे.

उप सभापती : लाल दिव्याच्या गाडीवर दगड पडत होते म्हणून आपण मोटरसायकलने फिरत होता.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, लाल दिव्याला सत्ताधाऱ्यांनी बदनाम केलेले आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

आम्ही सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांना लाल दिवा परत करणार आहोत. पण तो दिवा सत्ताधारीचा देणार आहोत. मी सन्माननीय सदस्य श्री.जयवंत जाधव यांना सांगू इच्छितो की,आपण चिठ्ठीवर निवडून आला आहात. आपण सांभाळून रहावे. या संबंधी अजून कोर्टाचा निर्णय यायचा आहे. मघाशी माननीय मंत्री श्री.भुजबळ साहेबांनी आपले मत व्यक्त केले आहे. त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल झाला तर सगळेजण आपली चिठ्ठी काढण्यास उत्सुक आहेच. त्यामुळे आपले जे काही चालले आहे ते बरे चालले आहे.

सभापती महोदय, माझे एवढेच म्हणणे आहे की, दुष्काळ निवारण करण्यासाठी कायम स्वरूपी उपाययोजना केली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.जयवंत जाधव यांच्या पाठीशी भुज-बळ आहेत. त्यामुळेच ती चिठ्ठी निघाली. यासंबंधी जास्त न बोललेले बरे. आपण श्री.भुजबळांमुळे आहात. शासन दुष्काळ निवारण्यासाठी कायम स्वरूपी उपाययोजना का करीत नाही, एवढाच माझा साधा,सरळ, सोपा प्रश्न आहे. हा प्रश्न वर्षानुवर्षे आहे. जत तालुक्यातील मडियाळ गावातील लोकांशी माझे बोलणे सुरू होते तेव्हा लोक म्हणाले की, आम्ही वर्षानुवर्षे दुष्काळी भागात आहोत. त्यावर शासन साधे उत्तर देखील शोधत नाही. खरे म्हणजे या भागात पुष्कळ मंत्री आहेत. पश्चिम महाराष्ट्रात मोठ्या संख्येने मंत्री आहेत. पश्चिम महाराष्ट्राचा दुष्काळी दौरा केल्यानंतर मी विदर्भामध्ये गेलो. त्यावेळी विदर्भातील लोक मला म्हणाले की, आम्हाला वाटले आमचे मंत्री कमी म्हणून आमच्यावर अन्याय. पण पश्चिम महाराष्ट्रात एवढे मंत्री आहेत तरी त्यांची एवढी अवस्था का ? मी त्यांना म्हटले पश्चिम महाराष्ट्रातील लोकांची अवस्था शेंदाड शिपाया सारखी आहे. शिपायाच्या हातामध्ये ढाल तलवार असते. पण तो जोरात लढत नाही. तो म्हणतो कसे लढणार ? ह्याचे मला एवढे ओझे झाले आहे की, मी लढू कसा ? तशा प्रकारचे मंत्र्यांचे ओझे आज पश्चिम महाराष्ट्रावर आहे. त्यामुळेच परंपरागत, वर्षानुवर्षे जो दुष्काळी भाग आहे, तो कायम स्वरूपी दुष्काळापासून दूर करण्याचे प्रयत्न होताना दुर्दैवाने कुठेच दिसत नाही.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

शासनाने या संबंधीच्या इतिहासाचा अभ्यास करून कायम स्वरूपी कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत याचा अभ्यास केला पाहिजे. याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी केला आहे. या उपाययोजना पाऊस पडे पर्यंत करताना शासन कुठेच दिसत नाही. शासनाच्या काही उपाययोजना ह्या तात्पुरत्या स्वरूपाच्या आहेत, तर काही दीर्घ मुदतीच्या आहेत. शासनाची भूमिका ही दुष्काळी माफियांना पोषक आहे. या भागात सतत दुष्काळ राहिला तर सदर भागातील जे नेते आहेत, त्यांचे जे चेलेचपाटे आहेत त्यांच्या कमाईचे क्षेत्र ते आहे. इकडे येऊन त्यांनी कमवायचे आणि तिकडे नेत्यांकडे जाऊन काम करायचे अशा पद्धतीची रचना बहुधा त्या पट्टयात चाललेली दिसते. आसपासच्या नगर जिल्ह्यात हिवरे बाजार आहे. ती उदाहरणे मी पुन्हा पुन्हा सांगत नाही. ही उदाहरणे आपण अनेक वेळा पाहिलेली आहेत, ऐकलेली आहेत. दुष्काळी भागात अशा पद्धतीने काम करता येईल. आम्ही या सर्व गोष्टी सभागृहात प्रत्यक्षपणे मांडल्या.

गेल्या वेळी बजेटच्या भाषणानंतर मी उल्लेख केला होता की, गेल्या वर्षी शेततळयांचा लक्ष्यांक 30,000 असताना तो केवळ 3000 एवढा खाली का आणला ? त्यावेळी आम्ही आमच्या योजना करतो असे मला उत्तर देण्यात आले.

सदर शेततळ्यांचा लक्ष्यांक खूप कमी असल्यामुळे तो वाढविण्यात यावा अशा प्रकारची मागणी विरोधी पक्ष नेता, विधान परिषद यांनी आपल्या अर्थसंकल्प भाषणात केली आहे काय, हे खरे आहे काय ? असा प्रश्न विचारला होता. त्या संबंधी सन्माननीय मंत्री श्री.नितीन राऊत यांनी काल पान क्रमांक 21 वर उत्तर दिले की, उपलब्ध कागदपत्रांवरून अशी मागणी केल्याचे दिसून येत नाही. विरोधी पक्ष नेत्याने सदर प्रश्न सभागृहात उपस्थित केला होता. कदाचित मंत्रिमहोदय त्यावेळी उपस्थित नसतील. पण आपले अधिकारी तरी असतील. त्यांनी नोंद करून हा प्रश्न ज्यांनी मांडला आहे, त्यासंबंधी काही तरी उत्तर काढायला पाहिजे होते. ते तर सोडा. मी काल प्रश्न विचारल्या नंतर आमच्या कागदपत्रात असे काही सापडले नाही अशा प्रकारचे उत्तर देण्यात आले. आता प्रोसिडींग असते तर त्यामध्ये सर्व दिसले असते. अशा प्रकारे सरकार निद्रिस्त असेल, सरकारला काही देणेघेणे नसेल तर मग जनतेने कोणत्या अपेक्षा करायच्या ?

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

ज्या दुष्काळी भागात मी गेलो होतो त्या भागातील प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश शेंडगे यांनी उपस्थित केला आहे. ताकरी, टेंभू, म्हैसाळा, येथे उपसा सिंचना योजना सुरू केल्या आहेत. 80 टक्के उपसा सिंचन योजना आम्ही आमच्या काळात केल्या आहेत. उरलेली 20 टक्के कामे आता टप्प्याटप्प्याने होताना दिसत आहेत.

यानंतर श्री.सरफरे

अप्रधारित पत्र / प्रतिलिपीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

आणि त्या भागामध्ये बारमाही पाणी दिले जाते त्या ठिकाणी आठमाही पाणी द्यावे. उरलेले पाणी दुष्काळग्रस्त भागाला द्यावे अशी मागणी माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी या सभागृहामध्ये अनेक वेळा केलेली मी पाहिली आहे. ही मागणी करीत असतांना त्यांच्या बागा जगवायच्या परंतु बाजूच्या तालुक्यातील माणूस पाण्यावाचून तडफडला तरी चालेल कारण तो माझा मतदारसंघ नाही. शेजारचा आटपाडी तालुका तुमचाच आहे ना, त्या भागात आपण गेल्यानंतर तेथील जनता आपल्याला "या लोकांना पुन्हा निवडून द्या" असे बोलून दाखविते. त्यामुळे सत्तेमधील लोकांनी या विषयाकडे राजकारणाच्या पलीकडे पाहण्याची गरज आहे. त्या भागामध्ये आठमाही पाणी देऊन बाकीचे पाणी दुष्काळी भागाकडे वळविता आले तर त्या भागामध्ये वर्षानुवर्षे दुष्काळ पडत आहे त्यावर काही तरी उपाय केल्यासारखे होईल. सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्र आपल्याला सधन वाटत असला तरी त्यामधील दुष्काळी तालुक्याकडे सुध्दा आपण लक्ष देणे गरजेचे आहे. राज्याच्या प्रत्येक विभागामध्ये अनुशेष दाखविला असला तरी त्या विभागातील काही तालुक्यांमध्ये असलेला अनुशेष दूर करण्यासाठी आपण खर्च करणे आवश्यक आहे अशाप्रकारे घटनेमध्ये म्हटलेले नसतांना सुध्दा माणुसकीच्या भावनेतून विचार करुन आपण हा खर्च केला पाहिजे. केवळ पश्चिम महाराष्ट्र सधन, श्रीमंत आहे असे समजून त्या भागामध्ये खर्च केला नाही तरी चालेल असा विचार न करता त्या भागातील काही तालुके हे दशका नु दशके दुष्काळग्रस्त आहेत त्यांच्यासाठी आपल्याला खर्च करावा लागणार आहे.

सभापती महोदय, मघाशी माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी त्या भागातील दुष्काळी परिस्थितीचे निवारण करण्यासाठी हार्वेस्टींगसारखे उपाय योजण्याची गरज असल्याचे सांगितले. त्या संदर्भात आपण आकस्मिकता निधीचा उल्लेख केला. त्या अनुषंगाने स्वर्गीय यशवंतराव चव्हाण साहेबांचे एक उदाहरण सांगितले. अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये दुष्काळाच्या विषयावरील चर्चेला उत्तर देतांना संबंधित सर्व मंत्र्यांनी निधीची कमतरता पडू देणार नाही असे आश्वासन दिले होते. आता आपण आकस्मिकता निधीमधून पैसे उचलावे लागतील असे सांगत आहात. आकस्मिकता निधीचा उपयोग हा अचानक उद्‌भवलेल्या कामासाठी करावयाचा असतो. राज्यामध्ये दुष्काळी परिस्थिती अचानक उद्‌भवलेली नाही. आपल्या राज्याचा अर्थसंकल्प तयार करण्याच्या कालावधीत ही गोष्ट लक्षात आली होती. मंत्रालयाला आग लागली की लावली जे काही असेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

इंटेरिअम लागली की, फायनल लावली यामध्ये सदोष मनुष्यवधाचा गुन्हा जेव्हा दाखल होईल तेव्हा होईल. त्यासाठी आकस्मिकता निधी वापरणे, 27/11 च्या घटनेकरिता आकस्मिकता निधीचा वापर करणे ही कारणे आपण समजू शकतो.

सभापती महोदय, राज्यामध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण होणार आहे हे नोव्हेंबर मध्येच आपल्या लक्षात आले असतांना देखील शासन त्यासाठी गंभीर झालेले नाही. इतकेच नव्हेतर, संपूर्ण जून महिना पाऊस न पडल्यामुळे कोरडा गेला आहे व शेतकरी संकटात सापडला आहे. काही ठिकाणी तर अवर्षणामुळे दुबार पेरणीचे संकट उभे ठाकले आहे. 41 तालुक्यांमध्ये सरासरीपेक्षा 20 टक्के कमी पाऊस झाला, 81 तालुक्यांमध्ये सरासरीपेक्षा 40 टक्के कमी पाऊस झाला, 78 तालुक्यांमध्ये सरासरीपेक्षा 60 टक्के कमी पाऊस झाला आणि 62 तालुक्यांमध्ये 80 टक्क्यापेक्षा कमी पाऊस पडला. हे जून महिन्यातील वास्तव आपल्यासमोर आहे. 262 तालुक्यांमध्ये सरासरीपेक्षा खूप कमी पाऊस पडल्यामुळे अजूनपर्यन्त शेतकऱ्यांनी शेतामध्ये पेरणी केली नाही. जुलै महिन्याच्या पहिल्या आठवडयामध्ये देखील राज्याच्या काही भागामध्ये आवश्यक इतका पाऊस पडलेला नाही. जुलैच्या दुसऱ्या आठवडयात पाऊस पडला तरी शेतकऱ्यांना 15 जुलैपर्यन्त पेरणीसाठी वाट पहावी लागणार आहे. 15 जूनपासून जुलैच्या पहिल्या आठवडयापर्यन्त पाऊस न पडल्यामुळे शेतकऱ्यांना पारंपारिक पिके घेता येणार नाहीत हे वास्तव आपणा सर्वांसमोर आले आहे.

सभागृहामध्ये माननीय कृषी मंत्री उपस्थित आहेत. आपल्याला माहीत आहे की, पिकांवर येणाऱ्या फुलोऱ्याच्या अवस्थेचे तीन प्रकार आहेत. त्यामध्ये शॉर्ट डे प्लॉंट, लॉंग डे प्लॉंट आणि डे न्यूट्रल प्लॉंट असतात. भारतीय उप खंडामधील सर्वात मोठा दिवस 21 जून असतो आणि 21 डिसेंबर हा सर्वात लहान दिवस असतो हे ऋतुचक्र आपल्याला बदलता येणार नाही.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हे कालचक्र आपण बदलणार नसलो तर 7 जुलै पर्यंत पेरणी न झाल्यामुळे पारंपारिक पिके शेतकऱ्यांना घेता येणार नाहीत हे वास्तव आहे. अशा वेळी आपल्याला जर उडीद, ज्वारी, मूग, नाचणी, कापूस ही पिके घेता येणार नसतील तर मग स्वाभाविकपणे शेतकऱ्यांचा कल हा सोयाबीनचे पीक घेण्याकडे असणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.नवलेसाहेबांना मी सांगू इच्छितो की, एकाच वेळी सर्व शेतकरी सोयाबीनचे पीक घेऊ लागले तर स्वाभाविकपणे सोयाबिनच्या बियाण्यांचा तुटवडा निर्माण होणार आहे अशा प्रकारचे वास्तव दिसत असताना आपण सोयाबीनच्या बियाण्यांची काय व्यवस्था केली आहे? मात्र आपण मला सांगणार आहात की, याबाबतीत व्यवस्था केली आहे. पण ती केवळ कागदावर असेल. नंतर राइर्ट टू रिप्लाय मध्ये कुठे-कुठे कशा प्रकारचे वास्तवात चित्र आहे ते मी आपल्याला दाखवून देईन. कारण शेतकऱ्यांचा एकाच पिकाकडे कल असेल असे नाही. उदाहरण द्यावयाचे तर सोयाबीन, सूर्यफूल आणि बाजारामध्ये बियाणांची टंचाई निर्माण झाल्याने आता त्याचा काळाबाजार सुरु झालेला आहे. तसेच काही भागात पेरण्या होऊन दरवर्षी प्रमाणे कापसाच्या बियाणांच्या बाबतीत कृत्रिम टंचाई प्रश्न निर्माण होत आहे ही गोष्ट आपण वाचत आहोत, पहात आहोत आणि लोकांकडून ऐकत आहोत आणि या सगळया बाबींकडे शासन मात्र लक्ष देत नाही हे आजचे वास्तव आहे.

सभापती महोदय, सर्वात महत्वाचा विषय म्हणजे सध्या मला अलीकडच्या काळातील कोर्टाच्या निर्णयाबाबत काही कळतच नाही. कोणीतरी वसईच्या हरित पट्टयाबाबत कोर्टामध्ये केस केली होती पण संपूर्ण ठाणे जिल्ह्यासाठी तो निर्णय लागू झाला आणि तेथील लोकांच्या घरांवर गदा आली. उत्तर प्रदेश मधील एका जिल्ह्यामध्ये केंद्रीय बँकेने ठेव बुडविली आणि मग त्याबाबतीत सुप्रीम कोर्टाने निर्णय दिला. त्यानुसार बँकींगचा परवाना अत्यावश्यक करण्यात आला आणि सर्व केंद्रीय सहकारी बँकांना कलम 11 लागू करण्यात आले. तसेच ज्यांचे बँकींग नेटवर्क हे किमान 1 लक्ष रुपये असेल त्या बँकांना बँकींगचा परवाना दिला. 7 जिल्ह्यांमधील सहा बँका दोषी सापडल्या मुळे रिझर्व बँकेने 35 (अ) हे कलम लागू केले. त्याबाबत बातमी आल्याबरोबर ताबडतोब लोकांनी बँकेतून पैसे काढून घेणे हे स्वाभाविक आहे. साई जिल्हा संचालक मंडळाच्या चुकीच्या पध्दतीने केलेल्या कर्ज वाटपामुळे ते अडचणीमध्ये आले आहेत. तेथील संचालक मंडळ कोणाचे आहे तर ते सत्ताधाऱ्यांचे आहे. अशा प्रकारचे वास्तव असताना या बँका बुडल्या तर त्या सत्तेमध्ये बसलेल्या लोकांच्या संचालक मंडळामुळे बुडणार आहे.शेतकऱ्यांना आज कर्ज मिळते का हा खरा प्रश्न आहे.

श्री.विनोद तावडे . . .

नागपूर मधील नेटवर्क किती तर 116, वर्धा -56, बुलढाणा-93, उस्मानाबाद - 28, जालना - 12 धुळे, नंदूरबार 66 कोटी, बुलढाणा-93, हे सर्व लक्षात घेतले तर येत्या सप्टेंबरपर्यंत एक लाख रुपयांचे नेटवर्क दाखवू शकणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना नवीन कर्ज मिळेल या आशेवर त्यांनी जुनी कर्जे फेडण्यासाठी घरातील सोन-नाणे विकले.

सभापती महोदय, मी धुळे येथे गेलो असताना तेथील गेस्ट हाऊसमध्ये मला तेथे प्रशासक भेटले. त्यावेळी त्यांनी असे सांगितले की, जर संबंधितांनी मागील कर्ज फेडले तर आम्ही त्यांना नॅशनल बँकाकडून कर्ज देऊ. आज शेतकरी असे सांगत आहेत की, साहेब, आम्ही कर्जे फेडली असताना सदरहू बँका आम्हाला कर्ज देण्यास तयार नाहीत. राज्यात एका बाजूला निसर्गाचे संकट आहे अशा वेळी त्या शेतक-याला मदतीचा हात मिळाला पाहिजे पण तो मिळत नाही आणि येथील सहा बँका दरवर्षी सुमारे 4561 कोटी रुपयांच्या पीक कर्जाचे वाटप करतात. एकंदर साडेपाच लाख शेतकऱ्यांची परिस्थिती गंभीर झाली आहे आणि ही वास्तविकता 7 जिल्ह्यात झाली आहे. अशा वेळी राज्य शासन हस्तक्षेप करुन संचालक मंडळावर कारवाई करीत असताना शेतकऱ्यांना कर्ज मिळण्याच्या दृष्टीने आपण कोणती कारवाई करणार आहोत याबाबत मला माननीय मंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण ऐकण्याची उत्सुकता आहे.

सभापती महोदय, जिल्हा केंद्रीय सहकारी बँक ही साखर कायद्यांप्रमाणे सेंट्रल प्रणित एजन्सी आहे. सर्व पतपेढ्या, सर्व नागरी पतसंस्था या आपोआप अडचणीमध्ये येणार आहेत. त्यामुळे आता हा प्रश्न सुटणार नाही. राज्य शासनाने नाबार्डला रि-फायनान्सिंग बाबत हमी देऊन लाखो ठेवीदारांसाठी बँका वाचवाव्यात अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

यानंतर श्री.बरवड . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

सभापती महोदय, आपण या सभागृहामध्ये काही गोष्टी आग्रहाने करतो. ते केल्यानंतर सरकारकडून ज्या गोष्टी व्हावयास पाहिजे त्या होताना दिसत नाहीत. 2005 पासून शेतकऱ्यांच्या आत्महत्या कमी न होता त्यामध्ये वाढ होत असताना विधानसभा आणि विधान परिषदेने सावकारी विधेयक मंजूर केले. ते विधेयक मंजूर केल्यानंतर केंद्र शासनाच्या गृह खात्याकडे गेले. तेथून तीन वेळा ते विधेयक परत आलेले आहे. स्वातंत्र्यापासूनच्या आणि महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेपासूनच्या इतिहासामध्ये अशा प्रकारे तीन-तीन वेळा विधेयक कधी परत आले असेल असे मला वाटत नाही. पण आपण मंजूर केलेले ते विधेयक केंद्र शासनाने तीन वेळा आपल्याकडे परत पाठविले. त्या विधेयकामध्ये आपण जाणीवपूर्वक त्रुटी ठेवत आहोत की केंद्र शासनालाच ते विधेयक आणण्याची गरज वाटत नाही ? केंद्रामध्ये जर वेगळ्या पक्षाचे सरकार असते तर आपण वेगळे सांगितले असते. जर सावकारी विधेयक तीन-तीन वेळा परत येत असेल तर त्या विधेयकातील सर्व त्रुटींची पूर्तता केली पाहिजे. आता बँका बंद पडल्यामुळे पुन्हा लोक सावकारांकडे जातील. सावकार पुन्हा त्यांना लुटतील. मग आबा कोपरापासून ढोपरापर्यंत वगैरे सांगणार. दे दणादण, भाषण जोरात चालू. त्याच्या बातम्या येणार. काही सन्माननीय सदस्य म्हणत आहेत की, लोक टाळया वाजविणार. तासगावच्या लोकांचे ते रोजचे दु:ख आहे. काहीच होत नाही मग टाळ्या किती वाजवावयाच्या असे लोक म्हणतात. टाळ्यांसाठी ती वाक्ये असतात, टाळ्यांसाठी तशा घोषणा होतात. आज राज्यामध्ये जी टंचाईची परिस्थिती निर्माण झालेली आहे त्याबाबत शासनाने केलेले काम आणि आता पुढे जी अवर्षणाची स्थिती निर्माण होत आहे त्या संदर्भात करावयाचे काम ही महत्वाची बाब आहे.

परवा मी म्हटल्याप्रमाणे आम्हाला खरिपाचा हंगामामध्ये चर्चेला बोलवावे असे पत्र मी माननीय मंत्री महोदयांना दिले होते. आपण सांगितले की, दोन्ही विरोधी पक्ष नेत्यांना आम्ही स्वतंत्र चर्चेला बोलवू असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. आपण आम्हाला कधी बोलविणार हे माहीत नाही. आम्ही प्रामाणिकपणे काही चांगल्या सूचना करु शकतो. कारण प्रत्यक्ष फिरताना लोकांनी आम्हाला काही गोष्टी सांगितलेल्या असतात. स्व. यशवंतरावजी चव्हाण नेहमी असे म्हणत होते की, विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्ष एकत्र मिळून सन्मानाने कामकाज केले तर राज्य

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

चालविणे सोपे असते. असे असताना आपण आम्हाला बोलवाल अशी आमची अपेक्षा होती. आपल्याशी माझे प्रत्यक्ष बोलणे झाले. पत्रव्यवहार झाला. आपण कधी बोलविणार याची आम्ही वाट पाहात आहोत. आपल्या कृषी क्षेत्राचा निगेटिव्ह ग्रोथरेट असताना पुढच्या हंगामामध्ये आपण फार कमी लक्ष्य ठरविले आहे. आपण सांगता की एवढा ग्रोथ रेट आहे. आपले लक्ष्यच कमी होते त्यामुळे आपण ते पूर्ण केले.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले साहेबांचे मी एका गोष्टीसाठी मनापासून अभिनंदन करतो की, कधी तरी आत्मपरीक्षण करुन आपले सरकार जर चुकले असेल तर चुकले म्हणण्याची हिंमत श्री. हेमंत टकले यांच्यासारखे सन्माननीय सदस्यच दाखवू शकतात. त्या हिंमतीने ते बोलू शकतात. त्यांनी सांगितले की, चारा डेपोमध्ये भ्रष्टाचार झाला, पाण्याची टंचाई आहे. मी मनमाडला गेलो. माननीय मंत्री महोदय श्री. छगन भुजबळ यांनी आपल्याला तो कागद दाखविला असेल. मनमाड येथील पाणी मी एका बाटलीत भरुन या ठिकाणी आणले आणि फोरेन्सिक लॅबकडे तपासणीसाठी दिले. त्या लॅबने "Unfit for potable purpose" असे सर्टिफिकेट दिले. ती बाटली मी सिल करुन आणली आणि त्यांच्याकडे दिली. त्यांनी त्याचा रिपोर्ट दिला. ज्या ठिकाणी सन्माननीय मंत्री महोदय श्री. छगन भुजबळ आणि त्यांच्या चिरंजीवांचा मतदारसंघ आहे तेथील लोक सांगत आहेत की तुम्ही आम्हाला हे अनफिट पाणी पिण्यासाठी देत आहात. अशा प्रकारचे अनफिट पाणी पिण्यासाठी दिल्यानंतर लॅबचे अशा प्रकारचे सर्टिफिकेट आले. अशा वेळी जनता अशी अपेक्षा व्यक्त करते की, आम्हाला फक्त पिण्यासाठी चांगले पाणी द्या त्या दृष्टीने शेतकरी, सामान्य माणसे यांच्यासाठी पुढच्या काळात शासन काय उपाययोजना करणार आहे हे सभागृहासमोर आले पाहिजे.

गेल्या वेळी माननीय मंत्री डॉक्टर पतंगराव कदम यांच्या केवळ घोषणा झाल्या त्याप्रमाणे यावेळी माननीय मंत्री श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या केवळ घोषणा झाल्या असे व्हावयास नको. या चर्चेतून आपण खरोखरच सर्वसामान्य लोकांना काही तरी दिलासा देणार आहोत हा जर संदेश राज्यात गेला तर येणाऱ्या संकटाशी सामना करण्यासाठी आपण तयार आहोत अशा प्रकारचा

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

विश्वास त्या संकटाशी सामना करताना राज्यातील सामान्य लोकांना मिळेल. आपण ते कराल असा विश्वास मी व्यक्त करतो. नाही तर येरे माझ्या मागल्या या पध्दतीने तेच टँकर माफिया, तेच चारा माफिया, तेच रोजगार हमी माफिया असे सर्व सुरु राहील. काँग्रेस-राष्ट्रवादीची रोजगार हमी, अर्धे तुम्ही आणि अर्धे आम्ही, दे दणादण चालू ठेवावयास हरकत नाही. पण असे व्हावयास नको एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय जिव्हाळ्याचा विषय मांडलेला आहे.

उप सभापती : ही चर्चा सायंकाळी 5 वाजेपर्यंत मंत्री महोदयांच्या उत्तरासहित संपवावयाची आहे. या चर्चेत ज्या सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे आहेत त्या सर्वांना मी संधी देईन. परंतु प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात आपले विचार मांडावेत. मंत्री महोदयांच्या उत्तरासाठी अर्धा तास वेळ देण्यात आलेला आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, प्रत्येक वक्त्याला किती वेळ दिलेला आहे याबाबत जर आपण आम्हाला माहिती दिली तर तेवढ्या वेळेमध्ये मुद्यांची मांडणी करणे सोपे होईल.

श्री.सुरेश नवले : सभापती महोदय, विश्वाचे रहस्य....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे सभागृह म्हणजे शाळा आणि आपण या शाळेचे मुख्याध्यापक आहात काय ?

उप सभापती : असे बोलणे चुकीचे आहे. माननीय सभापतींनी या चर्चेचे रोटेशन निश्चित केलेले आहे. त्यावेळी आपण बोलावयास पाहिजे होते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे विधिमंडळ आहे. महाराष्ट्रातील प्रश्नांची चर्चा करण्याचे हे स्थान आहे. एक तर विधिमंडळाच्या अधिवेशनाचे दिवस कमी करण्यात आले आहेत. आता कामकाजाचे केवळ 5 दिवसच शिल्लक राहिलेले आहेत. अशासकीय कामकाजाचे दोन दिवस व आजपर्यंतचे तीन दिवस वजा केले तर आता केवळ पाचच दिवस शिल्लक राहिलेले आहेत. राहिलेल्या दिवसांमध्ये शासकीय विधेयके सभागृहासमोर चर्चेसाठी येणार आहेत. जनतेचे प्रश्न मांडत असताना सन्माननीय सदस्यांनी वेळेचे भान ठेवले पाहिजे हे मला मान्यच आहे. परंतु ही चर्चा सायंकाळी 5 वाजेपर्यंत संपवावयाची आहे असे सांगून शाळेच्या घंटेप्रमाणे सभागृहात कामकाज चालणार असेल तर ते योग्य होणार नाही. हे विधिमंडळ आहे. दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांना आपल्या भावना व्यक्त करण्याचे हे स्थान आहे. येथे पक्षभेद करण्याचा विषय नाही. एखाद्या विषयाला अडीच तास वेळ ठरवून दिल्यावर ती चर्चा 5 तास चालते. आपण अधिक वेळ चर्चा करण्यासाठी सहकार्य देता, त्याला मान्यता देता त्याबद्दल आम्ही आपले आभार

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

मानतो. त्यामुळे मुक्तपणे चर्चा केली जाते. लोकांच्या मनामध्ये असलेल्या भावना येथे व्यक्त केल्या जातात. सिंचनासहित सरकारची भूमिका काय आहे ती या सदनाच्या माध्यमातून लोकांना कळत असते.

उप सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, माननीय सभापतींनी या प्रस्तावाची सुरुवात होत असताना सर्व सन्माननीय सदस्यांना वेळेच्या बाबतीत समजावून सांगितले होते. त्यावेळी आपण कोणीही बोलला नाहीत. मी आपले ऐकत असल्यामुळे आपण मध्येच बोलण्यासाठी ताडकन उभे राहिलात.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, राज्यातील दुष्काळी भागातील जनता दुष्काळाने अगोदरच होरपळून निघालेली आहे. जनावरांची चा-याअभावी हालअपेष्टा सुरु आहे. या सभागृहात चर्चा झाल्यानंतर कायम स्वरुपी दुष्काळ दूर होईल अशी दुष्काळी भागातील जनतेची अपेक्षा आहे. म्हणून या विषयावर सविस्तरपणे चर्चा होऊ द्यावी. अशी मी दुष्काळी भागातील जनतेच्या वतीने आपल्याला विनंती करतो.

उप सभापती : दुष्काळी भागातील आमदारांनी दुष्काळी भागासाठी काय केले आहे, इतके दिवस आपण गप्प का बसला होता ?

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, आता एक संशोधन पुढे आलेले आहे. विश्वनिर्मितीचे रहस्य काय आहे ? हिग्ज बोसन नावाच्या प्रयोगातून एक देवकण सापडलेला आहे. आकाशामध्ये जे द्रव्य आहे त्याला आकार देणारा हा देवकण आहे. संशोधकांनी विश्वनिर्मितीचे रहस्य उलगडून सांगितले आहे. पण दुष्काळ हटविण्याचे रहस्य मात्र सरकार सांगू शकलेले नाही. दुष्काळ पडल्यावर मृत्यू का उभा राहतो ? पारंपरिक पध्दतीने जर दुष्काळाचा विचार केला तर आमचे पूर्वज असे सांगत असत की, दुष्काळ म्हणजे मृत्यू. हेच चित्र आजही या शतकामध्ये पहावयास मिळते. वाळवंटात तडफणाऱ्या जीवाची जी घालमेल असते, जी तडफड असते, जगण्यासाठीची जी धडपड असते ती दुर्भाग्याने दुष्काळग्रस्त भागामध्ये दिसत आहे.

यानंतर श्री.शिगम....

प्रा. सुरेश नवले...

आनंदाची गोष्ट ही आहे की, जगामध्ये एकाच वेळी सर्व ठिकाणी दुष्काळ पडत नाही. संपूर्ण देशामध्ये एकाच वेळी दुष्काळ पडत नाही. म्हणून एक राज्य दुस-या राज्याला मदत करण्यासाठी धावत असते आणि एक देश दुस-या देशाला मदत करण्यासाठी धावत असतो. महाराष्ट्रातील अन्य विभागांपेक्षा पश्चिम महाराष्ट्र हा समृद्ध आणि संपन्न प्रदेश आहे. परंतु दुष्काळाने तो होरपळून निघालेला आहे. काही भागामध्ये प्रचंड अवकळा आली, भीषण पाणी टंचाई निर्माण झाली. यावर कायम स्वरुपी मात करण्याच्या प्रयत्नात राज्य शासनाला अपयश आलेले आहे. हे सत्ताधारी पक्षाचे चिंतन आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील पाणलोट क्षेत्राचा विचार करता गोदावरीच्या खो-याचे भौगोलिक क्षेत्र 49.5टक्के आहे. या खो-यात 38 अब्ज घन मीटर पाणी उपल्बध आहे. कृष्णा खो-याचे भौगोलिक क्षेत्र 22.6 टक्के आहे. कृष्णा खो-यामध्ये 27 अब्ज घन मीटर पाणी उपलब्ध आहे. तापी खो-याच्या 16.7 टक्के क्षेत्रामध्ये 7 अब्ज घनमीटर पाणी उपलब्धआहे. पश्चिम दिशेला वाहणा-या नद्यांचे क्षेत्र 10.7 टक्के आहे आणि 51 अब्ज घन मीटर पाणी उपलब्ध आहे. या पाण्यापैकी आपण किती पाणी अडवू शकलो हे राज्य शासनाने सांगण्याची गरज आहे. महाराष्ट्राला हे समजण्याची आवश्यकता आहे. आमच्या कडून काही गोष्टी राहिल्या असतील तर त्या दुरुस्त करणे हा आमच्या मनाचा मोठेपणा आहे. आम्हाला खात्री आहे की पुढच्या काळामध्ये दुष्काळावर मात करण्याचे सामर्थ्य या राज्यामध्ये नक्कीच येऊ शकेल, निर्माण झालेल्या भीषण पाणी टंचाईवर मात करता येऊ शकेल. हे सारे करण्यासाठी निधीची आवश्यकता आहे. हा निधी कसा उपलब्ध करुन देणार ? अधिका-यांच्या पातळीवर मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार आहे. हा भ्रष्टाचार कसा थांबविणार ?

सभापती महोदय, परवा बीड जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यांनी पाणी टंचाईचा आढावा घेतला त्यावेळी एकाच गावामध्ये तीन-तीन बोगस टँकर लावल्याचे आढळून आले. हा प्रकार भूषणावह नाही. भ्रष्टाचार निपटून काढण्यासाठी राज्य शासन कठोर कारवाई करते अशा प्रकारचा संदेश जाण्याची आवश्यकता आहे. हे शासन कुणाचाही मुलाहीजा ठेवत नाही. कुणीही तिसमार खाँ असेल तरी त्याला अरबी समुद्रामध्ये बुडविण्याची क्षमता राज्य शासनामध्ये आहे. हा परीक्षेचा काळ आहे. दुष्काळ हा नवीन नाही. माझे हे दुष्काळावरचे चौथे भाषण आहे. 1972ला दुष्काळ पडला.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

त्यावेळी पाणी टंचाई नव्हती. त्या वेळेला महाराष्ट्रातील कोनाकोपऱ्यात गेलात तर भूगर्भात 10 फुटावर पाणी सापडत होते. आज बीड तालुक्यात 700 फुटापर्यंत भूगर्भात पाण्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला तर पाण्याचा शोध लागत नाही. भूगर्भात पाण्याची पातळी प्रचंड खोल गेलेली आहे. 1972 च्या दुष्काळाच्या वेळी महाराष्ट्राची लोकसंख्या तीन ते साडेतीन कोटी एवढी होती. आता महाराष्ट्राची लोकसंख्या 11 कोटीपर्यंत गेलेली आहे. 1972 पूर्वी कधी कधी दुष्काळ पडले याची माहिती या ठिकाणी नमूद करु इच्छितो. 1801 ते 1921 या दरम्यान महाराष्ट्रात 31 वेळा दुष्काळ पडले. त्या कालावधीत इंग्रज सरकार राज्य करीत होते. त्यांना त्या दुष्काळावर मात करणे शक्य झाले नाही. बंगालमध्ये 1943 साली दुष्काळ पडला होता. त्या दुष्काळी परिस्थितीत 40 लाख लोक मृत्युमुखी पडले. राष्ट्रपिता महात्मा गांधी ते पंडित जवाहरलाल नेहरु पर्यंतच्या सगळया नेत्यांनी इंग्रज सरकारचा निषेध केला, धिक्कार केला की, इंग्रज सरकार उघडया डोळयांनी लोकांचे मृत्यू बघत आहे. इंग्रज सरकारला माणुसकी नाही. माणुसकीला काळीमा फासणारे कृत्य या सरकारने केलेले आहे.

सभापती महोदय, दुर्गादेवीचा दुष्काळ 12 व्या शतकात पडला. महाराष्ट्रात दुर्गादेवीचा दुष्काळ 12 वर्षे घोंगावत होता. या दुष्काळाने महाराष्ट्राचे संपूर्ण चित्र छिन्न विछिन्न करुन टाकले. प्रचंड पाणी टंचाई निर्माण झाली होती. दुष्काळी परिस्थितीमुळे लोक परागंदा झाले. महाराष्ट्र सोडून गेले. त्या कालावधीत दुर्गादेवीच्या दुष्काळाला गावदेवीचा दुष्काळ म्हणून संबोधले जात असे. गावदेवीचा कोप आहे अशी लोकांची धारणा होती. ही लोकांची अंधश्रध्दा होती. हा दुष्काळाचा इतिहास तपासला तर आपण या दुष्काळामधून काही बोध घेणार आहोत की नाही हा सगळयात मोठा प्रश्न आहे.

सभापती महोदय, ग्रामीण भागातील व्हल्यांची संख्या रोडावलेली आहे. ग्रामीण भागामध्ये चिमण्या दिसणे दुरापास्त झालेले आहे. महाराष्ट्रामध्ये विशेषत: मराठवाडयात करडईचे पीक मोठया प्रमाणावर घेतले जात होते. आज मराठवाडयात करडईचे नामोनिशाण उरलेले नाही. सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांना हृदयाचे दुखणे झाले तर त्यांनी करडईचे तेल खावे अशा प्रकारचा वैद्यकीय सल्ला त्यांना दिला जाईल. परंतु आता करडईचे तेल मिळत नाही. राज्य शासन पिकांच्या नियोजनाची पध्दत महाराष्ट्रात सुरु करणार आहे किंवा नाही हा या निमित्ताने

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

आमच्या समोरचा सगळयात मोठा प्रश्न आहे. पीक पध्दती लोकांसमोर ठेवणे आवश्यक आहे. माननीय विरोधी पक्ष नेते काय म्हणतात, त्यांच्या म्हणण्यात जे उपयुक्त आहे, जे विधायक आहे ते स्वीकारुन महाराष्ट्रातील जनतेच्या समोर ठेवणे आणि उत्तम प्रशासक म्हणून आपली प्रतिमा निर्माण करणे हे महाराष्ट्र शासनाचे काम आहे. मला असे वाटते की, त्यामध्ये आम्ही कुठे तरी कमी पडत असलो तर त्यात अजूनही सुधारणा करता येऊ शकते. सुधारणा करण्यासाठी मनाचा मोठेपणा राज्य शासनाने ठेवणे आवश्यक आहे आणि त्या दृष्टीने माननीय कृषी मंत्र्यांनी प्रयत्न करावेत अशी माझी त्यांना आग्रहाची विनंती आहे.

सभापती महोदय, मुंबई शहरात पाणी कपात करावी लागते आहे. या ठिकाणी किती पारंपारिक स्त्रोत आहेत. पारंपारिक स्त्रोत जीवंत करण्याचा राज्य शासनाने प्रयत्न केला आहे काय, मुंबई महानगरपालिका ते काम करीत आहे काय, मुंबई महानगरपालिका ते काम करीत नसेल तर राज्य शासन त्यांना दिग्दर्शन करणार आहे काय ? महाराष्ट्रात परतीचा पाऊस आला नाही तर भयावह चित्र निर्माण झाले. मी कल्पना करतो की, महाराष्ट्रात गावदेवीचा दुष्काळ येणार नाही असे आपण गृहीत धरु या. परंतु महाराष्ट्रात दोन वर्ष सातत्याने दुष्काळ पडला तर शासनाची पाण्याच्या नियोजनाच्या बाबतीत काय पध्दत असणार आहे....

यानंतर श्री. कानडे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले...

महाराष्ट्र राज्याची अवस्था काय होईल याचा विचार केलेला बरा. किती गंभीर परिस्थिती निर्माण होईल ? कर्नाटक आणि कन्याकुमारीहून पाणी आणणार काय ? आग रामेश्वरी आणि बंब सोमेश्वरी असे चित्र निर्माण होईल. हे चित्र बदलण्याची आवश्यकता आहे. राज्यामध्ये 39000 पेक्षा जास्त खेडी आहेत. तेथील पाण्याची परिस्थिती अतिशय गंभीर आहे. लोक 8-8 दिवस आंघोळ करीत नाहीत. समृध्द असा पश्चिम महाराष्ट्र आहे परंतु त्याठिकाणी सुध्दा परतीच्या पावसाने सर्व भाग हवालदिल झालेला आहे. शासनाने याबाबतीत गंभीर होण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्रातील सामान्य माणसाला दिलासा देण्याची गरज आहे. हा दिलासा योग्य प्रकारे नियोजन केले तरच मिळू शकेल असे मला वाटते.

सभापती महोदय, आजचे जे नियोजन आहे ते पाहिले तर जलस्वराज्य प्रकल्प जिल्हा परिषदेच्या माध्यमातून राबविला जातो. माझ्या बीड जिल्हयातील जलस्वराज्य प्रकल्पाअंतर्गत राबविलेल्या योजनांपैकी 60 टक्के योजना बोगस निघाल्या नाहीत तर मी आमदारकीचा राजीनामा देण्यास तयार आहे. गावाच्या सरपंचाला हाताशी धरायचे आणि योजनेचे मातेरे करावयाचे. राष्ट्रीय पेयजल योजना आहे या योजनेचे मातेरे करण्याचे काम गुत्तेदारांमार्फत आणि जिल्हा परिषदेच्या काही पदाधिकाऱ्यांमार्फत आणि संबंधित अधिकाऱ्यांना हाताशी धरुन केलेले आहे. याची उच्चस्तरीय चौकशी होणे गरजेचे आहे. यातून फार मोठे स्कँडल बाहेर येऊ शकेल. महाराष्ट्रातील वेगवेगळया जिल्हा परिषदांमध्ये हीच परिस्थिती आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेकडून राष्ट्रीय पेयजल योजनाच काढून घेण्याची गरज आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली एखादे महामंडळ स्थापन करावे की ज्यावर फक्त मुख्यमंत्र्यांची देखरेख असेल. महाराष्ट्रातील सगळया योजनांचे नियंत्रण फक्त मुख्यमंत्री करतील. तरच महाराष्ट्रातील सर्व विकासाच्या पाणीपुरवठा योजना चांगल्या प्रकारे राबविल्या जाऊ शकतात. त्रिस्तरीय पध्दतीऐवजी द्विस्तरीय पंचायत राज पध्दतीचा अवलंब करण्याबाबत केंद्र शासनाने महाराष्ट्र शासनाला प्रस्ताव पाठविलेला आहे. त्रिस्तरीय पध्दती मोडून काढण्याची गरज आहे. द्विस्तरीय पंचायती राज पध्दत आणणे गरजेचे आहे. ग्राम पंचायत आणि पंचायत समिती असा स्तर असावा. सध्याच्या पध्दतीमध्ये वेळेचा अपव्यय होतो. ग्रामपंचायतीनंतर पंचायत समिती आणि नंतर जिल्हा परिषद असा प्रवास करावा लागतो. त्याशिवाय कर्मचाऱ्यांसाठी देण्यात येणारी चिरी-मिरी आणि देवाण-घेवाण हा जो प्रकार आहे

त्यावरही मात करता येऊ शकेल मी राज्य शासनाला कळकळीची विनंती करतो की, द्विस्तरीय पंचायती राज पध्दत आणण्याचा प्रयत्न करावा. महाराष्ट्रातील कायम स्वरुपी दुष्काळावर मात करण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत एवढीच आग्रहाची विनंती मी कृषी मंत्रीमहोदयांना करणार आहे.

सभापती महोदय, दुष्काळाची परिस्थिती अतिशय गंभीर आहे. माननीय सदस्य श्री.नितीनजी गडकरी याठिकाणी बसलेले आहेत. आजही महाराष्ट्राच्या काही भागात पाऊस झालेला नाही. लोक पावसाची प्रतिक्षा करीत आहेत. पावसाच्या सरी बरसतील आणि आम्ही आलेचिंब होऊ यासाठी लोक आतूर झालेले आहेत. ढगातून पाऊस पडला नाही तर कृत्रिम पाऊस पाडण्याची किमया पाच वर्षापूर्वी शासनाने केली होती. ऑलिंपिकवर ढगाचे साम्राज्य पसरले होते तेव्हा चीनने तर ढगच हटविले होते. कृत्रिम पावसाचा प्रयोग यशस्वी करण्यासाठी बारामतीच्या केंद्राचे उद्दिपन करण्याचा प्रयत्न शासन करणार आहे किंवा नाही ? प्रचंड ढग निर्माण झाल्याचे दिसते पण पाऊस पडायला तयार नाही. काळेभोर ढग आकाशातून स्वच्छ सरी बरसवतील असे तंत्र विकसित करणार किंवा नाही हा मोठा प्रश्न आहे त्यादृष्टीने माननीय कृषी मंत्रीमहोदयांनी प्रयत्न करावेत अशी मी त्यांना विनंती करतो.

नंतर श्री.भोगले

अधिकृत मत / प्रतिक्रियेसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.....

सभापती महोदय, या महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठे म्हणजे पांढरा हत्ती बनलेली आहेत. गेल्या दहा वर्षात या कृषी विद्यापीठांमार्फत कोणकोणते संशोधन झाले याचा एकदा आढावा घेण्याची आवश्यकता आहे. पावसाळ्याच्या चार महिन्यात पाण्याचा स्पर्श झाला नाही तरी टिकू शकतील अशा क्षमतेची बियाणे विकसित करण्याचा प्रयत्न या कृषी विद्यापीठांकडून झाला आहे काय? याचा आढावा घेतला तर मला वाटते की, नकारात्मक उत्तर येईल. त्यामुळे कृषी विद्यापीठांच्या संशोधन कार्याला चालना देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, एक-दोन वर्षे पाऊस पडला नाही तरी महाराष्ट्रातील ग्रामीण जनतेला पाणी टंचाईची अडचण निर्माण होणार नाही असे आश्वासित करण्याची गरज आहे. पाणी टंचाईवर मात करण्याचा प्रयत्न राज्य शासन करेल आणि त्यात शासनाला 100 टक्के यश येईल अशा प्रकारची हमी किंवा आश्वासन राज्य शासनाने दिल्यास महाराष्ट्रातील जनता राज्य शासनाच्या पाठीशी सर्व शक्तीनिशी उभी राहील आणि माननीय विरोधी पक्षनेते यांच्यावर 2014 नंतरही आजच्याच स्थानावरुन भाषण करण्याची वेळ येणार आहे एवढे बोलून मी आपली रजा घेतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आजचा प्रस्तावातील विषय हा ज्याप्रमाणे बकरीचे शेपूट तिची अब्रू झाकू शकत नाही आणि माशी देखील उडवू शकत नाही अशा प्रकारचा आहे. माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी उत्तमप्रकारे भाषण केले. बाष्पीभवनाचा विषय त्यांनी मांडला. या राज्यात पाण्याच्या बाष्पीभवनाचे मोजमाप होते. वर्षभरात पाण्याच्या साठ्यापैकी किती पाण्याचे बाष्पीभवन झाले याचे मोजमाप केले जाते. त्यांनी पुनर्भरणाची सूचना केली ती देखील अत्यंत उपयुक्त आहे. मी स्वत: गेली दोन-तीन वर्षे विदर्भामध्ये पुनर्भरणाचे काम केले आहे.

सभापती महोदय, शालेय शिक्षणामधून शिक्षण अधिक माती आणि निसर्ग यांची जाणीव याचे ज्ञान विद्यार्थ्यांना दिले पाहिजे. त्या त्या गावातील विद्यार्थ्यांना आपल्या गावात एकूण पाणी किती आहे हे मोजायला शिकवायचे आणि त्या विद्यार्थ्यांच्या मनामध्ये माझ्या गावातील पाणी मोजल्यानंतर ते टिकले पाहिजे याची संवेदना जागृत झाली पाहिजे. म्हणजे पुनर्भरणाबाबत त्यांच्या मनामध्ये आवड निर्माण होईल. माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी प्रस्ताव मांडताना जे मुद्दे मांडले त्याबद्दल मी त्यांचे मनापासून स्वागत करतो. त्यांनी जे विषय मांडले ते प्रस्तावात अंतर्भूत असल्याचे दिसून येत नाही. प्रस्तावाच्या विपरित विषय त्यांनी मांडले आहेत, त्यामुळे प्रस्तावात जे विषय नमूद केलेले आहेत ते दुर्दैवाने मला मांडावे लागणार आहे.

सभापती महोदय, दुष्काळाच्या स्थितीत प्रत्यक्ष काम करुन मी या विषयावर बोलण्यासाठी आपल्यासमोर उभा आहे.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

अनुभवाच्या आणि माहितीच्या जोरावर भाष्य करुन शेतकऱ्यांची व्यथा मांडणे हा भाग असतोच. दुष्काळाची चर्चा सभागृहात झाल्यानंतर मी ताबडतोब सांगली जिल्ह्यात गेलो. वास्तविक दुष्काळ फक्त सांगली जिल्ह्यातच पडतो अशातला भाग नाही तर राज्यातील जवळपास 14 जिल्ह्यांमध्ये दुष्काळ पडतो. त्यामुळे मी सांगलीला प्रथम गेलो. सांगलीत असताना सकाळी 8 वाजता मला मातोश्रीवरुन माननीय शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब यांचा फोन आला की, सांगलीतील 42 गावातील गावकऱ्यांचे म्हणणे आहे की, आम्हाला येथे पिण्याचे पाणी मिळत नाही, जनावरांना चारा मिळत नाही त्यामुळे अशा प्रकारे पारंपारिक दुष्काळग्रस्त भागात राहण्यापेक्षा आम्ही शेजारच्या कर्नाटक राज्यात स्थलांतरित होतो, अशी माहिती मला त्यांच्याकडून मिळाली. योगायोग असा होता की, ही माहिती मी गावकऱ्यांना देत होतो तेव्हा त्यात राष्ट्रवादी पक्षाचे नेते सुध्दा होते. माननीय उध्दवजी ठाकरे या ठिकाणी आल्यानंतर 42 गावातील लोकांचा मेळावा घेण्यात आला. त्यांना सांगितले की, या 42 गावातील लोकांनी कोणत्याही परिस्थितीत आपले राज्य सोडून जाऊ नये. जर त्यांना पाणी व जनावरांना चारा पुरविण्यासाठी शासन असमर्थ ठरले तर शिवसेना पक्ष त्यांच्या पाठीशी उभा राहील. त्यावेळेस सांगली जिल्ह्यातील या 42 गावांपैकी मरगळे गावांत चाऱ्याची छावणी मी सुरु केली. त्या छावणीत जवळपास एक ते दीड हजार एवढी जनावरे 8 जुलैपर्यंत होती. या गावांसाठी तीन टँकरच्या सात फेऱ्या करुन पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला तसेच जनावरांनाही पिण्याच्या पाण्याची सुविधा निर्माण करण्यात आली. आतापर्यंत या छावण्या सुरु होत्या ती छावणी आम्ही 8 जुलैला बंद केली. अशा प्रकारे आमच्या कुवतीप्रमाणे त्या 42 गावांमध्ये आम्ही काम केले व हे काम करुन आपल्यासमोर उभा आहे.

माननीय शिवसेना प्रमुखांनी या 42 गावातील लोकांनी आपल्या राज्याशी विद्रोह करुन अशा प्रकारे दुसऱ्या राज्यात जाण्याची भाषा करु नये अशी विनंती केली व त्यांना पक्षाच्या वतीने मदत केली. हा प्रस्ताव तसा अत्यंत बोलका आहे तरी देखील तो मांडण्याची परवानगी आपल्याला कशी दिली हेच मला समजत नाही. याचे कारण म्हणजे या प्रस्तावाच्या माध्यमातून शासनाचा नाकर्तेपणा जाहीर होत असून तेच मांडण्याचे काम आपल्याकडून झाले त्याबद्दल प्रथम आपले अभिनंदन करतो व आपल्यासोबत इतरही अनेक नेते आहेत, त्यातील काही सदस्यांचा दुष्काळाशी कधी संबंध येतो हेच समजत नाही. यात बँकांमार्फत कर्जपुरवठा होत नसल्याचा उल्लेख आहे.

यानंतर श्री. भोगले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, या ठिकाणी सहकार मंत्री उपस्थित नाहीत परंतु सहकाराची ज्या घराण्याने मुहूर्तमेढ रोवली त्या घराण्याच्या तिसऱ्या पिढीतील सदस्य या ठिकाणी हजर आहेत. सहकाराची बरीच माहिती आपल्यातील बहुतेकांना आहे. सहा बँकाची मान्यता रद्द झालेली असल्यामुळे आपण सहा जिल्हयातील बँकाना कर्ज कसे काय देणार आहात ? राज्य बँकानी शेतकऱ्यांना कर्ज द्यावे असा फतवा काढला गेला होता. परंतु मध्यंतरी राज्य बँकच बरखास्त करण्यात आली होती. आपली इभ्रत वाचविण्यासाठी माननीय दादानी 50 कोटी रुपये राज्य बँकेला उपलब्ध करुन दिले. या बँकेला रिझर्व्ह बँकेने आता कोठे मान्यता दिलेली आहे. कर्जवाटपाच्या संदर्भात रिझर्व्ह बँकचे बँकेवर कर्ज वाटपाच्या संदर्भात काही निर्बंध असतात. आपण कितीही आदेश दिले तरी राज्य बँक पैसे देऊ शकणार नाही. शासनाचे आदेश धुडकावणाऱ्या प्रशासकालाच काढून टाकतो अशी बातमी वर्तानपत्रात छापून आली होती. अशा परिस्थितीत प्रशासक आपल्याला पैसे कसे काय देईल, त्याला काय घरी बसायचे आहे ? कायद्यात जे बसेल तेच काम प्रशासक करीत असतो. त्याने गैरकारभार केला तर तो घरी जाईल, तुरुंगात सुध्दा जाईल परंतु तुमचे काहीच जाणार नाही.

सभापती महोदय, राज्य बँक कर्ज देत नाही म्हणून राष्ट्रीयकृत बँकानी पैसे द्यावे असे फतवे तुम्ही काढले परंतु राष्ट्रीयकृत बँकाही तुम्हाला पैसे द्यावयास तयार नाहीत. शेतकऱ्याची सर्व बाजूने कुचंबणा सुरु आहे. सरकारचा नाकर्तेपणा या प्रस्तावात मांडल्याबद्दल मी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांना धन्यवाद देतो.

सभापती महोदय, दुसरा मुद्दा असा आहे की, आज शेतकऱ्यांना जास्त व्याज देऊन खाजगी सावकाराकडून कर्ज घ्यावे लागत आहे. कोण कोणाच्या मागे कसा उभा राहतो हे मला माहिती नाही. एखाद्याच्या मागे ठामपणाने उभे राहण्याचे कर्तृत्व तुमच्याकडून दाखवले जाते त्याबद्दल कौतुक वाटते. मंत्री पदावर असले तरी ते ठामपणे बोलतात की, "माननीय अशोक चव्हाणांच्या मागे आम्ही खंबीरपणाने उभे आहोत." त्यांनी काहीही घोटाळे केले तरी हे त्यांच्या पाठीमागे ठामपणाने उभे आहेत. सानंदाने कितीही घोटाळे केले, त्यांच्यावर कितीही एफआयआर दाखल झाले, सर्वोच्च न्यायालयाने दंड जरी ठोठावला असला तरी सुध्दा आम्ही माननीय विलासरावांच्या पाठीशी उभे आहोत असे जाहीरपणे सांगितले जात आहे. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. केशवराव मानकर)

श्री. दिवाकर रावते....

सभापती महोदय, माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी सावकारांना कोपरापासून ढोपरापर्यंत सोलून काढले जाईल अशी घोषणा केली होती. परंतु आता आबा काहीही म्हटले तरी लोकांचा त्यावर विश्वास बसत नाही. आज कृषी मंत्री जेथे बसले आहेत तेथेच दोन वर्षापूर्वी संसदीय कार्य मंत्री, सहकार मंत्री बसले होते. सावकाराच्या प्रश्नाबद्दल आम्ही शेतकऱ्यांच्या वतीने भावना मांडत होतो, ती आमची व्यक्तीगत व्यथा नव्हती. त्यावेळी त्यांनी उभे राहून सांगितले की, रावतेजी आम्ही पुढील अधिवेशनात सावकारी विधेयक आणणार आहोत. हे विधेयक आपल्याकडे आले, पासही झाले परंतु ते केंद्रसरकारने नाकारले. आम्ही सावकारी कायदा आणला, सावकारी कायदा आणला अशी बोंबाबोंब करण्यात आली होती. परंतु आज शेतकऱ्यांना बँकेकडून कर्ज मिळत नसल्यामुळे त्यांना शेवटी नाइलाजाने सावकाराच्या दारात उभे रहावे लागत आहे. सरकारच्या नाकर्तेपणाची भूमिका मांडल्याबद्दल, प्रस्ताव मांडल्याबद्दल, विरोधीपक्षाचे काम सत्ताधारी पक्षाने केल्याबद्दल मी आपल्या सर्वांना मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय, विदर्भातील 4300 गावात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली होती. पश्चिम महाराष्ट्रातील चार तालुक्यांमध्येही भीषण दुष्काळ पडला होता. पश्चिम महाराष्ट्रातील चार तालुके हे तर कायमचे दुष्काळी तालुके आहेत.

यानंतर श्री. भारवि....

अप्रमाणित प्रत / प्रतिक्षेपणी नाही

(सभापती स्थानी तालिका सभापती श्री.केशवराव मानकर)

श्री.दिवाकर रावते...

हे चार तालुके व सन्माननीय सदस्य श्री.गणपतराव देशमुख यांचा सांगोला तालुका हे कायमचे दुष्काळी आहेत. फक्त दुष्काळग्रस्त तालुक्यांसाठी विकास महामंडळ स्थापन करावे अशी सन्माननीय सदस्यांची मागणी आहे. आज येथे राज्याचे संपूर्ण मंत्रिमंडळ जात आहे. एवढेच नव्हे तर केंद्रीय नेतृत्त्व देखील येथे येत आहे. त्याचा मला आनंद होत आहे. पण ते गेल्या नंतर शुकशुकाट का होतो याचे मार्गदर्शन केले तर बरे होईल.

सभापती महोदय,या प्रस्तावात नमूद करण्यात आले आहे की, विदर्भातील 4300 गावात भीषण पाणी टंचाई निर्माण झाली आहे. पण तेथे एकही केंद्रीय नेतृत्व गेलेले नाही. आपले मंत्रिमंडळ देखील तेथे फिरकले नाही. असे असताना आज आपण विदर्भातील पाणी का विकले आहे ? 43000 हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणणारे पाणी सोफिया प्रकल्पाला विकून अमरावतीच्या शेतकऱ्यांना उघडे-नागडे करून टाकले आहे, त्याचा जाब कोण देणार आहे ?

आज विदर्भामध्ये कोळशावर चालणारे जवळ जवळ 54 नवीन प्रकल्प येत आहेत. यासाठी पाणी देखील लागणार आहे. त्यामुळे आमचा शेतकरी देखील उद्ध्वस्त होणार आहे. विदर्भामध्ये आज सर्वात जास्त सिंचनाचा अनुशेष आहे. माझ्या या विधानाशी माननीय मंत्री श्री.रणजीत कांबळे हे सहमत होतील. अशाने विदर्भातील शेतकरी टिकणार कसा काय ? आज लोक जाब विचारत आहेत. विदर्भामध्ये 54 वीज प्रकल्प आणत आहात. त्यामुळे शेतकऱ्यांचे पाणी जाणार आहे. लाखो हेक्टरचे पाणी विजेकरिता जाणार आहे. आपण म्हणाला की, आपल्याला वीज पाहिजे की नको ? वीज ही पाहिजे. पण शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करून नको. देशात व राज्यात सर्वात जास्त सिंचनाचा अनुशेष विदर्भामध्ये आहे. त्या विदर्भातील पाणी आपण विकले आहे. त्यानंतर मग आपण पाणी वाटपाचे धोरण बदलले. आपली तिजोरी भरल्यानंतर पाण्याचे धोरण बदलले तरी चालते. आता आपण खडखडाट दाखवत आहात. त्याचे रडगाणे येथे गात आहात. हे मगरीचे अश्रू आपण कोणासाठी दाखवत आहात. आपल्यात जर हिंमत असेल तर सोफिया प्रकल्प आपण रद्द करून दाखवा. अमरावती हा सिंचनाच्या बाबतीत सर्वात निचांक असणारा विभाग आहे. येथील शेतकऱ्यांना आपल्याला दिलासा द्यायचा असेल तर आपण सोफिया प्रकल्प रद्द केला पाहिजे. नाही तर आपले हे मगरीचे अश्रू आहेत असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

सभापती महोदय, पिण्याच्या पाण्यासाठी महिला मोर्चे काढत आहेत असे आपणच म्हटले आहे. महिला आज सरकारच्या विरोधात मोर्चे काढत आहेत. यासाठी आम्ही आपले कौतुक करायचे काय ? माझ्याकडे शासकीय माहिती आहे. दुष्काळासाठी उपाययोजना करण्यासंबंधातील ही माहिती आहे. त्यात म्हटले आहे की, राज्यात 2483 टँकर सुरू असून 80 कोटी रूपये वितरित करण्यात आले आहेत. असे असेल तर मग महिला मोर्चे कशासाठी काढत आहेत ? शासन म्हणते पाणी देतो तर मग महिला मोर्चे कशासाठी काढत आहेत ? अशा प्रकारे महाराष्ट्रातील अधिकारी हे आपल्याला कागदावर फसवत आहेत. सरकारला फसवत आहेत, विधान मंडळाला फसवत आहेत. प्रत्यक्षात मात्र जनतेला पाण्यासाठी मोर्चे काढावे लागत आहेत. ती व्यथा सत्ताधारी पक्षाला मांडावी लागत आहे.

या प्रस्तावामध्ये असेही म्हटले आहे की, शासनाने ठिकठिकाणी चारा डेपो उघडले आहेत. पण तेथे भ्रष्टाचार होत आहे असे सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यच म्हणत आहेत. हा प्रस्ताव आहे की काय आहे ? सरकार भ्रष्टाचारी आहे हे आपणच अधिकृतपणे जाहीर करीत आहात. हिंमत असेल, द्वेष असेल तर आपण सर्वांनी शासनाच्या निषेधार्थ राजीनामे द्यावेत. हे शासन भ्रष्टचारी आहे म्हणून राजीनामे द्यावेत. तेवढी हिंमत आपल्यात आहे काय ? चारा डेपो मध्ये भ्रष्टाचार होतो हे आपणच म्हटलेले आहे. हे सरकार भ्रष्टाचारी आहे असे जाहीररित्या सांगणाऱ्या सन्माननीय सदस्य श्री.चरणसिंग सप्रा यांच्यासह सर्वांचे मी अभिनंदन करतो. चारा मिळत नसल्यामुळे जनावरे विकली जात आहेत. आपण सर्वजण शेतकऱ्यांचीच मुले असल्यामुळे आपल्याला शेतकऱ्यांबद्दल जास्त कळवळा आहे हे आम्हाला मान्य आहे.

गावात रोजगार मिळत नसल्यामुळे शेतकऱ्यांना मुंबई-ठाण्याकडे स्थलांतरित व्हावे लागत आहे असे वाक्य या प्रस्तावात आहे.

यानंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

या पस्तावामध्ये सर्व काही आले असल्यामुळे मंत्री महोदय आपण उत्तर देण्याची तसदी घेऊ नका. या प्रस्तावामध्ये पुढे असे म्हटले आहे की, "गावात रोजगार मिळत नसल्यामुळे राज्यातील शेतकरी विशेषत: विदर्भातील शेतकरी मुंबई, ठाणे, नवी मुंबई येथे कुटुंबीयांसह स्थलांतरित होत आहे". दोन-चार लोक आल्याचे चॅनेलवाल्यांनी दूरदर्शनवर दाखविल्यानंतर आपण ते या प्रस्तावामध्ये समाविष्ट केले.

सभापती महोदय, श्री. नी. शा. वाणी, कक्ष अधिकारी, महसूल विभाग यांचा अहवाल माझ्याकडे आहे. त्यामध्ये त्यांनी असे म्हटले आहे की, "ग्रामीण रोजगार हमी योजनेवर 3 लाख 14 हजार 784 इतके मजूर उपस्थित आहेत. त्यावरील खर्चाची माहिती सध्या उपलब्ध नाही." तुमच्या राज्यात लोकांना मजुरी मिळत नाही म्हणून लोक ठाणे, मुंबईमध्ये येत आहेत असे सत्ताधारी पक्षातील मंडळी या प्रस्तावामध्ये म्हणत असतांना हा शासकीय अधिकारी मात्र 3 लाख लोक रोजगार हमी योजनेच्या कामावर येत आहेत असे जर सांगत असेल तर ही किती विलक्षण थट्टा आहे?

सभापती महोदय, या प्रस्तावामध्ये पुढे आपण असे म्हटले आहे की, "राज्यात दुष्काळी महामंडळाची स्थापना होऊन अद्यापि त्या मंडळाला निधी देण्यात आला नसल्याने मंडळाचे काम ठप्प होणे". अशाप्रकारे या सरकारचे कर्तृत्व आपण या प्रस्तावाव्दारे सांगितले आहे. आज या ठिकाणी या प्रस्तावाव्दारे माननीय कृषी मंत्र्यांना आपण सर्वांनी अडचणीत आणले आहे. माझे नाकर्ते सरकार कसे कर्तृत्ववान आहे असे आपण सभागृहामध्ये सांगा. परंतु आम्हीच ते नाकर्ते आहे असे या प्रस्तावाव्दारे आपण म्हणत आहात. या दुष्काळी महामंडळाला पैसे दिले नाहीत म्हणजे हा दोष माननीय श्री. अजित दादा पवार साहेबांवर आहे. ही बाब लक्षात आल्यानंतर हे आमच्याकडून चुकून झाले आहे असे म्हणून आपण स्वत:ला पटकन सावरुन घेतले आहे. या प्रस्तावामध्ये हे वाक्य कुणी घातले हे जाणून घेण्यासाठी माननीय श्री. अजित दादा पवार साहेब आपल्याला बोलावून घेतील. या प्रस्तावात पुढे असे म्हटले आहे की, "केंद्र शासनाची असलेली आर.आर.आर. योजना राज्यात राबविण्याबाबत शासनाकडून होत असलेला विलंब". कालच्या "टाईम्स" वर्तमानपत्रामध्ये माननीय पंतप्रधानांच्या नाकर्तेपणाबद्दल छापून आले आहे. कृषी खाते कॉंग्रेसकडे असल्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस सध्या जोरात आहे हे मला माहीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

या प्रस्तावावर बोलत असतांना मी एक शब्द देखील राजकीय स्वरुपाचा उच्चारलेला नाही, मला या मध्ये राजकारण करावयाचे नाही. माननीय श्री. विनायक मेटे साहेब आपल्याला माझ्याबरोबर राजकारण करावयाचे आहे काय? आपला पुनर्जन्म झाल्याबद्दल मी आपले स्वागत केले आहे. सभापती महोदय, हे शासन कर्तृत्वशून्य आहे. आपल्या देशाचे माननीय पंतप्रधान हे कर्तृत्वशून्य आहेत. परंतु ते कर्तृत्ववान कसे आहेत हे सांगण्यासाठी कोण गेले? माननीय सदस्य श्री. भाई जगताप गेले. त्या संदर्भात दूरदर्शनच्या चॅनेलवर चर्चा सुरु होती त्यावेळी माननीय सदस्य श्री. भाई जगताप त्या चर्चेमध्ये सहभागी होते. हे गणित कशाप्रकारचे आहे हे मला समजत नाही. माननीय श्री. हुसेन दलवाई हे पक्षाचे प्रवक्ते म्हणून नेहमी दूरदर्शनवर दिसतात. त्यांना आपण बोलाविले नाही. त्या "आयबीएन लोकमत" चॅनेलवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी केंद्र सरकार मधील अनेक मंडळी येत असतात. त्यावेळी आमचे पंतप्रधान कसे कर्तृत्ववान आहेत हे सांगण्यासाठी माननीय सदस्य श्री. भाई जगताप हे त्या ठिकाणी गेले.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब हे विषयाला धरुन बोलत नाहीत.

श्री. दिवाकर रावते : मी विषयाला धरुनच बोलत आहे. तुम्हीच दिलेल्या ठरावातील वाक्य रचनेला धरुन बोलत आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, दुष्काळ निवारण करण्यासाठी कोणत्या उपाय योजना करण्याची आवश्यकता आहे यासंबंधी त्यांनी आपले म्हणणे मांडावे. परंतु या देशाच्या माननीय पंतप्रधानांसंबंधी या सभागृहामध्ये चर्चा करण्याची गरज काय? आपण या सभागृहाची दिशाभूल करीत आहात.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आता या देशाला झाशीच्या राणीची गरज आहे. परंतु पक्षाकरिता फुलनदेवीची असत नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

तालिका सभापती (श्री. केशवराव मानकर) : माननीय सदस्यांचे हे वाक्य सभागृहाच्या कामकाजामधून विलोपित करण्यात येत आहे.

श्री. संजय पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी ते शब्द मागे घेतले पाहिजेत.

(गोंधळ)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : ते शब्द कामकाजातून वगळण्यात आले आहेत.

श्रीमती विद्या चव्हाण : मी फुलनदेवी काय, तुम्हाला काय वाटले? तुम्ही काहीही बोलले तर आम्ही ते ऐकून घ्यायचे काय?

(गोंधळ)

तालिका सभापती : मी ते शब्द कामकाजातून काढून टाकले आहेत.

श्री. दिवाकर रावते :मी कुणाचेही व्यक्तिगत नाव घेतले नाही, या देशाच्या पंतप्रधानांचा विषय आला म्हणून मी म्हटले. या देशाचे नेतृत्व कसे असले पाहिजे? तुम्ही देशाचे नेतृत्व करण्यासाठी जात असाल तर जा, आम्हाला त्याबद्दल आनंद आहे, पुष्पगुच्छ घेऊन आम्ही तुमचे स्वागत करावयास येऊ.

(गोंधळ)

मी प्रस्तावामधील वाक्यरचना वाचून दाखवीत आहे. या प्रस्तावामध्ये काय म्हटले आहे ते सांगत आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अधिकृत पत्र / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . ..

हा प्रस्ताव वाचत असताना सन्माननीय सदस्यांनी मध्ये अडथळा आणू नये. तुम्ही जे पाप केले आहे, तेच मी आता येथे वाचत आहे, त्याबाबतीत मी काय करु?

तालिका सभापती (श्री.केशवराव मानकर) : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आपले भाषण सुरु ठेवावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी केंद्र शासनाची योजना राबविली जात नाही हा नाकर्तेपणा आहे. येथे केंद्र शासनाचा संदर्भ आल्यानंतर प्रथम मला माननीय पंतप्रधानांची आठवण झाली. केंद्र शासन काम करीत नाही,माननीय पंतप्रधान काम करीत नाहीत. या राज्यातील माननीय मुख्यमंत्री काम करीत नाहीत असा याठिकाणी ठपका ठेवला आहे, त्याला मी काय करु. 1972 सालातील पाझर तलावाच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध होत नाही आणि हे तुम्हीच लिहिलेले आहे. 1972 सालापासून आता एवढी वर्षे झाली आहेत आणि आता राज्याच्या स्थापनेला 50 वर्षे झाली असल्याने आपण येथे सुवर्ण महोत्सव साजरा करीत आहोत. अशा वेळी दुष्काळ निवारण्याची चर्चा करीत असताना महाराष्ट्र राज्य निधीच उपलब्ध करुन देत नाही असे यामध्ये लिहिलेले आहे.

सभापती महोदय, यामध्ये एक विनोद आहे.सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकलेसाहेब आपण लेखक आहात. याठिकाणी जे वाक्य दिलेले आहे ते विनोदी आहे असे मला वाटते आणि आपण एक साहित्यिक म्हणून याबाबत मला माहिती द्यावी. दुष्काळ म्हणजे नापिकी झाली, माझा समज असा आहे की, 50 टक्केच्या खाली आणेवारी आली की दुष्काळ जाहीर होतो. परंतु याठिकाणी मुळातच दुष्काळ जाहीर केलेला नाही. त्यामुळे याठिकाणी असलेले पहिले वाक्यच चुकीचे आहे. तसेच टंचाई जाहीर केली त्याबाबत देखील सभागृहामध्ये टंचाई की दुष्काळ या शब्दाबाबत माझा वाद झाला होता. माननीय मंत्री महोदय म्हणाले की, ही टंचाई आहे. माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी हात वगैरे हलवत सदनामध्ये सांगितले की, टंचाई आणि दुष्काळ यामध्ये काही फरक नाही, तशीच मदत देण्यात येणार आहे. आपण सर्वजण येथे उपस्थित होता. याठिकाणी वाक्य असे आहे की, "दुष्काळ जाहीर करुन" म्हणजे शेतकऱ्याच्या शेतामध्ये काही पीक आलेले नसल्याने आपण त्याला मदत करा असे सांगत आहोत. तसेच येथे असे म्हटले आहे की, "दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य बाजारपेठ व भाव मिळाला पाहिजे."परंतु त्याच्या शेतामध्ये काही पिकलेच नाही तर त्यासाठी योग्य भाव कसा मिळणार हा प्रश्न आहे. अशा प्रकारची या .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते . . ..

प्रस्तावाची घाटणी आहे त्याला मी काय करु? हे सर्वकाही मांडल्यानंतर 2-4 मुद्दे सांगून मी माझे भाषण थांबविणार आहे.

सभापती महोदय, याठिकाणी दुष्काळाची चर्चा झाली. त्यावेळी सविस्तर माहिती देण्यात आली, मुखोद्गत सर्वकाही मांडले. ज्याप्रमाणे नेते गावामध्ये जातात म्हणजे छोटे नेते छोट्या गावात, मोठे नेते मोठ्या गावामध्ये जातात आणि त्यानुसार लेझीम, वाजंत्री वगैरे असतात. त्याप्रमाणे दुष्काळासाठी मदत मागण्याकरता डमडम डमडम वाजवत सर्वजण म्हणजे सर्व मंत्रीमंडळ, सर्व खासदार,तेथील विरोधी पक्षनेते इ.सर्व नेते दिल्लीला गेले आणि माननीय पंतप्रधान यांच्या पुढे् बसले आणि त्यांनी 2200 कोटी रुपयांची मागणी केली. माननीय मंत्री महोदय आपणही माननीय पंतप्रधान यांना भेटण्यासाठी गेला असणार. त्याचे काय झाले ?

सभापती महोदय, आदरणीय मुख्यमंत्र्यांनी सांगलीमध्ये निवेदन केले आहे की, राज्यातील सिंचन योजनेसाठी केद्र शासनाकडे 1200 कोटी रुपयांची मागणी केलेली आहे. परंतु गतवर्षीचे 700 कोटी रुपये अद्यापपर्यंत मिळालेले नाहीत. अशा प्रकारे विमानाच्या तिकीटाचे पैसे खर्च करुन, सर्वकाही करुन शेवटी हातामध्ये भोपळा घेऊन आले. आपण 600 कोटी रुपयांचा उल्लेख केला. काल आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी सांगितले.पण याठिकाणी सरकारी आकडा देण्यात आलेला आहे. मी आकडा म्हणतो कारण जो लागतो तो आकडा आणि मिळते ती मदत. मात्र केंद्र शासनाकडून राज्याला मदत मिळालेली नाही. राज्याने केलेल्या उपाययोजनेसाठी केंद्र शासनाकडून 574.71 कोटी रुपयांचे पॅकेज प्रतिपूर्ती म्हणून मंजूर करण्यात आले आहे आणि ते प्रत्यक्षात प्राप्त झ ाालेले आहे की नाही हे मला माहिती नाही. याची माहिती माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरामधून मिळू शकेल असे अवर सचिव यांनी दुष्काळाच्या संदर्भातील माहितीमध्ये म्हटलेले आहे.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदय यांचे म्हणणे आहे की, आम्ही मदतीची मागणी करीत आहोत, पण ते मिळत नाही. मात्र आमच्या दुष्काळग्रस्त भागाची जी टिंगलटवाळी करण्यात आली आहे त्याबाबत म्हणणे मांडणार आहे. कारण ती माझ्या जिव्हारी लागलेली आहे. अजून राज्यामध्ये पुरेसा पाऊस पडलेला नाही तरीसुध्दा माण, खटाव, जत, सांगोला हे तालुके दुष्काळी म्हणून जाहीर करण्यात आले आहेत.

यानंतर श्री.बरवड . . . .

अप्रधानित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

मी गेले दोन महिने सातत्याने या संपूर्ण भागाच्या संपर्कात आहे. मी जमेल तेवढे प्रयत्न करतो. फुशारक्या मारण्याचा हा विषय सुध्दा नाही. सुरुवातीला जे केले ते सांगितले. पाऊस न पडता देखील एक मोठा कार्यक्रम झाला. उरमोडीचे पाणी विटा मार्गे माण तालुक्याला द्यावयाचे होते. त्याचे फोटो वगैरे आले ते मी दूरदर्शनवर पाहिले. माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, सर्व मंत्री त्या ठिकाणी होते. आमच्या माननीय उप मुख्यमंत्र्यांना तर फारच आनंद झाला होता. मी हे उपेक्षेने किंवा टिंगलीने बोलत नाही. आम्ही काही तरी करीत आहोत असे चालले होते. माण तालुक्याकरिता जो कार्यक्रम झाला त्याचा फोटोही आलेला आहे. त्या ठिकाणी ज्या दरडी आहेत त्याच्या पलीकडे येऊन माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार त्या टनेलमधून उरमोडीचे पाणी चालले आहे हे वाकून बघत होते. त्यांच्या सोबत माननीय मंत्री श्री. सुनील तटकरे सुध्दा होते. जर त्या ठिकाणी पाणी उपलब्ध होते तर ते एक महिना अगोदर का दिले नाही असा माझा प्रश्न आहे. सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी हे समजून घ्यावे. कारण हा तुमचाही विषय आहे. एवढ्या उत्साहाने अधिकाऱ्यांनी सांगितले की, हे पाणी आपण देत आहोत. मुख्यमंत्री, सर्व मंत्री त्या ठिकाणी उपस्थित होते. माननीय उप मुख्यमंत्री अजितदादा पवार तर पलीकडे जाऊन वाकून बघत होते. त्यांचा फोटो आला. आम्ही ते दूरदर्शनवर पाहिले. पण ते पाणी तिकडे गेलेच नाही. त्या ठिकाणी अपेक्षेने लोकांना सांगितले की, आज दुष्काळी तालुक्यामध्ये पाणी येईल पण ते पाणी तिकडे गेलेच नाही. सरकार तुमचे आहे की आमचे हा प्रश्न नाही.

श्री. दिपकराव साळुंखे : उरमोडीचे पाणी गेले.

श्री. दिवाकर रावते : पण टेंभूचे पाणी मागे फिरले. सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, गाळ साचला. गाळ साचला होता हे सगळे ठीक आहे. पण त्या दिवशी तिकडे पाणी गेले नाही त्याबद्दल कोणत्याही अधिकाऱ्यावर कारवाई जाहीर झाली नाही.

नुकताच 19 जूनला जो कार्यक्रम झाला त्यावेळी अनेक सन्माननीय सदस्य उपस्थित होते. प्रकाशभाऊ उपस्थित होते. त्यांच्या मागे रमेशभाऊ होते. प्रकाशभाऊंनी रमेशभाऊंना पुढे येऊ दिले नाही. मी तिकडचा स्थानिक आमदार आहे असे ते म्हणाले. मी आता जतच्या बाबतीत सांगत आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP

श्री. दिवाकर रावते ....

सर्वजण पाण्याचे पूजन करण्यासाठी टोपल्या वगैरे घेऊन उभे होते. ते दूरदर्शनवर दाखविले. आपण पाणी डोळ्यांना लावतो, पायावर घेतो. श्री. विलासकाका उंडाळकर यांनी बोगद्यातून ते पाणी आणले. हजारो महिलांनी त्या पाण्याचे पूजन केले. त्या ठिक्राण्ी पाणी आले. ते पाणी डोळ्यांनी पाहिले. तुमच्या जतच्या बाबतीत काय झाले ? मी त्या ठिकाणी गेलो होतो. त्या ठिकाणी पाण्याचे पूजन केले, पाणी सोडले पण ते पाणी उलटे फिरले. ते पाणी आजही तिकडे गेलेले नाही. मला एवढेच म्हणावयाचे आहे की, हा दोष राज्यकर्त्यांचा नाही. अधिकाऱ्यांनी एक महिना अगोदर पाणी का दिले नाही ? जतचे पाणी पुढे गेलेच नाही. ते पाणी मागे फिरले. त्या ठिकाणी मुख्यमंत्री जातात, मंत्री जातात, 12 आमदार जातात. त्या ठिकाणी सांगली जिल्ह्यातील सर्व मंत्री हजर होते. एवढे पूजन केल्यानंतर पाणी पुढे पोहोचत नाही तरी अधिकाऱ्यांच्या संदर्भात एका शब्दानेही कारवाई होत नाही. हा काय विषय आहे ? सर्व गमतीजमतीने चाललेले असते.

सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी हा प्रस्ताव मांडला. आपण स्वागत करण्यासारख्या चांगल्या गोष्टी मांडल्या. पण मी व्यक्तिगत सुध्दा या सर्व गोष्टी केलेल्या आहेत. आपण चांगल्या पध्दतीने विचार मांडले त्याचा मला आनंद झाला. पण माण आणि जतचे पाणी का गेले नाही ? या सगळ्या गोष्टी आपण मांडल्या त्याबद्दल मी आपणा सर्वांचे अभिनंदन करतो. आपले सरकार दुष्काळाच्या बाबतीत नाकर्ते आहे असे आपण सरकार पक्षाकडून अधिकृतरित्या जाहीर केल्याबद्दल आपल्याला मन:पूर्वक धन्यवाद देतो. आपण आमचे काम हलके केल्याबद्दल पुन्हा एकदा आपल्याला धन्यवाद देतो आणि माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री. खंदारे .....

s

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजयसिंह मोहिते-पाटील (नामनियुक्त) : सभापती महोदय, या सदनाचे ज्येष्ठ सदस्य आणि आमचे सहकारी श्री.हेमंत टकले यांनी मांडलेल्या प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी आणि माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, राज्यामध्ये सातत्याने दुष्काळ पडत आहे. एक वर्ष आड या राज्यात दुष्काळ पडत असल्याचे दिसून येते. मागच्या काळात यापेक्षा मोठा दुष्काळ पडला होता त्यावेळी मी जिल्हा परिषदेचा अध्यक्ष होतो. सन्माननीय श्री.शरदराव पवार हे आमच्या जिल्ह्याचे पालक मंत्री होते. त्यावेळचा मोठा दुष्काळ पडलेला होता. 1971, 1972, 1973 या तीन वर्षामध्ये सातत्याने दुष्काळ पडला होता. त्यावेळी लोकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करुन देण्याची गरज भासली होती. मला चांगले आठवते की, सोलापूर जिल्ह्यात 5.50 लाख लोक दुष्काळी कामावर काम करीत होते. माझ्यापूर्वी कोणत्या तरी सन्माननीय सदस्यांनी असे म्हटले आहे की, त्यावेळी पडलेल्या दुष्काळामुळे लोकांना रोजगाराची आवश्यकता होती. पण धान्याची टंचाई नव्हती, 50 फूटावर बोअरला पाणी लागत होते. सध्याच्या दुष्काळामुळे राज्यात वेगळी परिस्थिती निर्माण झालेली आहे. लोकांना पिण्यासाठी पाणी मिळत नाही, जनावरांना चारा मिळत नाही. यासाठी जे जे करण्याची आवश्यकता आहे ते केले पाहिजे. सरकारने आणेवारी जाहीर केली आहे. परंतु ज्या ठिकाणी पाण्याचे दुर्भिक्ष्य असताना सुध्दा आणेवारी अधिकची दाखविण्यात आली आहे. म्हणून मी राज्याचे वन मंत्री डॉ.पतंगराव कदम, राज्याचे उप मुख्यमंत्री व अर्थ मंत्री श्री.अजित पवार यांना भेटून एक निवेदन दिलेले आहे. जी आणेवारी जाहीर झाली आहे त्यामध्ये चूक झालेली आहे. ज्या ठिकाणी पाण्याचे दुर्भिक्ष्य आहे त्या भागात 50 पैशापेक्षा जास्त आणेवारी जाहीर केलेली असली तरी त्या भागात पाण्याची व चाऱ्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे. त्या प्रमाणे माननीय मुख्यमंत्र्यांनी, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी, माननीय वन मंत्र्यांनी पाण्याची व चाऱ्याची व्यवस्था केली आहे. त्यामुळे मी या सर्वांना मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय, राज्यामध्ये सतत दोन-तीन वर्षानंतर दुष्काळ पडत असतो. त्यामुळे तात्पुरती कामे सुरु करुन प्रश्न सुटणार नाही. हा प्रश्न कायमचा सुटण्यासाठी पाझर तलाव, गाव तलाव, शेत तलाव बांधले पाहिजेत. परंतु आता नवीन साईटस् संपलेल्या आहेत. पाऊस चांगला पडला तरी पिण्यासाठी पाणी उपलब्ध होत नाही. 2004 साली या राज्याचा उप मुख्यमंत्री असताना

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/

श्री.विजयसिंह मोहिते-पाटील.....

मी एक प्रस्ताव सादर केला होता. सांगली, सातारा, पुणे, सोलापूर, उस्मानाबाद, बीड या जिल्ह्यातील 31 तालुके कायम दुष्काळी आहेत. कोल्हापूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पडलेल्या पावसाचे पाणी नदीतून वाहून जाते. ते पाणी उजनी धरणामध्ये आणावे. जे नवीन प्रकल्प सुरु आहेत त्या प्रकल्पांमध्ये सुध्दा हे पाणी वळविले पाहिजे असे त्या प्रस्तावात नमूद केले होते. उजनीमध्ये 42 टीएमसी, बेंबळा प्रकल्पासाठी 16 टीएमसी, टेंभू प्रकल्पासाठी 13, ताकारी प्रकल्पासाठी 3 टीएमसी, म्हैसाळ प्रकल्पासाठी 10 टीएमसी, माण व खटावसाठी 7 टीएमसी, अशा प्रकारची उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. त्यावेळी या प्रकल्पांची किंमत 5-10 कोटी रुपये इतकी होती. परंतु आता त्या प्रकल्पांची किंमत 5-10 हजार कोटी होऊन सुध्दा काम सुरु झालेले नाही. मराठवाडा व विदर्भात सिंचनाचा अनुशेष आहे. परंतु कायम स्वरुपी दुष्काळी भागासाठी शासन पिण्यासाठी पाणी देणार की नाही हा महत्वाचा विषय आहे. या भागात तात्पुरती कामे करुन चालणार नाही. मंगळवेढा तालुक्यातील जो दुष्काळी भाग आहे, त्या भागाला सुध्दा पाणी देण्याची आवश्यकता आहे. सांगोला, पंढरपूर, माळशिरस या तालुक्यांना सुध्दा पाणी देण्याची आवश्यकता आहे. शासनाने 5 हजार कोटी रुपयांची योजना तयार केली आहे. त्या योजनेसाठी योग्य पध्दतीने नियोजन करावे व कायम दुष्काळी भागाचा दुष्काळ कायमचा घालवावा अशा प्रकारची विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री.शिगम....

अप्रुव्हीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी नियम 260 अन्वये आणलेल्या प्रस्तावावर मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल सर्वप्रथम मी आपले आभार मानतो.

सभापती महोदय, या दुष्काळाच्या प्रश्नावर भाष्य करताना सन्माननीय सदस्य श्री. विजयसिंह मोहिते-पाटील यांनी जे सांगितले ती वस्तुस्थिती आहे. दुष्काळाचा प्रकार झपाट्याने बदलत आहे. पूर्वी दुष्काळामध्ये रोजगाराचा प्रश्न निर्माण होत होता. लोकांना रोजगार उपलब्ध करुन द्यावे लागत होते. लोकांना अन्नधान्याचा पुरवठा मोठ्या प्रमाणावर करावा लागत होता. आता मधल्या काळामध्ये पिण्याच्या पाण्याचा आणि चा-याचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी राज्य शासनाने अनेक चांगले निर्णय घेतले त्याबद्दल मी माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री आणि पुनर्वसन व मदतकार्य मंत्री डॉ. पंतगराव कदम यांचे अभिनंदन करतो. या दुष्काळामध्ये तहसीलदारांना जागेवरच टँकर मंजूर करण्याचे अधिकार दिले गेले. दुर्गम भागामध्ये पिण्याचे पाणी पोहोचविणे ही सोपी गोष्ट नाही. आता पावसाळा सुरु झालेला असला तरी अजूनही राज्यामध्ये दुष्काळी परिस्थिती आहे. दुष्काळाचे निवारण करण्यासाठी राज्य शासनाने चांगल्या प्रकारचे नियोजन केलेले आहे. ठिकठिकाणी चारा डेपा आणि छावण्या उघडलेल्या आहेत. या दुष्काळावर मात करण्यासाठी केन्द्र शासनाने देखील, राज्य शासनाने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देऊन भरीव मदत केलेली आहे. आपणाला आठवत असेल की, काही वर्षापूर्वी राज्यामध्ये जेव्हा दुष्काळ पडला होता त्यावेळी देशाचे तत्कालीन पंतप्रधान श्री. अटलबिहारी वाजपेयी यांनी राज्याला फक्त 50 कोटी रु.ची मदत केली होती. त्याचा विचार केला तर आता केन्द्र सरकारने राज्याला भरीव अशी मदत केलेली असून आणखीही मदत करण्याची केन्द्राने तयारी दर्शविलेली आहे. त्याबद्दल मी केन्द्राचे आणि राज्य शासनाचे मनापासून अभिनंदन करतो.

सभापती महोदय, दुष्काळावर मात करण्यासाठी आपल्याला दीर्घकालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. आपण जीवन प्राधिकरणाच्या माध्यमातून गावागावामध्ये ज्या पिण्याच्या पाण्याच्या योजना केलेल्या आहेत त्या योजनांचा आढावा घेऊन ज्या योजना तांत्रिक दोषामुळे, उद्भवाच्या अभावामुळे बंद असतील त्यामधील दोष दुरुस्त करुन त्या सुरु केल्या पाहिजेत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे...

विहिरींचे पुनर्भरण केले पाहिजे. अपूर्णावस्थेतील धरणे पूर्ण केली पाहिजेत. मातीच्या धरणांसाठी कमी खर्च येतो म्हणून ठिकठिकाणी छोटी छोटी मातीची धरणे बांधून त्यामधून पाईपाद्वारे ठिबक सिंचनाची योजना राबविली तर पाण्याचा कमी वापर होऊन जास्तीत जास्त क्षेत्र ओलिताखाली येऊ शकेल.

सभापती महोदय, पाणी सोसायट्या स्थापन करण्याचा प्रयोग दिंडोरी भागामध्ये फार चांगल्या प्रकारे यशस्वी झालेला आहे. दर तीन-चार वर्षानंतर दुष्काळाला सामारे जावे लागते असा आपला अनुभव आहे. हा अनुभव समोर ठेवून दुष्काळावर मात करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना आपण केल्या पाहिजेत. शिरपूर तालुक्यामध्ये श्री. अमरीश पटेल यांनी पाणलोटाचा कार्यक्रम अतिशय चांगल्या प्रकारे राबविलेला आहे. त्यांनी राबविलेला पाणलोटाचा पॅटर्न संपूर्ण राज्यभर राबविण्याची आवश्यकता आहे.

...नंतर श्री. गिते...

अप्रधारित प्रत / प्रतिक्षेसाठी नाही

डॉ.सुधीर तांबे....

सभापती महोदय, दुसरा महत्वाचा विषय जनावरांसाठी लागणाऱ्या चाऱ्याचा आहे. शासनाची शेतकऱ्यांच्या जनावरांना चारा देण्याची इच्छा असूनही चारा उपलब्ध नसल्यामुळे शेतकऱ्यांच्या जनावरांना चारा उपलब्ध करुन देऊ शकत नाही. महाराष्ट्रात मोठया प्रमाणात जंगल आहे. कोकणामध्ये देखील मोठया प्रमाणात जंगल आहे. जंगल विभागांमध्ये जनावरांसाठी चारा निर्मिती प्रकल्पांची कामे हाती घेऊन मोठया प्रमाणात चाऱ्याची निर्मिती केली तर चारा टंचाईवर आपण मात करु शकतो. चाऱ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी दीर्घकालीन विचार केला गेला पाहिजे. यावेळी महाराष्ट्रात ऊसाचे उत्पादन मोठया प्रमाणात झाले होते. त्यामुळे ऊसाच्या पिकाचा उपयोग शेतकऱ्यांच्या जनावराच्या चाऱ्यासाठी करण्यात आला. ऊस पीक उपलब्ध नसते तर चाऱ्याची टंचाई अधिक भासली असती. म्हणून चाऱ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना करणे आवश्यक आहे. कोकण भाग आहे, त्या ठिकाणी पाऊस मोठया प्रमाणात पडतो. त्या ठिकाणच्या परिसरात गवताचे आधुनिक जातीचे बियाणे टाकले तर खूप चारा निर्मिती होऊ शकते असे मला वाटते. दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाने अतिशय चांगल्या उपाययोजना केलेल्या आहेत. या उपाययोजनांची अंमलबजावणी करीत असताना शासनाने दीर्घकालीन उपाययोजनेकडे अधिक लक्ष दिले पाहिजे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. मला आपण बोलण्याची संधी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल मी आभार मानतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, या वर्षाचा दुष्काळ मागच्या वर्षापेक्षा भयानक आहे. महाराष्ट्रात कोरडा दुष्काळ या वर्षी पडलेला आहे. सभापती महोदय, हवामान खात्याचा अंदाज हा नेहमी शेतकऱ्यांना फसवित असतो. या वर्षी पाऊस उत्तम पडणार आहे असा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केल्याने शेतकरी खूष झाले. त्यांनी घरातील अन्नधान्य विकले आणि शेती करण्यासाठी ते सज्ज झाले. परंतु हवामान खात्याने अंदाज व्यक्त केल्याप्रमाणे पाऊस पडलाच नाही. नंतर हवामान खात्याने अंदाज व्यक्त केला की, अरबी समुद्रामध्ये कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला. केरळमध्ये मान्सून सक्रीय झाला आहे. आता उत्तर महाराष्ट्रात पाऊस पडणार आहे. शेतकरी शेती करण्यासाठी सज्ज झाले, ते पाऊस पडेल म्हणून मोठया आशेने आकाशाकडे बघत होते. त्यांना पावसाचे ढग दिसत नव्हते. त्यांना उन्हाळयाचे कडकडीत ऊन दिसत होते. म्हणून मला असे वाटते की, हवामान खात्याने अंदाज व्यक्त केले नाही तर बरे होईल. हवामान खात्याचा अंदाज सांगण्यासाठी त्यांना अद्ययावत मशिनरी उपलब्ध करुन द्यावी. शेतकऱ्यांना सर्वात जास्त अडचण हवामान खात्याची आहे.

महोदय, महाराष्ट्रात आतापर्यंत रोहिणी, मृग, आर्द्रा अशी तीन नक्षत्रे कोरडी गेली आहेत आणि आता पुनर्वसु नक्षत्र लागले आहे. आम्हाला हवामानाचा अंदाजापेक्षा नक्षत्रांचे वाहन बघितले तर पाऊस येणार की नाही या गोष्टी समजतात. रोहिणी नक्षत्र गाढव वाहनावर होते. आम्हाला वाटले होते की, गाढव लाथा तरी झाडेल. परंतु ते गाढव लोळत गेले. मृग नक्षत्र कोल्हयावर आले. तो कोल्हा देखील लबाड निघाला. तो कोल्हा आम्हाला काहीही न देता निघून गेला. आर्द्रा नक्षत्र मात्र म्हशीवर होते. ती म्हैस विदर्भात कोठे तरी येऊन बसेल. पण ती कोकणात बसली. कोकणात मात्र ओला दुष्काळ आला. आम्ही मात्र साधे म्हशीचे तोंड देखील पाहिले नाही. पुनर्वसु हे नक्षत्र घोडयावर आले आहे. पुनर्वसु नक्षत्राचे वाहन घोडा आहे. घोडा कुणीकडे जाईल, कुठे पळेल हे सांगता येत नाही. त्या घोडयाच्या लाथा विदर्भापर्यंत आल्या तरी खूप आहे. परंतु त्याच्या लाथा देखील अजूनपर्यंत विदर्भात आल्या नाहीत. दुष्काळी परिस्थितीत सरकार जनतेला अन्नधान्य पुरवू शकेल. आपण शेततळी, विहिरी, साठवण बंधारे यांची मागणी करतो. पण ही कामे करण्यासाठी पाणी कोठून आणणार हा खरा प्रश्न आहे. या वर्षी दीड महिन्यामध्ये फक्त 10 टक्के एवढाच पाऊस झालेला आहे. त्यामुळे पाण्याची परिस्थिती अतिशय गंभीर झालेली आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

सभापती महोदय, मी माझ्या तालुक्याचा विचार केला तर मागच्या वर्षी तेथे पाऊस पडण्याचे प्रमाण 40 टक्के एवढे होते. मागच्या वर्षी 205.07 इतका पाऊस 15 जुलै पर्यंत झाला होता. या वेळी तो 150 पर्यंत आला. याचा अर्थ असा की, मागच्या वर्षा पेक्षा या वर्षी पाऊस कमी पडलेला आहे. आज सगळया जलाशयामध्ये 10 टक्के एवढाच पाणीसाठा उपलब्ध आहे. पिण्यासाठी पाणी कसे उपलब्ध करावयाचे हा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. जनतेला अन्नधान्य सरकार आपल्या कोठारातून देईल. परंतु पिण्याचा पाण्याचा प्रश्न अतिशय गंभीर झालेला आहे. सिंचनाचा पाण्याचा प्रश्न गंभीर झालेला आहे. त्यामुळे या प्रश्नाकडे शासनाने गंभीरतेने पाहण्याची गरज आहे.

यानंतर श्री. कानडे....

अप्रधारित प्रत / परिशिष्टासाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ...

विदर्भातील मोठी धरणे आहेत त्यात 10 टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. मागील वर्षी तो 27 टक्के होता. लघुप्रकल्पांमध्ये 9 टक्के आणि मध्यम प्रकल्पांमध्ये 13 टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. मागील वर्षी याच वेळी हा पाणीसाठा 24 टक्के होता. मागीलवर्षी पेक्षा यावर्षीची स्थिती अतिशय गंभीर आहे. परिस्थितीनुरुप मी वरील माहिती सांगत आहे. मागील वर्षीपेक्षा 27 जिल्हयात आणि 209 तालुक्यात 80-120 टक्के पाऊस झालेला नाही. यावर्षी तर मागीलवर्षीपेक्षा स्थिती गंभीर आहे. मागीलवर्षी जीएसडीपी मायनस 5.1 टक्के होता. आज मात्र जीएसडीपी किती अंतर खाली जाईल हे सांगता येणार नाही.

मी जेव्हा आर्थिक पाहणी अहवालाचे पुस्तक वाचले त्यावेळी मागील वर्षी अन्नधान्याचे उत्पादन किती टक्क्यापर्यंत झालेले आहे हे पाहिले तर 2011-12 या वर्षीचे प्रमाण आहे ते मायनस 23 टक्के इतके आहे. आपण कुठे चाललो आहोत. उत्पन्नाच्या बाबतीत प्रत्येक गोष्ट जर मायनसमध्ये जाणार असेल तर शेतकऱ्याचे भले आपण कोणत्या अँगलने पहात आहोत याचा विचार करण्याची गरज आहे. मला पाणी मिळाले की तुम्हांला मिळाले नाही, पश्चिम महाराष्ट्रात मिळाले की विदर्भात मिळाले हा प्रश्न नाही. या महाराष्ट्राचा कणा शेतकरी आहे. त्याला जगवायचा असेल तर पूर्ण महाराष्ट्राचा एकत्रित विचार करण्याची गरज आहे हे याठिकाणी विशेषत्वाने सांगण्याची गरज आहे. त्याचे जीवन हेच पाणी आहे. शेतकऱ्याला शेतीसाठी पाणी लागणार आहे. जनावरांना पाणी लागणार. प्यायला पाणी लागणार आहे या सर्व गोष्टींचा केव्हा तरी विचार करणार आहोत किंवा नाही याचाही विचार करण्याची गरज आहे. मी सहज आर्थिक पाहणीचे पुस्तक पाहिले. गेल्या 15 वर्षांचा रेकॉर्ड पाहिला तर कृषी खाते प्रत्येक वेळी 5 टक्के 10टक्के पीक वाढ दाखविते. पीक वाढ दाखविली जाते तर मायनस 23 टक्के कसे येतं ? आपण अन्नधान्य टाकतो मग उत्पन्न मायनस कसे येते हे गणित मला सुटत नाही. म्हणून अधिकाऱ्यांना माझी विनंती आहेकी, प्रत्यक्षात कॅटलॉगचा हिशोब बंद करा. केबिनमध्ये बसून हिशोब करु नका. 10 टक्के पीक वाढ झाली म्हणून 10 टक्के वाढ करुन आर्थिक पाहणीमध्ये ती आकडेवारी देणार असाल तर महाराष्ट्राचे भले होणार नाही आणि त्याहून शेतकऱ्याचेही भले होणार नाही. म्हणून याठिकाणी या गोष्टीचा विचार करण्याची गरज आहे की प्रत्यक्षात शेतकऱ्याची नड काय आहे ? पाऊस कमी झाला तर रोपाची लागवड होणार नाही. कृषी अधिकारी सांगतात की, पिकामध्ये बदल करा.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परंतु बदल करा म्हणजे नेमके कोणते पीक लावा हे सांगत नाहीत. प्रत्येक ठिकाणची परिस्थिती ही तेथील जमिनीचा पोत कसा असतो यावर अवलंबून आहे. ज्याठिकाणी ओलावा धरुन जमीन असेल तेथे कडधान्य टाका. ज्याठिकाणी मुरमाड जमीन आहे तेथे पाण्याचा ओलावा नसेल तेथे काय टाकणार ? मातीचा कस बघून तेथे कोणते पीक लावावे हे जर कृषी खात्याने सांगितले तर ठीक होईल. काय लावावे हे अजूनपर्यंत सांगितले नाही. भुईमूग लावला तरी ओलावा लागतो. प्रत्येक पिकाला पाण्याच्या ओलाव्याची गरज आहे. त्याला कोंब फुटण्याकरिता ओलावा आवश्यक आहे. हे शेतकऱ्यांना समजते तर कृषी अधिकाऱ्यांना का समजू नये ? आमचे दु:ख भाषणे देऊन घालविणार काय याचाही विचार करण्याची गरज आहे. शेतकऱ्याला खऱ्या अर्थाने जगविणे आवश्यक आहे.

मागील वर्षी पाऊस कमी झाला. रोपे उशिरा लावण्यात आली. 120 दिवसांचे पीक आहे. किमान 90 दिवस तरी त्याला वाढीसाठी आवश्यक आहेत. 90 दिवसांच्या पिकाचा फायदा मिळेल. 30दिवसांचे रोपण राहील. पीक मिळू शकेल.70 दिवस रोप मातीमध्ये होते. 40 दिवसात पीक घेऊ शकलो नाही. 50टक्के पेक्षा खाली पीक आहे परंतु कृषी खात्याच्या अहवालामध्ये मात्र 50 टक्के पेक्षा जास्त पीक आले असे दाखविण्यात आले. पाऊस 100
टक्के झाला तरी पिकाचे प्रमाण जून, जुलै, ऑगस्ट व सप्टेंबर या काळात झाले पाहिजे. या चार महिन्यामध्ये पीक निघते. हे न बघता पाऊस आला म्हणजे पीक निघाले. अशा प्रकारे शेतकऱ्यांची थट्टा केली जाते ती थांबविण्याची आवश्यकता आहे. शेतकऱ्यांना तुमच्यापेक्षा जास्त कळते. त्याला माहिती असते की माझे किती पीक येणार आहे. आता मी रोप उशिरा रोवले असल्यामुळे माझे पीक कमी येणार आहे.

नंतर श्री.भोगले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.....

हे शेतकऱ्याला कळते ते अधिकाऱ्यांना का कळू नये? या सर्व गोष्टींचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. गेली पाच वर्षे आम्ही टाहो फोडून सांगण्याचा प्रयत्न करीत आहोत की, शासनाची आणेवारीची पध्दत चुकीची आहे. ही आणेवारीची पध्दत बदलली पाहिजे. अर्थसंकल्पीय अधिवेशनात शासनाने या प्रश्नाबाबत अधिकाऱ्यांची एक समिती स्थापन करण्याचे घोषित केले होते. अधिकाऱ्यांची समिती बनविण्यापेक्षा आमदार आणि शेतकऱ्यांचा समावेश असलेली समिती तयार केली पाहिजे. काय आवश्यक आहे याची त्यांना पुरेपूर जाणीव असते. आणेवारी कशी निश्चित करावी याबाबत किमान त्यांचा सल्ला घेतला पाहिजे. परंतु त्याबद्दल कोणताही विचार झालेला नाही. त्या आणेवारीच्या भरवशावर शेतकऱ्यांची विमा पॉलीसी अवलंबून आहे. दुष्काळ अवलंबून आहे, शासनाच्या सवलती अवलंबून आहेत. खऱ्या अर्थाने आणेवारीची पध्दत ही शेतकऱ्यांच्या दृष्टीने घातक ठरत आहे, याचा शासनाने विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांनी यावर्षी जी रोवणी केली ते बियाणे आता पावसाअभावी उपयोगात येणार नाही. त्यांना दुबार पेरणी करावी लागणार आहे. त्यासाठी पुरेसे बियाणे उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. बियाणे सवलतीच्या दरात किंवा अनुदानाच्या स्वरुपात मिळाले तर शेतकऱ्यांना दिलासा दिल्यासारखे होईल असे माझे स्पष्ट मत आहे.

सभापती महोदय, पाणी टंचाईच्या काळात पाण्याचे नियोजन करण्याची गरज आहे. प्रत्येक उन्हाळ्यामध्ये पाण्याबाबत जिल्हा परिषदेला टंचाईचा कार्यक्रम पाठविण्याबाबत कळविले जाते. टंचाईचा कार्यक्रम प्राप्त झाल्यानंतर शासनाकडून निधी दिला जातो. चंद्रपूर जिल्हयात अधिकारी वर्गाची पदे मोठया प्रमाणात रिक्त आहेत. प्रामुख्याने जिल्हाधिकाऱ्यांच्या हाताखालील पदे रिक्त आहेत. तहसीलदाराची 18 पैकी निम्मी म्हणजे 9 पदे रिक्त असून नायब तहसीलदाराची 59 पैकी 16 पदे रिक्त आहेत. टंचाईच्या कार्यक्रमाची पहिल्या टप्प्याची माहिती जिल्हाधिकारी स्तरावर संकलित होण्यामध्ये जून महिना संपून गेला. अद्याप टंचाईचा कार्यक्रम निश्चित झालेला नाही. त्यामुळे टंचाईचा एकही कार्यक्रम राबविला गेलेला नाही, हे दुर्दैवाने सांगावे लागते.

सभापती महोदय, शासनाने रोजगार हमी योजनेच्या कामावर मजुरांना काम उपलब्ध करुन दिले. परंतु मागील चार महिन्यापासून त्यांना मजुरी दिलेली नाही. याबाबत चौकशी केली तर शासनाकडून निधी आलेला नाही असे उत्तर दिले जाते. उन्हाळ्याच्या काळात काम केलेल्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.....

मजुरांना त्यांच्या कामाचे पैसे दिलेले नसल्यामुळे शासन एकप्रकारे कुपोषणाला हातभार लावण्याचे काम करीत आहे. मजुरांकडे स्वत:ची शेती नाही, कोणताही व्यवसाय नाही, ते मजुरी करुन पोट भरतात. त्यांना चार-चार महिने मजुरी मिळणार नसेल तर त्यांनी खायचे काय? सरकारने योजनेतील ही त्रुटी त्वरेने दूर केली पाहिजे. किमान रोहयो कामावरील मजुरांना मजुरीचे पैसे ताबडतोब मिळतील याची व्यवस्था केली पाहिजे.

सभापती महोदय, वर्धा नदीवर मोठया प्रमाणात वीज प्रकल्प उभारले जात आहेत. त्या नदीमध्ये 12 महिने पाण्याचा किती साठा असू शकतो आणि त्यातील किती पाणी वीज प्रकल्पासाठी देता येईल याची कोणतीही माहिती शासनाने भूगर्भ शास्त्रज्ञांकडून घेतलेली नाही. वर्धा नदीच्या पात्रात 12 महिने किती पाणी राहू शकते याचे कोणतेही गणित न करता त्या नदीच्या पाण्यावर अवलंबून राहून भरमसाठ वीज प्रकल्प मंजूर केले गेले. गावांमध्ये पाणी टंचाईची परिस्थिती निर्माण झाल्यामुळे लोकांवर विस्थापित होण्याची वेळ आलेली आहे. याला विकास म्हणता येईल काय? विजेची आवश्यकता जरुर आहे. याचा अर्थ असा नव्हे की, जनतेच्या रक्ताचे शोषण करुन मोठया उद्योगांना संजीवनी द्यायची. इंग्रजांच्या काळात इंग्रज सैनिकांना रक्ताची गरज भासत असे तेव्हा भारतातील मजुरांचे रक्त गोळा करुन त्यांची रक्ताची गरज भागविली जात असे. त्याच पध्दतीचा अवलंब करुन वर्धा नदीकाठच्या लोकांना मारुन उद्योजकांना मोठे करण्याचा प्रयत्न सुरु आहे. याचा शासनाने गांभीर्याने विचार केला पाहिजे. अन्यथा हा जनतेचा विद्रोह भविष्यात शासनाला धडा शिकविल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, वर्धा नदीच्या पात्रात उन्हाळ्यामध्ये पाणी नव्हते. भूजल विभागाने अहवाल दिला की, सेलचा खडक असल्यामुळे वर्धा नदीमध्ये पाणी राहू शकत नाही.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस .....

पक्का बंधारा बांधण्याची परवानगी असताना या पॉवर प्रोजेक्टने कच्चा बंधारा बांधला. त्याचा परिणाम म्हणून आमच्या पालक मंत्र्यांच्या वरोरा गावाला पाण्याच्या टंचाईला तोंड द्यावे लागले. आजूबाजूच्या 8 गावांत त्यामुळे पाण्याची टंचाई निर्माण झाली. शेवटी या गावांना टँकरने पाणी पुरवठा करावा म्हणून प्रोजेक्ट ऑफिसरला विनंती केली व त्यांनी वर्धा नदीवरील प्रकल्पासाठी आपले पिण्याचे पाणी घेतले आणि त्यांच्या टँकरने या गावांना पाणी पुरविले अशी उलट परिस्थिती निर्माण झाली. हे सर्व पाणी पॉवर प्रोजेक्टसाठी दिले तरी देखील दिंडोरा नावाचा प्रकल्प वर्धा नदीवर आहे. माननीय जलसंपदा मंत्र्यांनी सांगितले असले तरी वस्तुस्थिती अशी आहे की, यातील एकूण 90 दशलक्ष घन मीटरमधून 18 दशलक्ष घन मीटर पाणी सिंचनासाठी ठेवले तर 72 लक्ष घन मीटर पाणीच शिल्लक राहते. ते पाणी भद्रावती पॉवर प्रोजेक्ट, आयएसएमपी, एमआयएसएमपी आणि सोफिया प्रकल्पांसाठी देणार आहात. वास्तविक या चारही प्रकल्पांना 100 दशलक्ष घन मीटरच्या वर पाणी लागणार आहे. एवढे पाणी मात्र वर्धा नदीत नाही, त्यामुळे शेतीबाबत प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. असे केले तर मग नियोजनात पाण्याचा साठा किती आणि शिल्लक किती राहणार आहे याचा हिशेब नसला आणि कसलेही नियोजन नसेल तर हे राज्य कसे चालेल हे सांगण्याची गरज नाही. रोम जळते आणि नीरो फिडल वाजवित बसला, आलेल्या कागदावर फक्त सही करायची अशी या राज्याची परिस्थिती आहे.

वास्तविक राजा हा जनतेच्या भल्यासाठी असतो, जनतेला वाचविण्यासाठी असतो पण आमचा राजा तर आम्हाला मारण्यासाठी निघाला असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. मघाशी कोणी तरी सभागृहात धापेवाडा उपसा सिंचन योजनेचा उल्लेख केला. ती योजना प्रत्यक्षात शेतकऱ्यांची होती पण वरच्या माणसाच्या दबावाखाली येऊन त्या योजनेतील पाणी पॉवर प्रोजेक्टसाठी देण्यात आले एक थेंब सुध्दा शेतकऱ्यांसाठी मिळत नाही.

महोदय, गोसी-खुर्द प्रकल्प पूर्ण झाला पाहिजे म्हणून जवळपास सन 1982 सालापासून आम्ही प्रयत्न करतो, मागणी करतो पण अजून पूर्णपणे पहिल्या टप्प्यात सुध्दा हा प्रकल्प नाही. शेतकऱ्याला अद्यापही पाणी मिळालेले नाही, इतकेच नव्हे तर त्याच्या शेतापर्यंत सुध्दा पाणी गेलेले नाही. तरी देखील या प्रकल्पातून 24 हजार हेक्टरसाठी असलेले शेतकऱ्याचे शेतीचे पाणी पॉवर

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस .....

प्रोजेक्टसाठी दिले गेले. अद्याप आमच्या शेतात हे पाणी आले नाही. वास्तविक हा शेतकऱ्याच्या जीवन मरणाचा प्रश्न आहे, शेतकऱ्याला जीवदान मिळणार आहे, पण अशा प्रकल्पाचे पाणी जर आपण पॉवर प्रोजेक्टला देणार असाल तर शेतकऱ्याला पाण्यावाचून मारण्यापेक्षा विजेचा धक्का देऊन मारुन टाका. अशा प्रकारे एका गुंडाभर पाण्यासाठी भांडण्यापेक्षा हजारो लिटर पाणी शेतकऱ्याला द्या. शासन जर प्रकल्पासमोर माणसाचा विचार करणार नसेल तर या गोष्टीचा विचार भविष्यात करण्याची वेळ येणार आहे. यापेक्षा भयानक टंचाई येत्या चार महिन्यात येणार आहे. त्याचा परिणाम शेतकरी, कामकरी आणि गावकऱ्यांना भोगावा लागणार आहे, उद्योजकांना आणि कारखानदारांना नाही. त्यामुळे या गोष्टीचा शासनाने गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. या निमित्ताने मी शासनाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छिते की, मरणारा मरतो, मारणारा मारतो पण जगण्याची आशा आम्हाला आहे एवढेच लक्षात ठेवावे असा इशारा देऊन मी माझे भाषण पूर्ण करते.

धन्यवाद.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अप्रमाणित प्रत / प्रतिक्षेसाठी नाही

श्री. रामदास कदम (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्र विधान परिषद नियम 260 अन्वये सत्ताधारी पक्षाच्या वतीने दुष्काळ निवारणासाठी जो प्रस्ताव आणलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील दुष्काळ हा मानवनिर्मितच आहे असे मत राष्ट्रीय कीर्तीचे पाणी तज्ज्ञ राजेंद्र सिंह यांनी व्यक्त केलेले आहे. आपल्याकडे 1972 तसेच 2003 सालामध्ये मोठे दुष्काळ पडले होते. खरे म्हणजे ठेच लागल्यावर माणूस शहाणा होत असतो परंतु या शासनाला कितीही ठेचा लागल्या तरी हे शासन जागे होत नाही. दुष्काळाचा सामना आपल्याला करावा लागणार नाही यासाठी ज्या काही उपाययोजना करावयाच्या असतात त्या उपाययोजना या शासनाने केलेल्या नाहीत.

सभापती महोदय, आम्ही केवळ सभागृहात यायचे, घसा फुटेपर्यंत बोलायचे, तू-तू-मी-मी करायचे एवढेच काम राहिलेले आहे. आमचा मुद्दा कसा चुकीचा आहे यावरच चर्चा केली जाते परंतु पुन्हा दुष्काळ पडणार नाही यासंदर्भात मात्र काहीही उपाययोजना शासनाकडून केली जात नाही. आपल्याला दुष्काळाचा दोनदा सामना करावा लागला तरी आपण त्यातून काहीच धडा घेतलेला नाही याचे आत्मपरीक्षण शासनकर्त्यांनी करणे गरजेचे आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, नाशिक, धुळे, नंदूरबार, पुणे, लातूर, उस्मनाबाद, नगर, सांगली, सोलापूर सातारा, नागपूर, गोंदिया, गडचिरोली, अमरावती, बुलढाणा अशा एकंदर 15 जिल्हयांमध्ये एकंदर मोठया प्रमाणात दुष्काळ पडल्याचे चित्र आपल्याला पहावयास मिळाले आहे.

सभापती महोदय, अशी काही परिस्थिती निर्माण झाली की, हौसे,गवसे,नवसे लोक त्या ठिकाणी पोहचतात. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांच्या सारखे सदस्य क्वचितच अशा ठिकाणी पाहणी करण्यासाठी, अश्रू पुसण्यासाठी जात असतात. परंतु काही लोक वर्तमानपत्रात आपले फोटो छापून येण्यासाठी प्रयत्न करीत असतात हे आपल्याला माहिती आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील 5,773 वाडया व 1,789 गावांना दुष्काळाची झळ मोठया प्रमाणात लागली आहे. परंतु त्यासाठी आपण कोणकोणती कामे केलेली आहेत याची माहिती सभागृहाला मिळण्याची आवश्यकता आहे. सभागृहात दुष्काळावर चर्चा सुरु असतांना दुसऱ्या बाजूने

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

मंत्र्यांचाही दुष्काळ या सभागृहात पडलेला आहे. खालच्या सभागृहात दुष्काळावर चर्चा सुरु असली तरी या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी नाही, तर किमान माननीय उपमुख्यमंत्र्यांनी तरी उपस्थित राहावयास पाहिजे होते. दुष्काळाच्या संदर्भात जवळ जवळ 13-14 खात्याचा संबंध येत असतो. दुष्काळाच्या संदर्भात महसूल,पुनर्वसन,समाजकल्याण,सिंचन या सर्व विभागाचा संबंध येत असतो. त्यामुळे संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी या ठिकाणी उपस्थित राहणे आवश्यक होते. विरोधी पक्षाने चर्चा उपस्थित केली असती तर आम्ही समजू शकलो असतो परंतु सत्ताधारी पक्षाने चर्चा असतांना सुध्दा या चर्चेकडे शासनाने गांभीर्याने पाहिले नाही हे काही बरोबर नाही. शासन दुष्काळाकडे गांभीर्याने पाहत नाही हे यावरुन दिसून येते.

सभापती महोदय, मंत्री महोदय, सभागृहाच्या बाहेर घोषणा करतात परंतु सभागृहामध्ये उपस्थित राहण्याचे गांभीर्य सुध्दा ते पाळू शकत नाही. खालच्या व वरच्या सभागृहात एकाचवेळी चर्चा सुरु असेल तर खालच्या सभागृहात कॅबिनेट मंत्री व वरच्या सभागृहात राज्यमंत्र्यांनी उपस्थित राहिले पाहिजे. मंत्री जास्त असल्यामुळे मंत्र्यांच्या कॅबिन्स जळाल्या ही वस्तुस्थिती नाकारता येणार नाही. मंत्र्यांना जर सर्व सुविधा पाहिजे असतील तर मंत्र्यांनी किमान सभागृहात तरी उपस्थित राहावयास पाहिजे असे मला या निमित्ताने म्हणावेसे वाटते.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

मग येथे कोण बसणार ? आमच्या सर्व प्रश्नांची उत्तरे आपण एकटेच देणार काय ? येथे माननीय मंत्री डॉ.नितीन राऊत देखील उपस्थित आहेत. ते देखील सक्षम आहेत याची आम्हाला कल्पना आहे. ते आमचे मित्र आहेत, यात वादच नाही. अन्य मंत्र्यांची यात काहीच जबाबदारी नाही काय, हे माननीय मंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील यांना स्वत:ला तरी पटते काय ? म्हणूनच मला प्रामाणिकपणे सांगावयाचे आहे की, शासनकर्त्यांना या दुष्काळाचे कुठलेही गांभीर्य नाही. कालचा गोंधळ बर होता असे म्हणण्याची पाळी आज आली आहे. नेहमी प्रमाणे चर्चा होईल आणि सगळे संपेल असे शासनाला वाटते.

सभापती महोदय, गेले चार-पाच महिने राज्य पिण्याच्या पाण्याच्या टंचाईला सामोरे जात आहे. आम्ही नेहमी प्रत्येक भाषणात पश्चिम महाराष्ट्राचा "समृद्ध पश्चिम महाराष्ट्र" असा उल्लेख करतो. पण यंदा सर्वात जास्त दुष्काळाची झळ पश्चिम महाराष्ट्राला पोहोचली आहे. दुष्काळाची सुरूवात पश्चिम महाराष्ट्रापासूनच सुरू झाली. तशा बातम्या देखील आल्या आहेत. माननीय मुख्यमंत्री देखील पश्चिम महाराष्ट्राचेच आहेत. माननीय उप मुख्यमंत्री देखील पश्चिम महाराष्ट्राचेच आहेत. आमचे गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील हे देखील पश्चिम महाराष्ट्राचेच आहेत. माननीय वन मंत्री डॉ.पतंगराव कदम हे देखील पश्चिम महाराष्ट्राचेच आहेत. माननीय ग्रामविकास मंत्री श्री.जयंतराव पाटील हे देखील पश्चिम महाराष्ट्राचेच आहेत. 90 टक्के महत्वाची खाती ही पश्चिम महाराष्ट्राकडे आहेत. सर्व रथीमहारथी पश्चिम महाराष्ट्रातीलच आहेत. तरी देखील दुष्काळाची समस्या आज पश्चिम महाराष्ट्रापुढे उभी आहे.

मला एक गोष्ट आपण प्रामाणिकपणे सांगावी. त्यावेळी माननीय मंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील हे आमच्याकडे होते. तेव्हा आपण पाच हजार कोटी रूपयांचे कर्ज काढून कृष्णा-खोऱ्याचे काम केले नसते तर आज माननीय सदस्य श्री.विलासकाका पाटील यांनी कुठून भूमिपूजन केले असते ? मघाशी म्हटले की, माननीय सदस्य श्री.विलासकाका पाटील यांनी भूमिपूजन केले. ते त्यांनी केलेले नाही. ते आमचे आहे. होय, ते आमचे आहे. 25 वर्षापासून त्यांना जमले नव्हते ते आम्ही केले होते. कर्नाटक आणि महाराष्ट्र शासनामध्ये करार झाला होता की, 2000 साला पर्यंत पाणी उचलले नाही तर पाण्यावरचा सर्व अधिकार हा कर्नाटक सरकारचा असेल. 1995 सालापर्यंत

श्री.रामदास कदम...

एक थेंब पाणी अडविण्याचे काम या सरकारने केले नव्हते. ते काम आम्ही केले आहे. मग आमच्यावर आरोप झाले की, राज्याला कर्जबाजारी केले. आम्ही पाच हजार कोटीचे कर्ज रोखे काढले होते. कृष्णा खोऱ्याचे काम आम्ही केले. त्यावेळी तेथून आमचा फक्त एकच आमदार निवडून आला होता. तरी देखील आम्ही ते काम केले. 2 लाख 60 हजार कोटीचे कर्ज राज्यावर आहे. त्यामुळे मी आज पुन्हा विचारतो की, हा सर्व पैसा आपण कुठे नेला आहे ? ते आपण सांगू शकणार नाही म्हणूनच मी येथे श्वेतपत्रिकेची मागणी करीत आहे. हिंमत असेल तर या महाराष्ट्राला कर्जबाजारी का केले, महाराष्ट्राच्या डोक्यावर 2 लाख 60 हजार कोटींचे कर्ज का केले, ते पैसे कोणाच्या घशात गेले, ते कोणाच्या खिशात गेले, हे सांगावे. 70 हजार कोटी सिंचनाच्या नावावर खाल्ले आहेत. ते कोणाच्या खिशात गेले. हिम्मत असेल तर ते उत्तरामध्ये सांगावे. आपण ते सांगू शकणार नाही. हा दुष्काळ निसर्ग निर्मित नसून मानव निर्मित आहे. 70 हजार कोटी रूपये सिंचनावर खर्च होऊन फक्त एक टक्का सिंचन निर्मिती होत आहे. ही बाब आपल्याला लाजिरवाणी नाही काय ? आम्ही हे सगळे बोललो की, राजकारण केले असे बोलले जाते. आज आम्हाला दु:ख होत आहे. वेदना होत आहे. सत्ताधारी म्हणून आपण लाल दिव्यांच्या गाड्यां मधून जात आहात. ह्या लाल दिव्याच्या गाड्या आपण कोणाच्या जीवावर वापरत आहात. त्या गाडीतील डिझेल, पेट्रोल कोणाच्या घामाच्या पैशाचे आहे याची जाणीव आपल्याला आहे काय ?

विदर्भामध्ये 20 हजार मालगुजारी तलाव आहेत. या तलावांच्या दुरूस्तीसाठी 200 कोटी रूपये पाहिजे आहेत. त्यासाठी आपण निधी द्यावा अशी मी गेल्या पाच वर्षापासून मागणी करीत आहे. हे माल गुजारी तलाव इंग्रजांच्या काळातील म्हणजे 100 ते 200 वर्षापूर्वीचे आहेत. पण त्याच्या दुरूस्तीसाठी आपण निधी देत नाही. आपले राज्यकर्ते नालायक आहेत, लायक नाहीत. हे 20 हजार मालगुजारी तलाव आपण दुरूस्त केले असते तर सहा लाख लोकांना रोजगार मिळाला असता. या पाण्यातून हजारो एकर जमीन ओलिताखाली आली असती. त्यातून जवळ जवळ 5 ते 6 लाख लोकांना रोजगार मिळू शकला असता.

यानंतर श्री.सरफरे

अप्रधानित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

महाराष्ट्राच्या सिंचनावर 70 हजार कोटी रुपये खर्च होत असतांना आपण मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीसाठी 200 कोटी देऊ शकत नाही? याचे कारण तुम्हाला त्यामधून काही मिळणार नाही, त्या मालगुजारी तलावांचे एस्टिमेट आपल्याला जास्त रकमेचे करता येणार नाही. हे आम्हाला समजत नाही असे समजू नका. या ठिकाणी सत्ताधारी पक्षाकडून प्रस्ताव मांडण्यात आला आहे म्हणून मी प्रथम आपले अभिनंदन करतो. या प्रस्तावाच्या माध्यमातून आपण आपल्या सरकारला जाब विचारण्याचे धाडस दाखविले आहे.

सभापती महोदय, आम्ही कोकणातील लोकांनी काय पाप केले आहे हे समजत नाही? आज कोयनेचे पाणी वाया चालले आहे. पावसाळयात कोकणामध्ये प्रचंड पाऊस पडतो. नद्या-नाले तुडुंब भरुन वाहतात. परंतु हे सर्व पाणी समुद्राला जाऊन मिळते. या राज्यामध्ये आमचे शिवशाहीचे सरकार असतांना आम्ही कोकणामध्ये 35 पाटबंधारे योजना मंजूर केल्या होत्या व त्यांचे काम देखील सुरु झाले होते. परंतु आमचे शासन गेल्यानंतर त्या पाटबंधारे योजनांची कामे ठप्प झाली. तेव्हापासून आपले सरकार त्या पाटबंधारेच्या योजनांसाठी पैसे देत नाही. कोकणातील लोकांनी तुमचे काय पाप केले आहे? एकीकडे आपण सिंचनाच्या कामांवर 70 हजार कोटी रुपये खर्च करता तर मग कोकणच्या विकासासाठी 35 पाटबंधारेच्या योजना मंजूर करुन कामे सुरु केली असतांना मागील 12 वर्षामध्ये आपण त्या कामांना पैसे कां देत नाही? याचे उत्तर तुम्हाला द्यावे लागेल.

सभापती महोदय, कोकण विकासासाठी 5 हजार कोटींचे पॅकेज जाहीर करण्यात आले, कोकणातील सिंचन विकासासाठी 500 कोटी रुपये जाहीर करण्यात आले परंतु त्यापैकी अजून पर्यन्त एक दमडी देखील मिळाली नाही. या बाबत या सभागृहामध्ये आपण किती वेळा चर्चा करणार आहोत? कोयनेमधील 67 टीएमसी पाणी समुद्राला जाऊन मिळत आहे. अशा परिस्थितीत पश्चिम महाराष्ट्रामध्ये दुष्काळ पडल्यामुळे तेथील लोकांना 5 रुपयांना पाण्याची एक घागर विकत घ्यावी लागत आहे.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

दुसऱ्या बाजूला कोयना धरणातील 67 टीएमसी पाणी समुद्राला जावून मिळत आहे. हे वाया जाणारे पाणी उचलण्यासाठी आपण 2 हजार कोटी रुपये देऊ शकत नाही. मला या ठिकाणी एका गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे. या सभागृहामध्ये कोकण पदवीधर मतदार संघामधून माननीय तरुण सदस्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम.....

श्री. निरंजन डावखरे निवडून आले आहेत. या सभागृहामध्ये एका महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु असतांना या चर्चेच्या माध्यमातून व्यक्त होणारे विचार ऐकण्यासाठी त्यांनी या सभागृहामध्ये बसले पाहिजे. आमच्या वतीने आपण त्यांना सांगा की, आपण कोकणातून निवडून आला आहात. त्यामुळे कोयना धरणातील वाया जाणारे 67 टीएमसी पाणी उचलण्यासाठी 2 हजार कोटी रुपये मिळविण्याकरिता आपल्या वडिलांकडे वशिला लावण्यास सांगा. ते पाणी उचलण्यासाठी जर 2 हजार कोटी रुपये मिळवून दिले तर कोकणातील जनता आपल्याला कधीही विसरणार नाही.

माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित दादा पवार साहेबांनी या सभागृहामध्ये कबूल केले आहे. त्यांच्याबरोबर चिपळूणच्या विश्रामगृहामध्ये माझ्या पाच वेळा बैठका झालेल्या आहेत. त्या बैठकींना वरिष्ठ अधिकारी देखील उपस्थित होते. त्यांचे लेखी पत्र माझ्याकडे आहे म्हणून मी हे जबाबदारीने बोलत आहे. त्यांनी आम्हाला त्या कामाचे सर्वेक्षण करण्यासाठी 1 कोटी रुपये दिले. या गोष्टीला दोन वर्षे झाली तरी काहीही प्रगती नाही. आमचे काय चुकले, कोकणातील लोकांनी आपले घोडे मारले आहे काय? शिवशाही सरकारने 35 पाटबंधारेंची कामे हाती घेतली होती ती जर दोन-तीन वर्षामध्ये पूर्ण झाली असती तर कोकणातील एकही माणूस नोकरीसाठी, भाकरी-चाकरीसाठी, पोटाची खळगी भरण्यासाठी, पोटाची आग विझविण्यासाठी मुंबई, ठाणे, पुणे येथे गेला नसता. परंतु आमच्या नशिबामध्ये ते नाही. आपल्या शासनाने त्याकडे लक्ष दिले नाही. या बाबतीत आम्ही निसर्गाला दोष का द्यावा? ज्या सिंचनावर आपण 70 हजार कोटी रुपये खर्च केले ते पाणी कुठे तरी मुरत आहे. हे पैसे ठेकेदारांसाठी खर्च केले, कुणासाठी खर्च केले, हे पैसे कुठे गेले? देशातील सरासरी सिंचन 52 टक्के असतांना आपल्या प्रगतीशील राज्याचे माननीय समाज कल्याण मंत्री सांगतात की, आम्ही मागासवर्गीयांच्या कॉलेजसाठी पैसे देतो म्हणून "महाराष्ट्र" हे नाव पडले आहे.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माझ्या महाराष्ट्रातील सिंचनाची परिस्थिती 17 टक्के आहे आणि त्यापैक्री माझ्या कोकणामध्ये फक्त दीड टक्का असून ही आमची शोकांतिका आहे. माननीय मंत्री डॉ.नितीन राऊतसाहेब यांनी आमच्या कोकणाबद्दल काही करता आले तर पहावे.

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणामध्ये सांगावे की, शिवशाहीचे सरकार गेल्यानंतर 1999 पासून आजपर्यंत 13 वर्षाच्या काळामध्ये कोकणामध्ये किती पाझर तलावांची कामे मंजूर करण्यात आली, तसे झाले असेल तर एक नाव सांगावे. पण ते सांगता येणार नाही. याबाबतीत असे सांगण्यात येते की,सदरहू काम मापदंडामध्ये बसत नाही. असे असेल तर मापदंड बदलण्यात यावेत. शासन बाकीच्या ठिकाणी पाण्याच्या संदर्भातील मापदंड बदलत आहे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाबतीतील मापदंड बदलत आहेत. परंतु कोकणामध्ये उताराचा भाग आहे. तसेच खडकाळ आणि डोंगराळ भाग आहे मग अशी परिस्थिती असेल तर मग तेथील मापदंड बदलण्यात यावेत. राज्यामध्ये सरकार तुमचे आहे, तुमची सत्ता आहे मग या मध्ये कोणती अडचण आहे हा प्रश्न आहे. पण तसे होत नाही फक्त कोकणातून मते पाहिजेत. आम्हाला अशा स्वरुपाची भावना अनेक वर्षापासून पहावयास मिळत आहे.

सभापती महोदय, कोकण वैधानिक विकास मंडळाच्या बाबतीत काय झाले? विधान सभेमध्ये एकमताने ठराव मंजूर करुन तो दिल्लीमध्ये पाठविण्यात आला. परंत त्याचे पुढे काय झाले? त्या नंतर केळकर समिती, अमुक समिती, तमुक समित्या नेमल्या गेल्या. पण त्याचा अर्थ काय आहे ते आम्हाला माहिती आहे. यापूर्वी दांडेकर समिती आणि इतरही अनेक समित्या नेमण्यात आल्या पण पुढे काय झाले. जर एखादे काम थांबवावयाचे असेल, अडवावयाचे असेल तर समिती नेमावयाची आणि बूच मारावयाचे. एकदा समिती स्थापन केली की पुढे सहा वर्षे पहावयास नको. समितीचे काम सुरु आहे असे सांगावयाचे हे आम्हाला नवीन नाही, आम्हाला कळत नाही काय ? अशा प्रकारे थूक लावण्याचे, गूळ लावण्याचे धंदे थांबवावेत.

सभापती महोदय, निवडणुका आल्यानंतर मराठवाड्यामध्ये एक बैठक घ्यावयाची, कोकणामध्ये विभागीय बैठका घ्यावयाच्या आणि मग पॅकेज जाहीर करावयाचे. परंतु पुढील वर्षाच्या बजेटमध्ये जी तरतूद करण्यात येणार आहे तेच पैसे निवडणुकीच्या वेळेला पॅकेजमध्ये दाखवावयाचे आणि सांगावयाचे की,मराठवाड्यासाठी एवढे पॅकेज दिले,कोकणासाठी एवढे पॅकेज दिले.आता अशा प्रकारची जी फसवाफसवी केली जात आहे,ती थांबविण्यात यावी.शासन किती दिवस जनतेच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डोळ्यामध्ये धूळफेक करणार आहे. आज महाराष्ट्रामध्ये दुष्काळाची स्थिती निर्माण झाली आहे, तो शासन निर्मित आहे, तो निसग निर्मित दुष्काळ नाही.त्यासाठी शासनाने ठोस उपाय योजना करावी. माननीय मंत्री महोदयांनी सांगावे की, चाऱ्यांची किती कामे सुरु केली, रोजगार हमीच्या कामासाठी किती रक्कम खर्च केली? केंद्र शासनाकडून राज्याला 250 कोटी रुपये मिळाले आहेत. आम्ही दिल्लीला जाऊन भिकेचा कटोरा घेऊन माननीय पंतप्रधान यांच्याकडे 500 कोटी, 1000 कोटी रुपयांचा निधी द्यावा म्हणून भीक मागत आहोत. पण त्यापैकी किती निधी मिळाला, तुमच्यावर ही वेळ का आली, तुमची दिल्लीमध्ये काय पत आहे? केवळ मुंबईमधून प्रतिवर्षी 1 लाख 20 हजार कोटी रुपयांचा महसूल दिल्ली मध्ये जातो. परंतु दिल्ली मधून राज्य शासनाला 150 कोटी, 250 कोटी रुपये मिळतात, असे करुन ते आपल्यावर मेहेरबानी करीत आहेत काय? अशा वेळी दिल्ली तून मुंबईतील पाणी प्रश्नाच्या बाबतीत किती निधी मिळतो ? पण तुमची बोलण्याची हिंमत नाही. आपण केंद्र शासनाकडे 500 कोटी रुपयांची मागणी केली तर 250 कोटी रुपये दिले जातात. परंतु प्रत्यक्षात 1 लाख कोटी रुपयांची गरज आहे पण ते मिळत नाहीत अशी या राज्य शासनाची अवस्था असल्याचे दिसून येते.

सभापती महोदय, जोपर्यंत सिंचनाच्या बाबतीतील चित्र स्पष्ट होत नाही आणि पावसाच्या थेंब आणि थेंब अडविला जात नाही तोपर्यंत काही होणार नाही. आज जवळजवळ एक हजार कोटी रुपयांच्या पाटबंधाऱ्यांची कामे सुरु आहेत. परंतु आपण कालव्याची कामे केली नाहीत. माझ्याकडे नावे आहेत. ठेकेदाराला पैसे मिळावेत यासाठी फक्त धरणाची कामे करण्यात आली. मात्र कालव्याची कामे झाली नाहीत. कालवे तयार केल्यानंतर गावापर्यंत, तांड्यापर्यंत, वाड्यांपर्यंत कालव्याचे पाणी पोहोचणे आवश्यक असतानाही कालव्याची कामे झाली नाहीत. लोकांना धरणातील पाणी दिसत आहे पण आम्ही ते पाणी लोकांपर्यंत नेऊ शकत नाही. कारण कालव्यांची कामे झाली नाहीत. याला कोण जबाबदार आहे. पाण्याच्या दुष्काळाला जबाबदार कोण आहे? असा प्रश्न आहे. याबाबत शासनकर्त्यांनी विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, महाराष्ट्र आपल्या सर्वांचा आहे याबद्दल दुमत नाही.पण विशेषत: कोकणामध्ये देखील काम झाले पाहिजे.पण विकासाची समानता असली पाहिजे ती नाही. फावडे माती आपल्याकडे ओढते हे चित्र आपल्याला पहावयास मिळते.जिसके हात ससा वो पारधी, जिसके हात में लाठी उसकी भैस हे पहावयास मिळते. म्हणून माझी आपणामार्फत शासनाला विनंती आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम . . ..

की, पावसाच्या पाण्याचा पडणारा एकेक थेंब अन् थेंब कोकणासह सगळया ठिकाणी अडवला पाहिजे. कारण संपूर्ण महाराष्ट्रात जेवढा पाऊस पडतो त्यातील 40 टक्के पाऊस कोकणा मध्ये पडतो. पावसामध्ये नदी, नाले वहात असल्याचे चित्र दिसते.पण उन्हाळ्यामध्ये तेथील महिला, आमच्या भगिनी डोक्यावर हंडे घेऊन पाण्यासाठी दहा-दहा किलोमिटर भटकत असतात. हे पाप कोणाचे आहे?

यानंतर श्री.बरवड . . . .

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

हे पाप निसर्गाचे नसून शासनकर्त्यांचे आहे. या प्रस्तावाच्या निमित्ताने मी या शासनाचा पूर्णपणे धिक्कार करतो. हा शासननिर्मित दुष्काळ आहे. या दुष्काळाला शासन जबाबदार आहे. मी ठामपणे सांगेन की, याचे उत्तर आगामी निवडणुकांमध्ये देखील महाराष्ट्रातील जनता दिल्याशिवाय राहणार नाही. आज तुम्ही जनतेला पाणी पाणी करावयास लावत आहात पण उद्या महाराष्ट्रातील जनता तुमच्या तोंडाला देखील पाण्याचा फेस आणल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, या सभागृहामध्ये अतिशय महत्वाच्या विषयावर चर्चा चालू आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी आपापली मते मांडलेली आहेत. खरे तर जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पावसाची सुरुवात होणे अपेक्षित असताना आता जुलै महिना सुरु होऊन अर्धा जुलै महिना जाऊन सुध्दा म्हणावा तसा पाऊस सुरु झालेला नाही किंवा आपल्याला जी अपेक्षित आहे तशा प्रकारची पावसाची सुरुवात झालेली नाही.

सभापती महोदय, राज्यात दुष्काळाची परिस्थिती बिकट होत असताना मोसमी पावसाच्या आगमनाला उशीर झाल्यामुळे राज्यात धरणाच्या क्षमतेच्या केवळ 13 टक्के पाणीसाठा असून गेल्या वर्षी हा साठा 26 टक्के होता. त्यामुळे पिण्याच्या पाण्याची परिस्थिती अतिशय गंभीर झालेली आहे. गेल्या वर्षी 374 गावांना टँकरव्दारे पाणी पुरवठा केला जात होता. या वर्षी मात्र ही संख्या वाढून सव्वादोन हजार गावांना टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. अनेक ठिकाणी चारा डेपो सुरु करण्यात आलेले आहेत. हजारो टन हिरवा चारा उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. पण मला या ठिकाणी सांगावेसे वाटते की, दर एकदोन वर्षाने अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होत असते. त्यामुळे कायम दुष्काळी तालुक्यांसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करण्यात यावे. तसेच दुष्काळी भागामध्ये बीपीएल दराने धान्याची विक्री करण्यात यावी असे मला या ठिकाणी सांगावेसे वाटते.

सभापती महोदय, आपण जर राज्याच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार केला तर राज्यातील दुष्काळग्रस्त आणि पाणी टंचाईच्या प्रदेशांना प्राधान्याने पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी योजनांच्या प्रस्तावांचे तातडीने सर्वेक्षण आणि आर्थिक तरतूद करुन, एक समयबद्ध कार्यक्रम आखून त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. चालू आर्थिक वर्षात टँकरने पाणी पुरवठा करण्यासाठी 313 कोटी रुपयांची तरतूद करण्यात होती. ती तरतूद वाढविण्याची आवश्यकता आहे. ही दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता शासनाने ग्रामीण आणि नागरी भागांमध्ये विविध उपाययोजना करणे अत्यंत गरजेचे आहे. प्रामुख्याने शहरी भागांमध्ये सर्व गृह प्रकल्पांमध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंग करणे अत्यंत गरजेचे आहे. भूगर्भातील पाण्याची पातळी दिवसेंदिवस खालावत चाललेली आहे. पावसाळ्यात काही वेळा खूप पाऊस पडतो परंतु ते सर्व पाणी वाहून जाते. त्यामुळे आपण जर सर्व गृह प्रकल्पांना किंवा घर बांधताना रेन वॉटर हार्वेस्टिंग कंपल्सरी केले तर निश्चितपणे भूगर्भातील

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/

श्रीमती दिप्ती चवधरी .....

पाण्याची पातळी वाढणार आहे. आपण सर्वांनी हे मान्यच केले पाहिजे की, आता मान्सून जवळजवळ एक महिना पुढे सरकलेला आहे. आपण कितीही म्हटले तरी जूनच्या पहिल्या आठवड्यात कधीही पावसाला सुरुवात होत नाही. आपण गेल्या काही वर्षाची परिस्थिती पाहिली तर जुलै महिन्यामध्येच पावसाला सुरुवात होते. हा पाऊस पुढे ऑक्टोबर महिन्यापर्यंत चालतो त्यामुळे आपण जी पिके घेतो किंवा जून महिन्यामध्ये ज्या पेरण्या होत असतात त्याचा अभ्यास करुन पेरण्या केव्हा कराव्यात, कोणती पिके घ्यावीत याबद्दल शासनाने शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे अतिशय जरुरीचे आहे.

त्याचप्रमाणे आपण पाण्याचे नियोजन करताना शहरातील पाण्याचे नियोजन असो किंवा इतर ठिकाणच्या पाण्याचे नियोजन असो त्यामध्ये 7 जुलैपर्यंत पाणी पुरेल अशा पध्दतीचे नियोजन करीत असतो. पाण्याचे नियेाजन 7 जुलैपर्यंतचे न करता 15 ऑगस्टपर्यंत पाणी पुरेल अशा प्रकारचे नियोजन करणे आवश्यक आहे. कारण मान्सून एक महिना पुढे सरकलेला आहे. त्यामुळे ऑक्टोबरमध्ये जेव्हा हा पाऊस सुरु असेल तेव्हा हातातोंडाशी आलेली जी पिके असतील त्यावर सुध्दा या पावसाचा वाईट परिणाम होणार आहे. त्यामुळे कोणती पिके घ्यावीत या विषयी निश्चितपणे विचार करणे अत्यंत गरजेचे आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी....

शासनाने दुष्काळाच्या विषयासाठी नवीन धोरण आखून त्याची तातडीने अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. पाणी ही अत्यावश्यक बाब असल्यामुळे त्याचे नियोजन व्यवस्थितपणे केले तरच नियमितपणे दुष्काळी परिस्थितीतून मार्ग निघू शकेल. कायम दुष्काळी तालुक्यांसाठी स्वतंत्र महामंडळ स्थापन करावे आणि दुष्काळी भागातील जनतेला तातडीने बी.पी.एल.च्या दराने धान्याची विक्री करण्यात यावी, अशी विनंती करुन मी माझे भाषण संपविते.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/

श्री.केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले आणि इतर सन्माननीय सदस्यांनी राज्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीसंबंधी नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडलेला आहे. या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावाच्या सूचनेमध्ये असे म्हटलेले आहे की, शेतकऱ्यांनी 15 लाख हेक्टरवर सुमारे 450 कोटी रुपयांचे बियाणे व खते वापरुन पेरणी करण्यात आली होती. हे 450 कोटी रुपये कोठे गेले ते समजणार नाही. ज्या शेतकऱ्यांनी पेरणीबरोबर खते टाकली होती ती सुध्दा व्यर्थ गेली आहेत. कारण ही खते टाकून 21 दिवस झालेले असल्यामुळे ती निर्जीव झालेली आहेत. बियाण्यांची उगवण झालेली नाही. 450 कोटी रुपयांच्या खतांपैकी 75 टक्के खते नष्ट झालेली आहेत. ही वस्तुस्थिती आहे. मृग नक्षत्राचा पाऊस 7 जूनपासून सुरु होणे आवश्यक होते. परंतु त्यावेळी रोवणीचा पाऊस पडला नाही. त्यामुळे पूर्व विदर्भातील शेतकऱ्यांना मशागत करण्यासाठी वेळ मिळाला आहे. आजही त्या भागात अल्प पाऊस सुरु आहे. कोठे तरी एक सर येऊन जाते. त्याऐवजी जोरदार पावसाची आवश्यकता आहे. 7 जून रोजी टाकलेल्या बियाण्यांच्या रोपांची 28 जून रोजी लावणी सुरु व्हावयास पाहिजे होती. पण रोवण करण्याचे काम सुरु झालेले नाही. त्या कामाला विलंब झालेला आहे. आता तीन नक्षत्रांचा म्हणजे दीड महिन्याचा कालावधी उलटून गेलेला आहे. हलक्या प्रतीच्या धानाची लावणी केली असती तर पुढील दोन महिन्यात त्याची पीक हाती आले असते. धान उत्पादक शेतकऱ्यांचे 40 टक्के नुकसान आताच झालेले आहे. परमेश्वराची लीला अपरंपार आहे. पाऊस केव्हा सुरु होणार आणि रोपणीचे काम केव्हा सुरु होईल ते कोणालाही सांगता येत नाही. बेभरवशाचा पाऊस दरवर्षी आपल्याला धोका देत आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांना खतांच्या व बियाण्यांच्या वाढीव किंमतींना सुध्दा सामोरे जावे लागत आहे. 500 रुपयांच्या डी.ए.पी.साठी 1200 रुपये मोजावे लागत आहेत. म्हणजे खतांच्या किंमतीमध्ये 150 टक्क्यांनी वाढ झालेली आहे. रासायनिक खतापैकी युरियाच्या किंमती वाढलेल्या नाहीत. पण आरसीएफने नीम कोड नावाचे खत निर्माण केलेले आहे. त्यालाही प्रत्येक पोत्यामागे 10-12 रुपये अधिक द्यावे लागत आहेत. म्हणजे खते महाग, बियाणेही महाग झालेले आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/

श्री.केशवराव मानकर....

आमच्या भागात धानाची दुबार पेरणी करण्यासाठी बियाणे उपलब्ध नाही. धानाचे बियाणे कोठून उपलब्ध होईल असा प्रश्न धान उत्पादक शेतकऱ्यांसमोर उभा ठाकलेला आहे. म्हणून शासनाला माझी विनंती आहे की, ज्या शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावयाची आहे त्यांना 75 टक्के सबसिडी देऊन तत्काळ बियाणे उपलब्ध करुन द्यावे. कारण 8 दिवसामध्ये शेतक-यांनी रोपे लावली तरच त्यांना पीक घेता येईल. इस्त्राईल देशाने ज्या पध्दतीने पाण्याचे नियोजन केलेले आहे त्याप्रमाणे आपल्याकडे उपलब्ध असलेल्या पाण्याचे नियोजन केले पाहिजे. माननीय कृषी मंत्र्यांसोबत आम्ही इस्त्राईलच्या दौऱ्यावर गेलो होतो. तेथे शेतीसाठी ड्रिप इरिगेशन पध्दतीने पाण्याचा वापर केला जातो. त्याप्रमाणे आपल्या राज्यात ड्रिप इरिगेशन पध्दत मोठ्या प्रमाणात राबविली पाहिजे. त्यासाठी शेतकऱ्यांना सबसिडी दिली पाहिजे. इस्त्राईलमध्ये 6 इंच पाऊस पडून सुध्दा दोन्ही मोसमात 100 टक्के पिके घेतली जातात. त्यांच्यासारखे राज्यात पाण्याचे नियोजन करणे आवश्यक आहे.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विनायक मेटे)

यानंतर श्री.शिगम....

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर....

सभापती महोदय, द्रव खताचा कमीत कमी वापर करुन जास्तीत जास्त शेतीचे उत्पादन घेता येते. परंतु ही द्रव खते अत्यंत महाग आहेत. जी नियमित वापरली जाणारी खते आहेत त्यावर कोट्यवधी रुपयांची सबसिडी दिली जाते. परंतु द्रव खतांना सबसिडी दिली जात नाही. तेव्हा ठिबक सिंचन करणा-या शेतक-यांसाठी द्रव खतावर सबसिडी द्यावी अशी मी या निमित्ताने शासनाला सूचना करीत आहे. शेतकरी जी नेहमीची खते वापरतात त्यांची मुदत 21 दिवसांची असते. आता दुबार पेरणी करावी लागत असल्यामुळे आणि खतांची मुदत संपत असल्यामुळे पुन्हा खतावर खर्च करण्याशिवाय शेतक-याला पर्याय नाही. किटक नाशकांच्या किंमतीवर शासनाचे कोणतेही निर्बंध नाहीत. अशा परिस्थितीमध्ये शेती कशी करावी असा प्रश्न शेतक-या समोर आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य सहकारी बँके मार्फत शेतक-यांना कर्ज पुरवठा करण्यात येतो. परंतु शासनाने या बँकेत पैसे न ठेवता ते राष्ट्रीयकृत बँकेत ठेवावेत असा जी.आर. काढलेला आहे. गोंदिया जिल्हा परिषद जेव्हा या बँकेतील सर्व पैसे विथ्ड्रा करण्यास गेली त्यावेळी त्या बँकेला गोंदिया जिल्हा परिषदेला सर्व पैसे देता आले नाहीत. मग ही महाराष्ट्र राज्य सहकारी बँक शेतक-याला कर्ज पुरवठा कसा करणार असा प्रश्न निर्माण झालेला आहे. तेव्हा माझी माननीय सहकार मंत्र्यांना विनंती आहे की, त्यांनी शेतक-यांना महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून किंवा अन्य राष्ट्रीयकृत बँकेकडून कमीत कमी व्याजदराने कर्ज पुरवठा होईल अशी व्यवस्था करावी.

सभापती महोदय, पाणी टंचाईच्या बाबतीत न बोललेले बरे. पुरवणी मागण्यामध्ये पाणी टंचाईच्या संदर्भात तरतूद केलेली असल्यामुळे त्यावर मी जास्त बोलू इच्छित नाही. परंतु पाण्या संबंधीचे राज्याचे पुढचे भविष्य हे परमेश्वराच्याच हाती आहे. आपण वरुण राजाला एवढीच विनंती करु शकतो की, ये रे पावसा ये आणि आमचे जीवन सावर. पाण्याशिवाय आपण जीवन जगू शकत नाही. म्हणून पिण्याच्या पाण्याच्या संदर्भात दीर्घकालीन उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आज शेतकरी खूप अडचणीमध्ये सापडलेला आहे. राज्यात रोजगार हमी योजना आणि केन्द्राची महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु आहे. या योजनेच्या माध्यमातून दुष्काळात सापडलेल्या शेतक-याला आपणाला मदत करता येऊ शकेल. रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून रोवणी, कापणी अशी शेतीची कामे करण्यासाठी मजूर उपलब्ध करुन त्याची मजुरी रोजगार हमी योजनेतून दिली तर शेतक-याला फार मोठी मदत होऊ शकेल. तेव्हा केन्द्राच्या

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर...

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेतून किंवा राज्याच्या रोजगार हमी योजनेतून शेतीवर काम करण्यासाठी मजूर उपलब्ध करुन द्यावेत अशी मी या निमित्ताने शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, महाराष्ट्रात अनेक ठिकाणी तलाव आहेत. आमचा पूर्व विदर्भ तर तलावांनी व्यापलेला आहे. या तलावांची अवस्था अत्यंत वाईट आहे. या तलावामध्ये गाळ साचलेला आहे. या तलावातील गाळ काढण्याचे काम रोजगार हमी योजनेमार्फत घेता येऊ शकेल. परंतु त्याकडे शासनाचे दुर्लक्ष झालेले आहे. गाळ साचल्यामुळे आज तलावामध्ये एक थेंबही पाणी नाही. नाही तर या मोसमामध्ये आमच्याकडील सर्व तलाव पाण्याने भरलेल्या स्थितीत असत आणि दुसरे पीक येई पर्यन्त त्या तलावातील पाण्याचे नियोजन शेतकरी करीत असत.

सभापती महोदय, कोल्हापुरी बंधारे आणि पाझर तालावांच्या दुरुस्तीसाठी बजेटमध्ये नेहमी तरतूद केली जाते. परंतु ही तरतूद अतिशय कमी असते. शासनाने राज्यात शेततळी बांधण्याचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे. केवळ 3 हजार शेततळी बांधण्यात येणार आहे. खरे तर अशा दुष्काळी परिस्थितीमध्ये राज्यात 3 लाख शेततळी बांधण्याची गरज आहे. या दुष्काळी परिस्थितीमध्ये शेतक-याला वाचवायचे असेल, भूगर्भातील पाण्याची पातळी वाढवायची असेल तर जास्तीत जास्त शेततळी बांधली गेली पाहिजेत, पाणी अडवा आणि पाणी जिरवा हा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर राबविला गेला पाहिजे. खरे सांगायचे तर पाणी अडवा आणि पाणी जिरवा हा कार्यक्रम फक्त कागदावरच राहिलेला आहे. 10-15 वर्षापूर्वी पाणी अडविण्यासाठी आणि जिरविण्यासाठी जी काही नालाबंडिगची कामे केली होती ती आज अस्तित्वात नाहीत. पुनश्च नाल्या खोदल्या गेल्या नाहीत. दुष्काळी परिस्थितीमध्ये अशा कामाकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

....नंतर श्री. गिते...

अप्रधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर....

सभापती महोदय, महाराष्ट्रात दुष्काळी परिस्थितीमुळे अनेक गंभीर प्रश्न निर्माण झालेले आहेत. त्या परिस्थितीबाबत या सभागृहात आपण चर्चा करीत आहोत आणि त्या बाबतीत माननीय मंत्री महोदय उत्तर देतील. परंतु आजच्या चर्चेतून काही फलश्रुती पदरात पडेल काय हा खरा महत्वाचा प्रश्न आहे. दुष्काळी परिस्थितीत राज्यातील जनतेला शासनाच्या धान्य कोठारातून धान्य उपलब्ध करुन दिले जाईल. शासनाच्या धान्याच्या कोठाऱ्यांमध्ये मोठया प्रमाणात धान्य आहे. धान्य ठेवण्यासाठी शासनाकडे गोडाऊन्स उपलब्ध नाहीत. परंतु आज संपूर्ण राज्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे, जनावरांसाठी चाऱ्याची टंचाई निर्माण झाली आहे, ती टंचाईची परिस्थिती दूर करण्यासाठी शासनाने कशा पध्दतीने नियोजन आखलेले आहे यासंबंधी माननीय मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात माहिती द्यावी. दुष्काळी परिस्थिती फक्त पश्चिम महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण राज्यात निर्माण झाली आहे. राज्यातील 40 टक्के भागात दुष्काळी परिस्थिती आहे. दुष्काळी परिस्थिती बाबत सत्ताधारी पक्षाकडून या सभागृहात प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. परंतु या प्रस्तावाच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी ज्या काही उपयुक्त सूचना केल्या आहेत, त्या सूचना राज्य शासनाने मान्य केल्या पाहिजेत अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, माननीय कृषी मंत्री गोंदिया जिल्हयात एका कार्यक्रमासाठी आले होते. त्यावेळी त्यांनी अनेक घोषणा केल्या आहेत. त्या घोषणाची अंमलबजावणी संपूर्ण महाराष्ट्रात केली गेली तर सध्याच्या दुष्काळावर मात करण्यासाठी निश्चितपणे मदत होईल असे मला वाटते. त्या कार्यक्रमात आपण अत्यंत चांगले विचार मांडले होते, त्या विचारांचे मी स्वागत करतो. परंतु ते विचार प्रत्यक्षात कृतीत आणले पाहिजे अशी माझी माननीय कृषी मंत्र्यांना पुन:श्च विनंती आहे.

सभापती महोदय, धान उत्पादक शेतकऱ्यांना हलक्या धानाच्या बियाण्याची गरज आहे. शासनाने शेतकऱ्यांना त्या बियाण्यांची पूर्तता करावी, शेतकऱ्यांना कर्ज पुरवठा करावा, सावकारी कायदा केंद्र शासनाने मंजूर केला नसला तरी मला सभागृहाच्या माध्यमातून राज्य शासनाला विनंती करावयाची आहे की, सावकारी कायद्याच्या बाबतीत तात्पुरता अध्यादेश काढावा आणि त्याची अंमलबजावणी करावी. आज सावकार मोठया प्रमाणात व्याज घेऊन शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर....

करुन देत आहेत. त्या सावकारांना कर्ज देण्यापासून थांबविले पाहिजे. त्यांना गजाआड केले पाहिजे. या बाबतीत शासनाने कठोर धोरण घेतले पाहिजे. जे लायसन्सधारक सावकार आहेत, त्यांनी कमी दराने शेतकऱ्यांना कर्ज द्यावे असे शासनाने सांगितले पाहिजे. शेतकऱ्यांना सावकाराच्या कर्जातून मुक्त करण्याचा प्रयत्न या शासनाच्या माध्यमातून झाला पाहिजे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावास माननीय कृषी मंत्री उत्तर देणार आहेत. त्या उत्तराच्या अनुषंगाने आश्वासने देण्यात येतील, त्या आश्वासनांची माननीय मंत्री महोदय तातडीने पूर्तता करतील अशी अपेक्षा व्यक्त करतो. सभापती महोदय, आपण मला या चर्चेत भाग घेण्याची संधी उपलब्ध करुन दिली त्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापतीस्थानी माननीय उप सभापती

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्र विधान परिषद नियम 260 अन्वये ज्येष्ठ सदस्य श्री. हेमंत टकले यांनी आणलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी राज्यातील दुष्काळाच्या बाबतीत राज्य शासनाला वेगळी दिशा देणारे विचार सभागृहात मांडले. आपण पाणी कशा पध्दतीने वाचवू शकतो, त्या संदर्भातील संशोधन आणि पाण्याचे न्याय वाटप या तीन बाबी प्रामुख्याने त्यांनी या ठिकाणी मांडलेल्या आहेत.

सभापती महोदय, मी शासनाचे लक्ष दोन बाबीकडे वेधतो आहे. कृषीसाठी वेगळा अर्थसंकल्प करावा अशी मी माननीय कृषी मंत्र्यांकडे मागणी करतो. त्याचप्रमाणे दुष्काळासाठी स्थायी आदेश शासनाने काढलेले आहेत. जमीन महसूल वसुलीला स्थगिती दिली आहे. सहकारी संस्थाच्या कर्ज वसुलीस स्थगिती दिलेली आहे. शेतकऱ्यांना वीज बिलात 33 टक्के सवलत दिली आहे.

यानंतर श्री. कानडे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

थकबाकी असलेल्या ग्राहकांची वीज तोडण्यात येऊ नये,रोहयोची कामे घेऊन मागेल त्याला काम आणि मागणी तेथे काम देणे, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ, पाटबंधारे प्रकल्पातील पाणी केवळ पिण्यासाठी राखीव, चारा डेपो सुरु करुन खरेदीसाठी शेतकऱ्यांना 75 टक्के अनुदान, बीपीएल शेतकऱ्यांना चारा खरेदीसाठी 90 टक्के अनुदान, पाणीपुरवठा योजनेच्या दुरुस्तीचे अधिकार 15 लाखापर्यंत जिल्हाधिकारी यांना व 30 लाखापर्यंत विभागीय आयुक्तांना, या स्थायी आदेशांचे कायद्यात रुपांतर करा अशी माझी यानिमित्ताने मागणी आहे. ज्युनिअर इंजिनिअरकडे गेलो आणि त्याला सांगितले की, वीज कनेक्शन तोडू नका. शासनाने तसा शब्द दिलेला आहे. तर तो सांगतो की, मला शासनाचे परिपत्रक आलेले नाही. शैक्षणिक शुल्क माफ करण्यासाठी हेडमास्तरकडे गेलो तर तो म्हणतो की मला तसे परिपत्रके आलेले नाही. म्हणून दुष्काळात जे निर्णय घेतले जातात त्याचे कायद्यात रुपांतर करा. दुष्काळासंदर्भातील कायदा करा. दुष्काळाची डेफिनेशन काय हे स्पष्ट करा. अमुक एका तारखेपर्यंत पाऊस आला नाही तर टंचाईची तारीख जाहीर करा. अमुक एका तारखेपर्यंत पीक आले नाही तरी दुष्काळ जाहीर केला जात नाही. याठिकाणी चर्चा झाली.दुष्काळ जरी जाहीर झालेला नसला तरी फी माफ होईल, वीज कनेक्शन तोडले जाणार नाही अशा प्रकारचे आदेश दिलेले आहेत.

कृषीमंत्री महोदयांना आजच्या प्रसंगी विनंती आहे की, यासंदर्भात कायदा करा. तरच त्याचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणार आहे. किती खात्यांचा दुष्काळाशी संबंध आहे याचा विचार केला तर 9 खात्यांचा संबंध येतो. महसूल, कृषी, पुनर्वसन, वीज, पाणी पुरवठा, शिक्षण, रोहयो, पाटबंधारे या खात्यांचा दुष्काळाशी संबंध येतो. या खात्यांमध्ये समन्वय असणे आवश्यक आहे. आजच्या प्रसंगी मी माननीय कृषीमंत्र्यांना विनंती करीन की, 60 ते 65 टक्के जनता कृषीवर अवलंबून आहे. त्यासाठी वेगळा अर्थसंकल्प करण्याची सुरुवात करु या. हे काम सोपे नाही याची मला जाणीव आहे. वेगवेगळया खात्यामधून कोणते काम कोणत्या खात्याकडे द्यावे आणि कृषी अर्थसंकल्पात कोणत्या बाबी घ्याव्यात हे थोडेसे अडचणीचे होईल. परंतु निदान सुरुवात तरी करु या.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ....

1952 चा दुष्काळ मला आठवत नाही. 1972 चा दुष्काळ धान्याचा होता. गेल्या 10 वर्षात जो दुष्काळ पडत आहे तो पाण्याचा आहे. धान्याचा दुष्काळ नाही. अमेरिका आणि अरब सारखे देश आफ्रिकेमध्ये जाऊन शेती भाडयाने घेतात. अमेरिका आणि अरब कंट्री दुसऱ्या देशात धान्य मिळावे म्हणून शेती विकत घेतात. कोणत्या देशात ही घटना घडली त्या देशाचे नांव मला आठवत नाही परंतु आफ्रिकेतून ज्यावेळी पहिल्यांदा अरब कंट्रीमध्ये धान्याचे जहाज आले त्यावेळी ते स्वीकारण्यासाठी आणि सत्कार करुन त्या जहाजाचे स्वागत करण्यासाठी तेथील राजा स्वत: पोर्टवर उभा होता.

महाराष्ट्र आज अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण आहे. प्रश्न पाण्याच्या नियोजनाचा आहे. पाण्याचे नियोजन करणे अत्यंत आवश्यक आहे. गेल्या 20 वर्षे सातत्याने ज्या तालुक्यात दुष्काळ पडत आहे त्यांची यादी द्या. गेली 10 वर्षे ज्या तालुक्यात दुष्काळ पडला त्याची यादी द्या. एखाद्या वर्षी सुध्दा दुष्काळ पडला नाही त्या तालुक्यांची यादी द्या. गेली पाच वर्षे ज्या तालुक्यात दुष्काळ पडला त्याची यादी द्या. पुढे नियोजन महत्वाचे आहे. कृषी खात्यापेक्षा पाणीपुरवठा खाते नियोजनाच्या दृष्टीने पुढील काळात महत्वाचे ठरणार आहे. पाटबंधारे खाते अत्यंत महत्वाचे आहे. आज 80 टक्के कामे पूर्ण झालेली आहेत. कोकणासाठी 2000कोटी रुपये मागितले आहेत, खानदेशासाठी 2000 कोटी रुपये आवश्यक आहेत. त्याचा दुष्काळाशी संबंध नाही. पाण्याचे नियोजन जोपर्यंत होत नाही तोपर्यंत दुष्काळ हटणार नाही.

"पाणी,पाणी,पाणी,
पाणी पाणी, पाणी,
पाण्यासाठी फिरतो अनवाणी,
सांगतो कहाणी, ऐकेना कोणी."

यानंतर श्री.भोगले

अप्रकाशित पत्र / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी.....

पाणी महत्वाचे आहे.

मेहमान आये घर को, न है बूंद-बूंद पानी
और हमारी इज्जत का हो रहा है पानी-पानी.

आतापर्यंत पैशाचे नियोजन झाले. यापुढे पाण्याचे नियोजन करावे लागेल. पाण्याच्या नियोजनाचे काम झाले तर अत्यंत चांगल्या पध्दतीने आपण दुष्काळाचा सामना करु शकतो.

सभापती महोदय, शेततळ्यासाठी सरकार पैसा द्यायला तयार आहे, परंतु कोणताही शेतकरी शेततळे घ्यायला इच्छुक नाही. त्याला वाटते की, शेजारच्या शेतकऱ्याने शेततळे घ्यावे. प्रत्येक गावात किमान पाच शेततळी तयार करण्याची जबाबदारी ग्रामपंचायतींवर सोपविली पाहिजे. लॉटरी पध्दतीने पाच शेततळी त्या गावातील कोणत्या शेतकऱ्याच्या शेतात घ्यायची याचा निर्णय घेण्यात यावा. 100 टक्के अनुदान मिळत असताना शेतकरी शेततळी घ्यायला तयार नाही. कारण त्याची जमीन जाते. 2000 चौ.मी. किंवा 500 चौ.मी.जी काही असेल ती जमीन शेततळ्यासाठी लागत असल्यामुळे तो शेततळे घेत नाही. शेततळे होत नाही तोपर्यंत जमिनीखाली पाण्याचा ओलावा असणार नाही.

सभापती महोदय, रोजगार हमी योजना मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मी त्यांना विनंती करतो की, रोजगार हमी योजनेमधून जलसंधारणाची कामे घेण्यात यावीत. नरेगा योजनेच्या माध्यमातून इतर राज्यांनी केंद्राकडून 5 ते 6 हजार कोटी रुपयांचा निधी पदरात पाडून घेतला. रोहयोच्या मजुरीच्या दरात मजूर उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे शासनाने 10 ते 15 रुपये जास्त मजुरी दिली तर मजूर उपलब्ध होतील. 1 हजार कोटी रुपये द्यावेत आणि 5 हजार कोटी रुपये केंद्राकडून मिळवावेत. मजुरांची मजुरी वाढविण्यात यावी. राजस्थान, मध्यप्रदेश राज्यात नरेगा योजनेच्या कामासाठी मजूर मिळतात. महाराष्ट्रातील मराठवाडा, विदर्भ, खानदेश भागात रोहयोच्या कामासाठी मजूर उपलब्ध होत नाहीत. नरेगा योजनेच्या माध्यमातून 5 ते 6 हजार कोटी रुपये राज्य शासनाला मिळू शकतात. फक्त रोहयोच्या कामावरील मजुरीची रक्कम वाढविली पाहिजे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी.....

सभापती महोदय, ठिबक व स्प्रिंकल हे सध्या परवलीचे शब्द झालेले आहेत. 10 वर्षानंतर सरफेस वॉटर थांबले पाहिजे. हा विषय कायद्यात रुपांतरित करावा लागेल. 10 वर्षानंतर पाटबंधाऱ्याच्या माध्यमातून जे पाणी उपलब्ध होते ते कालव्यातून न येता पाईपद्वारे किंवा स्प्रिंकल वा ठिबक पध्दतीने द्यावे लागेल. पाण्याचे 10 वर्षाचे नियोजन केले तर ते अत्यंत महत्वाचे राहील. जग, जंगल आणि जमीन हे अत्यंत महत्वाचे असून आता जंगल राहिलेले नाही. विदर्भात दिवसेंदिवस जंगलाचे प्रमाण कमी होत आहे. खानदेशात 22 टक्के जंगल असणे आवश्यक असताना 16 ते 17 टक्के जंगल अस्तित्वात आहे. झाडे असतील तर हवेत गारवा देखील असतो. मातीत पाणी असते. हवेत गारवा पाहिजे. त्या दृष्टीकोनातून प्रयत्न झाले पाहिजेत.

सभापती महोदय, राज्यात चार कृषी विद्यापीठे आहेत. माझ्या माहितीप्रमाणे राहुरी कृषी विद्यापीठाने संशोधन करुन 28 दिवसात तयार होणारे चवळीचे वाण तयार केले आहे. प्रत्यक्षात दोन ते तीन महिन्यात चवळीचे पीक तयार होते. ऊसाचे पीक 12 ते 14 महिन्यानंतर तयार होते. एका महिन्यात तयार होणाऱ्या पिकाचे वाण त्यांनी निर्माण केले आहे. लघु मुदतीच्या आणि कमी पावसाच्या पाण्यावर तयार होणाऱ्या वाणाची निर्मिती केली पाहिजे. आज राज्यातील 70 टक्के पाणी ऊस पिऊन जातो. कमी पाऊस आणि कमी पाण्यात पिके कशी येतील या संदर्भात संशोधन झाले तर फार महत्वाचे होईल.

सभापती महोदय, आपल्याकडून धूळ पेरणी केली जाते. पाऊस येईल हे गृहित धरुन धूळ पेरणी केली जाते. 30 ते 40 दिवस पाऊस आला नाही तरी बियाणे उगवेल अशा पध्दतीने संशोधनात्मक काम झाले पाहिजे. दुबार पेरणी करणे शेतकऱ्यांना परवडत नाही. 300 रुपयांपेक्षा कमी दरात पेरणी करण्यास माणसे उपलब्ध होत नाहीत. 400 ते 450 रुपयांपेक्षा कमी दराने बैलजोडी उपलब्ध होत नाही. बियाणे पेरण्यासाठी 200 ते 250 रुपयांपेक्षा कमी दराने महिला काम करण्यास तयार नसतात. दुबार पेरणी करायची म्हणजे शेतकरी मेला. दुबार पेरणी करावी लागणार नाही या दृष्टीने काळजी घेण्याची गरज आहे.

सभापती महोदय, रोपवाटिकेला प्रोत्साहन दिले पाहिजे. ग्रीन हाऊसमध्ये रोपे तयार केली जातात. 20 ते 30 दिवसात तयार होणारी रोपे विक्री करण्यासाठी उपलब्ध होतात. एक रोप 1 रुपया 5 पैसे किंवा 1 रुपया 10 पैसे दराने विकले जाते. त्याऐवजी ते 30 ते 40 पैशात उपलब्ध करुन दिले पाहिजे.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी .....

शेतीची पारंपारिक पध्दती बंद करुन जेव्हा पाऊस पडेल तेव्हा रोप वाटिकांमधील रोपे लावण्याची पध्दत सुरु करावी त्यामुळे दुबार पेरणीची गरज पडणार नाही. शासन सध्याच्या परिस्थितीत अशा रोप वाटिकांना 25 ते 30 टक्के अनुदान देते अशी माझी माहिती आहे. पण या रकमेत वाढ केली आणि कृषी पदवीधरांच्या माध्यमातून प्रत्येक गावाला आवश्यक तेवढ्या रोप वाटिका तयार केला तर शेतकऱ्यांना बियाणे विकत घेणे वगैरे त्रास होणार नाही.

यानंतर माझा मुद्दा असा आहे की, पाटबंधारे प्रकल्पाच्या अंतर्गत जेवढे कॅनॉल्स आहेत त्यातून शेतीला पाणी देण्याची सोय असते पण त्या चाऱ्याची दुरुस्ती होत नसल्यामुळे भरपूर पाणी वाया जाते. माझी लाभक्षेत्र विकास मंत्र्यांना विनंती आहे की, शेतीला देण्यात येणाऱ्या पाण्याचे नियोजन कसे केले व किती एकर जमीन भिजते याचा विचार केला तर 25 ते 30 टक्क्याच्या वर जमीन भिजत नाही. वास्तविक पाण्याचे वाटप सहकारी पाणी वाटप संस्थांच्या माध्यमातून सरकारने करावे असा नियम आहे पण त्याचा किती फायदा होतो याकडे लक्ष दिले पाहिजे. याचे कारण म्हणजे जास्तीचे पाणी दिले जाते त्यामुळे जमीन क्षारपट होते व जमिनीचा कस खराब होतो. अशा परिस्थितीत पाणी किती दिले पाहिजे याची जागरुकता शेतकऱ्यांमध्ये निर्माण करणे आवश्यक आहे. क्रॉपिंग पॅटर्न कसा असावा याबाबत नियम नाही पण त्यात एक महत्वाची गोष्ट म्हणजे जनावरांसाठी चारा मुबलक प्रमाणात उपलब्ध होत नाही. त्यामुळे जनावरे अर्धपोटी राहतात. वास्तविक ज्वारीच्या उत्पन्नापेक्षा कडब्याचे उत्पन्न जास्त प्रमाणात होते. एका एकरात पाच हजार रुपयाची ज्वारी मिळत असेल तर दहा हजार रुपयाचा कडबा मिळतो. आमच्या सातपुडा भागातून चारा आणण्यासाठी दरवर्षी दोनशे ते तीनशे बैलगाड्या जात असतात. त्यामुळे जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न फार महत्वाचा ठरणार आहे. माझी या निमित्ताने अशी सूचना आहे की, बाराही महिने हिरवा चारा मिळावा अशी व्यवस्था करावी. ज्याप्रमाणे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न महत्वाचा आहे त्याप्रमाणे शेतीसाठी लागणाऱ्या जनावरांना जगविण्याची गरज आहे, यादृष्टीने विचार करावा अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : महोदय, मार्च महिन्यातील अर्थसंकल्पिय अधिवेशनात दुष्काळाच्या प्रश्नावर खास करुन पाणी टंचाईवर चर्चा झाली होती व त्यानंतर शासनाने जी.आर. देखील काढले. या 20 एप्रिल ते 20 जून या तीन महिन्याच्या काळात मी सांगली जिल्ह्यातील आटपाडी भागात जाऊन आले. तसेच यवतमाळ जिल्ह्यातील घाटंजी, पांढरकवड व केळापूर भागात देखील जाऊन आले. त्याचप्रमाणे सोलापूर मधील पंढरपूर, बीडमध्ये परभणी प्रत्यक्ष जाऊन पाहणी केली. त्याचबरोबर शिवसेने आमदार आणि खासदार यांनी सुध्दा मराठवाडा व विदर्भाचे दौरे केले. शिवसेना कार्यकारी अध्यक्ष माननीय उध्दवजी ठाकरे, युवा नेते आदित्य ठाकरे यांनी काही ठिकाणी दौरे केले. त्या पाहणीतून काही अहवाल प्राप्त झाले. तसेच वेगवेगळ्या निवेदनांच्या माध्यमातून या भागातील लोकांचे जे प्रश्न दिसून आले त्याबद्दल सभागृहासमोर वस्तुस्थिती मांडतांना मला खेद होतो. मोखाडा तालुक्यातील पार्वती जाधव पाण्यासाठी चेंगराचेंगरीत मृत्युमुखी पडते त्याचबरोबर नाशिक जिल्ह्यातील वळवाडी येथील रखुमाई सोनावणे हिचा देखील 9 तारखेला पाण्यासाठीच मृत्यू होतो. यवतमाळ, केळापूर तालुक्यातील काठोडा या गावातील 40 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. निवेदनात गावकऱ्यांनी खास करुन म्हटले आहे की, शासनाने या गावाला भेट द्यावी. माननीय कृषी मंत्री सभागृहात उपस्थित आहेत त्यांनी या विनंतीचा विचार करावा. मागील चार महिन्यात मी या जिल्ह्यात पाच वेळा जाऊन आले. पांढरकवडा भाग आत्महत्याग्रस्त भाग म्हणून ओळखला जातो. मी तेथील काही शेतकरी महिलांशी स्वत: बोलले. त्यातून असे समजले की, नापिकीमुळे या आत्महत्या होत आहेत. दुबार पेरणीचे संकट असल्याने या भागाला कशा प्रकारे दिलासा देणार आहात याची माहिती मंत्री महोदयांनी दिली पाहिजे. या निमित्ताने काही महत्वाच्या गोष्टींकडे मी मुद्दाम लक्ष वेधणार आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

सभापती महोदय, ज्या ठिकाणी गंभीर परिस्थिती निर्माण होते अशा ठिकाणी मंत्र्यांनी स्वत: भेट दिली पाहिजे अशी आपल्या सर्वांची अपेक्षा असते. माझ्या माहिती प्रमाणे माननीय कृषी मंत्री श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांनी कसारा येथील वाळयाचा पाडा या गावाला भेट दिली होती त्यावेळी त्या ठिकाणच्या एका विहिरीत तेल मिसळल्याचे दिसून आले होते. जनतेच्या आक्रोशाला माननीय मंत्री महोदयांना सामोरे जावे लागले होते. त्यामुळे यासंदर्भात माझी अशी मागणी आहे की, ज्या ज्या वेळी अशा घटना घडतात व त्यामुळे लोकांच्या हालअपेष्टात भर पडलेली असते त्या घटनेच्या बाबत संबंधित मंत्री महोदयांनी तपशीलवार नोंद घेतली पाहिजे. विहिरीमध्ये तेल मिश्रित पाणी सापडते त्यावेळी संबंधित विभागातील अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, गेल्या अधिवेशनापासून आतापर्यंत सिंचनाच्या संदर्भात चर्चा गाजते आहे. आपल्याकडे सिंचनाची अनेक कामे अपूर्ण राहिली असून सिंचनावर त्या त्या प्रमाणात खर्च झाला नाही म्हणून आपल्याकडे 0.1 पर्सेंट सिंचन झाले आहे. सिंचनाच्या संदर्भात श्वेत पत्रिका काढली जाईल असे सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे विधान आम्ही वाचले होते. परंतु यासंदर्भात अद्यापपावेतो अधिकृत घोषणा काहीही झालेली नाही.

सभापती महोदय, सातारा, सांगली या भागात कृष्णा खोऱ्याचे बरेच काम अपूर्ण आहे. या विषयाच्या संदर्भात केंद्रीय मंत्री श्री. प्रतीक पाटील यांचे विधान आम्ही वाचले असून त्यांनी सांगितले आहे की, केंद्राकडून पाहिजे तेवढा पैसा राज्यास देण्यास आम्ही तयार आहोत. मग प्रश्न असा निर्माण होतो की, राज्य सरकार म्हणते आम्ही एवढे कोटी रुपये खर्च केले, केंद्र सरकार पैसे देण्यास तयार आहे तर वेळेत कामे का पूर्ण होत नाही असा प्रश्न आमच्यापुढे पडतो. त्यामुळे यासंदर्भात वस्तुस्थिती दर्शक माहिती जनतेसमोर आली पाहिजे तसेच वाढीव बिले, कामे पूर्ण न होणे यासंदर्भात बोलावयाचे झाले तर उरमोडी धरणाच्या पाण्यासाठी बोगदा नाही. सातारा जिल्हयातील नीरा देवधर धरण तसेच उजनी, काळम्मावाडी या धरणात पाणी आहे परंतु पाणलोट विकासाच्या योजना न झाल्यामुळे जनतेचे प्रचंड हाल होत आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

सभापती महोदय, हे सर्व घडत असतांना कोंढाणे धरणाच्या संदर्भात मोठा वाद निर्माण झाला असून त्यासंदर्भातील वस्तुस्थिती जनतेला समजलेली नाही. मला या चर्चेत राजकारण आणावयाचे नाही. परंतु श्री. पी.साईनाथ यांनी म्हटले आहे की, "दुष्काळ आवडे सर्वांना" या प्रमाणे दुष्काळाच्या नावाने पॅकेज देण्यात येते. महाराष्ट्रातील दुष्काळाच्या संदर्भात केंद्रीय समिती सुध्दा महाराष्ट्रातील काही जिल्हयांना भेट देऊन गेलेली आहे. दुष्काळ निवारणासाठी आपण केंद्राकडे 2200 कोटी रुपयांची मागणी केली होती व प्रत्यक्षात आपल्याला केवळ 588 कोटी रुपयेच प्राप्त झाले आहे अशी आमची माहिती आहे. परंतु पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री श्रीमती ममता बॅनर्जी यांनी पंतप्रधानांच्या दोन मिनिटाच्या भेटीमध्ये 2000 कोटी रुपये मिळवून घेतले अशी परिस्थिती आहे.

सभापती महोदय, केंद्रीय समितीने पुणे,सातारा, सांगली, नगर,बीड, धाराशीव या जिल्हयाचा दौरा केला परंतु त्यांच्या दौऱ्यातून विदर्भाला तसेच उत्तर महाराष्ट्राला का वगळण्यात आले याची माहिती आम्हाला मिळू शकली नाही.

सभापती महोदय, पाण्याच्या नियोजनाच्या संदर्भात श्री. माधवराव चितळे यांनी फार मोठे काम केलेले आहे. सन 2005 मध्ये पाण्याचे नियोजन करण्यासाठी आपण कायदा देखील केलेला आहे. राज्य सरकारने महाराष्ट्र जलसंपदा नियमन प्राधिकरण केलेले आहे. नद्यांच्या पाणी वाटपाच्या संदर्भात पाण्याचा किती वापर होणार व त्यातून किती प्रमाणात कर जमा होणार,कशा पध्दतीने न्याय निवाडा होणार याचे निकष ठरविले गेले नाहीत, त्यामुळे फार वाईट परिस्थिती निर्माण झालेली आहे. यांसदर्भात मी सोलापूरच्या पोलीस अधीक्षकांना विचारले असता त्यांनी सांगितले की, आमचे सर्व पोलीस शेतीला पाणी दिले जाते की, नाही यावर लक्ष ठेवण्यासाठी नेमलेले आहेत. सोलापूर विरुध्द ऊस्मानाबाद असा वाद त्या ठिकाणी पेटलेला होता.

सभापती महोदय, आपण म्हणतो की, महाराष्ट्राचे विघटन होत आहे परंतु ज्या जिल्हयाचा जो अनुशेष आहे तो अनुशेष तालुक्यानुसार दिला जातो. परंतु काही जिल्हयांमध्ये जिल्हयांच्या नावाने अनुशेष घेऊन तालुके मात्र कायमस्वरुपी वंचित राहतात त्यामुळे शासनाने यासंदर्भात आत्मपरीक्षण केले पाहिजे असे मला वाटते.

...3..

डॉ. नीलम गोऱ्हे ....

सभापती महोदय, सांगली-सातारा जिल्हयातील लोक अनुशेषाच्या संदर्भात अतिशय नाराज आहेत. राजकीय दृष्टया ज्यांचे वर्चस्व जास्त आहे त्यांच्याच तालुक्यात पाण्याच्या योजना नेल्या जातात व बाकीचे तालुके पाण्याच्या योजने पासून वंचित राहतात अशी वस्तुस्थिती सर्व ठिकाणी आहे याकडे मला सदनाचे लक्ष वेधावेसे वाटते.

यानंतर श्री. भारवि....

अप्रधारित पत्र / परिपत्रकासाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

सभापती महोदय, पाण्याच्या टंचाईवर बोलत असताना कत्तलखान्याकडे जाणाऱ्या जनावरांची संख्या देखील वाढत आहे हे देखील तितकेसे खरे आहे. पुण्या सारख्या शहरामध्ये पाण्याची चोरी करण्याच्या घटना मोठ्या प्रमाणावर घडल्या आहेत. पुणेकरांचे आणि अन्य दुसऱ्या शहरावासियांचे असे म्हणणे आहे की, पुण्याचे पाणी आटले की लाटले ? लवासा आणि नांदेड सिटी सारख्या गृह प्रकल्पांना पाणी देण्यात आले आहे. चोरीला गेलेल्या पाण्याची गळती रोखण्यासाठी राज्य व महानगरपालिकांचे जे जे विभाग आहेत त्यांच्याकडून सातत्याने दुर्लक्ष होत आहे, ही वस्तुस्थिती आहे.

गडचिरोली जिल्ह्यामध्ये 221 हातपंप पाण्याचा हाहाकार असताना बंद होते. तसेच, कृष्णा खोऱ्याच्या निधीचा मुद्दा देखील महत्त्वाचा आहे. पाण्याच्या गळती संबंधातील चित्र स्पष्ट दिसत आहे. आज पाण्याचे नियोजन झालेले नाही. मी यवतमाळ जिल्ह्यातील घाटंजी गावामध्ये गेले होते. हे एक छोटेसे गाव आहे. येथे हिवरे बाजारचा उल्लेख वारंवार केला जातो. ज्या गावांमध्ये जलसिंचनाच्या चांगल्या योजना राबविल्या गेल्या आहेत, त्यांचा चांगल्या पद्धतीने कसा उपयोग करून घेऊ याचा देखील विचार करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, ज्या अधिकाऱ्यांकडून चारा डेपो उघडण्यास दिरंगाई झाली किंवा ज्यांच्या बद्दल तक्रारी देण्यात आल्या आहेत त्यांच्या विरूद्ध कारवाई झाली पाहिजे. मला सांगली जिल्ह्यात सांगण्यात आले की, ज्या अधिकाऱ्यांनी चुका केल्या आहेत त्यांची कधीही बदली होणार नाही. कारण नातेवाईक असणारेच अधिकारी तेथे बहुतेक वेळा आणले जातात. अशा अधिकाऱ्यांवर कारवाई का होत नाही हे सर्व जग जाहीर आहे. खास करून सांगली जिल्ह्यामध्ये माननीय कृषी मंत्र्यांकडून लोकांची अपेक्षा होती. त्यांनी तेथे स्वत: जाऊन लक्ष घालायला पाहिजे होते. तेथील तक्रारी संबंधातील अहवाल त्यांनी मागविला पाहिजे होता. याकडे देखील मी आपले लक्ष वेधत आहे.

शेवटी, मी एका छायाचित्राकडे आपले लक्ष वेधणार आहे. एका बैला बरोबर शेतकऱ्याने स्वत:ला नांगराला जोडून घेतले आहे. त्यात नमूद करण्यात आले आहे की, ... 2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

जोडीदाराला दाखवलास बाजार
जू तुझ्या खांद्यावर पाहून मी बेजार
घसा कोरडा ओला
डोळ्यात आटली आसावं
रणरणत्या उन्हात झालास तू बेजार

हे चित्र सांगोल्यातील आहे. अशाप्रकारे हृदयाला चटका लावणारे दृश्य आज आपल्याला राज्यात सर्व ठिकाणी पहायला मिळत आहे. ....(अडथळा)... विधान सभेचे सन्माननीय सदस्य श्री.गणपतराव देशमुख यांचा सांगोला मतदार संघ आहे, तर माननीय श्री.शरद पवार यांच्या लोकसभा मतदार संघामध्ये सांगोला तालुका येतो हे मी आपल्या निदर्शनास आणून देते. सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांना कुठल्याही राजकीय निर्णयात सामावून घेतले जात नाही असे चित्र आज तरी आम्हाला दिसत आहे. त्यांना कुठल्या कुठल्या निर्णयामध्ये सामावून घेतले जात हे त्यांनी सांगावे. येथे कुरघोडी करण्या पेक्षा माननीय राज्यपाल महोदयांनी दुष्काळी भागामध्ये दौरा केला पाहिजे असे जे बोलले गेले आहे त्याकडे मला लक्ष वेधायचे आहे. माझ्या माहिती प्रमाणे राज्यपाल महोदयांनी तेथे दौरा केलेला नाही. त्यांच्या प्रकृतीची कारणे असू शकतील. मला कोणतीही वैयक्तिक टीका येथे करायची नाही. ते आम्हाला आदरणीय आहेत. येथे त्यांची पुनर्नियुक्ती करण्यात आली. आपल्याला केंद्र शासनाकडून निधी पाहिजे होता. तो मिळालेला नाही. ज्या प्रश्नावरून आपण कामाला सुरूवात केली त्याबाबत जनतेला काय मिळाले तर पावसाची वाट पाहणारे शासन मिळाले. या पलीकडे दुसरे काहीच घडले नाही. धन्यवाद.

उप सभापती : सन्माननीय सदस्या डॉ.नीलमताई गोऱ्हे यांचे भाषण म्हणजे हृदयी अमृत, नयनी पाणी, नीलमताई नेहमीच करती गाऱ्हाणी. सभागृहाची आजची बैठक मी आता स्थगित करीत आहे. उद्या सदर प्रस्तावावर पुन्हा चर्चा होईल व उर्वरित सर्व सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडण्यासाठी अनुमती देण्यात येईल.

सभागृहाची बैठक उद्या गुरूवार, दिनांक 11 जुलै 2012 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 59 मिनिटांनी गुरूवार, दिनांक 12 जुलै 2012 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही